# महाभारत

मराठी अनुवाद : श्री. अशोक कोठारे

## खंड ६ : सभापर्व १



# महाभारत

## खंड ६वा : सभापर्व खंड पहिला

अशोक कोठारे

ई साहित्य प्रतिष्ठान

# महाभारत

## मराठी अनुवाद : श्री. अशोक कोठारे

ashokkothare@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न के यास कायदेशीर कारवाय होऊ शकते .

ई साहित्य प्रतिष्ठान
G1102, Eternity, Eleventh floor
Eastern Express Highway. Thane, 400604
**www.esahity.com**
**esahity@gmail.com**
©esahity Pratishthan®2018

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फॉरवर्ड करू शकता.

• हे पुस्तक वेबसायटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

**प्रकाशन : १० जुलै २०१८**

## – अनुवादकाचे दोन शब्द –

हिंदू मान्यतेत ज्या कांहीं रचना सर्वमान्य आहेत त्यातील एक महाभारत आहे. हिंदूंच्या सगळ्या परंपरा, चालीरिती, संस्कार ह्यांची मुळं महाभारतात आहेत. चौकस हिंदू व्यक्तिला बर्याचवेळा अमुक प्रथा कां प्रचारात आली असा प्रश्न पडतो परंतु, त्याचे समाधानकारक उत्तर मात्र त्याला मिळत नाही. चार जण चार कल्पना सांगतात व त्याचा गोंधळ उडतो. ते होऊ नये व त्या वहिवाटी, प्रथा ह्यांचे मूळ कोठे आहे ते लक्षात यावे ह्यासाठी हा प्रयत्न आहे, हा अनुवाद वाचला कीं, त्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरं मिळतील अशी माझी अपेक्षा आहे. म्हणून, मी महाभारत ह्या महाकाव्याचा मराठीत अनुवाद करण्याचे ठरवले. आता पर्यंत महाभारतावर बरेच लिहीले गेले आहे व ह्यापुढेसुद्धा पुष्कळ लिहीले जाईल पण महाभारत, जसें आहे तसें, वाचकांना मिळणे आवश्यक आहे व ते ह्या भाषांतराने मी वाचकांना देत आहे.

महाभारत हे एक महाकाव्य आहे. असें म्हणतात, हा सर्वात मोठा ग्रंथ आहे. मी मात्र अनुवाद करतांना ते गद्यात केले आहे कारण, मला कवितेचे अंग नाही. महाभारताच्या उपलब्ध प्रतिंत कांहीं भेद आढळतात. त्यासाठी सगळे भेद भाषांतरात घेतले आहेत म्हणजे, कांहीं राहून जावू नये.

माझे वाचक साधे मराठी आहेत ज्यांचे ज्ञान मोजके आहे असें गृहीत धरून मी अनुवादाची भाषा बाळबोध मराठी ठेवली आहे, त्यामुळें कोणालाही ते सहजपणे वाचता येईल व समजेल. कांहीं लेखक अशा ग्रंथाचे अनुवाद करतांना मुद्दाम प्राचीन (Archaic) भाषा वापरतात परंतु माझा असा अनुभव आहे किं, बहुतेक वाचकांना ते वाचण्यास त्रास होतो. म्हणून भाषा आपली नेहमीचीच ओघवती ठेवली आहे.

महाभारताचे अठरा पर्व आहेत व त्या आधीचा असा आदिपर्व म्हणून एक जोडला आहे. आदिपर्वामुळे महाभारतातील मुख्य कथाभागाचा पूर्वेतिहास वाचकांना समजेल. आदिपर्वात हिंदूंच्या अनेक पुराणांच्या मुळसुत्राची कल्पना येते. म्हणून तो माझ्यामते फार महत्वाचा आहे. मी मात्र अनुवाद करण्याच्या सोयीसाठी संपूर्ण महाभारत चाळीस खंडांत विभागून दिले आहे. त्यामुळें इंटरनेटवर चढवतांना व उतरवतांना सोपे जाईल अशी अपेक्षा

आहे. त्यात मूळ महाभारताचे खंड केले आहेत, त्यातील हा सहावा खंड आपण आता वाचणार अहात.

महाभारत कधी लिहीले गेले असा प्रश्न नेहमी ते वाचणार्याच्या मनात डोकावतो म्हणून त्याबद्दल थोडे लिहीत आहे. महावीर व गौतम बुद्ध आपल्याला माहीत आहेत, साधारणपणे इसवीसन पूर्व ५५० वर्षे ते दोघे महानुभाव होऊन गेले. जर महाभारताची रचना त्याआधीची असती तर त्याचा उल्लेख त्याकाळातील जैन व बुद्ध साहित्यात निश्चितच आला असता. बुद्धाला सांख्यमुनी असें संबोधतात. कारण, त्याचे तत्त्वज्ञान सांख्य विचारावर आधारीत आहे. व्यासांची भगवत गीता वेदांताचे तत्त्वज्ञान मांडते जे तुलनेने अर्वाचीन आहे व सांख्य विचार हा हिंदू तत्त्वज्ञानातील पहिला म्हणजे, सर्वात जास्त जुना समजला जातो. जर ते बुद्धाच्या आधीचे असते तर निश्चितच त्याचा प्रभाव बुद्धाच्या विचारांवर झालेला दिसला असता. विशेष करून हे दोघे राजघराण्याचे होते म्हणजे त्यांचे शिक्षण त्या काळातील सर्वोत्तम असणारच मग त्याच्या अभ्यासात गीता, कृष्ण हे आले असते. विशेषकरून जर ते दोघे धर्मावर काम करत होते तर हे अपेक्षित आहे. परंतु, प्रत्यक्ष असें दिसते किं, त्या दोघाच्याही तत्कालिन साहित्यात तो उल्लेख आढळत नाही. ह्याचा अर्थ महाभारत त्यानंतरच्या काळात रचले गेले असावे. दुसरा अंदाज असा कीं, वेदांत तत्त्वज्ञान लिहीणारे व्यास व महाभारतकार व्यास एकच व्यक्ति होती असें साधार मानले जात आहे. वेदांताचा सार महाभारतातील गीतेत आहे. वेदांत तत्त्वज्ञानाचा उगम त्याच सुमारास झाला हे सर्वमान्य आहे. महाभारत लिहीणारे व्यास सांगतात, वेदांचा विसर पडत चालला आहे तरी ते ज्ञान सोप्या भाषेत सामान्यानां समजावे म्हणून कथारुपातून ते उपलब्ध व्हावे ह्यासाठी त्यांनी महाभारत ही काल्पनिक रचना केली आहे. असें सर्व पहाता आपण अंदाज करू शकतो किं, महाभारत इसवीसन पूर्व ४००च्या सुमारास म्हणजे, अशोक सम्राटाच्या आधी लिहीले गेले असावे.

महाभारतात स्वतः व्यास एक पात्र अशी भूमिका करतांना दिसते. त्याप्रमाणे कृष्ण म्हणून जे पात्र आहे त्याचे सगळे कर्तव्य पहाता व्यास ज्यांचे खरे नांव कृष्ण द्वैपायन आहे, तेंच करीत आहेत असे वाटते. म्हणजे महाभारतकार व्यास त्यांच्या रचनेत दोन भूमिका

करतांत असें म्हणावे लागेल. त्यामुळें असे समजण्यास हरकत नसावी कीं, महाभारत त्यांच्या कल्पनांचाच एक भाग आहे.

माझ्या मते, अशा चर्चेत वेळ व्यर्थ न घालवतां हिंदूंनी महाभारतातील कथांतून काय सांगावयाचे आहे ते पहावे. एक ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून महाभारत उपयोगी येईल असें वाटत नाही. महाभारतातील कथा पहाता, त्यातील अतिरंजित प्रसंग हेंच सांगतात किं हे सगळे कपोलकल्पित आहे. परंतु, त्यांतून जे शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे तो अप्रतिम आहे.

आपल्याकडे इंग्रजांनी सांप्रतची शिक्षण पद्धती आणली त्या आधी हिंदूंतील द्विज, पाठशाळांतून प्राथमिक शिक्षण घेत असतं. त्यात प्रथम, अक्षर ओळख नंतर गणित व महाभारत शिकवले जाई (पुरोहित ब्राह्मणांच्या पाठशाळांतून त्याशिवाय कर्मकांडाच्या पोथ्या शिकवल्या जात) हे लक्षात घेतले पाहिजे. कारण, महाभारतातून माणसाला जीवन कसे जगावे त्याबद्दलचे मार्गदर्शन मिळते. महाभारत हे एक शैक्षणिक माध्यम म्हणून वापरात होते. आपल्या शिवाजी राज्यांचे शिक्षण महाभारतातूनच झाले होते. त्यातून जे नितीशास्त्र शिकवले आहे तेंच आपले शिक्षण होते. माझ्यामते, हांच उद्देश वाचकांनी डोळ्यासमोर घेऊन महाभारत वाचावे, धार्मिक ग्रंथ समजून भाबडेपणे वाचू नये कारण तो धार्मिक ग्रंथ नाही. महाभारतात अनेक बौद्धीकं आहेत जसें भगवत गीता, विदूर गीता, कणिक गीता वगैरे. ते सगळे जीवनाचे ज्ञान आहे म्हणून प्रत्येक शहाणा हिंदू, महाभारत वाचण्यात ठेवेल तर त्याचे भले होईल. त्यांना ते सहजपणे मिळावे म्हणून हा प्रपंच आरंभला आहे. ई–साहित्य त्याचे विनामुल्य वितरण करणार आहे म्हणून त्यांना शतशः धन्यवाद.

अशोक कोठारे

माझा ई–मेल – ashokkothare@gmail.com

ह्या वरून आपण माझ्याशी संपर्क करू शकता.

ह्या पुस्तकाचे मुद्रण करण्यासाठी अनुवादकाची आधी परवानगी घेणे आवश्यक आहे. न घेतल्यास तो गुन्हा ठरेल व त्यावर योग्य कारवाई होईल.

ह्या ई–पुस्तकाचे विनामुल्य वितरण ई–साहित्य करणार आहेत परंतु, हे ई–पुस्तक कोणीही कोणालाही विनामुल्य भेट देऊ शकतो.

माझे विचार व संशोधन कांहीं ब्लॉग मधून प्रसिद्ध करत असतो ते असें –

You are invited to visit my other blogs

Ashok Kothare, http://ashokkotharesblog.blogspot.com/

for stories

I reckon, http://kotharesviews.blogspot.com/ for philosophy

You may visit blog, Ideas and tips on any subject,

http://kotharay.blogspot.in/

for intelligent discussions.

My Marathi Blog, http://kothare-marathi.blogspot.in/ मला असे वाटते
Freedom of Expression, http://kothare-thinks.blogspot.in/



## – महाभारत  सभा पर्व खंड पहिला –

ह्या खंडातील प्रकरणे खालील प्रमाणे आहेत

सभापर्वातील पहिल्या भागातील पर्व – सभाक्रिया पर्व, लोकपाल सभाक्रिया पर्व, राजसूयारंभ पर्व, जरासंध वध पर्व, दिग्विजय पर्व, राजसूयिका पर्व, अर्घ्य हरण पर्व, शिशूपाल वध पर्व,

## सभाक्रिया पर्व सुरु

प्रिय वाचकहो, आदिपर्वानंतर सभापर्व सुरु होते. त्यात किती प्रकरणे आहेत त्यांची यादी वर दिलेली  आहे. आता सभाक्रिया पर्वाला आपण सुरुवात करत आहोत.

ॐ बोलून नारायण व नर ह्यांच्या पवित्र स्मृतीस स्मरून व मातादेवता सरस्वतीचे स्मरण करून त्यानंतर जय असा घोष करून पुढील भागाचे वाचन करणार आहोत.

वैशंपायन त्यानंतर बोलतात, त्या निर्जन अशा नदीच्या किनारी जेथे कृष्ण, अर्जुन आणि माया असुर एकत्र फिरत होते तेथे माया असुर (दानव) पुनः पुन्हा अर्जुन व दामोदराचे आभार मानत असतो, कारण त्याला त्यां दोघांनी खांडववनातून जीवनदान केलेले असते. (हा भाग आपण आदिपर्वात पाहिला आहे). माया असुर म्हणतो, "अहो कुंत्तीपुत्र , तुम्ही मला ह्या कृष्णापासून आणि अग्नीदेवापासून सुद्धा वाचवले नसते तर मी त्याच्या हाती मेलोच होतो. आता मला आज्ञा द्या मी त्या उपकाराच्या बदल्यात तुमची कोणती सेवा करू"?

ते ऐकून अर्जुन त्याला प्रेमाने सांगतो, "अहो श्रेष्ठ असुरा, तू आधीच सर्व उपकाराची फेड केली आहेस. त्यात हे असें बोलून भर घालत आहेस. तुझे कल्याण हो, तू मुक्त आहेस, तुला हवे तेथे जाऊ शकतोस. परंतु, माझ्याशी नेहमी चांगला रहा. कारण आता आपण एकमेकांचे हितचिंतक झालो आहोत".

ते प्रेमाचे उद्‌गार अर्जूनाच्या तोंडी झाल्यामुळें मायासुर बोलतो, "तुम्ही जे सांगता तो तुमचा मोठेपणा आहे. परंतु, मला मात्र वाटते किं, मी तुमची आणखीन कांहीं सेवा केली पाहिजे. तसे करण्यास परवानगी आपण दिली तर मी धन्य होईन. मी दानवातील विश्वकर्मा आहे हे आपण जाणताच, म्हणून अहो पंडुपुत्रा, माझ्या किमयेचा उपयोग करून तुमच्यासाठी कांहीं मोलाचे काम करण्याची इच्छा आहे". अर्जुन ते ऐकून त्याला सांगतो, "एवढे जर तुला वाटत असेल तर तू माझ्या मित्रासाठी, ह्या कृष्णासाठी, त्याला जे हवे ते करून दाखव कारण, ते माझ्यासाठी केल्यासारखेच होईल, असे बघ मी कधीही उपकाराची फेड वगैरे करून घेत नाही, कारण मी जे चांगले काम करतो ते विधात्याची सेवा ह्या दृष्टीने करत असतो, मी कधी कोणा व्यक्तिची सेवा अथवा मदत करत नाही. त्यामुळे त्याची फेड घेणे अप्रस्तुत ठरते".

वैशंपायन सांगतात, अरे जनमेजया, मायासुराची ती विनंती ऐकल्यावर अर्जुन विचारात पडला, तो कृष्णाकडे पहात राहिला. कृष्ण जो साक्षात ह्या सृष्टीचा निर्माता त्यावर थोडे थांबून नंतर बोलला, "आमच्या राजासाठी, युधिष्ठीरासाठी तू एक सभागृह निर्माण करावेस. त्याची रचना वगैरे सगळे तुझ्या कल्पनेनुसार असावे. परंतु, ते सभागृह असें अद्वितीय झाले पाहिजे किं, मानवात कोणीही तसें दुसरे बनवू शकणार नाही. त्या सभागृहाची नक्कल सुद्धा करता आली नाही पाहिजे. असें केलेस म्हणजे तुला समाधान मिळेल असे आम्हाला वाटते. त्याच्या शिल्पात मानवी, दैवी आणि आसुरी प्रभाव व्यक्त झाला पाहिजे.

वैशंपायन पुढे सांगतात, अर्जुन आणि कृष्णाचे ते बोलणे ऐकल्यानंतर मायासुराला अत्यानंद होतो. मायासुर ताबडतोब त्या दोघांना त्याच्या कल्पनेतील सभागृहाची प्रतिमा हवेत दाखवतो. ती पाहून ते दोघे संतुष्ट होतात. ती प्रतिमा एकाद्या देवांच्या सभागृहासारखीच होती. त्यानंतर कृष्ण व अर्जून युधिष्ठीराची व मायासुराची ओळख करून देतात. युधिष्ठीर मायासुराचे त्याच्या योग्यतेनुसार सन्मानपूर्वक स्वागत करतो. ते औपचारिक झाल्यानंतर, तो दितीचा मुलगा, त्या सन्मानाने खूप आनंदीत होतो. त्यानंतर तो माया त्या पांडवांना दानव वृषपर्व आख्यान ऐकवतो. त्यात त्याच्या घराण्याची मूळकथा आहे. त्यानंतर तो थोडा विश्राम करतो आणि त्वरित ते सभागृह प्रत्यक्ष उभे करण्याच्या

कामाला सुरुवात करतो. शुभमुहूर्त पाहून त्यांच्या इंद्रप्रस्थातील एक सुयोग्य जागा निवडून जी त्या पांडवांनासुद्धा आवडली, पाया भरणीचा यज्ञ तो सुरु करतो. हजार जाणकार ब्राह्मणांच्या शुभ हस्ते तो विधी संपन्न होतो. त्यांना अनेक दानं दिली जातात. निवडलेल्या जागेचा विस्तार पांच हजार चौरस हात एवढा असतो. आता त्या जागी एक भव्य अद्वितीय अशी वास्तु तो मायासुर उभी करणार असतो. जी वास्तु सर्वप्रकारच्या ऋतूंत सुयोग्य असेल.

अशारितीने सभागृह पर्वातील सभाक्रियाचा पहिला भाग संपला.

# सभापर्व भाग दुसरा

(सभाक्रिया पर्व पुढे चालू)

वैशंपायन सांगतात, जनार्दन ज्याची सगळें पुजा करतात, खांडवप्रस्थात बरेच दिवस मोठ्या मजेत राहील्यानंतर व कुंतीपुत्रांचा भरपूर पाहुणचार अनुभवल्यानंतर स्वतःच्या पित्यास भेटण्यासाठी निघण्याचा विचार करतो. सगळ्या सृष्टीवर नजर ठेवून असलेला तो, ज्याची सगळे पुजा करतात, युधिष्ठीर व कुंतीचा निरोप घेतो . कुंती त्याची आत्या असते म्हणून मोठ्या आदराने तिला वाकून वंदन करतो. कुंती त्याच्या माथ्याचे हुंगून चुंबन घेते. त्याला प्रेमांने मिठी मारते. त्यानंतर तो आपल्या बहिणीस भेटतो. त्यावेळी त्याचे डोळे अश्रूंनी भरतात. तिच्याशी तो कांहीं प्रेमाच्या व हिताच्या मार्मिक गोष्टी सांगतो. मधूर बोलणारी त्याची बहिण खाली मान घालून ते सगळे ऐकते व तिच्या सग्यासोयरांसाठी तिचा निरोप त्याच्याकडे देते. तिला शुभेच्छा देऊन तो वृश्नी घराण्यात जन्मलेला नरहरी द्रौपदी आणि पुरोहित धौम्यऋषींना भेटतो. त्यानंतर तो सर्वज्ञानी, अर्जूनाबरोबर कौरवांना भेटण्यास जातो. त्याच्या भोवती पांडव उभे होते व त्यात तो इंद्रासारखा उठून दिसत होता. तो त्याच्या रथाकडे जातो ज्या रथावर गरुडाचे चिन्ह होते. प्रवासास निघण्यासाठी ज्या निर्गमनाच्या विधी करावयाच्या त्या तो करतो. त्यासाठी तो प्रथम आंघोळ करतो. त्यानंतर कपडे घालतो व त्यानंतर त्याच्या योग्यतेचे दागिने परीधान करतो. त्यानंतर प्रथम ब्रह्माचे पुजन करतो व नंतर ब्राह्मणांचे आशिर्वाद घेतो. त्या ब्राह्मणांच्या गळ्यात माळा घालून त्याना अत्तर लावून व मंत्रोच्चार करून त्या ब्राह्मणांना वंदन करतो. तो विधी पूर्ण झाल्यावर कृष्ण त्या सगळ्यांचा निरोप घेण्यास तयार होतो. घराच्या बाहेर येऊन तो ब्राह्मणांना भांडभर दही व विविध फळं दान करतो. त्यानंतर धान्याचा शिधा देतो व त्यांना निर्गमनाच्या वेळच्या शुभेच्छा त्याला देण्यास विनंती करतो. त्यांना आणखीन कांहीं दान करून त्याच्या भोवती प्रदक्षिणा घालतो. हे सगळे औपचिरीक झाल्यावर कृष्ण त्याच्या रथात चढतो. त्या रथावर सोन्याचा मुलामा चढवलेला होता, त्याच्या ध्वजावरसुद्धा गरुडाचे चित्र होते. त्याशिवाय रथात कांहीं आयुधे स्वसंरक्षणार्थ ठेवलेली होती. त्यात गदा, तलवारी, सुदर्शन चक्र, शारंग नावांचे धनुष्य–बाणाचा भाता असें होते. त्याच्या रथाचे त्याचे आवडते दोन घोडे होते, शैव आणि सुग्रीव. तो कमलनयनी योग्य वेळ पाहून

प्रवासाला सुरुवात करतो. त्याच्या बरोबर युधिष्ठीर सुद्धा त्या रथात चढतो व कृष्णाच्या सारथ्याला, दरुकाला बाजूला करून स्वतः त्या रथाचे सारथ्य करण्यास बसतो. त्याबरोबर अर्जुनसुद्धा त्या रथात चढतो. अर्जुन हातात सोन्याचा दांडा असलेल्या चमरांनें कृष्णाला वारा घालतो. भिम व इतर पांडव नकुल व सहदेव आणि ब्राह्मण त्यांच्या रथातून त्याला सीमेपर्यंत साथ देण्यासाठी निघतात. कांहीं जबाबदार नागरिक सुद्धा त्यांच्या वाहनांतून कृष्णाला सीमेपर्यंत पोहोचवण्यासाठी निघतात. ती मिरवणूक पहातां असें वाटत होते, जणूकाय गुरू निघाले आहेत व त्यांच्या बरोबर त्यांचे शिष्य जात आहेत. ते दृष्य दिव्य होते. अशी ती मिरवणूक अर्धा कोस गेल्यावर रथ थांबतात आणि अखेरचा निरोप संस्कार सुरु होतो. कृष्ण अर्जूनाशी बोलतो व त्याला घट्ट आलिंगन देतो. युधिष्ठीराला नमस्कार करून मग भिम व शेवटच्या दोन भावांनासुद्धा आलिंगन देऊन त्याची रजा घेतो. ते पांडव सुद्धा त्याला मिठी मारतात, नकुल व सहदेव त्याच्या पाया पडतात. त्यांनंतर कृष्ण त्या सगळ्यांना परत जाण्याची आज्ञा करतो व ह्यापुढे तो त्याच्या सारथ्यासह द्वारकेला निघण्यासाठी त्या मित्रांना व त्यांच्या बरोबर आलेल्या सगळ्यांना परत जाण्यास सांगतो. त्याआधी कृष्ण युधिष्ठीराच्या पाया पडतो. परंतु, त्यामुळें ओशाळलेला युधिष्ठीर त्याला चटकन उठवतो व मिठी मारतो. त्याच माथा हुंगतो. सगळ्या पांडवांकडे पहात तो सांगतो किं, तो परत येण्यासाठी जात आहे. ते सगळे त्याला प्रवास सुखाचा होवो असे बोलतात. त्यानंतर कृष्ण त्याच्या रथातून थोडा पुढे जातो व मागे वळून पहातो ते दिसते कीं, ते सगळे त्या रथामागून पायी येत आहेत. ते पाहिल्यामुळें कृष्ण रथ थांबवतो व आश्वासन पूर्वक मोठ्याने बोलतो किं तो पुनः येणार आहे. ते बोलल्यानंतरच ते पांडव त्याला जाण्यास अखेरची परवानगी देतात नंतर ते सगळे त्याप्रमाणें परत फिरतात.

आता त्याचा रथ वेगांने त्याच्या घराकडे निघतो, द्वारका जी पृथ्वीवरील अमरावती होती. ते पांडव कृष्णाचा रथ नजरेच्या पलिकडे गेल्यावर ते सगळे आपल्या नगरीला निघतात. त्यांचे रथ मागून येतच असतात, त्यात ते चढतात व वेगांने इंद्रप्रस्थाकडे जातात. कृष्ण गेल्यामुळें त्या सगळ्यांना उगाचच अस्वस्थ झाल्यासारखे वाटत होते, त्यांचे परस्पर प्रेम अतुट होते. कृष्ण लवकरच त्याच्या द्वारकेला गरुडाच्या वेगांने पोहोचतो.

वैशंपायन सांगतात, युधिष्ठीर त्याच्या भावंड व इतर सहकार्यांसह त्याच्या नगरीला पोहोचल्यावर सगळ्यांना निरोप देतो व स्वतः द्रौपदीच्या कडे जातो. कृष्ण त्याच्या घरी आल्यावर त्याचे स्वागत करण्यासाठी महत्वाचे यादव त्याच्या भोवती जमा होतात. त्यात उग्रसेन असतो. तेथे पोहोचल्यावर तो कमलनयनी, प्रथम आपल्या त्या वृद्ध माता व पिता ह्यांना भेटतो आणि वंदन करतो. त्यानंतर मोठा भाऊ बलरामला भेटून आपल्या आसनावर जाऊन बसतो. तेथे त्याला भेटण्यास आलेले प्रद्युम्न, शम्व, निषथा, चारुदेशन, गद, अनिरुद्ध आणि भानु आणि सगळ्या इतर श्रेष्ठ यादवांची रजा घेऊन आपल्या पत्नीला, रुक्मिणीला भेटण्यास जातो.

अशारितीने सभापर्वातील सभाक्रिया पर्वाचा दुसरा भाग संपला.

# सभापर्व भाग तिसरा

(सभाक्रिया पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगतात, माया असुर अर्जूनाला बोलतो, "मी कांहीं समयासाठी रजेवर जाऊ इच्छितो, परंतु, थोड्याच काळात मी परत येणार आहे, रजेवर जाण्याचे कारण, आमचे दानव मैनक पर्वतातील कैलास शिखरावर तेथे बिंदू नदीच्या काठावर एक यज्ञ करत आहेत. मला तेथे जावे लागेल. आपल्या कामाबाबत सांगावयाचे म्हणजे, मी भरपूर मौल्यवान रत्नं व इतर वंड (कच्चा माल) जमा करून ठेवला आहे. ते सत्यवादी म्हणून ख्यातनाम अशा वृशपर्वाच्या वाड्यात जमवून ठेवले आहेत. मी पहाणार आहे तेथे गेल्यावर कीं, ते धन अजून तेथे आहे कां"? "ते सगळे ठरवून मी पुनः परत येणार आहे. त्यानंतर लगेचच मी आपल्या सभागृहाच्या कामास सुरुवात करणार आहे". "त्या सभागृहाच्या रचनेत अतिमौल्यवान असें रत्न, जवाहीर वापरले जाणार आहेत. त्यामुळें ते सभागृह प्रेक्षणीय आणि अतुलनीय होईल. आणखीन एक गोष्ट सांगतो, त्या बिंदू नदीमध्ये दानव राजांने एक भलामोठा सोटा लपवून ठेवला आहे. तो ब्रह्माच्या अजिंक्य शस्त्रांपैकीं एक आहे. तो खूप वजनदार आहे. तो एक सोटा हजार साधारण सोट्यांपेक्षा जास्त प्रभावी आहे. त्या महासोट्याची मुठ सोन्याची आहे". तो सोटा तुझ्या भिमासाठी एकदम योग्य होईल, जसा कृष्ण तुझ्यासाठी आहे. तेथे आणखीन कांहीं महत्वाच्या चिजा आहेत ज्या तुम्हाला भविष्यात खूप उपयोगाच्या ठरणार आहेत. त्यात एक शंखू आहे त्याचे नांव आहे देवदत्त. तो वरुणाचा आहे. त्या सगळ्या चिजा मी येतांना घेऊन येणार आहे". असें बोलून तो मायावी असुर निघून जातो. मायासुर ईशान्य दिशेने जातो. अर्जूनाला माहीत होते, कैलासच्या उत्तरेकडे असलेल्या डोंगरात रत्नं व माणके मोठ्या प्रमाणात आहेत, त्या भागाला हिरण्यश्रृंग असें नांव आहे. त्या शिखराच्या जवळ बिंदू सरोवर व त्यातून निघणारी नदी आहे. त्या नदीच्या किनार्यावर फार प्राचीन काळी राजा भगिरथ बरीच वर्षे रहात होता. तो गंगादेवीचे दर्शन मिळावे म्हणून तपस्या करत होता. तिने त्याला दर्शन दिले व त्यापासून तिला भागिरथी असें नांव तिच्या भक्ताच्या नांवावरून पडले. हे अर्जुन जाणत होता. त्याच किनार्याला देवांचा राजा शक्र एक शंभर महायज्ञ करत होता. तेथे शास्त्राची प्रथा नसतांना केवळ सौंदर्यवृद्धीसाठी बरेच सोने, रत्नं आणि आणखीन बरेच कांहीं तेथे

शक्रने साठवून ठेवले आहे. ते यज्ञ केल्यानंतर तो हजार अक्ष असलेला साचीचा पति, इंद्र त्याच्या त्या पदावर यशस्वीरित्या बसला. त्याच ठिकाणी ह्या विश्वाचा निर्माता सगळी सृष्टी उत्पन्न केल्यानंतर राहू लागला. तेथे त्याची पुजा असंख्य शक्ति करत असतात. त्यात अनेक देव असुर, राक्षस असें बरेच आहेत. त्याच ठिकाणी नर, नारायण, ब्रह्मा, यम आणि पांचवा स्थानू असा सर्वांनी हजारावे युग संपले तेव्हां त्यासाठीचे यज्ञ केले होते. सृष्टीत पुण्य व धर्म (कर्तव्य करण्याची प्रवृत्ती) प्रस्थापित व्हावी म्हणून खर्या मनाने वासुदेवांने अनेक वर्षे यज्ञ केले होते. त्या दरम्यान त्यांने यज्ञाच्या काठ्या आणि वेदी ठेवल्या आहेत ज्यांना सोन्याचा मुलामा आहे. त्यांची पुजा केली तेव्हां त्यांनी घातलेले सोन्याचे हार तेथे तसेंच पडून आहेत. त्यांचे तेज अवर्णनीय आहे. मी तेथेच जातो आहे. माया सांगतो, अर्जूनाला. "ते सगळे आपलेच आहे तर मी ते सगळे येथे आणून त्याचा वापर आपले सभागृह बनवण्यात करावा असें म्हणतो. त्यात अनेक अमुल्य शंख, स्फटीक, आहेत जे वृषपर्वाचे आहेत". तेथे मायासुर गेल्यावर तो ती अफाट धनसंपत्ती ताब्यात घेण्यासाठी प्रयत्न करतो. परंतु, त्या धनावर संरक्षक म्हणून यक्ष व राक्षस नेमलेले होते. त्यांचे कसे तरी समजावून समाधान करून तो ती सगळी संपत्ती ताब्यात घेतो. त्या सामुग्रीच्या मदतीने तो एक स्फटिकासारखा सुंदर महाल तयार करतो. त्यामध्यें योग्य जागी योग्य अशारितीने त्यांने ती आणलेली रत्नं, माणकं, सोने वगैरे कांहीं बसवून त्या सभागृहाचे सौंदर्य द्विगुणीत करतो. तिनही जगात ते देखणे सभागृह एकमेव झाले होते. मायासुर त्यांने आणलेला भलामोठा सोटा भिमाला भेट देतो. अर्जूनाला ते इंद्राचे मौल्यवान शंखू ज्याच्या आवाजाने सर्व पशु घाबरून थराथरा कापतात ते भेट करतो. त्या सभागृहाचे खांब सोन्याचे होते. त्याचे विस्तार क्षेत्र पांच हजार चौरस हात एवढे होते. त्याची शिल्पता अप्रतिम होती. जसें जणू साक्षात अग्नी किंवा सूर्य किंवा सोम त्याच्या चमकण्याने अंधार संपत होता. सूर्यापेक्षा जास्त तेजस्वी परंतु, चंद्रासारखे शितल असें ते होते. त्या प्रभेत स्वर्गिय आणि भूतलाचे मिश्रण होते. कांहीतरी अवर्णनीय असें सगळे होते. जसा तो तयार होत होता त्याची प्रभा सगळ्याना प्रभावित करत होती. मायानें मोठ्या मेहनतीने बांधलेला तो महाल विस्ताराने अवाढव्य होता, त्याचे आतील शिल्प देखणे होते. त्याच्या भिंती सोन्याच्या होत्या. त्या भिंतींवर सुंदर चित्रे काढलेली होती त्यामुळें त्या सभागृहाचे अंतरंग

विलक्षण आनंददायक झाले होते. उत्कृष्ट सामुग्री वापरलेली असल्यामुळें त्याकडे सतत पहात रहावे असें पहाणार्याला वाटावे, त्यातील एक एक कृती कौतुकास्पद होती. सुंदर कमानी, दरवाजे, सोन्याचे चमकणारे खांब असें सगळे दिव्य होते. त्याची स्तुती करण्यांसाठी शब्द अपुरे पडले असते. दशरथाच्या वंशातील थोर राजा, सुधर्माच्या राजमहालापेक्षा तो कितीतरी पटीने सुंदर होता. किंवा समजा, ब्रह्माच्या वाड्यापेक्षा सरस होता, काय वर्णन करावे त्याचे. त्या कामात त्याला आठ हजार किंकर जातीचे राक्षस मदत करत होते व तेंच त्याचे संरक्षण सुद्धा करत होते. ते राक्षस आकाराने प्रचंड होते, त्यांच्या शक्तिचे काय सांगावे, त्यांचे डोळे लालबुद होते, त्यांचे कान लांब व टोकदार जसें राक्षसांचे असतात तसें होते. पाहणार्याला भितीने कापरे उठत असें. ते राक्षस आकाशातूनच त्या वास्तुवर नजर ठेवून असतं. त्या महालात एक नितळ पाण्याचा हौद त्यांने तयार केला होता. त्यातील पाण्यात सुंदर रत्नजडीत कमळे, त्यांच्या बाजूला भलीमोठी पानं त्याला सुशोभित करत होती. त्या हौदात विविध जलपक्षी खेळत होते. त्याशिवाय त्यात विविध सुंदर मासे, सोनेरी कासवं असें बरेच प्राणी त्याची शोभा वाढवत होती. त्या तलावातून, उतरण्यासाठी एक सोन्याचा जिना वळसे घेत बाहेर येत होता. त्या हौदाचा परिसर संगमरवरी स्फटीकांनी बांधलेला होता. त्या प्रशस्थ हौदाच्या कडांनी लावलेली फुलांची रोपं तेथे वावरणार्या मंद झुळूकीने डुलत होती. त्या हौदाच्या बाजू व इतर भिंती रत्नजडीत केलेल्या होत्या. सभागृहाच्या सभोवार सुंदर दिसणारी उंच झाडे लावलेली होती. त्यांची हिरवळ, त्यांची फुलं असें सर्व विलोभनीय होते. त्यातील कांहीं वृक्षांच्या राळीमुळें मंदसा सुगंध आसमंतात पसरत होता. त्या मुख्य हौदाशिवाय आणखीन कांही लहान तलाव त्यांने बांधलेले होते, त्यात सुंदर काळी व शुभ्र हंस बागडत होती. त्याशिवाय चक्रवाक आणि करंदव जातीचे पक्षी सुद्धा तेथे पाळलेले होते, एकंदर त्यांच्या वावरण्यामुळें तो सबंध परिसर आनंददायक झाला होता. त्या विविध तलावात वाढत असलेल्या निरनिराळ्या प्रकारच्या कमळांतून येणार्या परिमलामुळें वातावरण आल्हाददायक होत होते. त्या परिसरामुळें पांडवांच्या आनंदात भर पडेल असे सगळे होते. मायासुराने तब्बल चौदा महीन्यात तो बांधून पूर्ण केला होता. त्यानंतर ते सभागृह बांधून पूर्ण झाल्याची वर्दी तो राजा युधिष्ठीराला देतो.

अशारितीने सभागृह पर्वातील सभाक्रिया पर्वाचा तिसरा भाग संपला.

# सभापर्व भाग चौथा

(सभाक्रिया पर्व संपले)

वैशंपायन सांगतात, त्यानंतर तो राजा युधिष्ठीर त्या सभागृहाच्या महालात प्रवेश करण्याचा मुहूर्त येतो. त्याआधी दहा हजार ब्राह्मणांना तो दुधभात व त्यावर तुप, फळं, कंदमुळं, डुकराचे मांस, गोमांस, आणि त्यावर लोणी व मध असा शिधा देतो. असा शिधा देऊन तो महान राजा त्या अनेक देशांतून आलेल्या ब्राह्मणांचे आशिर्वाद घेतो. त्या परदेशांतून आलेल्या ब्राह्मणांनी त्यांच्या त्यांच्या देशांतून तीळात मुरवलेली जिवंतीची भाजी (हिमालयातील वन क्षेत्रात सांपडते. वीर्यवर्धक म्हणून आयुर्वेदात वापरतात Dendrobium macraei), करंटोलाची भाजी आणि भात, त्यावर लोणी ह्यांच प्रसाद व त्याबरोबर इतर त्यांच्या देशांत सापडणार्या प्राण्यांचा मांसाहार व शिजवलेले खाद्य पदार्थ आणलेले होते त्या बरोबर सातुच्या भाकर्या होत्या. रिवाजानुसार ते सगळे राजाला देण्याचा विधी संपन्न होतो. त्याशिवाय बरीचशी त्या त्या देशाची वैशिष्ट्ये अशी पेये व इतर खाद्यपदार्थ आणि वस्त्रे, पोषाख, झगे, इतर प्रकारची कापडं राजाला त्या प्रतिनिधी ब्राह्मणांनी दिली. ते सगळे राजा फुलांनी सुशोभित करतो, असें दाखवण्यासाठी किं ते सगळे राजा आदरपूर्वक स्वीकारत आहे. ते सगळे विधीपूर्वक त्या ठिकाणी सादर झाले. त्यानंतर राजा त्या प्रत्येक ब्राह्मणाला एक हजार गाई दान करतो. त्या आदरतिथ्यामुळें प्रसंन्न झालेले ते सगळे ब्राह्मण उद्गारतात, "अहो भरता, काय हा शुभ दिवस आहे पहा". त्यांचा तो एकत्रितपणे केलेला उद्गार एवढा मोठ्याने झाला किं तो स्वर्गात पोहोचला. ते सगळे झाल्यावर तो राजा नवीन बांधलेल्या सभागृहात प्रवेश करतो. वास्तुदेवांची पुजा करतो. सुश्राव्य कवने आणि प्रसन्न करणार्या सुगंधाचा उपयोग त्यात केला गेला होता. त्यानंतर करमणूकीचे कार्यक्रम सुरु झाले, त्यात मल्ल, नकलागार, लढवय्ये, स्तुतीगान करणारे भाट असें सगळें राजाची स्तुती त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीने गाऊन व नाचून करू लागले. राजाचे स्वागत त्या नव्या सभागृहात केले जात होते. युधिष्ठीर त्याच्या चार भावंडांबरोबर जसा इंद्र स्वर्गात मिरवतो तसे मिरवत होते. त्यांच्या सोबत पाहूणे राजे जे त्या सोहळ्यासाठी आमंत्रित होते आणि कांहीं निरनिरीळ्या प्रांतातून आलेले थोर ऋषी बसले होते. त्या ऋषींत असित, देवल, सत्य, सर्पमाळी, महासीर, अर्ववसु, सुमित्र,

मैत्रेय, शुनक, वली, दल्व्य, स्थुलशिर, कृष्ण द्वैपायन, शुक, सुमंत, जेमिनी, पैल, व्यासांचे शिष्य, तित्री, याज्ञवल्क्य, लोमहर्षना, त्याच्या पुत्रासह, अप्सुहोर्न्य, धौम्य, अणिमांडव्य, कौशिक, दमोश्निश, त्रैवल्य, पर्नद, वरायनुक, मौंजय, वायुभक्ष्य, परासर्य, शरीक, वालिवक, सिलिवक, सत्यपाल, क्रितश्रम, जतुकर्ण, शिखावत, अलम्व, पंजतक, महान पर्वत, महान मुनी मार्कंडेय, पवित्रपानी, सवर्न, भालुक, गलव, जंघबंधू, रैभ्य, कोपवेग, भृगु, हरिवभ्रू, कौंडीन्य, वभ्रूमली, सनातन, काक्षिवत, अशिज, नचिकेता, औशिज, गौतम, पैंग, वरह, कुक्कुर, वेणूजंघ, कलप आणि कथ अशा सगळ्या उच्च परंपरा असलेल्या घराण्यातील वंशाचे ऋषी ते होते. त्यांचे वेद व वेदांगांचे अध्ययन पूर्ण होते. त्यांचे पवित्र नियमांचे ज्ञान आणि त्यातील व्यासंग विशेष होता. पवित्र, व्रतस्थ असें ते सगळे ऋषी युधिष्ठीराला शुभेच्छा देण्यासाठी उभे झाले. त्यांच्या पवित्र बोलण्यामुळें राजा प्रसंन्न झाला.

त्या उद्घाटन सोहळ्याला जे क्षत्रिय आणि राजे हजर होते त्यांची नांवे अशी, प्रसिद्ध मंजुकेतू, विवर्धन, संग्रामजित, दुर्मुख, उग्रसेन, कक्षसेन, पृथ्वीचा राजा अजिंक्य क्षेमक, कमथ, कंबोजचा राजा, महारथी कपन ज्याच्या धसक्याने यवनांचे धाबे दणाणले होते जसे कालकेय असुरांचे इंद्राच्या वज्रामुळें झाले होते,

जटासुर, मद्रकाचा राजा, कुंती , किराटांचा राजा पुलिंड, अंगदेशाचा राजा, वंगदेशाचा राजा, उधरचा राजा पंड्रा, अंधक, सुमित्र, महाशत्रुघ्न शैव, सुमन दुसरा किराटांचा राजा, यवनांचा राजा चनूर, देवरत, भोज, भिमरथ, कलिंगचा राजा श्रुतयुद्ध, मगधचा राजा जयसेन, सुकर्मन, चेकितन, पुरु, केतुमाता, वसुदन, वैदेह, क्रितक्षन, सुधर्मन, अनिरुद्ध, बलाढ्य श्रुतायू, अजिंक्य अनुपराजा, देखणा कर्मजित, शिशुपाल त्याच्या मुलाबरोबर आला होता, करुशचा राजा, त्याशिवाय वृश्नी घराण्यातील शूरवीर आणि देखणी तरुण मंडळी ज्यामध्ये उल्लेख करण्यासारखे अहुक, विप्रीथू, सदा, शरण, अक्रूर, कृतवर्मन, शिनीचा मुलगा सात्यकी, भिस्मक, अंकृती, द्युमत्सेन, सोमक घराण्याचे धनुर्धार्यातील प्रमुख कैकेय, यज्ञसेन असें महापराक्रमी क्षत्रिय आमंत्रित होते ते सगळे आवर्जून हजर होते. त्याशिवाय अर्जूनाच्या मार्गदर्शनात तयार झालेले भरपूर तरुण क्षत्रिय हरणाच्या कातड्याची वस्त्रं परिधान करून तेथे आले होते. ते युधिष्ठीराच्या भोवती पहारेकर्यासारखे

आदरपूर्वक उभे होते, त्या नव्या बांधलेल्या सभागृहात त्या कुंतीपुत्रांचे ते सगळे कौतुक करत होते. वृश्नी घरातील रुक्मीचा पुत्र प्रद्युम्न, शम्व आणि सत्यकीचा युयुधान तेथे होते. त्याशिवाय धनंजयाचे मित्र तिर्नवुरु, गंधर्व चित्रसेन, त्यांचे पदाधिकारी तेथे होते. त्या सोहळ्याची मजा लुटण्यासाठी कित्येक अप्सरा व इतर गंधर्व आले होते. त्यांना साथ देण्यासाठी किन्नर आले होते ते सगळे गाणीबजावणी आपापल्या वाद्यांसह करत होती ज्यामुळें त्या प्रसंगाला वेगळीच रंगत आली होती. बरीच आमंत्रित मंडळी त्यांच्या त्या सुमधूर संगीताने लुब्ध झाली होती, त्यात अनेक ऋषी तल्लीन झालेले दिसत होते. त्या सगळ्या प्रियजनांच्या सोबत्यांच्या दोस्त्यांच्या साथीने पंडुपुत्र एका वेगळ्या सुखानंदात गेले होते. त्यांच्या जीवनातील तो एक सुंदर दिवस होता. त्या सोहळ्याचा युधिष्ठीर केंद्रबिंदू झाला होता. जणू काय तो सोहळा त्याच्या राजरोहणाचाच असावा असें वाटत होते.

अशारितीने सभागृह पर्वातील सभाक्रिया पर्वाचा चौथा भाग संपला.

# सभापर्व भाग पांचवा

(लोकपाल सभाख्यान पर्व सुरु)

वैशंपायन सांगत असतात, सभा उद्घाटनाचा सोहळा संपल्यावर सगळे आमंत्रित आपापल्या ठिकाणी गेले होते व पांडव सभेत बसले असतांना त्याच्या बरोबर मुख्य गंधर्व होते, अशावेळी त्यांना भेटायला नारद मुनी आले. नारद त्यांना भेटल्यावर पांडवांना ते मोलाचा सल्ला देतात.

वैशंपायन सांगतात, त्याआधी नारदांचे श्रेय काय ते सांगतो. नारद वेद आणि उपनिषदांचे गाढे पंडीत आहेत, देव त्यांना पुजतात, त्यांचे पुराणाचे व इतिहासाचे ज्ञान विश्वसनीय असते, प्राचीन कल्पांत जे कांहीं घडून गेले त्या सगळ्याची त्यांना संपूर्ण कल्पना असते, त्यांचा न्याय, नितीशास्त्र आणि सहा अंगांचा (योग्य उच्चारण, व्याकरण, छंदरचना, तर्कशास्त्र, कर्मकांड, ज्योतिष) अभ्यास अतुलनीय आहे, परस्पर विरोधी विधानांतील साम्य ओळखणे व सामान्य अनुभवाची विशिष्ट अनुभवाशी सांगड घालणे हे तर्काचे तंत्र त्यांना चांगलेच अवगत असते, त्याच प्रमाणे, परस्पर विरोधी वाटणार्या परिस्थितीचा अर्थ काढण्यासाठी त्या प्रत्येक परिस्थितीचा स्वतंत्रपणे अर्थ काढून त्यातील साम्य पुढे आणणे, मुद्दे मांडण्याची चतुराई, आपल्या म्हणण्याबद्दल असलेला आत्मविश्वास, उत्तम स्मरणशक्ति, राजकारणातील नैतिकता व तर्क, उत्तम व हीण ह्यांचे चांगले मुल्यमापन, उपलब्ध माहितीच्या आधारे बिनचुक अंदाज बांधणे, उपलब्ध पर्यायातील जास्त चांगला कोणता ते ठरवण्याची तर्कशुद्ध बुद्धि, नारद प्रत्यक्ष ब्रह्माचे सल्लागार आहेत, धर्म (कर्तव्य), अर्थ, काम व मोक्ष ह्यांची सांगड प्रत्यक्ष जीवनांत कशी घालावयाची त्याचे ज्ञान, विश्वहित आणि वैयक्तिक हित ह्याची सांगड कशी घालावयाची त्याचे ज्ञान, अशा बहुतेक बाबीत नारदांचा हात कोणीही धरू शकत नव्हते. त्याशिवाय तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात सांख्य, आणि योग त्यांना चांगले माहीत असतं, देव आणि असुर ह्यांत झगडे लावून त्यांना एकमेकांशी लढवून त्यांची शक्ति नियंत्रित करण्याचे काम तो नारद ब्रह्मासाठी करीत असें. अंदाजावरून नेमके ओळखणे ह्या प्रकारच्या तर्कक्षेत्रात (शक्यता शास्त्र) नारद चांगलेच वाकबगार होते. राजकारणात नेहमी उपयोगी ठरणारे सहा डाव (तह, युद्ध, सैनिकी कारवाया, सीमेवरील छावण्यांचे नियंत्रण, गनिमी कावा आणि तटस्थता) ते चांगलेच

जाणत होते. नारदांचा स्वैर संचार असतो सगळ्याच विद्या, शास्त्र, संगीत, वाद्य, विविध कला ह्यांमध्यें. नारदांना येत नाही अथवा आवडत नाही असां एकही विषय नाही. ज्या विषयात बोलाल त्या विषयात ते निष्णात असतात. नारदांची विश्वभराची भटकंती विख्यात आहे. त्या भटकंतीमुळें त्याचे ह्या ब्रह्माने उत्पन्न केलेल्या सृष्टीचे ज्ञान पूर्ण आहे. असें सर्वगुण संपन्न नारद त्या ठिकाणी पांडवांना भेटण्यास आले त्यावेळी त्यांच्या सोबत परिजात, सौम्य, सुमुख आणि रैवत होते. ह्या त्याच्या सोबत्यांची योग्यता कांहीं कमी नाही हे अरे राजा, जनमेजया समजून घे. नारद त्या सभागृहात प्रवेशले व सगळे पाहून प्रसन्न झाले. आल्यावर त्यांने युधिष्ठीराला शुभंभवतु, असा आशिर्वाद दिला. नारदांना येतांना पाहून तो शिष्टाचाराचे ज्ञान असलेला राजा व त्याची गुणवान भावंडं उठून उभी राहिली, अभिवादनं झाली. त्यांच्या आगमनाने हर्ष झालेले ते पंडुपुत्र त्यांना आर्जवपूर्वक बसण्यासाठी आसन देतात. त्याआधी चंदनाच्या गंधाचा टीळा त्यांना विधीपूर्वक प्रत्येक पांडव लावतो. रिवाजाप्रमाणे राजा त्यांना अर्घ्य देतात मधाचे (मध व पाणी असें मिश्रण) त्यानंतर गाईचे दान करतात, सर्व वैदीक ब्राह्मणाप्रमाणे नारद फक्त गाय व डुक्कराचेच मांस खात असल्यामुळें ते दान महत्वपूर्ण होते. त्याशिवाय दक्षिणा म्हणून कांहीं जडजवाहर, रत्नं असे दिले. ते सगळें रितिरीवाजानुसार नारद व त्यांचे सोबती स्वीकारतात, प्रसंन्न होतात.

ते औपचारिक उरकल्यावर नारद युधिष्ठीराला अनेक प्रश्न विचारू लागतात, "पांडवानो, जी संपत्ती तुम्ही कमावता ती योग्य प्रकारे खर्च होत आहे कां? तुमचे मन पुण्यकर्मात रमते कां? तुम्ही तुमचे जीवन चांगले उपभोगता कां? तुमच्या सामर्थ्याचा भार तुम्हाला पेलवतो कां? अरे राजा, मला सांग, तू व तुझे बंधू तुमच्या पूर्वजांनी घालून दिलेल्या मार्गाने धर्म (कर्तव्य) आणि काम (सुखोपभोग) ह्यांचे संतुलन पाळता कां"? तुमच्या श्रेष्ठ पूर्वजांने घालून दिलेल्या पायंड्यानुसार चांगले, वाईट व मधले असें जे विषय आहेत त्या नुसार तुमचे काम विवेकांनी होत आहे कां"? मला सांगा, "सुखोपभोगांसाठी तुम्ही कर्तव्याकडे दुर्लक्ष करता कां"? मला सांगा, "धर्म आणि अर्थ ह्यांकडे सुखोपभोगासाठी दुर्लक्ष करता कां"? सुखोपभोगात रमणारे बहुधा धर्म व अर्थाकडे दुर्लक्ष करतात, तसें तुमचे होते कां"? तुम्ही शूरयोद्धे जन सामान्यांसाठी जागृत अहात कां"? काळ ओघाचा

अंदाज करण्याचे माहीत असलेले तुम्ही कर्तव्य, अर्थ, काम (सुखोपभोग) आणि मोक्ष ह्यांसाठी पुरेसा समय त्यांचे संतुलन राखून देता कां"? अहो निष्पाप राजांनो, राजाचे सहा गुण जसें वाक्चातुर्य, हजरजबाबीपणा, शत्रूला तोंड देण्याची कसब, कुशाग्र बुद्धी, नितीतत्त्वांचे ज्ञान आणि राजकारण नैपुण्य ह्यांचे भान राखतां कां? किं, त्यांच्या मदतीने तुम्ही सात साधनं (भेदनिती, सामोपचार, सजा, दान, प्रार्थना, औषधी आणि चेटूक विद्या) प्राप्त करतां का"? पुढे नारद बोलतात, "तुमच्या गुण अवगुणांचे स्वतः मुल्यमापन करून शेवटी मला सांगा, तुमच्या शत्रूचे चौदा (त्यांचे राज्य, किल्ला, रथ (वाहन) सामर्थ्य, हत्तीदळ, पायदळ, घोडदळ, प्रधानांची गुणवत्ता, त्यांचा जनानखाना, राज्यातील खाद्य व्यवस्था, राज्याचा महसूल, धार्मिक प्राबल्य, मद्याची परिस्थिती, त्यांचे छुपे शत्रू आणि सैन्याची परिस्थिती) गुण ज्यांच्या बरोबर तुम्हाला सामना करावयाचा असतो. त्याचप्रमाणे, राज्यातील आठ उद्योग (शेती, व्यापार, कारखाने, वैद्यकी, कारागिरी, सफाई, वखारी, जनावरं सांभाळणे) तुम्हाला जपावयाचे असतात. हे सगळे तुमचे व तुमच्या शत्रूचे असें दोनही तुम्हाला ध्यानात घेऊन राज्य करावयाचे आहे. प्रतिस्पर्ध्याशी समझौता करून राज्याला सुरक्षित करण्याचे काम तुम्हाला साध्य करावयाचे असते. नारद पुढे बोलतात, "अरे भरत वंशाच्या राजा, तुझे सात आमात्य (राज्यपाल, सैन्य प्रमुख, ग्रामरक्षकांचा (पोलिस) प्रमुख, प्रधान पुरोहित, मुख्य न्यायाधीश, मुख्य वैद्य, मुख्य ज्योतिषी ) तुझ्याच आज्ञेत आहेत नां? ते शत्रूपक्षाच्या प्रलोभनांत अडकले आहेत कां? ते त्यांची कामं कर्तव्यदक्षतेने आळस न करता करत आहेत कां? ते सगळे तुझ्याशी प्रामाणिक आहेत कां? त्यांच्या अपेक्षेपेक्षा (योग्यतेपेक्षा) जास्त वेतन तू देतोस कां? तुझ्या हेरांचे लक्ष त्यांच्या कामावर आहे कां? मला आशा आहे कीं, तू एक हुशार राजा आहेस तेव्हां तुझे मित्र काय करत आहेत ते तुला माहीत असेलच. तुझे शत्रू काय करत आहेत"? राज्यात फिरणारे परकीय फिरस्ते काय करत आहेत ते तुला माहीत असले पाहिजे. साधू, बैरागी ह्यांची माहिती तू ठेवतोस कां? तू तह किंवा युद्ध योग्य वेळ साधून करत आहेस नां? त्रयस्थांशी तू समतोल वृत्ती ठेवशील जे तुझ्याशी त्रयस्थरित्या वागतील. तुझे वागणे  जशाच तसें असे आहे कां? तुझे मंत्री कसे आहेत? ते प्रौढ, सय्यमी, समजूतदार, शांतवृत्ती, दुसर्याचे म्हणणे ऐकून घेणारे, काय

योग्य व काय अयोग्य ह्याची जाण असणारे, जन्माने व रक्तांने शुद्ध, तुझ्याशी प्रामाणिक, दूरदृष्टी, प्रजादक्ष, जबाबदारी ओळखणारे, सात्त्विक असें आहेत कां? राजाच्या यशात त्याच्या गुणी मंत्र्यांचा मोठा वाटा असतो, अरे पंडुपुत्रा, मला सांग तुझे मंत्री शास्त्रार्थ चांगला जाणतात कां? ते तोंड बंद ठेवून (ह्या कानाची गोष्ट त्या कानाला जाणार नाही असें) काम करतात कां? त्यांना तुझे शत्रू पटवू शकतील कां"? त्यानंतर नारद विचारतात, त्या नंतर सगळ्या पांडवांना, "सांगा मला तुमची झोप तुमच्या नियंत्रणात आहे कां? तुम्ही योग्य वेळी उठता कां? दुसर्या दिवशी काय करावयाचे त्याची तयारी आदल्या रात्री तुम्ही करता कां? तुम्ही कोणाचा सल्ला घेता त्याची योग्यता पहाता कां? तुमच्या निर्णयाचा भर चौकात बोभाटा तर होत नाहींना? जे चटकन होण्यासारखे आहे ते तुम्ही लवकर उरकतां कां? कां त्यात निर्णय घेण्यात व्यर्थ विलंब करता? तुमचे शेतकर्याकडे दुर्लक्ष होत नाही नां? तुझी प्रजा तुला भेटायला घाबरते कां? तुझे सेवक प्रजेशी काम करतांना तुझ्या सांगण्या प्रमाणेच काम करतात कां? तुझे सेवक अनुभवी आहेत कां? तुझ्या प्रजेला तू आधी केलेली कामं व जी कामं सध्या होत आहेत त्याची जाणीव असली पाहिजे परंतु, तिला तुझ्या मनातील योजना माहीत नसल्या पाहिजेत, अरे राजा अशी परिस्थिती आहे कां"?

नारद पुढे विचारतात, "तुझ्या अधिकार्यांना प्रशिक्षण देणारे शिक्षक त्यांच्या विषयाचे पुरते जाणकार आहेत कां? तुझे प्रजाजन सुशिक्षित आहेत कां? त्यांना सुशिक्षित करण्यासाठी पाठशाळा तू उघडल्या आहेत कां? तुझ्या राज्यातील द्विज सुशिक्षित आहेत कां? हजार अशिक्षितांपेक्षा एक सुशिक्षित जास्त कामाचा असतो ते तुझ्या ध्यानात आहे कां"? अवकाळी सुशिक्षित परिस्थिती जास्त चांगल्या प्रकारे हाताळू शकतो ते तू जाणतोस म्हणून त्यांची तजवीज तू परिस्थिती चांगली असतांनाच केली पाहिजेस. तुझ्या किल्ल्यांत दाणागोटा, धनसंपत्ती आणि पाण्याची काय व्यवस्था आहे"? ते सगळे आवश्यकतेनुसार आहे कां"? एक गुणी मंत्री राजाला व त्याच्या मुलांना समृद्ध करण्यास कारणीभूत होतो. तो मंत्री बुद्धिमान, तर्कशुद्ध विवेक असलेला, समतोल वृत्ती असलेला, संय्यमी, शूर, स्वाभिमानी असला पाहिजे. कारण जो स्वाभिमानी नसतो तो सहजपणे भ्रष्ट होतो कारण त्याला त्याची लाज वाटत नाही. तुझ्या मंत्रीमंडळात किती लाचार, लोचट,

स्वाभिमानशून्य तत्त्वहीन आहेत ते तुला माहीत आहे कां? तुझे दूत तुला सगळी माहिती आणून देतात कां? तुझे दूत तुझे मिंधे (उपकाराने अडकलेले) आहेत कां? जर तसे नसेल तर त्यांना तसें करावे कारण, हेरांचा प्रामाणिकपणा हा त्यांच्या स्वाभिमानाचा एक हिस्सा असला पाहिजे. तुला तुझे शत्रू कोण आहेत ते माहीत आहे कां? तुझ्या शत्रूंना तुझी कांहीं माहीती असतां कामा नये, तसे आहे कां? तुझे पुरोहित सात्त्विक आहेत कां? तुझ्या सेवेत किती शहाणे, स्पष्टवक्ते (खरे बोलणारे), शास्त्रार्थ जाणणारे, सात्त्विक ब्राह्मण पौरोहित्यासाठी आहेत? तुझ्या यज्ञकुंडातील होम कोण व केव्हा प्रज्वलित करतो ते तुला माहित आहे कां? तू सेवेत घेतलेला ज्योतिषी, लोकांची देहबोली समजू शकतो कां? त्याचे ज्ञान किती आहे त्याची फेरतपासणी तू केली आहेस कां? अशुभ योगांना बाद करण्याचे ज्ञान त्याच्याकडे आहे कां? भविष्यात येणार्या प्राकृतिक व मानवी संकटांचे वेध त्याला लागतात कां? एक उत्तम ज्योतिषी राजाची अनेक संकटे दूर करू शकतो हे तुला माहित आहे कां? तुझे सरकारी नोकर प्रतिष्ठित आहेत कां? तुझ्या मंत्र्याचे पूर्वज काय होते ते तुला माहित आहे कां? त्यांची प्रवृत्ती प्रजेला त्रास देण्याची (त्यांच्या अधिकाराच्या जोरावर) आहे कां? तुझे राज्यातील दूरच्या प्रदेशातील मंत्री तुझ्या आज्ञा पाळतात कां? त्यांची मनमानी किती चालते ते तुला माहित आहे कां? तुझे सैनिक शूर व धाडसी आहेत कां? त्यांचे सैनिकी शिक्षण बरोबर झाले आहे कां"? अरे राजा, तुझे लष्करी अधिकारी तुझा सन्मान करतात कां? तुझ्या लष्काराला त्यांचे वेतन योग्यवेळी मिळते कां? अरे राजा, हे लक्षात असू दे किं, त्यांच्या वेतनाकडे तुझे दुर्लक्ष झाले तर तुला बंडाला सामना करावा लागेल. लष्काराकडे दुर्लक्ष करणे हि राजाची सर्वात मोठी चूक असें जाणकार मानतात. तुझे सैनिक तुला किती मानतात? तुझ्या सेनेत किती उच्चकुलिन आहेत व किती शूद्र आहेत? किती व्यसनी आहेत? एक गोष्ट राजा लक्षात असू दे, व्यसनी अधिकारी राज्याचा मोठा शत्रू असतो, म्हणून तुझ्या अधिकार्यात कोणीही व्यसनी अधिकारी ठेवू नकोस. असें अधिकारी फितूर होतात हे तुला माहित आहे नां"? अरे राजा, तू तुझ्या सगळ्या लायक सेवकांचा सन्मान करशिल व त्यांना सदैव जाणीव राहिल किं तुझे त्यांच्याकडे लक्ष आहे, त्यासाठी त्यांना वेळोवेळी बक्षिसं देशिल, बढती देशिल, त्यांच्या कामाचे कौतुक करशील, त्यांना योग्य सन्मानाने गौरवशील. ज्या सेवकांनी

तुझ्यासाठी प्राण गमावले, अपंगत्व स्वीकारले अशां सगळ्यांच्या परिवाराला तू तुझा परिवार समजून त्यांचे पालन पोषण करशिल. त्यांच्या मुलांवर तुझ्या अपत्याप्रमाणे माया करशील. त्यांच्या मुलींची लग्न लावशिल. अरे राजा, तू ज्यांना हरवले आहेस युद्धात व जे नम्रपणे तुला शरण आले आहेत त्यांचा तू सन्मान करशील. तुझे लोक तुला त्यांचे मायबाप मनापासून मानतात कां? त्यासाठी तू काय करतोस"? तुझा शत्रू कमजोर झाला आहे असें समजल्यावर तू त्यावर चाल करून जाशिल. शरण आलेल्या प्रतिस्पर्ध्याला, शत्रूला तू उपकार करून मिंधा करशिल. नव्या सिमोल्लंघनासाठी जातांना चांगल्या ज्ञानी ज्योतिषाचा सल्ला घेतोस कां"? तुझ्या अतिम जिंकण्यात त्याचे महत्व आहे ते लक्षात घे. माणसाच्या यशात व अपयशात त्या दैवी शक्तिंचासुद्धा हात असतो हे समजून वाग. परंतु, चढाईत जिंकण्यासाठी बारा डावपेच काम करत असतात ते असें, राखीव फौज ठेवणे, गनिमीकाव्याची तयारी, सैनिकांचा पगार वेळीच देणे, शत्रूपेक्षा जास्त चांगली आयुध असणे, हल्ल्याची वेळ ठरवणे, हेरांद्वारा शत्रूपक्षाला स्वतःबद्दल खोटी माहिती पुरवणे, शत्रूचे अधिकारी फितूर करणे, शत्रूराज्यात दानधर्म करून त्या प्रजेला आपलेसे करणे, शत्रूच्या सैन्याचा दाणागोटा अडवणे अथवा नष्ट करणे, शत्रूच्या सैनिकांना प्रलोभने दाखवून आपलेसे करणे, विषप्रयोग, शत्रूचे पाण्याचे साठे नष्ट करणे वगैरे त्यांकडे दुर्लक्ष करू नकोस. त्या शिवाय शांततेच्या काळात मैत्रीच्या बाता वाढवून शत्रूला गाफिल ठेवणे, त्याचे अमात्य पटवणे असे बरेच इतर डाव आहेत ते अजमावयाचे असतात. अरे पंडुपुत्रांनो, शत्रू कोण, प्रतिस्पर्धी कोण, हे कसे ओळखावे ते सांगतो, जो तुझ्या नाशाची स्वप्न पहातो, तुला पाण्यात पहातो, जो वासनांध होऊन त्याच्या प्रजेचे हाल करतो इतरांना पिडा देतो तो तुझा शत्रू समज. पंडुपुत्रांनो, शत्रूचा नाशच करावा लागतो. त्याला दयामाया दाखवलीस तर तो त्याचा गैरफायदा घेऊन तुला ठार मारल्याशिवाय रहाणार नाही. म्हणून तू मरण्यापेक्षा शत्रू मेलेला बरा हे ध्यानात ठेव. आता प्रतिस्पर्धी कोण ते सांगतो, ज्याची महत्वाकांक्षा तुझ्या महत्वाकांक्षेसारखीच आहे तो तुझा प्रतिस्पर्धी होय. प्रतिस्पर्ध्याला नष्ट करण्याची आवश्यकता नसते. त्याला तू हरवून तुझा मांडलिक करून सामोपचारांने, प्रेमांने ठेव, म्हणजे त्याची ताकद तुझी ताकद होईल. प्रसंगी त्याला पटवून तुझा मित्रसुद्धा करता येईल तसें शत्रूचे होऊ शकत नाही. परंतु, हे राजा प्रतिस्पर्धी शत्रू

होत नाही नां ते सावधपणे पहाणे शहाण्या राजाचे लक्षण समजले जाते. अरे राजा, तुझ्यात एक तुझा शत्रू आहे तो म्हणजे तुझ्या वासना. म्हणून तू तुझ्या सगळ्या सहा वासना (काम, क्रोध, लोभ, मोह, मद व मत्सर) नियंत्रित करण्याचे काम प्रथम करावे. ज्या राजाचे भोगेंद्रियांवर नियंत्रण आहे तो नेहमी विजयी होतो. यशस्वी राजा तो, जो त्याची इंद्रिये ताब्यात ठेवतो, अशा राजाला राजर्षी असें संबोधतात. इंद्रिय भोगांबाबत तटस्थता, उदासिनता, दुर्लक्ष अशा कांहीं पद्धतीने ते साध्य तू करू शकशिल. इंद्रिय दमनाने तू तटस्थता साध्य करतोस, भोगांबद्दल साशंकता बाळगल्यामुळें उदासिनता प्राप्त होते, इतर कर्तव्यांबद्दल (धर्म) जास्त प्राधान्य देण्याने तू दुर्लक्ष साध्य करतोस. भोगेंद्रियांचे संयमन सवयप्रधान असल्याने सुरुवातीला जरी त्रास झाला तरी प्रयत्नाने ते सहज होते. जो राजा हा योग साध्य करतो त्याला कर्मयोगी म्हणतात. शत्रू अथवा प्रतिस्पर्धी दोघांचा मुकाबला करतांना चार धोरणं (साम, दाम, दंड व भेद) तू अवलंबू शकतोस. प्रथम सामोपचार (साम) त्यांने नाही वळला तर लाच, बक्षिसी, भेटी देऊन अथवा थेट विकत घेऊन (दाम), त्यानेही नाही बधला तर लढाई करून (दंड), लढाईत जर भारी गेला तर मग शेवटचे धोरण भेद, म्हणजे त्यांच्यात दुफळी माजवून त्याला कमजोर करून मग पुनः दंड अशारितीने तू तुझ्या शत्रूला नामोहरम करू शकतोस. क्षत्रियांचा धर्म जिंकण्यात असतो हे तुम्ही सगळे पांडव लक्षात असू द्या. शरण आलेल्या पराजिताशी अन्याय्य वागणूक देऊ नकोस. तेवढे सांगितल्यानंतर नारद सैन्याबद्दलची माहिती सांगतात. ते विचारतात, "तुझ्या सैन्यात चार प्रकारची दले आहेत कां"? त्यात पायदळ, भाडोत्री सैनिक, खोगिरभरती, त्या सगळ्यांना सर्वप्रकारची आयुध दिली आहेत कां"? जसें रथ, हत्ती फौज, घोडदळ, खाणे बनवणारे आचारी, हेर, त्या प्रदेशाचे वाटाडे, जखमी सैनिकांना औषध इलाज करणारे शल्यक व वैद्य, अशा तयारीवाचून जर तुम्ही गेलात तर सैनिक चांगले लढू शकणार नाहीत कारण त्यांना सुविधा मिळालेल्या नाहीत. शत्रूच्या राज्यात दुष्काळ असेल किंवा कापणीचा मोसम असेल त्यावेळीच चढाई तू करतोंस नां? युद्धावर तू गेला असतांना तुझे मंत्री राजकारभार व्यवस्थितपणे करतील अशी सोय आहे कां? तुझ्या अशा गैरहजेरीत तुझे मंत्री प्रामाणिकपणे कारभार पहातात कां? तुझ्या संपत्तिचे संरक्षण लायक लोकांच्या भरवशावर आहे नां? शत्रूच्या

हल्ल्यापासून तुझ्या गोष्टी जसें, गोठे, तबेले, बायकांचे वाडे, दारुगोळा व तत्सम सामुग्री आणि खजिना सुरक्षित असतें कां? तुझ्या वाड्यात काम करणारे सेवक तुझ्याशी प्रामाणिक आहेत कां? तुझ्या निजी उत्पन्नातील किती भाग तू शानशौकीवर खर्च करतोस, पाव हिस्सा, तिसरा कां अर्धा? तुझ्या अतिरेकी खर्चाबद्दल तुझे सेवक नाक मुरडतात कां"? तुझे स्वतावरील खर्च जास्त होत आहेत असे तुला ते सांगू शकतात का"? तसें ते सांगत असतील तर ते तुझे हितचिंतक आहेत असें समज. तुझ्या वर्तणूकीमुळें तुझे सेवक, आश्रित, व्यापारी, आप्त संतुष्ट आहेत कां"? तुझ्या कमाई व खर्च ह्यांची ताळमेळ जमतो कां ते तुला स्पष्टपणे सांगणारे तपासणीस आहेत कां"? तसें जर असेल तर तू सुरक्षित आहेस असें समज. त्या राजाला त्याचे हितचिंतक सेवक लाभतात तो यशस्वी ठरतो. तुला स्पष्टपणे तू चुकत आहेस असें सांगणारे सेवक असतील तर तू सुरक्षित आहेस, जर तू असें सांगणार्यावर कडक कारवाई करत असशील तर तुझे भवितव्य धोक्यात आहे. तुझे सेवक तुझ्या दोषांबद्दल तुला एकटे गाठून सांगतील असें त्यांना खबरदारीचे सांगतोस कां"? तुझी खोटी स्तुती तुझे सेवक करतात कां"? तसे असेल तर त्या सेवकांवर नजर ठेव. कारण तो तुझा घात करू शकतो, असा सेवक फितूर होऊ शकतो. अशा सेवकांला कामावरून काढून टाक्ण्या ऐवजी लांब कोठेतरी त्याची बदली कर आणि त्याच्यावर लक्ष ठेव तुझ्या हेरांच्या द्वारा, कारण असा सेवक शत्रूला सामिल असू शकतो. त्याच्या द्वारा तू शत्रूची माहिती मिळवू शकतोस तसेंच शत्रूला खोटी माहिती देऊन गाफिल ठेवू शकतोस. तुझ्या प्रजेला त्रास देणार्यां लोकांचा नाश करतोस नां? तुझ्या राज्यातील व्यसनी, चोर, सट्टा खेळणारे, भामटे ह्यांच्यावर तुझे नियंत्रण आहे कां? तुझ्या राज्यातील पाणी व्यवस्था योग्य लोकांच्या नियंत्रणाखाली आहे कां? तलाव, टाक्या, हौद, विहीरी सुस्थितीत आहेत कां? तुझ्या राज्यातील शेते केवळ पावसांवर विसंबून आहेत कां? जर तसे असेल तर, तुझ्या राज्यात दुष्काळ पडू शकतो, म्हणून त्याबद्दलची योग्य निगा करावी. शेतकर्याला चांगले बियाणें उपलब्ध आहे का? तू शेतकर्यांना कर्जाऊ बियाणे उपलब्ध करतोस कां"? तुझ्या राज्यातील चार व्यवसाय जसें कृषी, व्यापार (विविध गोष्टींचा), गुंर पाळणे (धनगरी, अहिरी, गुराखी), सावकारी प्रामाणिक माणसांच्या ताब्यात आहेत कां"? अरे राजा, तुझ्या हातात असते तुझ्या प्रजेचे

सुख त्यासाठी तुझे सगळे हस्तक प्रामाणिक, चाणाक्ष, व्यवहार चतूर, खरे, असले पाहिजेत. तुझी पांच खाती, किल्ला, व्यापार, शेती, वखारी, न्याय व्यवस्था उत्तम असली पाहिजे, गुन्हेगाराला कठोर शिक्षा झाली पाहिजे. सेवकांच्या चांगल्या वर्तणूकीची राजा कदर करतो असें सगळ्यांना समजले पाहिजे, त्यामुळें सगळे लोक चांगले होतात, म्हणतात नां "यथा राजा तथा प्रजा". तुझ्या राज्यातील सगळी खाती एकमेकांना पुरक असली पाहिजेत तरच राज्य समृद्ध व सुरक्षित होते. तुझ्या राज्यातील आणि बाहेरील चोरांना तुझी भिती वाटते कां"? तशी वाटणे राज्यासाठी फार महत्वाचे असते. नगरांच्या संरक्षणासाठी त्या भोवती गांवे वसली पाहिजेत, गांवांच्या संरक्षणासाठी त्या भोवती खेडी बसली पाहिजेत. खेड्यांच्या भोवती शेती, कुरणे असले पाहिजेत. त्या सगळ्यांचे व्वस्थापन करणारे अधिकारी तू नेमावयाचे असतात. तुझ्या राज्याच्या अंतरिक संरक्षणासाठी (चोर, लुटारु, बंडखोर अशांपासून) शिपाई दल (पोलीस) तू तैनात केले आहेस कां? तुझ्या राज्यातील स्त्रिया, अपंग, वृद्ध, आजारी ह्यांना कोणी दुष्ट त्रास देतो कां? तू राजा आहेस, म्हणून सर्वकाळ तुझ्या लोकांच्याच हिताचा तुला विचार करावयाचा असतो हे तुला लक्षात आहे कां"?

नारद पुढे सांगतात, अरे राजा, तू नेहमी योग्य प्रकारे तुझा पोषाख, वर्तणूक, हालचाली (देहबोली), बोलणे ठेवतोस कां"? ती दक्षता बाळगल्याने तुझे स्थान तुझ्या व बाहेरच्या लोकांत योग्य राहिल. तू तुझ्या लोकांत राजशिष्टाचारानुसार वर्तणूक ठेवतोस कां? तू तुझ्या शरीर प्रकृतीची योग्य काळजी घेतोस कां"? तुझे वैद्य, भिषक चांगले जाणकार आहेत कां? ते तुझे हितचिंतक आहेत कां? तुझ्याकडे न्याय मांगण्यासाठी आलेल्या फिर्यादी व आरोपी ह्यांना तू बिनचूकरित्या पारखतोस कां? त्यांच्यावर अन्याय होत नाहीं नां? ज्या आश्रितानी तुझ्यावर भरवसा ठेवला त्याचा भरवसा खोटा ठरत नाहीं नां? तुझ्या राज्यातील लोक बंडाळी करणार नाहीत ह्याकडे तुझे लक्ष आहे कां? तुझे सैनिक तुझ्यासाठी प्राण द्यायला तयार आहेत कां"? तुझ्या राज्यातील ब्राह्मणांचा तू योग्य आदर करतोस कां"? जर अशारितीने तू त्यांचा आदर करत असशिल तर त्यात तुझा फायदा आहे. वेदाच्या शिकवणूकीवर तुझा भरवसा आहे कां? अशा ब्राह्मणांना तू दान, भेटी आणि दक्षिणा देतोस कां? तू प्रामाणिकपणे यज्ञ करतोस कां? तू वाजपेय आणि पुंडरिक यज्ञ

करतोस कां? त्यांचा फायदा होतो. तू वडीलधार्यांचा, विद्वानांचा, वृद्धांचा, आदर करतोस कां? तुझ्या राज्यातील उंच वाढणार्या वृक्षांचे तू संरक्षण करतोस कां? अशी झाडं खूप उपयोगाची असतात. अशा उंच वाढणार्या वृक्षांमुळें पाऊस वाढतो हे तुला माहीत आहे कां? तू कोणावर उगाचच रागावतोस कां? तुझे पुरोहित तुझा सन्मान करतात कां"? अशा वागण्यामुळें तुझी किर्ती सर्वदूर पसरेल व त्यामुळें तुला विरोध करणारे तुला वचकतील. तुझे धर्म, काम व अर्थ साधणे सोपे होईल. अशारितीने गुणवंतांचा सत्कार करणारा राजा व त्याचे राज्य कधीही दुःखात जात नाही. असा राजा जग जिंकतो व समृद्धीचा उपभोग घेतो. तुझ्या राज्यात कोणाही सज्जनावर चोरीचा आरोप होत नाही, असें तेव्हां होते जेव्हां तुझे मंत्री, न्यायाधीश शास्त्र जाणत नसतात. म्हणून तू असें पाहशिल किं, तुझे मंत्री व न्यायाधीश शास्त्र जाणतात. ज्या दिवशी एकादा चोर लांच देऊन कायद्याच्या कचाट्यातून सुटेल व निरपराधी तुरूंगात जाईल त्या दिवसापासून तुझा र्हास सुरु होईल, म्हणून अशा गोष्टींबाबत तू विशेष दक्षता बाळगशिल. न्याय देतांना श्रीमंताला एक व गरीबाला दुसरा असा भेद तुझ्या राज्यात होऊ देऊ नकोस. गरीब निर्दोष व श्रीमंत दोषी असें असेल तर गरीबाच्या बाजूने निवाडा झाला पाहिजे केवळ ह्यांसाठी कीं, तो निर्दोष आहे. राजाच्या चौदा दोषांपासून तू मुक्त आहेस कां? ते चौदा दोष असें, देव न मानणे, खोटे वागणे, अकारणी क्रोध, बेसावधपणा, उशीर करणे, शहाण्यांशी संपर्कात न रहाणे, आळस, अस्थिर मनस्थिती, एकाचाच सल्ला घेणे, हित अहिताचे ज्ञान नसलेल्याकडे मार्गदर्शनासाठी जाणे, दिलेली शब्द न पाळणे, गुप्तता न राखणे, फायद्याच्या योजनांकडे दुर्लक्ष करणे, पूर्ण विवेकाशिवाय निर्णय घेणे. त्याशिवाय प्रजेबद्दल तुच्छतेची भावना असें तुझ्या आहेत कां? असें दोष तुझ्या जर उत्पन्न झाले तर तू बरबाद होशिल हे लक्षात ठेव. तू तुझ्या खाजगी जीवनांत सुखी आहेस कां"? असें प्रश्न विचारून नारद राजा युधिष्ठीराला सावध करतात.

वैशंपायन पुढे सांगतात, एवढे बोलून ऋषी थांबतात, त्यानंतर युधिष्ठीर त्यांना विचारतो, वेदाचे ज्ञान, वास्तविक संपत्ती, पत्नी आणि शास्त्राचे ज्ञान खरोखरीच उपयोगाचे असते कां"?

ऋषी सांगतात, वेदाचा उपयोग तेव्हां होतो जेव्हां तो अग्निहोत्र करून यज्ञ सुरु करतो, संपत्ती तेव्हां उपयोगाची असते जेव्हा तो ती उपभोगतो, पत्नी तुझ्या वंशाचा दिवा देते तेव्हां उपयोगाची ठरते, शास्त्राची उपयुक्तता तेव्हां सिद्ध होते जेव्हां त्याचा वापर केला जातो.

त्यानंतर नारद राजाला विचारतो, मला सांग, जे तुझे अधिकारी करातून मिळालेल्या पैशातून त्यांचे वेतन घेतात ते बाहेरून येणार्या व्यापार्यांकडून लांच घेत असतील, तर तुला त्यांची ती सवय मोडावी लागेल. कोणीही व्यापारी अशा रितीने तुझ्या अधिकार्यांना विकत घेत असेल तर ती तुझी फसवणूक आहे हे लक्षात घे. अरे राजा, शहाण्या जाणकार वृद्ध लोकांचे काय म्हणणे आहे ते नेहमी ऐकत जा. राज्यात पुण्यप्रभाव वाढावा, शेती सुधारावी, पशुसंपत्ती वाढावी, फळाफुलांची वाढ व्हावी ह्यासाठी ब्राह्मणाचे आशिर्वाद उपयोगी येतात त्यासाठी, नेहमी ब्राह्मणांना मध आणि साजूक तुपाचा शिधा देणे चांगले असते. अरे राजा, तुझ्याकडे काम करणार्या कारागिरांना आणि कलाकारांना जे साहित्य त्यांचे काम करण्यासाठी लागते ते नियमितपणे मिळेल असें पहा, त्यांचे वेतन त्यांना न मांगता देत जा. जे असें काम करणारे चांगले काम करतील त्यांच्या कामाची स्तुती करत जा व चांगले कांम नाही झाले तर ते कां झाले नाही त्याची खरी माहिती मिळवून त्यावर उपाय शोधून काढ म्हणजे तसे पुनः होणार नाही. असें केल्यांने तुझ्या काम करणार्यांचा तुझ्यावरील विश्वास वृद्धींगत होईल व तुझी किर्ती सर्वत्र होईल. घोडे, हत्ती, रथ अशा गोष्टींच्या बाबत ऋषीमुनींचे मत विचारात घेत जा. शस्त्रे, अस्त्रे, आयुधं, युद्धाची इतर सामुग्री अशांच्या बाबतसुद्धा जाणकार ऋषीमुनींचा सल्ला घेत जा. त्याशिवाय मंत्र, तंत्र, जारणमारण, विषप्रयोग, विषकन्या अशा गोष्टीतसुद्धा अशांचे मत महत्वाचे असते. आगी (जाळपोळ), सर्पदंश, जंगली श्वापदं, रोगराई आणि राक्षस (दुर्जन) ह्यांच्या पासून तुझी प्रजा सुरक्षित ठेव, त्यासाठी जे कांहीं करावे लागेल ते सगळे करत जा. त्यामुळें तू खर्या अर्थाने त्यांचा मायबाप होशिल. विशेषकरून आंधळे, मुके, अपंग, वक्रांगी (शरीरात न बरे होणारे दोष असलेले). मित्रहीन आणि संन्यासी ह्यांचा मित्र हो. त्यांची काळजी घेणार्या राजाला इंद्राचे बळ मिळते हे लक्षात असू दे. हे राजा तुझ्यात ते सहा दोष कधीही उत्पन्न

होणार नाहीत असें पहा, अतिनिद्रा, आळस, भिती, क्रोध, मनोगंड, बुद्धीभेद (संभ्रमावस्था, योग्य निर्णय न घेता येणे).

युधिष्ठीर ते  सगळे बौद्धीक नारदांकडून ऐकल्यावर नम्रपणे उठून त्यांचे पाय धरतो व बोलतो, "ऋषीवर, आपल्या उपदेशामुळें आम्हाला बर्याच आमच्या जबाबदार्या बद्दलची जाण झाली आहे. आपण सांगितल्याप्रमाणे आम्ही सगळे बंधू आमची कर्तव्ये पार पाडू असें मी सर्वांच्यावतीने आपल्याला आश्वासन देतो".

वैशंपायन सांगतात, "पांडव त्याप्रमाणे राज्यकारभार पहातात व यथावकाश सर्व पृथ्वीचे स्वामी होतात, अरे जनमेजया".

अखेरीस नारद त्याला बोलतात, "जो राजा समाजातील चार वर्णांचे संरक्षण करतो तो दिग्विजयी होतो व शेवटी इंद्राच्या पदाला पोहोचतो". पुढे ते सांगतात, "जर चांगले गुणी लोक तुझे राज्य सोडून इतरत्र जात असतील तर तसें कां होते ते पहा व त्याची कारणे निपटून काढ. कारण, असे प्रजाजन राज्या सोडून जाणे राज्याच्या हिताचे नसते".

अशारितीने सभागृह पर्वातील लोकपाल सभाख्यान पर्वाचा पांचवा भाग संपला.

# सभा पर्व भाग सहावा

(लोकपाल सभाख्यान पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगतात, नारदांच्या प्रश्नमालिकेला आता युधिष्ठीर उत्तर देण्यास सुरुवात करतो. त्याआधी तो त्यांची  औपचारिक पुजा करतो व बोलण्यास सुरुवात करतो.

युधिष्ठिर सांगतो, "पवित्र ऋषीवर, धर्मातील सत्य आणि नैतिकता जशी शास्त्रात सांगितली आहेत, त्याप्रमाणे, मी व माझे बंधू यथाशक्ती व मर्यादा पालन करत आहोत. त्याच प्रमाणे, पूर्वी होऊन गेलेल्या आमच्या पूर्वजांचे अनुकरण त्यापासून मिळणार्या फळांसाठी आम्ही करणार आहोतच. मी आपल्याला आश्वासन देतो किं, आमच्या पूर्वजांनी जो पुण्याचा, नितीचा मार्ग आम्हासाठी आखून ठेवला आहे त्याप्रमाणेच आम्ही सगळे आमची कर्तव्ये पार पाडू.

वैशंपायन बोलतात, युधिष्ठीर पंडुचा सुपुत्र, मोठा किर्तीमान, नारदांनी सांगितलेल्या त्या सगळ्या गोष्टींचा क्षणभर आढावा घेतो व ऋषींबरोबर पुनः बोलण्याची संधी पाहू लागतो. ते ऋषीवर नारद ज्यांच्या ज्ञानाला काहीं मर्याचा नाहीत, जे विश्वभर भटकल्यामुळें सर्वप्रकारच्या सवालांना तोंड देण्याच्या तयारीत नेहमी असतात, ज्यांनी सगळ्यांच्या पूर्वजांना पाहिले आहे, आणि आता जे आरामात त्यांच्या आसनावर स्थानपन्न झाले आहेत, त्यांना युधिष्ठीर कुतुहलाने विचारतो, "सांगा ऋषीवर, आपण सगळें दरबार डोळ्याने पाहिले आहेत, त्याकरता मी तुम्हाला विचारतो कीं, असे सभागृह आपण आधी कुठे पाहिले आहे कां"? हा प्रश्न ऐकल्यावर नारद गालातल्यागालात हसत त्याच्याकडे बघत बोलले, "अरे माझ्या बाळा, मी आतापर्यंत कोठेही असे रत्नांकित जडवलेले सोन्याचे खांबे असलेले सभागृह बघितलेले किंवा ऐकलेलेसुद्धा नाही. तुझे हे सभागृह अजोड आहे. परंतु, मी तुला होऊन गेलेल्या यमाचे दालन, महाबुद्धीमान वरुणाचे, देवांचा राजा इंद्राचे, कुबेराचे जे कैलासात आहे कसे होते ते सांगू शकेन, त्याच प्रमाणे ब्रह्माचे घरसुद्धा ह्या प्रकारच्या दिव्य वास्तूत येते. त्या सगळ्या सभागृहांत दैवी, मानवी आणि असुरी संकल्पनांचा सारखाच समावेश होता जसा तुझ्या ह्या सभागृहात आहे. त्या वास्तूंची पुजा सगळे देव आणि पितर नित्य करत आहेत. साध्य व गण (उपदेवता), यज्ञ

करणारे बैरागी, वैदीक यज्ञात रमलेले मुनीगण, ब्रह्माला दान करणारे सिद्ध असें सर्व ज्यात आहेत त्यांची माहिती मी तुला सांगेन जर तुला त्यात आस्था असेल".
वैशंपायन पुढे सांगतात, ते ऐकल्यावर तेथे जमलेले सगळे ऋषी व उच्च दर्जाचे ब्राह्मण ते ऐकण्यासाठी फार आतूर असल्याचे दाखवतात. ते सगळे एकत्रच बोलतात, "सांगा मुनीवर आम्हाला सगळे ते ऐकण्याची आस्था आहे. ती सभागृहं कोठल्या सामुग्रीपासून बनवलेली होती? त्यांचे व्यापक्षेत्र किती होते? त्यांच्या लांबी व रुंदीची कल्पना द्या. त्या ब्रह्माच्या सभागृहात कोण हजेरी लावत असतं? इंद्राच्या सभागृहात कोण येत असतं? विवस्वानाच्या (यम) सभागृहात कसे काम चालत असें? वरुण आणि कुबेराच्या सभागृहाची सुद्धा आम्हाला माहिती सांगा. अहो ब्राह्मण ऋषी नारद, आम्हाला ते सगळे सांगा. आम्हाला ते सर्व समजून घ्यावयाचे आहे तरी त्वरित सांगण्यास सुरुवात करावी. पांडवांचा तो उत्साह पाहून नारद त्यांना म्हणाले, अहो राजांनो, मी त्या सगळ्या सभागृहांची माहिती क्रमवार एकामागोमाग एक अशी सांगतो, तरी ती ऐका.
अशारितीने सभागृह पर्वातील लोकपाल सभाख्यान पर्वाचा सहावा भाग संपला.

# सभापर्व भाग सातवा

(लोकपाल सभाख्यान पर्व पुढे चालू)

नारद सांगतात, प्रथम मी तुम्हाला इंद्राच्या सभागृहाचे सांगतो, ते तेजाने चमकत असे. इंद्राने ते त्याच्या तपस्येचे फळ स्वरुप मिळवले होते. सूर्याची चमक असलेले ते सभागृह शक्राने स्वतः बांधलेले होते. ते एका जागी स्थिर नव्हते, ते इंद्राच्या मर्जीनुसार कोठेही जात असें. त्याची लांबी एकशेपन्नास योजने व एकशे योजने रुंदी असे मोठे अवाढव्य होते. त्याची उंची पांच योजने होती. त्यात प्रवेश केला किं, सगळा थकवा, वृद्धत्व, भिती, संपुष्टात येत असें सगळे शुभ आणि पवित्र होत असें, कमालीची प्रसन्नता वाटत असें. त्याच्या दर्शनाने सुदैव प्राप्त होत असें. त्यात उत्तम सजावट व इतर सामान होते आणि त्यात दैवी वृक्ष वाढलेले होते. ते सभागृह अत्यंत आनंददायक होते. त्या सभागृहातील एका प्रशस्थ आसनावर तो इंद्र आणि त्याची पत्नी साची तिच्या सौंदर्याने प्रसन्न दिसणारी व वैभवशाली अशी बसलेले असतं. विलक्षण असें त्याचे ते रुप कोणत्याही शब्दाने वर्णन करता न येणारे असें असते, त्याच्या दंडाला दंडबंध दागिना असतो, माथ्यावर शिरोमुकूट आणि अंगात पांढरा शुभ्र अंगरखा असे, गळ्यात रंगीबेरंगी फुलांच्या माळा, त्याच्या दोन बाजूस सौंदर्य, किर्ती आणि वैभव अशा तीन देवता उभ्या असत. सगळ्या यज्ञदेवतासुद्धा त्याच्या दरबारात सदैव तयार असतं. त्या शिवाय त्या सभागृहात अनेक मरुत हजर असतं, जे सगळ्या गृहस्थांच्या कामात मदत करत असतात. सिद्ध, स्वर्गिय देवता अनेक संख्येने, साध्य सगळ्या योग्यतेचे, देव आणि मरुत त्यांच्या विविध रंगी वस्त्रात असें आणि गळ्यात माळा घातलेले असें इंद्राच्या आज्ञेची प्रतिक्षा करत तयार असें उभे असतं. त्या सभागृहात दैवी ऋषी आपापल्या स्थानी विराजमान असत जे त्यांच्या पावित्र्याच्या तेजाने तळपत होते, त्यांच्या पुण्यप्रभावाने शक्तिमान झालेले असें ते ज्यांनी सर्व दुःखाच्या कारणांचा नाश केला आहे व जे कसाचीही चिंता करत नाहीत असें आणि सदैव सोमयज्ञ करत असतात ते सुद्धा इंद्राच्या सुचनेची प्रतिक्षा करत असलेले दिसत होते. त्यात विशेष असें पराशर, पर्वत, शवर्न, गलव, आणि शंख होते. त्याशिवाय मुनी गौरशिरस, दुर्वास, क्रोधन, स्वेन, मुनी दिर्घतमस, पवित्रतपन, याज्ञवल्क्य, भलुकी, उद्यालक, स्वेतकेतु, तांड्य, भांदयनी, हविष्मत, गिरीश, राजा हरिश्चंद्र, ऋषी हृद्य, उदारशांडिल्य, परसरय, कृषिवल, वटस्खाद, विषाखा,

विधाता, काळ, करालदंत, तस्त्री, विश्वकर्मन, तुमुरू आणि इतर पुष्कळ ऋषी स्थानापन्न होते. त्यातील कांहीं स्त्रिच्या उदरातून आलेले तर कांहीं हवेवर (केवळ प्राणवायू घेऊन) जगणारे, कांहीं फक्त अग्नी खाऊन रहाणारे असें बरेच जे वज्रधारी इंद्राची उपासना करतात ते हजर होते. सहदेव, सुनीत व वाल्मिकी जे त्याच्या तपोसामर्थ्यासाठी सगळ्याना ज्ञात आहेत तेसुद्धा होते. सत्यवचनी समिक, प्रचेता जे भक्तांच्या इच्छा पूर्ण करतात, मेधातिथी, वामदेव, पुलस्त्य, पुलह, क्रतु, मरुत आणि मरिची, स्थानु, कक्षिवत, गौतम, तरक्ख्य, मुनी वैश्रवण, मुनी कलखविख्य, अश्राव्य, हिरन्मय, समवर्त, देहव्य, सामर्थ्यवान विश्वक्षेन, कण्व, कात्यायन, त्याशिवाय गार्ग्य आणि कौशिक असें सगळे त्या सभागृहात उपस्थित होते. त्या ठिकाणी दैवी पाणी व दैवी वनस्पति होत्या. विश्वास, बुद्धी, सरस्वती, कुबेर, कर्तव्य, सुख अशा आणखीन कांही माणसाला मदत करणार्या देवता तेथे होत्या. नारद पुढे सांगतात, त्या सभागृहात अरे पंडुपुत्रांने, स्वर्गातील पाण्याने भरलेली ढगं, त्यांचा गडगडाट, विजांचा कडकडाट, वारे आणि विविध भयंकर आवाज सुद्धा तेथे उपस्थित होते. त्या सभागृहाच्या पूर्वेकडील बाजूस सत्ताविस यज्ञाचे अग्नी उभे होते. अग्नी, सोम, इंद्राचा अग्नी, मित्राचा अग्नी, सावित्री, आर्यमन, भाग्य, विश्वास, साध्य आणि महागुरू बृहस्पति, शुक्र, विश्वावसु, चित्रसेना आणि सुमन, तरुण, तेथे यज्ञात ब्राह्मणांना द्यावयाचे सगळे सामान ठेवलेले होते. त्याशिवाय विविध ग्रह, पृथ्वी, तारे ह्यांच्या देवता उभ्या होत्या. यज्ञात उच्चारले जाणारे सर्व मंत्र तयार स्तिथीत हजर होते. असंख्य अप्सरा, गंधर्व त्यांची संगीत वाद्ये ह्यांचा जलसा चालू होता. ते सगळे वलाचा आणि वृत्राचा बळी घेणार्या शतक्रतु इंद्राची विधीपूर्वक स्तुती करत होते. त्याशिवाय बरेच उच्चकोटीचे ब्राह्मण व ऋषी त्या सभागृहात ये जा करत होते. त्यांच्या अंगावर फुलांचे दागिने त्यांनी परिधान केलेले होते. तेथे येणारे स्वर्गातील तेजस्वी, आपापल्या रथातून ज्यांच्या रचना विविध आणि विलोभलीय होत्या दिसत होते. प्रत्यक्ष बृहस्पति आणि शुक्र तेथे नेहमीच उपस्थित असतं. त्याशिवाय अनेक मोठे तपस्वी जसें भृगु आणि सप्तर्षी जे ब्राह्मा इतकेच श्रेष्ठ होते त्यांचे नित्य येणे व जाणे त्या सभागृहात होत असें त्याचे रथ सोमाच्या रथा इतकेंच सुंदर व प्रसन्न करणारे होते. त्या विलक्षण सभागृहाला सगळे प्रेमांने पुष्करमालिनी असें ओळखतात. शतयज्ञ करणार्या त्या स्वर्गाच्या राजाचे सभागृह कसें होते ते सांगितले, आता यमाच्या सभागृहाबद्दल सांगतो.

अशारितीने सभागृह पर्वातील लोकपाल सभाख्यान पर्वाचा सातवा भाग संपला.

# सभापर्व भाग आठवा

(लोकपाल सभाख्यान पर्व पुढे चालू)

त्यानंतर नारद पुढे सांगतात, अहो राजर्षी युधिष्ठीरा, आता मी तुम्हाला विवस्वानाचा मुलगा यम त्याचे सभागृह कसे होते अथवा आहे, ते सांगतो. आता माझे ऐका, चमकवलेल्या सोन्यासारखे चमकणारे, विश्वकर्माचे रचलेले असें ते सभागृह साधारणपणे शंभर योजनांपेक्षा जास्त रुंद व लांब असें क्षेत्रफळाचे असावे. त्याची चमक सूर्यासारखी होती. त्यात जी इच्छा कराल ते मिळत असें. त्याचे आतील तापमान सामान्य म्हणजे न जास्त न कमी असें असें. परंतु, नेहमीच आल्हाददायक असें. तेथे दुःख, दुर्बलता, वृद्धत्व आणि पाप प्रवृत्ती ह्यांना जागा नव्हती. सगळ्या गोष्टी ज्यांची अपेक्षा स्वर्गातील अथवा पृथ्वीवरील माणसे करतात त्या सगळ्या चिजा तेथे होत्या. जणू त्यांचे प्रदर्शनच मांडलेले होते. माणसाला सुखवणार्या अशा ज्या कांहीं चिजा असू शकतात त्या सगळ्या तेथे होत्या. चविष्ट खाद्यपदार्थ, पेये, जी खाण्याची, चोखावयाची अथवा चाखत चाखत पिण्याची व खाण्याची अशी सगळी तेथे होती. तेथे असलेल्या फुलांच्या माळा अतिशय सुगंधी व विविध रंगांने नटलेल्या अशा होत्या. तेथे असलेले वृक्ष गोड फळांनी डवरलेले होते. विशेष असें किं, ते वृक्ष आपण ज्या फळाची अपेक्षा करू ते फळ त्वरित देत असें. मधूर पाणी थंड व कोमट जसें तुम्हाला पाहिजे तसे तेथे असलेल्या झर्यांतून मिळत होते. तेथे अनेक महान तपस्वी, योगी आणि ब्राह्मण मंडळी मोठ्या प्रसंन्न मनाने सदैव उपस्थित असतं. तेथे त्या सभागृहात विवस्वानाची पुजा करण्यासाठी अनेक लोकोत्तर आत्मे सदेव येत असतं. त्यात ययाति, नहुष, पुरु, मंधत्री, नृग, राजर्षी त्रसदस्यु, कृतवीर्य, सौतश्रवस, अरिष्टनेमी, सिद्ध, कृतवेग, क्रिती, निमि, प्रतर्धन, शिवी, मत्स्य, पृतुलक्ष्य, बृहद्रथ, वर्त्त, मरुत, कुशिका, संकस्य, संकृति, ध्रूव, चतुर्स्व, सदास्वोर्मि, राजा कर्तवीर्य, राजा भरत, सुरथ, सुनिथा, निषाध, नळ, देवोदास, सुमन, अम्वरिष, भगिरथ, व्यस्व, वर्धस्व, पृथूवेग, पृथूश्रवस, प्रिशद्वस, वसुमनस, क्षुप, सुमहवल, वृश्दगु, वृशसेन, पुरुकुत्स, ध्वजिन, रथिन, अर्षतिस्न, दिलीप, तेजस्वी ऋषी उशिनर, औशिनरी, पुंडलिक, सर्यति, सरवा, सुची, अंग, रिष्ता, वेणा, राजा दुश्मंत, श्रींजय, जय, भंगसुरी, सुनीथ, निशाद, बहिनर, करंधम, वल्हिक, शुद्यम्न, आणि महाबलशाली मधू, ऐल्य, राजा मरुत, कपोत, त्रिनक, शदेव, अर्जुन, व्यस्व, सस्व,

कृषस्व, राजा ससबिंदू, दशरथाचा मुलगा राम, लक्ष्मण, प्रतर्दन, अलर्क, कक्षसेन, गय, गौरस्व, राम जनमेजयाचा मुलगा, ब्रह्मदत्त, निभग, सागर, भुरिद्युम्न, महस्व, पृथस्व, राजा जनक, राजा वैन्य, वरीसेन, पुरुजित, जनमेजय, त्रिगर्त, राजा उपरिचर, राजा इंद्रद्युम्न, भिमजनु, गौराप्रिष्ट, नळ, गय, पद्म, मचुकुंड , भूरिद्युम्न, प्रसेनाजित, अरिष्टनेमी, सुद्यम्न, पृथूलौस्व, अष्टक, त्याशिवाय शंभर मत्स्य घराण्याचे राजे, हजारो विप, शंभराहून जास्त हय राजे, धृतराष्ट्र नांवाचे शोकडो, जनमेजय नांवाचे आठ राजे, ब्रह्मदत्त नांवाचे शेकडो सम्राट, इरी घराण्याचे शेकडो, दोनशेपेक्षा जास्त भिष्म, शेकडो प्रतिविंध्य, शेकडो नाग राजे, शेकडो पलस, शेकडो कस आणि कुस, शंतनु राजा, तुमचे पिता पंडु, उसंगव, सत्रथ, देवराज, जयद्रथ, त्या शिवाय शंभरापेक्षा जास्त अश्वमेध यज्ञ केलेले राजे, बुद्धिमान राजर्षी वृषद्वर, त्याचे लोकोत्तर मंत्री मंडळ, ससविंदू नांव असलेले शेकडो राजे, असंख्य ब्राह्मण ज्यांनी मोठी तपस्या करून ते पद मिळवले आहे असें सगळे तेथे यमाची आज्ञा घेण्यासाठी उपस्थित होते, असतात. त्याशिवाय अगस्त्य, मातंग, काळ, मृत्यू, शवावर क्रिया करणारे मांग ऋषी, अनेक योगी, योगिनी, त्याशिवाय अग्नीस्वत्त, फेनप, उष्मपक, स्वाधवत, वर्हीशद आणि इतर प्रकारचे पितर, विवस्वानाच्या मुलांच्या सेवेत उपस्थित होते. कालचक्र आणि यज्ञाचे तूप त्यात आणून सोडणारा पट्टा दिसत होता. सर्व पापी आत्मे गर्दी करून दाटीवाटीने तेथे उभे असतात. त्याशिवाय जे उत्तरायणात मेले तेसुद्धा तेथे त्यांचा क्रम केव्हा येतो त्याची प्रतिक्षा करत असलेले दिसत होते. त्या सभेत आत्म्यांचे येणे जाणे अव्याहतपणे चालू असते. त्यावर लक्ष ठेवून चित्रगुप्ताचे सेवक होते त्यांना यमदूत असें म्हणतात. तेथे शिंगस्प, पलस, कास जातीचे वृक्ष होते. ते सगळे न्यायदेवतेच्या आज्ञेची प्रतिक्षा करत असलेले दिसत होते. त्या सभेतील पितरांच्या दालनात अनेक असतात ज्यांची नांवे सांगणे अशक्य आहे. सुखात मेलेले, दुःखात मेलेले असें सगळे तेथे मात्र आनंदात वावरतांना दिसतात. पापात्मे त्यांच्या शिक्षेसाठी व पुण्यात्मे त्यांच्या बक्षिसासाठी प्रतिक्षा करतांना दिसत होते. त्यात पिशाच्चांचे आत बाहेर असें फिरणे हि एक नित्याची गोष्ट होती. त्या सगळ्यांची गणती केवळ अशक्य आहे. ते सभागृह इंद्राच्या पुष्करमालिनी प्रमाणे हलत होते. ते अवाढव्य सभागृह विश्वकर्माने त्याच्या दीर्घ तपस्येनंतर बांधले होते. यमाच्या तेजांने चमकणारे ते सभागृह विलक्षण सुंदर होते त्यात

घोर तपस्या करणारे तपस्वी शांतपणे आपली तपस्या करत होते. त्यांच्या अंगावर स्वच्छ झगे होते. त्यांच्या गळ्यात फुलांच्या माळा व हातात कंकण होते. त्यांची श्रेणी त्यांच्या झग्यावर लिहीलेली होती. असें संन्यासी सदैव त्या सभेत येत होते. कांहीं गंधर्व, अप्सरा, संगीत व वाद्ये ह्यांच्या विविध धूनीनी तो आसमंत प्रसन्न करत होते. तेथे हास्य विनोद ह्यांचे फवारे उडत असतं. सगळा आसमंत सुगंधाने प्रसन्न झालेला असतो. गणती करता येणार नाही इतकी गर्दी व त्यात न्याय मागणार्यांची वर्दळ अशी होती. असें आहे पितरांच्या राजाचे, यमाचे सभागृह.

आता मी तुम्हाला वरुण राजाच्या सभागृहाची माहिति सांगतो. त्याचे नांवसुद्धा पुष्करमालिनी असेंच आहे.

अशारितीने सभापर्वातील लोकपाल सभाख्यान पर्वाचा आठवा भाग संपला.

## सभापर्व भाग नववा

(लोकपाल सभाख्यान पुढे चालू)

नारद पुढे सांगत असतात, अहो राजर्षी युधिष्ठीर, वरुणदेवाची स्वर्गातील सभा तिच्या वैभवासाठी अतुलनीय आहे. मापात ते यमाच्या सभे एवढे आहे. त्याच्या भिंती व कमानी शुभ्र रंगाच्या असतात. त्याचे काम विश्वकर्माचे केले आहे. ते सभागृह पाण्यात उभे आहे. त्याच्या सभोवार दैवी झाडे रत्नं माणकांनी जडवलेली अशी आहेत. त्या झाडांना चवदार फळं व सुंदर फुलं येत असतात. अशा फळाफुलांनी डवरलेली ती झाडं विविध रंगांने सजलेली असतात, त्या सभागृहा भोवती काळ्या, पांढर्या, लाल, पिवळ्या, निळ्या, राखाडी रंगाच्या छटा असलेली घरटी आहेत. त्यांतून विविध रंगाचे पक्षी रहात असतात. ते पक्षी त्यांच्या सुश्राव्य किलबिलाटांने तो आसमंत प्रसन्न करत असतात. त्या घराचा धनी स्वतः वरुणदेव आहे. त्या सभागृहात पुष्कळ आसनं आहेत. त्यातील एका उंच जागी वरुण विराजमान असतात. त्यांच्या अंगावर रत्नजडीत अंगरखा असतो व अंगावर मौल्यवान रत्नांनी मढवलेले दागिने असतात. त्याची पत्नी तसेंच उंची वस्त्र नेसून त्याच्या बाजूला नेहमी बसलेली असते. आदित्य वरुणाच्या सेवेत उपस्थित असतात. वरुण हा एका पंचमहाभूतांचा देव आहे त्याप्रमाणे त्याचे कर्तव्य ह्या सृष्टीत चालत असते. त्याच्या संबंधात असलेल्यात वासुकी, तक्षक, नांग राजा ऐरावत, कृष्ण, लोहीत, पद्म, महाशक्तिमान चित्र आणि इतर नांग देव कम्वल, अश्वतर, धृतराष्ट्र, वल्हक, मतिमत, कुंडधर , करेकोटक, धनंजय, पनिमत, महाशक्तिमान कुंद्रक जणू पृथ्वीचा राजा, प्रह्लाद, मुशिकद, जनमेजय आणखीन बरेच हे सर्व उत्तम लक्षणे असलेले व मोठे फणे असलेले त्याच्या दरबारात उठ बस करत असतात. कोठल्याही गोष्टीची फिकीर नसलेले ते सगळे सर्प वरुणराजाची सेवा करत असतात. विरोचनाचा मुलगा वली, पृथ्वीजित नरक, संघर्द, विप्रचित्ती, दानव कलकंज, सुहानु, दुर्मुख, संख, सुमन, सुमति, घटोदर, महापर्स्व, करथन, पिथर, विश्वरुप, स्वरुप, विरुप, महासीर, दशग्रीव, वली, मेघावसस, दसवर, तित्तीव, विताभूत, संघ्रद, इंद्रतापन हे दैत्य व दानव तेथे असतात. त्यांच्या अंगावर संपूर्ण दागिने असतात व गळ्यात माळा असतात. कानात मोठी कुंडलं असतात . डोक्यावर मुकुट अशा दिमाखात ते त्या सभेत वावरतांना दिसतात. ब्रह्माचा वरदहस्त लाभलेले असें ते त्यांच्या शौर्याने ख्यातनाम

झालेले तेथे विराजमान असतात. ते सगळे वरुणाचे भक्त असतात. वरुणाचे चिन्ह आहे फांसा, त्याबरोबर चार सागराच्या देवतां, अनेक नद्यांच्या देवतां, त्यात विशेष करून भागिरथी, कालिंदी, विदीशा, सिंधू, देवनदी, नर्मदा, वेनवा, विपाशा, शतद्रू, चंद्रभागा, सरस्वति, इरावती, विताशा, गोदावरी, कृष्णवेना, आणि नद्यातील राणी कावेरी, किंपुना, विसाल्या, वैतरणी, त्रितीया, जेश्थिला, सौना, चर्मावती, पर्नसा, शरयू, वरवत्या, लंगली, करटोया, अत्रेई, लाल रंगाची महानदा, लाघेति, गोमति, संध्या, त्रिश्रोतसी, अशा सगळ्या जगभरच्या पवित्र नद्या आणि नद त्यांच्या प्रातिनिधीक देवता तेथे हजर असतात. त्यांच्या तिर्थांवर लोक आपले पाप धुण्यासाठी जातात. त्याशिवाय अनेक छोट्या म्हणजे कमी क्षमतेच्या नद्या, तलाव, झरे, ह्यांचे प्रतिनिधी सुद्धा हजर होते. अरे भरत कुळातील राजांनो, वरुणाच्या आदेशांचे ते पालन करत असतात. जेथे जेथे पाण्याचा संबंध येतो तेथे वरुणदेवाचा संबंध होत असतो, त्याच्या आज्ञे बाहेर कांहींही जात नाही. म्हणून सर्व प्राणिमात्र, वनस्पति सगळे वरुणाच्या आज्ञेनेच जगत असतात त्यामुळे त्याचे प्राधान्य सगळीकडे जाणवत असते. इतर सभांमध्ये जसे गंधर्व आणि अप्सरा गाणी बजावणी करतात तसे ते येथेसुद्धा करत असतात. ते वरुणाची स्तुतीपर गाणी व धून वाजवत होते. ज्या डोंगरावरून नद्या उगम पावतात त्या सगळ्या डोंगर, पर्वतांचे प्रतिनिधीसुद्धा तेथे उपस्थित होते. ते व्यक्तिस्वरुपात तेथे बसून आपापल्या परिस्थितीची कल्पना एकमेकांना देत असतात. धरणीकंप, भूस्खलन, ज्वालामुखी, वादळं, नद्यांना पूर येणे हे सगळे त्या सभेत ठरत असते म्हणून ती सभा हे राजा युधिष्ठीरा, जगाच्या दैनंदीन कारभारावर प्रभाव पाडत असते म्हणून खूप महत्वाची असते. त्यात किती माणसे दगावणार हे सुद्धा यमाच्या सभेतून येणार्या संदेशानुरूप ठरवले जात होते. अनेक दैत्य आणि राक्षस पर्वतरुपांने असतात ते सगळे त्या पर्वतांचे प्रतिनिधी म्हणून बसलेले मी पाहिले आहेत. कांहीं दैत्य ज्वालामुखी व धरणीकंपाचे प्रतिनिधी होते ते त्या बाबत आपले विचार मांडतांना मी पाहिले आहे. सगळे तेथे ठरते व कांहीवेळा एकाद्या सप्तर्षीच्या (किंवा त्यांच्या योग्यतेच्या इतर ऋषी) मनात कांहीं आले तर ते त्याना ह्या सभेत सांगावे लागते व त्याप्रमाणे जर फरक करावयाचा तर तो वरुणदेवाच्या संमतिने होत असतो. अरे राजा, जगात जे कांहीं नैसर्गिक आसमंतात होते ते सगळे येथे ठरत असते. वरुणाचा प्रधान मंत्री सुनभ त्याच्या

मुलांनातवंडांसह वरुणाची सेवा करत असतांना मी पाहिले आहे. देव ब्रह्माच्या सभेतून सृष्टीतील विविध गोष्टींचे उगम (जन्म) ठरवत असतात त्याप्रमाणे त्या सगळ्यांचा अंत (र्हास) यमाच्या आणि वरुणाच्या सभेत दैत्य, दानव आणि राक्षस निश्चित करत असतात. उत्पत्ती व विनाश ह्यांचे संतुलित व्यवस्थापन ह्या चार सभांतून होत असते. हे तू समजून घे, युधिष्ठिरा. म्हणून देव जसे सृष्टीच्या कारभारासाठी उपयोगी असतात तसेंच दैत्य, दानव आणि राक्षस सुद्धा उपयोगी असतात हे समजून घे. देव उत्पत्ती व वृद्धी पहातात व दैत्य, दानव, सगळ्या सृष्टीचा विनाश पहातात. देवांच्या कार्यात पुण्य उपयोगाचे असते तसे पाप दैत्य दानवांना उपयोगाचे असते. प्रत्येकाचे कार्य नेमून दिले आहे तसे आपसुकपणे होत असते म्हणून ही सृष्टी अव्याहतपणे कार्यरत राहात असते. ह्या सगळ्या तीन सभांच्या कार्याचा लेखाजोखा इंद्राच्या सभेत नोंदला जात असतो. अशारितीने हि सृष्टी काम करत असते. त्यात कधी कोणी मातबर ऋषी कांहीं बदल सुचवतात त्यांची नोंद होते व जर ब्रह्माने मान्य केली तर ती सुचना इतर सभांतून अमलात आणण्याचे आदेश दिले जातात. अतिशय चोख अशाप्रकारे हे सगळे कार्य बिनचूक असें होत असते.

अशी आहे वरुणाच्या सभागृहाची माहिती. आता कुबेराच्या पांचव्या सभेची माहिती मी जी पाहिली ती तुम्हाला सांगतो.

अशारितीने सभापर्वातील लोकपाल सभाख्यान पर्वाचा नववा भाग संपला.

# सभापर्व भाग दहावा

(लोकपाल सभाख्यान पर्व पुढे चालू)

नारद पुढे सांगतात, वैश्रवणाचे ते सभागृह त्याच्या वैभवासाठी ख्यातनाम आहे. त्याची मापं अशी आहेत, शंभर योजने लांब आणि सत्तर योजनें रुंद आहे. त्याची रचना स्वतः वैश्वानराने त्याची मायावी शक्ति वापरून केली होती. कैलास पर्वताच्या सारखे सुंदर आणि प्रभावी असें त्याचे स्वरुप आहे. त्याची चमक अशी आहे किं, ते चंद्राला ग्रहण लावते. गुह्यकांच्या आधाराने ते सभागृह आकाशावर अधांतरी उभे असते. त्यातील दालनं सोन्यानी मढवलेली आहेत त्यामुळें त्याच्या सौंदर्यात भर पडलेली आहे. दैवी परिमलाने त्याचा आसमंत दरवळत असतो. त्यामुळें ते सभागृह विशेष आल्हाददायक झालेले आहे. त्याच्या भिंतींचा पृष्ठभाग चट्टेरी पट्टेरी रंगीबेरंगी अशा भासतो. त्यामुळें ते सभागृह विलक्षण आकर्षक वाटते, त्याच्यासारखे दुसरे, मी तरी आजपर्यंत पाहिलेले नाही. त्यात विलक्षण चमक असलेली रत्ने बसवलेली आहेत. शुभ्र ढगाच्या घोळक्यासारखे ते आकाशातील सभागृह पृथ्वीवरून दिसते. ढगामागे सूर्य दडल्याने जसे प्रकाश किरण त्या ढगांच्या मागून फेकल्यासारखे दिसतात, तसें त्या सभागृहाच्या बाबत होते, त्यामुळें ते सभागृह तेजस्वी वाटते. अशा सुंदर सभागृहात मध्यवर्ती ठिकाणी एका देखण्या प्रशस्त आसनावर कुबेर देव विराजमान असतात, त्यांच्या भोवती त्यांच्या हजार बायका बसलेल्या असतात. त्याला शोभेल असा उंची वस्त्राचा पोषाक त्याने नेसला आहे. अंगावर उंची दागिन्याच्या माळा, हातात रत्नजडीत कंकणं, कानात तशीच मौल्यवान कुंडलं असा त्याचा थाट असतो . त्या सभागृहात मंद वहाणारा वारा आहे व तो तेथे जस्मीन, मोगरा, चंपक अशा सुगंधांचा अनुभव तेथे असणार्यांनी देत असतो. अलका नदीतील आणि नंदनवनातील कमळांचा सुगंध सुद्धा तेथे येत असतो. तो यक्षांचा राजा, कुबेर म्हणजेच वैश्रवण त्याच्या भोवती गंधर्व आणि अप्सरांचे घोळके दिसले जेव्हां मी गेलो होतो. ते सगळे त्याची स्तुती गान करत होते. मिष्रकेषी, रंभा त्यात प्रमुख दिसत होत्या. त्याशिवाय चित्रसेना,सुचिष्मिता, चारूनेत्रा, धृताची, मेनका, पुंजिकस्थला, विश्वाची, सहजन्या, प्रेमलोचा, उर्वशी, ईरा, वर्गा, सौरवेई, समिची, वदुदा, लता अशा बर्याच अप्सरा आणि त्यांच्या बरोबर इतर अप्सरा तेथे दिसल्या. त्यांना साथ देण्यासाठी गंधर्व होते व त्यांचे सुश्राव्य संगीत ऐकू येत होते. कांहीं

अप्सरा नृत्य त्या संगीताच्या तालावर करत होत्या. त्या सगळ्या वास्तविक संपत्तीच्या देवाची, कुबेराची स्तुति करत होत्या. त्या सुंदर अप्सरा आणि गंधर्वांच्या गायन व नृत्यामुळें ते सभागृह स्वर्गात विशेष कौतुकाचा विषय बनले आहे. गंधर्वातील किन्नर, नरस, मणिभद्र, धनद, स्वेताभद्र, गुह्यक, कसेरक, गंडकंद, शक्तिमान प्रद्योतक, कुस्तुमवर, पिशाच, गजकर्ण, विशालक, वराहकर्ण, तम्रौश्थ, फल्काक्ष, फलेदक, हंसचुडा, शिखावर्त, विभिषण, पुष्पानन, पिंगलक, सोनितोद, प्रवलक, वृक्षवस्प-निकेता, चिरवसस आणि अनेक इतर यक्ष तेथे हजर होते, ज्यांची नांवे मी सांगू शकणार नाही. कुबेराची सेवा आणि आज्ञापालन यक्ष आणि गंधर्व करतात, त्यांना किन्नर आणि अप्सरा मदत करत असतात अशी व्यवस्था असते. कुबेराच्या सभेत आमच्यासारख्या कितीतरी ऋषींचे सदैव येणे जाणे चालू असते. तेथे प्रसंगी माता लक्ष्मीसुद्धा येत असते. कुबेराचा मुलगा नलकुबेर त्याला मदत करत असतो. अनेक राक्षस, दैत्य आणि दानव आपापल्या कामानिमित्त त्या सभेत हजेरी लावत असतात. त्या सगळ्यांची नांव मी देऊ शकणार नाही इतके ते सगळे आहेत. सृष्टीच्या कारभारासाठी संपत्ति आवश्यक असल्याने सगळेच लहान मोठे देव तेथे वेळोवेळी उपस्थिती लावत असतात. त्यात प्रसंगी, उमापति साक्षात महादेव, असुर भगनेत्राचा वध करणारे, त्यांच्या भयंकर दिसणार्या गणांबरोबर येत असतात. असंख्य कुरूप दिसणारे यक्ष त्यांच्या मोठ्या पोटामुळें मजेशीर दिसणारे, खुज्या देहयष्टीचे इकडे तिकडे फिरत होते. यक्ष कधी राक्षस होतात व कधी राक्षस यक्ष होतात, ते सगळे त्यांच्या आखून दिलेल्या कामानुसार होत असते. त्या सगळ्या गोष्टींचे नियंत्रण ह्या सभेतून होत असते. त्याची स्वरुपं घाबरवणारी होती. कांहीं यक्ष कुबड असलेले, त्यांना मान नसलेले, जणूकाय देहावर डोके बसवले आहे, त्याच्या हातात कच्चे मांस व हाडं आहेत व ते त्याचे चावा घेत खात आहेत असें बिभत्स दृष्य तेथे मी पाहिले आहे. त्यांचे पाय इतके खुजे किं, जणूकाय ते जमिनीतून आले असावेत असें वाटत होते. त्यांचे लाल डोळे पहाणार्याला घाबरवत होते. कांहींच्या कडे विचित्र दिसणारी आयुधं होती व ते अधून मधून हवेत उडून जात होते. कांहीं मध्येच अदृष्य होत असत. सगळे तेथे विचित्र व हृदयाचा थरकाप करणारे असेंच होते. विद्याहरांचा प्रमुख चक्रबंधन, कुबेराच्या आज्ञेची प्रतिक्षा करत असल्याचे मी पाहिले. किन्नराचा राजा भागदत्तसुद्धा तेथे हजर होता. किंपुरुषांचा प्रमुख द्रुम तेथे मी पाहिला.

राक्षसांचा प्रमुख महेंद्र तेथे होता. गंधामदन त्याच्या असंख्य यक्ष सहायकांच्या सह तेथे होता. कुबेराचा धाकटा भाऊ, बिभिषण तेथे आपल्या मोठ्या भावाची मदत करण्यासाठी होता. निरनिराळ्या पर्वतांचे देव हिमवत, विंध्य, सह्याद्री, कैलाश, मंदार, मलय, दुर्दुर, महेंद्र, गंधमादन, इंद्रकिल, सुनव, पूर्वाद्री, त्यांची अनेक शिखरे, मेरू असें सगळे तेथे व्यक्त स्वरुपात उपस्थित होते. नंदीश्वर, महाकाल आणि टोकदार कान असलेली व कोल्ह्यासारखी तोंड असलेली, अशी बरीच देवते (शुभ अशुभ कृत्यांची करक) तेथे कांहीं सांगण्यासाठी आलेले मी पाहिले. कक्ष, कुथीमुख, दंति, विजया असें श्रेष्ठ दर्जाची दैवते तेथे होती, त्यात मधून मधून हंबरणारा नंदीसुद्धा तेथे होता. तो प्रशस्तपणे ऐटीत बसलेला होता. त्याशिवाय अनेक इतर राक्षस आणि पिशाच्च तेथे आली होती आपापली बाजू मांडण्यासाठी. पुलस्त्याचा मुलगा विश्वानर अथवा कुबेर शिवाच्या बरोबर सर्वत्र पुजला जातो. म्हणून बहुधा शंकर (भव) ह्याच सभेत कुबेराबरोबर बसलेले असतात. त्यामुळें त्यांचे भिषण दिसणारे गणसुद्धा तेथेच असतात. अरे युधिष्ठीरा, माणसाला वास्तविक संपत्तीचा मोह जास्त असल्यामुळें तो माणूस शिवाबरोबर वैश्वानराचीसुद्धा पुजा करतो त्याचे कारण हेंच आहे. सर्व विश्वात असलेल्या संपत्तीचा प्रतिनिधी शंख व पद्म व्यक्त स्वरुपात तेथे होते. सहा वासनांच्या देवता, काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर दैत्याच्या रुपात कधी स्त्री रुपात तर कधी पुरुष रुपात तेथे होते. माणसाला अज्ञानात ठेवण्यासाठी ते काम करत असतात. अशी ती कुबेराची अद्वितीय सभा मी पाहिली ती कशी होती ते सांगितले. आता मी तुम्हाला ब्रह्माची सभा कशी असते ते सांगतो.

अशारितीने सभापर्वातील लोकपाल सभाख्यान पर्वाचा दहावा भाग संपला.

# सभापर्व भाग अकरावा

(लोकपाल सभाख्यान पर्व पुढे चालू)

नारद पुढे सांगतात, आता ऐका, खरे सांगावयाचे म्हणजे त्या कृत युगाच्याही आधी बनलेल्या सभेचे वर्णन कोणीही करू शकणार नाही. त्या सुवर्ण युगात तो देव आदिती पृथ्वीतलावर आला, त्यांने ब्रह्माचे सभागृह पाहिले होते जे ब्रह्मांने त्यांच्या विचारांतून उभे केले होते. आदित्या मोठ्या मजेत पृथ्वीवर मानव रुपात भटकत होता. त्याला पृथ्वीवरील विविध गोष्टी पहावयाच्या होत्या. त्यावेळी तो दिवसाचा देव मला म्हणाला, त्याने त्यावेळी मला (नारदाला) ब्रह्माच्या सभागृहाबद्दल सांगितले होते. तो त्यावेळी म्हणाला होता कीं, ते अदृष्य सभागृह असल्यामुळें त्याला मापं नव्हती. त्याच्या केवळ अस्तित्वामुळें मात्र सगळे सुखानंदात डुबत होते. ते त्याचे बोलणे ऐकल्यावर मला ते सभागृह समजून घेण्याची इच्छा झाली. मी त्या आदित्यला सांगितले कीं, मला त्या अदृष्य सभागृहाचा अनुभव घ्यावयाचा आहे. कारण ते फक्त अनुभवानेच समजण्यासारखे असते. जसें आनंद, दुःख हे सांगता येत नाहीत कारण, त्या गोष्टी अनुभवसिद्ध असतात, त्याप्रमाणेच ते सभागृह फक्त अनुभवसिद्ध आहे. मी असें काय केले तर त्याचा अनुभव मला मिळेल ते सांग असें मी त्याला बोललो. "अरें आदित्या मला सांग कोणते तप केले म्हणजे मला त्या विलक्षण सभागृहाचा अनुभव घेता येईल"? माझे ते ऐकून तो दिवादेव मला म्हणाला, "जर तुला खरोखरच त्या सभागृहाचा अनुभव हवा असेल तर एक हजार वर्षे ब्रह्मांच्या नांवाचा जप करावा लागेल तुला हिमालयाच्या शिखरावर". ते ऐकल्यावर मी ते तप केले, त्याच्या अखेरीस तो देदिप्यमान दिवादेव सूर्य मला त्या ब्रह्माच्या अदृष्य सभागृहाकडे घेऊन गेला. ते अदृष्य सभागृह जसे मी म्हणाले, फक्त अनुभवानेच पहाता येते तरी मी कांहीं त्याची लक्षणे तुम्हाला सांगतो. त्या गृहाचा कांहीं विशेष आकार नसतो. त्याची आकारमापे सारखी बदलत असतात. त्याचे कारण, अरे युधिष्ठारा त्या सभागृहात सगळे विश्व सामावलेले आहे. जसें विश्वाचा आकार त्यातील पाप पूण्याच्या प्रभावाखाली बदलत असतो त्याप्रमाणे त्या सभागृहाचा आकार बदलत असतो. आम्ही त्यात असूनही त्याच्या बाहेरसुद्धा होतो. तेथे काळ नसतो. केवळ अस्तित्व असते. तेथे गेलेल्याला अहंकार नसल्यामुळें, सहा दोष (काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर) जे माणसाला व त्यातील आत्म्याला

कार्यकरी करतात ते तेथे नसतात म्हणून तेथे दिसणे, पहाणे, ऐकणे, स्पर्श, गंध, ध्वनि हे सगळे नसतात. म्हणून ते सभागृह अदृष्य असते. त्या सभागृहात फक्त कैवल्याच्या सुखाचाच अनुभव येत असतो जो मी तुम्हाला शब्दांत व्यक्त करू शकणार नाही. स्पर्शानुभव नसल्यामुळें तेथे थंडावा अथवा उष्णता जाणवत नाही. ह्या देहाने कोणी तेथे जाऊ शकत नाही. तेथे तहान, भूक लागत नाही. आपापल्या अध्यात्मिक योग्यतेनुसार प्रत्येकाला वेगवेगळे अनुभव येतात. त्याच्या खाली, वर, बाजूला असें कांहीं नसते. कोणाला तेथे मौल्यवान रत्ने दिसतात, कोणाला अमृताचे हंडे दिसतात, कोणाला आणखीन कांहीं दिसत असते, ज्याची जी कल्पना त्याला तसे वाटत असते. काळ नसल्यामुळें त्याला अंत नाही. मला ते सूर्य चंद्रापेक्षा जास्त देदिप्यमान वाटले. तेथे सगळे विश्व विचारांने उत्पन्न केल्यावर विश्रांति घेत असतात. त्यांच्या बरोबर दक्ष (प्रजापति), प्रचेता, पुलह, मरिची, कश्यप, भृगु, अत्री, वसिष्ठ, गौतम, अंगिरस, पुलस्त्य, केतु, प्रह्लाद, कर्दमत हे चौदा प्रजापति तेथे असतात. त्या बरोबर अथर्ववेद (म्हणजे सगळ्या विज्ञानांचे नियम) सांगणारे अंगिरस, वलिखिल्य, मरीचिप होते. ब्रह्माने त्या सगळ्या मुलभूत ऋषींना आखून दिलेली कामं ते करत असतात व त्यामुळें ही सृष्टी कार्यरत असते. जुन्या देवता रद्द करणे, नव्या उत्पन्न करणे अशी सगळी कामं होत असतात. त्याशिवाय बुद्धी, प्रज्ञा, आकाश, ज्ञान, ह्यांच्या देवता उपस्थित असतात. त्याशिवाय पंचमहाभूतांच्या पांच देवता, भोगेंद्रियांच्या पांच देवता, ज्ञानेंद्रियांच्या पांच देवता तेथे होत्या. तसेंच पुढच्या युगाची तयारी करणारे ऋषी होते. जगबुड करणारी यंत्रणा तयार होती. नव निर्मितीचे विशाल अंडे सुद्धा मी तेथे पाहिले. ते सगळे पहाण्यासाठी त्या योग्यतेचे व्हावे लागते. अनेक इंद्र, शिव, विष्णू, वरुण, यम उत्पन्न करण्याचे काम तेथे कांहीं ऋषी करत होते. अठरा विश्वांचा लेखाजोखा ठेवणारेसुद्धा तेथे होते. असा हा व्याप असूनही ते एकाच बिंदूत आहे असा अनुभव होत होता. अगस्त्य, मार्कंडेय, जमदाग्नि, भारद्वाज, समवर्त, च्यवन, दुर्वास, देवल, जैगिशव्य, ऋषभ, अजातशत्रू, मणी हे सगळे आणि आणखीन कांहीं तेथे युगांच्या कारभारा करता कार्यरत असलेले पाहिले. सगळे तारे, सगळे सूर्य, सगळे चंद्र, आपल्या प्रातिनिधीक स्वरुपात तेथे होते. आयुर्वेद, अथर्ववेद, साम वेद तेथे होते. यज्ञाच्या अनेक देवता, मंत्रांच्या देवता, मुलतत्वाच्या देवता अशा असंख्य देवता तेथे

ब्रह्माच्या आज्ञेची प्रतिक्षा करत होत्या. सर्व भावना, वासना, भोग, तपस्या, वैराग्य, त्याग प्रवृत्ति, उदासभाव, भक्ति, त्याच प्रमाणे स्वार्थ, क्रोध, दुःख, द्वेष, मत्सर, सुड, मान, अपमान, क्रिया, प्रतिक्रिया, तटस्थता अशा बर्याच देवता तेथे येत जात होत्या. विश्वाचे सगळे लोकपाल, गंधर्वांच्या आणि अप्सरांच्या वीस प्रजाति, शुक्र, अनेक बृहस्पति, बुध, मंगळ (अंगारक), शनि, राहू, केतू व इतर ग्रहांच्या देवता तेथे होत्या. हरिमत व वसुमत, आदित्य देवता होत्या. दोन अग्नी (अग्नीसोम, इंद्राग्नि) सावित्री, वेदोच्चाराचे प्रकार, शांति, संयम, क्षमा, शिक्षा (सजा), बलिदान, अर्ध्य, ह्या देवतांसुद्धा मी तेथे पाहिल्या. लिखाण, वाचन, पठण, गायन, वाद्य वाजंत्री, सगळी विज्ञानं तेथे तयार होत होती. व्याकरण, तर्क, गणित, न्याय, रुपक, उपमा, व्यंजन, असे सगळे तेथे व्यक्तरुपात हजर होते. ते सगळे ब्रह्माच्या आदेशाची प्रतिक्षा करत होते. रात्र, दिवस, क्षण, लवस, मुहूर्त, पंधरवडा, महिना, वर्ष, आठवडा, सहा मोसम, युग, मन्वंतर, चार प्रकारचे दिवस (माणसाचे, पितरांचे, देवांचे व ब्रह्माचे), अगम्य, अज्ञात, विनाशी, अविनाशी, चांगले, वाईट, कालचक्र, गुणचक्र ब्रह्माच्या आज्ञेसाठी तयार होते. प्रजापतिच्या कन्या अदिती, दिती, दानु, सुरसा, विनता, ईरा, कलिका, सुरभी, देवी, सरमा, गौतमी, प्रधा आणि कद्रू ह्या स्वर्गातील प्रजातिंच्या माता तेथे होत्या. त्याशिवाय रुद्राणी, लक्ष्मी, भद्रा, शस्थी, पृथ्वी, गंगा, र्ही, स्वाहा, किर्ती, सुरा, साची, पुष्टी, अरुंधति, समवृत्ती, असा, नियति, सृष्टी, रति, आणखीन बर्याच देवता तेथे होत्या. अनेक आदित्य, वसु, रुद्र, मरुत, आश्विन, विश्वदेव, साध्य, पितर, वेगांने प्रवास करणारे तेथे होते. अरे राजा तुला माहीत आहे कां, ह्या सृष्टीच्या उत्पत्तीस कशी सुरुवात झाली? ब्रह्माने प्रथम दोन परिमाणं उत्पन्न केली त्याच्यातून आणखीन तीन परिमाणं उत्पन्न झाली. पहिली दोन आहेत, विचार आणि रचना. ही दोनही अव्यक्त आहेत त्यांतून प्रथम काळ (कांहीं तज्ज्ञांच्या मते काळ सापेक्ष अव्यक्त अथवा व्यक्त असतो) नंतर दिशा (लांबी, रुंदी व उंची) व शेवटी भार (वजन, गुरुत्वाकर्षण) असें उत्पन्न झाले हे तीन व्यक्त होतात व त्यातून सृष्टीचा विकास झाला आहे. रचना ह्या तत्त्वामुळें आकार दिसू लागले. अरे युधिष्ठीरा तुला माहीत आहे कां? पितरांचे सात प्रकार असतात. त्यातील चारांना दृष्य स्वरुप असते व तिघांना नसते. वैरज आणि अग्नीस्वत्त, गर्हापत्य, स्वर्गातच असतात. सोमप, एकशृग्र, चतुरवेदी आणि कलश हे

माणसांने पुजावयाचे असतात. माणसाच्या चार वर्णांचे लोक त्यांना पुजतात. त्या पितरांच्या सगळ्या प्रजातिना सोमरस दिल्यानंतर ते संतुष्ट होतात व मग मोठ्या आनंदाने ब्रह्माची सेवा करण्यास तयार होतात. राक्षस, पिशाच्च, दानव, दैत्य, गुह्यक, नाग, पक्षी वर्ग, विविध प्राणी, सर्व चर आणि अचर जीव ब्रह्माची पुजा करतात. पुरंदर, इंद्र, शक्र, वरुण, कुबेर, यम, महादेव, त्याच्या स्त्रीस्वरुपासह उमा तेथे येत असतात. राजराजा कार्तिकेय, महासेन सुद्धा मी तेथे आलेला पाहिला आहे. नारायण स्वतः इतर स्वर्गस्थ ऋषी त्यात वलखिल्य व सगळे गर्भज प्रजाति असें सगळे त्रिलोकातील तेथे हजेरी लावत असतात. अरे राजा, पन्नासहजार ऋषी ज्यांनी त्यांचे वीर्य स्थंभन केले आहे, ते त्यांच्या पुत्रांबरोबर तेथे आलेले मी पाहिले आहे. ते तेथे राहून सदैव ब्रह्माचे दर्शन घेत असतात. तृप्त झाल्यावर ते आपल्या निवासस्थानी परत जातात. सर्व जगाचा कारण तारण कर्ता असा तो ब्रह्मदेव सगळ्यांवर सारखीच माया करतो. जो त्याची प्रार्थना मनोभावे करतो त्याला त्याच्या योग्यतेनुसार कृपा करतो. त्याला पापी, पुण्यवान, सिद्ध, सगळेच सारखेच प्रिय असतात. त्यामुळें अरे राजा, ती सभा नेहमीच गजबजलेली असते. अशी मी पाहिली ते ब्रह्माचे अद्भूत सभागृह. ती स्वर्गाच्याही पलिकडे असते. हि सृष्टी त्रैलोक्याची (स्वर्ग, पृथ्वी आणि पाताळ) आहे परंतु, ब्रह्माचे स्थान त्याही पलिकडे असते. तुझे सभागृह येथे पृथ्वीवर आहे. माणसांच्या सभागृहात ते अद्वितीय आहे, स्वर्गातील आणि त्या पलिकडील गोष्टींशी तुलना पृथ्वीवरील गोष्टींशी होत नाही म्हणून, ते मी करणार नाही.
अशारितीने सभापर्वातील लोकपाल सभाख्यान पर्वाचा अकरावा भाग संपला.

# सभापर्व भाग बारावा

(लोकपाल सभाख्यान पर्व संपले)

युधिष्ठीर विचारतो, अहो महामुनी बोलण्यात चतुर अशा तुम्ही, त्या सगळ्या सभागृहांबद्दल आम्हाला वर्णन करून सांगितले. तुमच्या सांगण्या प्रमाणे बहुतेक सगळे मोठे सम्राट यमाच्या सभेत होते. तसेंच वरुणाच्या सभेत नाग, दैत्य, नद्या, समुद्र असें वरुणाच्या सभेत होते. यक्ष, गुह्यक, राक्षस, गंधर्व, अप्सरा व यम हे वैश्रवणाच्या, कुबेराच्या सभेत दिसतात. त्यानंतर आपण सांगता किं, ब्रह्माच्या सभेत महाऋषी, सगळे देव, सगळ्या ज्ञानाच्या शाखा, सगळी मुलभूत तत्त्वे देवाच्या व्यक्त रुपात दिसतात. इंद्राच्या सभेत तुम्ही पाहिले सगळे देव, गंधर्व, आणि बरेच ऋषी परंतु फक्त एकच राजा तेथे तुम्हाला दिसला. ते हरिश्चंद्र होते. ते इंद्राबरोबर रहातात असें दिसते. मला सांगा, अहो मुनी, असें काय त्यांनी केले कीं, त्यांना अशी श्रेणी मिळाली? त्यांने काय तपस्या केली? कोठल्या प्रकारचे व्रतस्थ जीवन ते जगले ज्यामुळें ते इंद्राच्या योग्यतेला पोहोचले ते सांगा. आपण माझ्या पित्याला, पंडु, कसे पाहिले? ते पितर जगातील पाहूणे आहेत. तुमचे त्याच्याशी कांहीं संभाषण झाले कां? त्यांनी तुम्हाला आमच्या बद्दल कांहीं सांगितले कां? कांहीं सांगितले असेल तर ते समजून घेण्याची आम्हा सगळ्या पांडवांना कुतुहलता आहे.

नारद सांगतात, राजाधिराजा, युधिष्ठीरा, तुला जी माहिती हरिश्चंद्राबद्दलची पाहिजे ती सगळी मी तुला आता सांगणार आहे. तो एक जबरदस्त ताकदवान राजा होऊन गेला. तो सगळ्या पृथ्वीवरील राजांचा राजा होता. सगळे त्याच्या काळातील इतर राजे त्याचे ऐकत असतं. त्याच्या सोन्याच्या रथात बसून तो धाडसी राजा त्याच्या प्रभावी शस्त्रास्त्रांच्या जोरावर सगळी सात बेटे असलेले हे जग जिंकतो. त्या भूप्रदेशातील सगळे पहाड, अरण्ये, वनराया, नद्या, सपाट जमिनी जिंकल्यावर तो राजा एक मोठा यज्ञ करण्याचे ठरवतो. त्या यज्ञाचे नांव राजसूय यज्ञ असें असते. त्याचे सगळे मांडलिक राजे त्यासाठी त्याला आवश्यक असलेले धन गोळा करून देतात. सगळे राजे त्या यज्ञात भाग घेऊन जमवलेले धन, अन्न वगैरे ब्राह्मणांना दान करण्याचे ठरते. विविध देशांतून आलेले ते ब्राह्मण त्या भेटी व दानं घेऊन संतुष्ट होत होते. ते ढिगारभर धन, दौलत मिळाल्यानंतर ते ब्राह्मण राजाबद्दल बोलतात कीं हा राजा सर्व नरेशांत सर्वश्रेष्ठ आहे. त्या कृपादृष्टीमुळें तो श्रेष्ठ

राजा इतर सगळ्या हजारो राजांपेक्षा जास्त तेजस्वी झाला. तो यज्ञ समाप्त केल्यावर त्याची जागा देवांच्या राज्यात निश्चित झाली. तेथील सिंहासनावर तो शोभू लागला. त्याशिवाय ज्या इतर राजांनी त्या यज्ञात हरिश्चंद्राला सहकार्य केले ते सुद्धा स्वर्गात उच्च पदावर विराजमान झाले. ते सगळे इंद्राच्या सानिध्यात आपले काळ घालवू लागले. अरे राजा, जे राजे जीवाची पर्वा न करतां सत्यासाठी लढतात व वीरगती प्राप्त करतात तेसुद्धा अशारितीने इंद्राच्या सभेत सन्माननीय ठरतात. जे  घोर तप करून त्यातच अंत पावतात तेसुद्धा अशाप्रकारे स्वर्गात इंद्राकडे जातात व तेथे देवांचा पाहूणचार अनेक तपं घेत रहातात. अरे कुरु वंशाच्या राजा, कुंतीपुत्रा , पंडुच्या सुपुत्रा, मला तुझा तात एकदा तेथे भेटल्यावर बोलला होता किं, पृथ्वीवर गेलास तर माझ्या मुलांना सांग किं, त्याचा एकोपा इतका श्रेष्ठ आहे कीं, ते हे जग जिंकू शकतात व त्यानंतर जर त्यांनी राजसूय यज्ञ केला तर त्यांच्या त्या सत्कर्मामुळें मला इंद्राच्या बरोबर अनंत काळ हरिश्चंद्रासारखे बसता येईल. नारद पुढे सांगतात, मी त्याला आश्वासन दिले कीं, जर मी पृथ्वीवर गेलो व त्याच्या मुलांना भेटलो तर त्याची इच्छा त्यांना न विसरता सांगेन. त्याप्रमाणे मी आता तुम्हा पंडुपुत्रांना त्याचा तो निरोप देत आहे. नारद पुढे सांगतात, केवळ तुमचा पिताच नाही तर तुम्हीसुद्धा आणि तुमचे सगळे पूर्वज अशारितीने जर यशस्वीपणे राजसूय यज्ञ केला तर त्याच्या सारखे स्वर्गात इंद्राच्या सानिध्यात कायम जाऊ शकता. त्यानंतर पुनः मानव जन्म घ्यावाच लागणार नाही, एकापरीने मोक्ष मिळवण्यासारखेच ते आहे. हे राजसूय यज्ञाचे फायदे ऐकल्यावर खूष झालेल्या पांडवांना नारद सांगतात, असें असले तरी हा यज्ञ करण्यात अनेक अडचणी असतात. राक्षसांपैकीं ब्रह्मराक्षस राजसूय यज्ञात बाधा उत्पन्न करतात. ते राक्षस देवांपेक्षा जास्त चतुर असतात आणि ते त्या यज्ञात कोणती तृटी आहे ते शोधून यज्ञ थांबवतात. बर्याच वेळा असा यज्ञ करणार्याच्या समोर युद्धाचे सावट उभे रहाते. त्या युद्धात अनेक क्षत्रिय मारले जातात. प्रसंगी संपूर्ण पृथ्वीचा नाश संभवतो. एक जराशी चूक आणि सगळे बरबाद होते. एवढे सांगितल्यावर तो मुनीवर राजाला सावध करतो किं, जर त्यांने त्याची प्रजा, त्यातील सर्व चारही वर्णाच्या लोकांत सुख शांती आणि समाधान राखले, तर त्यांच्या कृपेमुळें ब्रह्मराक्षस दुर्बळ होतात व त्यांचे सगळे प्रयत्न फोल ठरू शकतात. म्हणजे राजसूय यज्ञ करणार्या राजाची प्रजा, त्याच्या मांडलिक राजांची

प्रजा असें सगळे सुखी, समाधानी व शांत असणे अनिवार्य असते. म्हणजे असांच राजा हा यज्ञ करू शकतो ज्यांने त्याचे त्याच्या प्रजेबाबतची जबाबदारी सुयोग्यरित्या पार पाडलेली आहे. एवढे सांगून नारद थांबतात.

नारद युधिष्ठीराला अखेरीस बोलतात किं, त्यांने संमृद्ध होऊन हे राज्य वाढवावे आणि राजसूय यज्ञाच्या भरीस पडू नये. वेळोवेळी ब्राह्मणांना संतुष्ट करावे, इतर वर्णांचे भले करावे हि राजाची कर्तव्ये चांगल्या बुद्धीने पार पाडावीत एवढे झाले तरी खूप होईल. त्यानंतर नारद सांगतात कीं, त्यांची आता जाण्याची वेळ आली आहे, ते येथून थेट द्वारकेला दशरथांच्या राजधानीकडे जाणार आहेत.

वैशंपायन सांगतात, अरे जनमेजया, असें बोलून नारद त्यांच्या बरोबर आलेल्या ऋषींसह पांडवांना अनेक आशिर्वाद देत निरोप घेतात. नारदांच्या जाण्यानंतर तो पराक्रमी राजा व त्याचे चार तुल्यबळ बंधू ह्यांच्या बरोबर त्या अवघड यज्ञाचा विचार करू लागतात. वैशंपायन गमतीने बोलतात, नारदांनी त्यांच्या सवयीप्रमाणे पांडवांत राजसूय यज्ञाची इच्छा निर्माण केली.

अशारितीने सभापर्वातील लोकपाल सभाख्यान पर्वाचा बारावा भाग संपला.

# सभापर्व भाग तेरावा

(राजसूयारंभ पर्व सुरु)

वैशंपायन बोलतात, युधिष्ठीर नारदाचे ते ऐकून जोरजोराने श्वास घेऊ लागतो. त्याच्यात तो यज्ञ करण्याची इच्छा प्रबळ होऊ लागते. त्या विचारात सतत राहिल्यामुळें त्याची झोप नाहीशी होते. त्याची खात्री असते कीं, तो त्याच्या चार भावंडांच्या मदतीने साम्राज्य स्थापन करू शकतो. त्याशिवाय त्याला त्याच्या पित्याचे नारदाला जे सांगणे होते त्याची सारखी आठवण येत रहाते. पंडु नारदाला बोलले होते किं, त्यानी पंडुपुत्रांना तो राजसूय यज्ञ करण्याची आज्ञा केली आहे. त्या राजा हरिश्चंद्राच्या इंद्राबरोबर रहाण्याचे सारखे आठवत असते. आपण हा यज्ञ केला तर आपण व आपले बंधूसुद्धा इंद्राबरोबर राहू शकू ह्या कल्पनेने तो राजा अधीर झाला होता. अशा सगळ्या विचारांचे काहूर त्याच्या डोक्यात माजल्यामुळें तो अस्वस्थ झाला होता. युधिष्ठीर तो अवघड यज्ञ करण्याचा निर्धार करतो. आपल्या सगळ्या मंत्र्यांना बोलावतो, त्यांचे आदरतीथ्य केल्यानंतर तो राजा ह्या यज्ञाचा विषय त्यांच्या सभेत काढतो. ते सगळे त्या मुद्द्यावर चर्चा करतात. त्यानंतर तो यज्ञ करण्याच्या तयारीला सगळ्यांना लागण्याची आज्ञा देतो. सर्वांचे भले झाले तरच तो यज्ञ करणे शक्य असते हे लक्षात घेऊन तो ते कसे साध्य करावयाचे त्याचा विचार करू लागतो. स्वभावतः तो तेंच सदैव करत होता तरी आता आणखीन खास कांहीं करावयाचे ते तो पहात असतो. कोणावरही न रागावता तो राजा एरवीसुद्धा सगळ्यांचे चांगलेच करीत असें, त्यामुळें त्याची प्रजा त्याला धर्मात्मा म्हणून ओळखत होती. त्यामुळें त्याचे नांव धर्म असें पुढे जास्त प्रचलित झाले. ज्याचे त्याच्या योग्यते नुसार द्यावे असा संकेत होता त्याच्या राज्याचा. तो सगळ्या जनतेचा अक्षरशः मायबाप झाला होता. त्याच्या त्या वागण्यामुळें त्याचा द्वेष करणारे कोणीही नव्हते. तो जणू अजातशत्रू म्हणून ओळखला जाऊ लागला. त्याच्या जनतेतील सगळे त्याच्या घरातील सदस्य आहेत असें त्याचे वर्तन होते. त्याला त्याच्या सगळ्या चारही भावांची साथ उत्तम मिळत होती. भिमाचा राज्यकारभार निर्दोष असें, अर्जुन सगळ्यांचे संरक्षण करत असें, सहदेव व नकुल लोकांकडे न्यायाने वागत असत. त्यामुळें व्यापार, शेती, सावकारी, कारखाने असें सगळे विनाक्लेश प्रगती करत होते. राजाबरोबर प्रजासुद्धा समृद्ध होत होती. त्या सर्वांना कुंतीचा

आधार होता व त्यांची पत्नी त्यांना प्रेमांने सांभाळत होती. जो तो आपापले काम, कर्तव्य चोख बजावत होता. चारही वर्णाचे लोक व त्यांचे प्राणी संतुष्ट रहात होते, त्याचा परिणाम स्वरुप ऋतु सुद्धा वेळच्या वेळी येऊन निसर्ग समृद्ध करत होते. राज्यातील लहान मोठ्या देवता संतुष्ट झाल्या होत्या. कोणीही कोणावर अन्याय करू शकत नव्हता कारण तशी वेळच येत नव्हती. लहानमोठे मतभेद सामोपचाराने सुटत होते. मद व मत्सर त्याच्या राज्यातून पार नाहीसे झाले होते. त्याच्या राज्यात चोर, लुटारु, भामटे, व्यसनी, जुगारडे. खोटे बोलणारे राहिले नाहीत. वशिलेबाजी, भ्रष्टाचार, पळवापळव, विश्वासघात हे होत नव्हते. त्याचे राज्य राजसूय यज्ञाच्या दृष्टीने योग्य होत होते. ब्रह्मराक्षसाना कोठलीही उणीव त्यात शोधून सुद्धा मिळत नव्हती. ते पांडव एकामागोमाग एक अशी राज्ये पादाक्रांत करत होते व ज्या राज्यात त्यांचे राज्य प्रस्थापित होत होते तेथे तशीच परिस्थिती ते बनवत होते. त्यामुळें आजुबाजूच्या राज्यांना आणि राजांनासुद्धा युधिष्ठीराचे राज्य यावे असेंच वाटत होते. युधिष्ठीराचे मांडलिक सुद्धा त्याच्या कारभारामुळें संतुष्ट होत होते. राजा त्यांच्या प्रजेला व त्या राजांनासुद्धा संरक्षण देत असें. सर्वदूर युधिष्ठीराच्या साम्राज्यात ब्राह्मण आणि शुद्र सारखेच सन्मानाने वागवले जात होते. त्यामुळें कोणाची कधी अढी झाली नाही. सर्वत्र न्यायाचेच राज्य होते. एवढे साध्य झाल्यावर त्याचे मंत्री त्याला सांगू लागले किं, राजा आता तुम्ही तो यज्ञ करावा ज्यामुळें तुम्ही वरुणदेवाच्या योग्यतेला जाल. सगळे त्यांचे मित्र  सांगू लागले, अरे धर्मात्म्या युधिष्ठीरा, तू आता तो यज्ञ करच, कारण ती वेळ आली आहे. त्याकरतां व्रतस्थ तपस्वी ऋषींनी येऊन सहा अग्नी प्रज्वलित करून सामवेदांचे मंत्र उच्चारण सुरु केले पाहिजे, तुझ्या क्षात्र धर्माच्या उन्नतिसाठी. जेव्हां तो राजा, राजसूय यज्ञाचा यजमान, त्यानंतर त्याच्या सिंहासनावर विराजमान होतो तेव्हां त्याला त्या अग्निहोत्राचे सगळे फायदे प्राप्त होतात. त्यासाठी त्याला विश्वजित असें अभिधान प्राप्त होते. हे राजा आम्ही सगळे तुझ्या सह आहो, लवकरच तू तो यज्ञ सुरु करशिल असें समजतो. म्हणून जेवढे त्वरित होईल तेवढे हा यज्ञ प्रारंभ करावा असें त्याचे सगळे मित्र व सहकारी युधिठीराला आग्रह करू लागतात. ते त्याच्या हितचिंतकांचे बोलणे राजाने मनातल्या मनात स्वीकारले परंतु, तो आणखीन कांहीं गोष्टींची प्रतिक्षा करत होता. राजाला त्याच्या राजगुरूची त्यासाठी मान्यता हवी होती, त्याशिवाय इतर ऋद्विज,

द्वैपायन अशा मान्यवरांची त्यासाठी परवानगी त्याला त्यांच्या स्वखूषीने मिळणे आवश्यक होते. युधिष्ठीर त्यांना सगळ्या त्याच्या हितचिंतकांना बोलतो, केवळ तुमच्या आणि माझ्या इच्छेने असा यज्ञ आरंभ करणे कसें उचित होईल, त्यासाठी विधात्याच्या मर्जीचासुद्धा विचार काय आहे ते पहाणे मला आवश्यक वाटते. ते सर्वज्ञ जाणतात कीं, ब्रह्मराक्षस कोठे दबा धरून बसले आहेत त्या यज्ञाला बाधा करण्यासाठी, आणि ते सगळे निर्दोष आहे असें स्पष्ट झाले, तरच आपण सगळे हा राजसूय यज्ञ करण्यास प्रारंभ करणे श्रेयस्कर ठरेल. केवळ मी त्या यज्ञासाठी योग्य असून तेवढे पुरेसे नाही. त्याच्या त्या विनम्रतेचे सगळे ऋद्विज आणि ऋषी कौतुक करतात. युधिष्ठीर त्याच्या इतर बाबींचा सुद्धा विचार करत असतो. त्याच्या समजूतीनुसार कोणताही निर्णय विशेषकरून अशा महत्वाच्या बाबींबद्दलचा, विवेकपूर्ण असला पाहिजे. कारण जे निर्णय भावनिक प्रभावाखाली घेतले जातात त्यात अपयश दडून बसलेले असते. म्हणून तो त्याच्या सगळ्या मित्रांना सांगतो, किं, ह्याबद्दलचा अंतिम निर्णय तो स्वतः घेणार नाही, तर जर कोणी मातबर त्यास सुचवेल किं आता त्यांने हा यज्ञ करावा तरच तो त्याचा विचार करील. असा कोण मातबर आहे ते पहावयाचे आहे, जो विधात्याशी जोडलेला आहे. युधिष्ठीर त्यासाठी त्याच्या चारही भावांचासुद्धा सल्ला घेतो. अखेरीस सर्वमताने असें ठरते किं, त्यासाठी त्यांने श्रीकृष्णाचा सल्ला घ्यावा. कृष्णाच्या लिला सगळ्यांना माहीत होत्या. त्याचे अभूतपूर्व ज्ञान त्याला माहीत होते. कृष्ण त्यांचा खरा हितचिंतक आहे हेसुद्धा त्यासाठी विचारात घेतले गेले आणि अशारितीने अखेरीस कृष्णच त्याबद्दलचा अंतिम निर्णय घेण्यासाठी सुयोग्य ठरला. ते ठरल्यावर तो जगद्जेता राजा त्याचे संदेशवाहक द्वारकेला पाठवण्याचे ठरवतो. त्या संदेशवाहकाबरोबर तो असा संदेश धाडतो जसा मोठ्यानें लहानाना पाठवावयाचा असतो. तरी त्यात लहानाचे श्रेष्ठत्वसुद्धा अभिप्रेत आहे. संदेश मिळाल्यावर कृष्णाला समजते किं, त्याच्या आत्येभावांना त्याला कांहीं कामानिमित्ताने भेटण्याची तीव्र इच्छा आहे. ते समजल्यावर तो दामोदर त्याच्या वेगवान रथाने इंद्रप्रस्थाकडे निघतो. त्याच्या बरोबर इंद्रसेन असतो. इंद्रप्रस्थात आल्यावर लागलीच तो युधिष्ठीराच्या घरी जातो. तेथे त्याचे स्वागत युधिष्ठीर आणि भिम मोठ्या प्रेमांने करतात. औपचारीक बोलणी झाल्यावर तो जनार्दन तडक त्याच्या आत्येकडे जाऊन तिच्या पाया पडतो. त्यांनतर तो त्याचा

सखा अर्जुन आणि दुसरे दोघे पांडव ह्यांना भेटून आलिंगन देतो. त्यानंतर तो एका प्रशस्थ दालनात विश्राम करण्यासाठी जातो. कृष्णाचा प्रवासामुळें आलेला थकवा निघाल्यावर थोड्या समयानंतर राजा युधिष्ठीर त्याला भेटण्याची परवानगी मांगतो. तेथे बोलण्याच्या दरम्यान धर्मराजा राजसूय यज्ञाचा विषय काढतो. तो कृष्णाला सांगतो, "आमच्या सगळ्यांची अशी इच्छा आहे किं, आता एवढे साम्राज्या स्थापन केल्यानंतर मी राजसूय यज्ञ करावा, परंतु, त्यासाठी मला तुझा प्रामाणिक व आमच्या भल्याचा सल्ला, मार्गदर्शन हवे आहे. तर तुला काय वाटते ते सांगावेस. तुला सगळे माहित आहे कीं, त्यासाठी काय केले पाहिजे व इतर सावधानीच्या गोष्टी, त्यासाठी तू जे सांगशील तसें आम्ही करणार आहोत. माझे सर्व मंत्री आणि ऋद्विज अशा मताचे आहेत किं, मी तो यज्ञ करण्यास योग्य वेळ आली आहे. त्याशिवाय आमचें स्वर्गस्थ पिता पंडु नारद मुनीना बोलले आहेत किं मी तो यज्ञ करावा. त्यासाठी जे योग्य ठरेल तुझ्या विचारांने ते करण्याचा माझा, आमचा मानस आहे. मला अनुमोदन देणार्यांचे आपले त्यात स्वार्थ असतात त्यामुळें त्यांच्या मताने मी कांहीं करणार नाही. ती गोष्ट तुझ्याबाबत नाही. तू जो निर्णय घेशिल त्यात तुझा मतलब नसतो तर केवळ आमच्या हिताचेच तू सांगशिल ह्यांवर माझा व माझ्या भावंडांचा विश्वास आहे, म्हणून तुला आम्ही येथे मार्गदर्शनासाठी बोलावयाचे ठरवले.

अशारितीने राजसभा पर्वातील राजसूयारंभ पर्वाचा तेरावा भाग संपला.

# सभापर्व भाग चौदावा

(राजसूयारंभ पर्व पुढे चालू)

ते ऐकून कृष्ण त्याला बोलतो, "अरे युधिष्ठीरा तुझ्यात राजसूय यज्ञ करण्यासाठी आवश्यक असलेले सगळे उत्तम गुण आहेत. तरीसुद्धा मी तुला आता कांहीं गोष्टी सांगतो, जे क्षत्रिय म्हणून समजले जातात व जे इतर समजले जातात त्यांच्या बद्दलची माहिती मी आता तुला सांगतो. जामदग्न्यने (परशुरामाने) कां त्यांचा विनाश केला ते समजून घे. त्यात क्षत्रियांच्या विविध परंपरा ज्या त्यांच्या मध्ये वंश परंपरेने प्रचारात आहेत त्यांची माहिती सांगतो. त्यावरून त्यातील कोण हा राजसूय यज्ञ करण्यास योग्य आहेत ते तुला समजेल. अनेक क्षत्रियांचे वंश स्वतःला ऐल व ईश्वाकू ह्यांचे वंशज असल्याचे मानतात. आता पर्यंत त्या दोनही कुळांतील वंशजांच्या असंख्य शाखा उत्पन्न झाल्या आहेत. त्यातील ययाति व भोज ह्यांचे वंशज आज असंख्य झाले आहेत व त्यांची कर्तृत्वेसुद्धा मान्यवर समजली जातात. त्यांचे वंशज सगळे पृथ्वीवर पसरलेले आहेत. बाकीच्या सामान्य क्षत्रियांतील बरेच त्यांची आज्ञा मानून वागतात. असें असले तरी यादव असूनही जरासंध त्याच्या सामर्थ्याने इतरावर कुरघोडी करत आहे".

एवढे ऐकल्यावर युधिष्ठीर न राहून मध्येच सांगतो किं "नारदांने सांगितले कीं, वैश्वानराच्या सभेत अनेक गंधर्व, यक्ष, राक्षस, अप्सरा आणि यमदेव त्यांने पाहिले. शक्राच्या सभेत अनेक ऋषी, मुनी, गंधर्व, देव त्यांने पाहिले. परंतु फक्त एकच राजा त्यांनी तेथे पाहिला व तो होता हरिश्चंद्र. असें त्यांने कोणते मोठे काम केले की, त्याला इंद्राच्या जवळ स्थान मिळाले. काय त्यानें तप केले कां कांहीं व्रतस्थता पाळली कीं इतर कोणते काम केले ते मला समजले पाहिजे. पुनः तेथे त्या श्रेष्ठ मुनीस माझे पिता पितरांच्या ठिकाणी भेटले व त्याला म्हणाले कीं, जर ते पृथ्वीवर गेले व त्यांच्या पुत्रांस भेटले तर त्यांना माझी इच्छा सांगा कीं, पांडवांनी हा यज्ञ करावा. असें नारदांनी स्वतः आम्हाला सांगितले. त्याप्रमाणे नारदांनी आम्हाला तो आमच्या पित्याचा निरोप दिला आहे. परंतु, माझ्या भावा, मला हे सगळे तुझ्या तोंडून ऐकावयाचे आहे म्हणजे मी त्यावर कांहीं कार्य करू शकेन".

त्यावेळी नारद आम्हाला हरिश्चंद्राची माहिती देतांना म्हणाले, "तो एक महान राजा होऊन गेला. तो शक्तिमान सुद्धा होता. तो पृथ्वीवरील राजांचा राजा होता. ते सगळे राजे त्याच्या

आज्ञेचे पालन मोठ्या आदराने व स्वखुषाने करत असत. त्याच्या सोन्याच्या रथातून त्यांने पृथ्वी पादाक्रांत केली, सगळी सात समुद्राने वेढलेली जमीन त्याच्या नियंत्रणाखाली आली होती. अशारितीने सगळी पृथ्वी ताब्यात आल्यावर त्यांने राजसूय यज्ञ करण्याचा निर्णय घेतला व त्यात त्याने त्याचे सगळे मांडलिक राजे सामिल करून घेतले होते. त्यामुळें सगळ्या जगातून अमाप धन संपत्ति त्या यज्ञाकरता गोळा केली गेली. सगळ्यांनी मिळून तो यज्ञ यशस्वी केला, कोणी धान्य दिले, कोणी पैसा, कोणी जनावरं, कोणी इतर कांहीं असें सगळे गोळा केले गेले. कोणी ब्राह्मणांचे पाहिले. सगळ्या मांडलिक राजांनी जेवढी संपत्ति आणली त्याच्या पेक्षा पांचपट त्या एका हरिश्चंद्राने दिली होती. सगळे ब्राह्मण त्यामुळें अतिप्रसंन्न झाले व त्यांनी अनेक आशिर्वाद राजांना दिले. ते ब्राह्मण राजाचा जयजयकार करू लागले. ब्राह्मणांच्या त्या बोलण्यामुळें तो राजा हरिश्चंद्र सर्व राजांत श्रेष्ठ ठरला. राजसूय यज्ञ संपन्न झाल्यानंतर तो राजा त्याच्या आसनावर आरुढ झाला. त्यावेळी तो अतिशय तेजस्वी दिसत होता. नारद त्यानंतर आम्हाला म्हणाले किं. जे राजे हा यज्ञ करतात ते कायम इंद्राच्या जवळच रहातात. त्यांना पुनः मानुष्य जन्म घ्यावा लागत नाही. त्याशिवाय जे क्षत्रिय शत्रूशी सत्यासाठी जीवाची पर्वा न करतां लढतात व अखेरीस वीरगती प्राप्त करतात ते सुद्धा त्या पदाला जातात. त्याचप्रमाणे, जे घोर तप करून शरीर झिजवतात तेसुद्धा त्या गतिला पोहोचतात. त्यानंतर तो महामुनी नारद पांडवांना सांगतो, त्याला त्यांचा पिता पंडु इंद्रलोकातील पितरांत बसलेला दिसतो. तेथे तो नारदाला विनंती करतो कीं, जर नारद मृत्युलोकांत गेला व त्याच्या मुलांना भेटला तर त्यांने पंडुचा निरोप द्यावा की, पंडुची अशी आज्ञा आहे किं, पांडवानी मिळून हा राजसूय यज्ञ करावा म्हणजे पंडुला त्यांच्या बरोबर हरिश्चंद्रा प्रमाणे इंद्राच्या जवळ स्थान प्राप्त होईल व तो अनंत काळ कायम इंद्राकडेच सुखात राहिल. त्यावर नारद त्याला आश्वासन देतो किं, तो त्याची निरोप वजा आज्ञा, त्याच्या मुलांपर्यंत पोहोचवेल". एवढे सांगून नंतर युधिष्ठीर कृष्णाला पुढे सांगतो, "परंतु, अशा यज्ञात तो करतांना अनेक बाधा उभ्या रहातात. ब्रह्मराक्षस प्रजातीतील राक्षस इंद्राच्या आदेशानुसार त्यात अनेकविध व्यत्यय उपस्थित करतात. जसा हा यज्ञ सुरु होतो तसे ते ब्रह्मराक्षस त्यात कोठे उणीवा आहेत कां ते हुडकून काढून तो यज्ञ थांबवतात. बर्याच वेळा एकादे मोठे विघ्न युद्धाच्या रुपांने

उभे रहाते. अशा मोठ्या लढाईमुळें जगाचा नाशसुद्धा होण्याची शक्यता उत्पन्न होत असते. राज्यातील चारही वर्णाचे लोक पूर्णतया संतुष्ट असावे लागतात व जरी एक शुद्र असमाधानी आढळला तरी तो यज्ञ पूर्ण होऊ शकत नाही".

एवढे सांगून युधिष्ठीर पुढे कृष्णाला बोलतो, "अरे मित्रा, तू सगळे जाणतोस ज्याच्या मदतीने असा यज्ञ साध्य करता येईल. असा यज्ञ तोंच साध्य करतो जो सगळ्यात बलवान आहे, ज्याच्या राज्यात कोणीही दुःखी नाही, जो राजाधिराज आहे, माझे कारभारी आग्रह करतात किं, मी हा यज्ञ करून आमच्या पित्याची इच्छा पूर्ण करावी व पितृऋणातून मुक्त व्हावे. तेव्हां आता तू मला सांग, मी काय करावे कारण अशा बाबत मी तुझा शब्द प्रमाण मानतो. माझ्या लक्षात आले आहे कीं, माझ्या बर्याच कारभार्यांना ह्यातील अडचणी दिसत नाहीत व ते बहुधा भावनिक बुद्धीने अनुमति देत आहेत. कांहीं दुसरे, त्यांचा मतलब पाहून त्यासाठी अनुमति देत आहेत, कोणीही निरपेक्ष बुद्धीने ह्याबद्दल बोलत नाही. तू तसा नाहीस, तू सर्व वासनांवर काबू पावलेला आहेस व म्हणून तुझे मत मला फार मोलाचे वाटते. तरी मी अशा परिस्थितीत काय करावे ते सांग. ज्या कारणांने जगाचे भले होईल".

ते शांतपणे ऐकल्यानंतर तो कृष्ण पुनः क्षत्रियांच्या बद्दल पुढे काय ते सांगण्यास सुरुवात करतो. "अरे कुरु वंशाच्या राजा, जर तुला हा यज्ञ करावयाचा असेल तर तुला कोणाला नष्ट करावे लागेल ते प्रथम ध्यानात घे. त्यासाठी मी काय सांगतो ते तुम्ही सगळे पांडव नीट ऐकाल". असें बोलून कृष्ण सांगू लागला. "मगध देशाचा राजा जरासंध सर्व शक्तिमान झाल्यावर त्याला दुर्बुद्धी सुचते. हे तुला माहित असेल कीं, जो राजा सर्व राजांत श्रेष्ठ होतो त्याच्या भोवती सगळ्या गोष्टी फिरू लागतात. अशा राजालाच सम्राट अशी उपाधी प्राप्त होते. अशा परिस्थितीत शिशुपाल राजांने स्वतःला जराशंधाचा प्रमुख सेनापति करून घेतले होते. शिशुपाल तसा फार मोठा सेनानी होता. जरासंधाच्या इतर क्षत्रिय सहकार्यांची नांवे अशी, करुश देशांचा राजा वक, हा मायावी विद्येचा उपयोग करून शत्रूचा निःपात करत असें. तो जरासंधाचा स्वतःला शिष्य समजत असें, त्या शिवाय दोन आणखीन होते, त्यांची नांवं हंस आणि दिम्वक. ते थोर ज्ञानी व गुणवान होते. त्यांना जरासंधाने आश्रय दिला होता. त्याशिवाय दंतवक्र, करुश, करव, मेघावहन जरासंधाचे बलाढ्य

सेवक होते. यवनांचे राजा ज्याच्या कपाळावर एक अमुल्य हिरा नेहमी चमकत असावयाचा तो होता, त्यांने अमर्याद ताकद असलेल्या मुरु आणि नरकाला पराभूत केले होते. भागदत्त राजा ज्याचे राज्य सगळ्या पश्चिमेकडील प्रदेशांत पसरलेले होते. आणि जो तुझ्या पित्याचा चांगला मित्र होता असं बरेच जण जरासंधापुढे नाक घासत होते. बोलण्याने आणि कामांने सुद्धा तो तुझा मित्र आहे. त्यांचे तुझ्यावर बापासारखे प्रेम आहे. तुमचा मामा ज्याचे राज्य पश्चिमेपासून दक्षिणे पर्यंत पसरले आहे असा, त्याचे नांव पुरुजित आहे. तो कुंती घराण्याचा मोठा योद्धा , ज्यांने सगळ्या शत्रूंचा नाश केला आहे. तो छेडी, जो स्वताला दैवी पुरुष म्हणून सांगत असतो. तो त्यामुळें तसाच ओळखला जात होता, त्याशिवाय ते वंगचे राजे, पुंड्रचे राजे, किराताचे राजे ज्यांना क्रमाने पौंड्र आणि वासुदेव म्हणून ओळखतात, हे सुद्धा जरासंधाच्या बाजूला आहेत. एवढेच नाही तर तो थोर राजा भिष्मक भोज घराण्यातील श्रेष्ठ, जो प्रत्यक्ष इंद्राचा स्नेही आहे, ज्याचे साम्राज्य चौथ्या जगात पसरले आहे, ज्यानें पांड्य आणि क्रथ–कौशिक ह्यांना हरवले, ज्याचा बंधू शूर अकृत जो परशुरामासारखा होता तो सुद्धा जरासंधाला घाबरतो आहे. त्या जरासंधाचे आपण सगळे आप्त आहोत. त्यामुळें त्याची सेवा करत आहोत. वाईट भाग ह्यात असा आहे कीं, त्याच्या नजरेत मात्र आपल्याला कांहींच किंमत नाही. तो असुरी संपदेने भ्रष्ट झालेला आहे. अरे युधिष्ठीरा त्या जरासंधाला घाबरून भोजांच्या अठरा टोळ्या पश्चिमेकडे गेल्या. त्याचप्रमाणे, सुरसेन, भद्रक, वुध, शल्व, पतच्छरस, सुस्थल, मुकुट, कुलिंदास आणि कुंती असे बरेच त्याच्या दुष्टाईने वैतागले होते. सल्वयन टोळ्या, पांचाळ, पूर्वेकडील कोसल (काशी) असें सगळे त्याच्या जाचांने त्रस्त झाले आहेत. ते सगळे कुतींच्या ठिकाणी गेले आहेत. तसेंच मत्स्य, संन्यस्तपद जरासंधाला वैतागून उत्तरेकडील आपला प्रदेश सोडून दक्षिणेकडे गेले आहेत. जरासंधाला घाबरून इतस्ततः पळून गेले आहेत. त्या एका भ्रष्ट क्षत्रियामुळें सगळे क्षत्रिय जग अस्वस्थ झाले आहे".

एवढे सांगून कृष्ण थांबला. त्यानंतर तो पुन्हा सांगू लागला. "जरासंधाच्या मुलीचा पति तसांच दुष्ट होता. त्याला मी ठार मारले त्यांचे नांव कंस होते. त्यांने स्वतः यादव असूनही यादवांचा संहार केला. त्यानें त्याच्या मस्तीत जरासंधाच्या दोनही कन्यांशी लग्न केले होते. त्यांची नांवं अस्ति व प्राप्ती होती. जरासंधाचा मुलगा सहदेव होता. अशा नात्यामुळें

कंसाची ताकद वाढली होती. आपल्याच आप्तांचा नाश करून तो सामर्थ्वान झाला. त्याच्या त्या कर्मामुळें त्याला मोठी कुप्रसिद्धी मिळाली. त्यांनें वृद्ध भोज राजांचा अपमान केला. त्यापासून संरक्षण मिळावे म्हणून ते आमच्याकडे मदत मागत होते. आम्ही सगळे जण एकत्र झालो त्यात अक्रूरा, अहूआची मुलगी, शंकराशन जो माझ्या सारखाच आहे, मिळून कंसाचा वध केला त्यात बलरामाची मोठी मदत होती. त्यामुळें थोडावेळ भिती जरी कमी झाली होती, लवकरच कंसाचा सासरा जरासंध त्याच्या शस्त्रार्थासह अंगावर आला. आम्ही अठरा यादवांच्या टोळ्या त्यानंतर असं ठरवतात किं, जरी आम्ही आमच्या सगळ्या सामर्थ्याने चढाई केली तरी तीनशे वर्षे लढूनही त्या जरासंधाचे पारिपत्य करू शकणार नाही कारण तो केवळ अंगाच्या सामर्थ्याने लढत नाही तर त्या बरोबर मायावी शक्तींचासुद्धा वापर करत असतो. त्यांने अनेक चेटुकी जाणणारे तज्ज्ञ सांभाळलेले आहेत. त्यांत दोन अतिमहत्वाचे होते. हंस आणि दिम्वक अशी त्यांची नांवे होती. जरासंधाचे त्यांच्याशी चांगले संबंध होते. त्यांच्यांशी तो फार प्रेमाने वावरत असें. त्यांच्यामुळेंच तो अशाप्रकारे अजिंक्य झाला होता. हे केवळ आमचे मत होते असें नाही तर सगळेच अनुभवी राजे तेच समजत होते. एका अठरा दिवस चाललेल्या लढाईत माझा भाऊ बलराम ह्यांने एका हंस नांवाच्या असुराचा वध केला. ती वार्ता सर्वत्र पसरली. ती ऐकून दिंवक समजला कीं, त्याचा भाऊ हंस मारला गेला आहे. त्या गैरसमजाचा परिणाम असा झाला कीं, दिम्वक फार निराश झाला व तो यमुना नदीत उडी मारून स्वताचा अंत करतो. त्याचा हंस मेलेला नव्हता. परंतु, जेव्हां त्याला समजते किं, त्याचा जीवलगा दिंवकांने आत्महत्त्या केली तेव्हां तो फार निराश होतो. त्या नैराश्याच्या अवस्थेत तोसुद्धा यमुना नदीच्या पात्रात स्वताला झोकून देतो व त्याचासुद्धा मृत्यू होतो. शेवटी सगळ्याच गोष्टींचा अंत होत असतो हेंच खरे. अरे युधिष्ठीरा, ते समजल्यावर जरासंध समजतो किं आता त्याची ताकद संपली आहे व तो निराश मनांने त्याच्या मगधातील राजधानीकडे जातो. त्यानंतर आम्ही सगळे मोठ्या आनंदात मथूरेत राहू लागलो. परंतु, आमचे दुर्दैव संपलेले नव्हते. कारण, हंसाची पत्नी जी जरासंधाची एक मुलगी होती त्याला आग्रह करू लागली किं तिच्या पतिच्या मृत्यूस जबाबदार असणार्यांना त्यांनी चांगला धडा शिकवावा. जेव्हा ती वार्ता आम्हाला समजली तेव्हां आमची चिंता वाढली व आणखीन हत्त्या नको

म्हणून आम्ही सगळे नातेवाईक मथूरा सोडून लांब पश्चिमेकडील द्वारकेला रहाण्यासाठी गेलो. जातांना आम्ही आमची अफाट संपत्ति विभागून लहान भागात केली म्हणजे ती घेऊन जाणे सोपे व्हावे. तेथे एक प्रसन्न करणारे नगर आहे त्याचे नांव आहे कुशस्थली. त्याच्या बाजूला मोठा पर्वत रैवत नांवाचा आहे. त्या ठिकाणी आम्ही आमचे बस्थान बसवले. तेथे आम्ही एक फार मजबूत असा किल्ला बांधला. इतका मजबूत तो होता कीं, देवांना सुद्धा तो जिंकता येऊ नये. तो असां बांधला होता किं, त्याच्या तटा आडून बायकासुद्धा लढू शकतील. सध्या आम्ही सगळे तेथेच रहात असतो. एवढे झाल्यावर ते मधूचे वंशज स्वतःला चांगलेच सुरक्षित समजू लागले. कारण त्यांच्याकडे येण्यासाठी जरासंधाला प्रथम तो विशाल रैवत पर्वत पार करावा लागणार होता त्यानंतर आमचा दुर्दम्य किल्ला अशा व्यवस्थेने आम्हाला सुरक्षीत केले होते. तरीसुद्धा त्या जरासंधाची भिती एवढी झाली होती किं, आमच्यातील कांहीं त्याही पुढे गोमंतच्या पर्वतीकडे रहाण्यासाठी गेले. त्या गोमंताची लांबी तीन योजने होती, त्याच्या प्रत्येक योजना अंतरावर आम्ही सैनिक पहारे बसवले होते. त्याशिवाय मध्ये अनेक खिंडी व कमानी बसवलेल्या होत्या. त्या प्रत्येक ठिकाणी शूर योद्धे पहारा देत असतं. कोणालाही हार न मानणारे असें यादव कुळातील शूर क्षत्रिय तेथे पहारा देत होते. आमचेच कुलिन असें अठरा हजार त्यात होते. अहुतचे शंभर मुलगे होते. त्यातील प्रत्येक देवासारखा शक्तिमान व धाडसी होता. चारुदेसन, त्याचा भाऊ चक्रदेव, सत्यकी, मी स्वतः रोहीणीचा मुलगा बलराम, माझा मुलगा सम्व जो माझ्या इतकांच प्रबळ आहे, आणि अतिरथ असें सगळे सात एकत्र होतो. त्याशिवाय आणखीन कांहीं होते. त्यांची नांवं अशी, क्रितवर्मन, अनध्रिष्ती, समिक, समितींजय, कंक, संकू, आणि कुंती. ते महारथी होते. त्याशिवाय दोन मुलगे अंधकभोजाचे होते. त्याशिवाय वृद्ध राजा स्वतः तेथे हजर होता. इंद्राच्या वज्रासारखे ते सगळे शूर होते. ते सगळे मध्यदेशात रहाणारे हल्ली वृश्नींबरोबर असतात".

एवढे सागितल्यानंतर तो कृष्ण युधिष्ठीराला सांगतो, "अरे तू तुझ्या भावंडांच्या मदतीने एक सम्राट होऊ शकतोस. तरी तू विचारत आहेस म्हणून सांगतो, राजा तू जोवर त्या जरासंधाचा नाश करत नाहीस तोवर तो यज्ञ तू करू शकणार नाहीस. ते ब्रह्मराक्षस त्याला पुढे करून तुझा यज्ञ मोडीत काढतील. त्या जरासंधाने अनेक राजे त्याच्या असंख्य

दुर्गांवर कैद करून ठेवले आहेत. जरासंधाला जो यज्ञ करावयाचा आहे त्यात तो ते सगळे कैद केलेले राजे व त्याचे सैनिक बळी देणार आहे. त्याच्या आसुरी वासनेतून हा यज्ञ उपस्थित झालेला आहे. ह्या यज्ञाद्वारा तो प्रत्यक्ष शंकराला जिंकण्याचा प्रयास करणार आहे. त्यांने इतके राजे व त्यांचे सैनिक कैद केले आहेत कीं, त्याची मोजदाद करता येणार नाही. त्या सगळ्यांचा तेथे फार मोठ्या प्रमाणात छळ होत आहे. असा राजा तुम्हाला तुमचा राजसूय यज्ञ करू देणार नाही. त्यासाठी इतर तयार्या करण्याआधी ह्याचा कसा नाश करावयाचा त्याचा विचार तुम्ही भावंड करतील तर ते जास्त योग्य होईल. त्याच्या कैदेत असलेल्या राजांना तुम्ही मुक्त केल तर त्यांची मदत तुला तो यज्ञ पूर्ण करण्यात होईल म्हणून सर्व दृष्टीने, जरासंधाचा नाश हेंच तुमचे पहिले काम असले पाहिजे असें माझे ठाम मत आहे. अहो पांडवानो, तुम्ही सुज्ञ अहात, तुम्हाला कोणाच्या सल्ल्याची खरोखरच गरज नाही, तरी अखेरीस तुम्हाला जे उचीत वाटते तेंच करा. कारण होणार्या परिणामांचे तुम्हीच वारस असाल". कृष्ण एवढे बोलून थांबला.

अशारितीने सभापर्वातील राजसूयारंभ पर्वाचा चौदावा भाग संपला.

## सभापर्व भाग पंधरावा

(राजसूयारंभ पर्व पुढे चालू)

युधिष्ठीर कृष्णाला विचारतो, "तू खूप हुशार आहेस त्यात शंका नाही. तू जे सांगतोस त्याला पर्याय नाही हे आम्ही जाणतो. सर्व शंकांचे समाधान तुझ्यापेक्षा जास्त चांगले कोण करू शकतो". "असें पहा कृष्णा, निरनिराळ्या प्रदेशात त्या त्या भागांसाठी कोणी प्रमुख असतो. तो त्याचे काम करत असतो. ते प्रत्येक जण दुसर्याचे कौतुक करत नाही. परंतु, सम्राट होण्यासाठी ते पुरेसे नसते. त्यासाठी त्या सगळ्या लहान राजांना नियंत्रणाखाली आणावे लागते. जो ते करू शकतो तोंच खरा सम्राट म्हणून ओळखला जातो. त्यामुळें त्याचे सगळेजण कौतुक करू लागतात. तू वृश्नी वंशाचा अभिमान आहेस. माणसाचे स्वभाव आणि प्रवृत्ती विविध असतात. त्यात सुधारणा होण्यासाठी माणसाला अनुभवाचे प्रमाण वाढवावे लागते. त्यासाठी जगभर प्रवास करावा लागतो. खरे सत्त्य समजण्यासाठी आपले नेहमीचे ज्ञान पुरेसे नसते. त्यासाठी त्यापेक्षा वरच्या श्रेणीचे ज्ञान आत्मसात करावे लागते. त्यातून खरी समृद्धता प्राप्त होत असते. आता मला असें वाटते केवळ हा यज्ञ करून भागणार नाही. आपल्या समाजातील कांहीं शक्तिमान क्षत्रिय समजतात किं आपल्यापैकीं कोणीतरी सर्वश्रेष्ठ राजा होईल. त्याचवेळी आपले सगळे राजे जसे तू सांगत आहेस, त्या जरासंधाला घाबरत आहेत. त्याच्या वाईट वर्तणूकीने ते अस्वस्थ होत आहेत. तू माझ्यामते सर्व शक्तिमान असूनही त्या राक्षसाचे दमन करू शकला नाहीस अशा परिस्थितीत मी असें कसे समजू कीं, आम्ही पांडव त्या नराधमाला नष्ट करू शकूं"? "मला पुनः पुन्हा शंका वाटते किं, त्या जरासंधाला जर तू किंवा बलराम मारू शकत नाहीत तर भिम किंवा अर्जुन किवा कोणीही इतर पांडव त्याला मारू शकतील कां? अरे सर्वज्ञ दामोदरा, केशवा जरा मला समजून घे व सांग, असें कसे शक्य आहे किं, जे तुला जमले नाही ते आम्हा पांडवांना कसें शक्य होईल"? ते युधिष्ठीराचे नकारात्मक उद्‌गार ऐकून बोलण्यात चतुर असलेला भिम बोलला, "जो राजा कमजोर असतो आणि ज्याच्याकडे मित्र नसतात, तो जर एकाद्या बलवान प्रतिस्पर्ध्यास आव्हान देईल तर तो खचितच नष्ट होईल. परंतु, एक गोष्ट आपण लक्षात घेतली पाहिजे किं, जर तो कमजोर राजा युक्ति, नशिब व चांगले मित्र असे जमवून लढेल तर तो खचीतच जिंकू शकतो.

आपल्याकडे हे सगळे आहे, जसे कृष्णाच्या युक्त्या, माझे बळ आणि अर्जूनाचे व दुसर्या पांडवांचे नशिब असें एकत्र असल्यानंतर आपण जरासंधाला नष्ट करू शकू. त्या मगधच्या नरेशांला यमाकडे पाठवू शकू. हे असें आहे जसें यज्ञाचे तीन अग्नी एकत्र येऊन यज्ञ संपन्न करतात". ते ऐकल्यावर कृष्ण बोलतो, "जो अपरिपक्व बुद्धीचा आहे तो भलत्याच यशाच्या अपेक्षा बाळगतो. तो दूरदृष्टीच्या अभावामुळें भविष्यातील धोके पहात नाही. एक गोष्ट आपण लक्षात घेतली पाहिजे किं, कोणीही तुम्हाला क्षमा करणार नाही कारण तुम्ही अडाणी अहात. तुमचा अडाणीपणा हा तुमचा दोष असेल व त्याची शिक्षा तुम्हाला भोगावीच लागेल". पुढे तो सांगतो, "कृतयुगात सर्व राजांना जिंकल्यावर यौवनस्वीन सगळे कर माफ करतो व त्यामुळें उच्चपदाला जातो, कर्तवीर्य त्यांच्या तपस्येने तेंच पद मिळवतात, भरत त्याच्या शौर्याने व सामर्थ्याने आणि मरुत त्याच्या समृद्धीने तेंच मिळवतो. अशाप्रकारे ते सगळे सम्राट झाले. परंतु, युधिष्ठीरा तुला आता ह्या सगळ्या गुणांच्या एकत्रित परिणामांने ते साध्य करावयाचे आहे. त्या अशा, नशीब, जनसेवा, पुण्य, समृद्धी, आणि चातुर्य अशा सगळ्यांची तुम्हाला गरज आहे तेव्हांच तुम्ही जरासंधाला थांबवू शकाल. अहो भरत कुळाच्या राजांनो, बृहद्रथाचा तो मुलगा जरासंध ह्या सगळ्या गुणांत अव्वल असूनही त्याच्या पापप्रवृत्तीमुळें फक्त राक्षसपदाला गेला आहे. त्यांने जर चांगले कृत्य आचरले असते तर तो इंद्राकडे गेला असता पण तो वेगळ्याच महत्वाकांक्षेने पिडलेला आहे. रत्नजडीत वस्त्र नेसणारे शूरयोद्धे त्याची चाकरी करत आहेत. परंतु, बालपणापासूनच व्रात्य असलेला तो कधी चांगले करूच शकत नाही. कारण नसतांना तो चांगल्या राजांना पकडून कैद करतो, त्यांच्या सैन्याला बांधून ठेवतो, लोकांचा छळ करतो. त्या त्याच्या आसुरी प्रवृत्तीमुळें ते श्रेष्ठपद त्याला त्याची एरव्ही योग्यता असूनही प्राप्त होणार नाही. अशारितीने त्यांने निदान शंभर राजे ताब्यात घेतले आहेत. आता मला सांग, अशा आगाऊ प्रतिस्पर्ध्यावर कोणता शहाणा राजा जाऊन हल्ला करील"? "अरे माझ्या भावंडानो, तो एका वेगळ्याच सिद्धीच्या मांगे आहे. तो शिवाला त्या राजांचे बळी चढवून पापक्षेत्राचा अधिपति होण्याचे स्वप्न पहात आहे. पुण्यक्षेत्रात त्याला रस नाही. अहो भरत कुळातील योद्ध्यानो तुम्ही समजता किं, जो क्षत्रिय सत्यासाठी लढत मरतो तो सर्वांच्या कौतुकाचा धनी होतो. म्हणून कां आपण सगळे एकत्र येऊन त्या पापात्म्याला

यमसदनात पाठवण्याचे काम करणार? एक लक्षात ठेवा, आतापर्यंत त्याने सह्यांऐशी राजे कैद केले आहेत, त्याला आणखीन फक्त चौदा राजे पाहिजेत, ते पूर्ण झाले किं त्याचा तो भयंकर यज्ञ शिवापुढे सुरु होईल, त्यानंतर जे होईल ते पहाता तुमचे राजसूय यज्ञ करावयाचे स्वप्न फक्त स्वप्नच राहिल. म्हणून जर तुम्हाला तुमच्या पित्याची इच्छा पूर्ण करावयाची असेल तर त्याला कपट कारस्थानाने व युक्तिने मारून टाकावे लागेलच. त्या एका क्षत्रियाचा नाश करण्याने तुमचा राजसूय यज्ञाचा मार्ग मोकळा होईल.

अशारितीने सभा पर्वातील राजसूयारंभ पर्वाचा पंधरावा भाग संपला.

# सभापर्व भाग सोळावा

(राजसूयारंभ पर्व पुढे चालू)

ते ऐकल्यावर युधिष्ठीर बोलतो, "अरे कृष्णा, केवळ धाडस करून स्वार्थी प्रवृत्तीने आपले महत्व वाढवण्यासाठी लढून त्याला कसें मारता येईल? माझे दोन भाऊ भिम व अर्जुन माझे दोन हात व डोळे आहेत जर त्यांचे कांहीं बरेवाईट झाले तर मी कसा जगू शकेन? जर यमसुद्धा त्याला मारू शकत नाही तर मी कसे ते साध्य करणार? त्याचा कशा प्रकारे नाश करावयाचा त्याचा निसंशय मार्ग उपलब्ध असेल तरच ते करण्यात तथ्य आहे एरवी तो एक मूर्खपणा नाही कां ठरणार? म्हणून माझ्यामते हा राजसूय यज्ञाचा प्रस्ताव तूर्तास रद्द करावा. कारण, त्यातच सगळ्यांचे भले आहे असें मला वाटते. खरें सांगावयाचे म्हणजे, त्यामुळें आज माझे हृदय खिन्न झाले आहे".

वैशंपायन सांगतात, त्या युधिष्ठीराच्या नकारात्मक बोलण्याने अस्वस्थ झालेला अर्जुन बोलतो, "मी हि जी विलक्षण सामर्थ्य असलेली विविध आयुध मिळवली आहेत त्यांचा केव्हां उपयोग होणार आहे? तो न संपणारा भाता, ते त्यातील विलक्षण बाण, तो जादुई रथ, त्यावरील अजिंक्यत्व देणारा ध्वज हे सगळे कशासाठी आहे? आपल्याला मायासुराची साथ आहे त्याचा केव्हा उपयोग होणार"? ते बोलल्या नंतर तो युधिष्ठीराला सांगतो, "मी जे हे मिळवले आहे ते ह्यावेळी कामास येणारे आहे. ह्या सगळ्या अजब गोष्टी मिळवणे तितकेंच अशक्यप्राय होते तरी ते आम्ही मिळवले आहे त्यांचा अपमान करू नये. तरीसुद्धा मी एक गोष्ट तुमची मान्य करतो किं, विद्वान मंडळी उच्चतेची नेहमी वाहवा करतात. सामर्थ्याच्या शिवाय कांहींही करणे शक्य होणार नाही. अशा उच्चकुळात जन्मून जर आम्ही कर्तृत्व गाजवू शकलो नाही तर त्या शक्तिचा काय उपयोग. तू म्हणतोस असें हात पाय गाळून बसण्याने तो जरासंध गुपचुप बसणार नाही, तो आपल्यावर त्याचे शंभर राजे पूर्ण करण्यासाठी चालून येणार त्या आधी आपण त्याच्यावर चालून जाणेच जास्त श्रेयस्कर होय असें मला वाटते. एका क्षत्रियाला शोभेल अशी वाणी आपण बोलले पाहिजे असे मला सांगावयाचे आहे. शत्रूचा निःपात करणे हे खर्या क्षत्रियाचे काम आहे. त्याला घाबरून कसे चालेल"? "मी समजतो किं, आपल्या धाडसाच्या जोरावर चालून जातांना निष्काळजी रहाणे उचित नाही पण त्यासाठी सर्वच सोडून देणे कितपत क्षत्रिय धर्मात

बसते? आपले नशीब आपल्याला साथ देणारच नाही असें समजणे कितपत योग्य होईल"? "आम्ही जाणतो कीं, बर्याचवेळा निष्काळजीपणामुळें मोठे मोठे रथीमहारथी बाद झाले आहेत पण आपण सर्व खबरदार्या बाळगून त्याच्यावर हल्ला केला तर यश आपलेच होणार आहे, त्यात आपल्या आईला, कुंतीला द्वैपायनांने जो आशिर्वाद दिला आहे त्याप्रमाणे जर सर्व गोष्टी घडणार असतील तर जरासंधाचा मृत्यू भिमाच्या हातून निश्चितपणे होणार आहे असें मी सांगू इच्छितो. त्याप्रमाणें त्या राक्षसाचा नाश करून जसें दामोदर सांगतो आहे त्याप्रमाणे, आपण त्या अभागी राजांची सुटका करून हा राजसूय यज्ञा संपन्न करावा असें मला वाटते. युधिष्ठीराच्या एकाच्या कमकुवतीसाठी सागळ्यांनी पिछेहाट करणे कितपत योग्य होईल. जरासंधाने हरवलेले राजे व आम्ही एकाच योग्यतेचे तू कां समजतोस"? अशा अवघड कारवाया करण्यातच खर्या क्षत्रियांचे श्रेय मिळते, घाबरून नाही. जो क्षत्रिय स्वताच्या सामर्थ्याचा अशाप्रकारे अपमान करील त्याला तो क्षत्रिय समजू शकणार नाही. म्हणून मी त्याच्याशी मुकाबला करणार आहे मग वडिल भाऊ कांही बोलो". असें मोठ्याने बोलून अर्जुन थांबतो. त्याला भिमाचे अनुमोदन असल्याचे स्पष्टपणे दिसते, धाकटे दोघेसुद्धा त्याला होकार देतात.

अशारितीने सभापर्वातील राजसूयारंभ पर्वाचा सोळावा भाग संपला.

# सभापर्व भाग सतरावा

(राजसूयारंभ पर्व पुढे चालू)

कृष्ण ते ऐकून बोलतो, "भरत घराण्याचा वारस असल्यासारखेच, विशेषकरून कुंतीपुत्र असें अर्जुन बोलला आहे म्हणून मला त्याचा अभिमान वाटतो आहे". केव्हा रात्री किंवा दिवसा मृत्यू आपल्यावर घाला घालून येईल ते कोणालाही माहीत नसते. तसेंच कोणी सांगत नाही किं, अमरत्व एकाद्याला प्राप्त होईल केवळ युद्धाला घाबरून, म्हणून पवित्र नियमानुसार पापी शत्रूवर हल्ला करणे हे खर्या कुलिन क्षत्रियांचे आद्यकर्तव्य समजले जाते. त्यामुळें निदान त्या शूराला मनाची शांति मिळते किं त्यांने त्याचे क्षात्र कर्तव्य व्यवस्थितपणे पार पाडले आहे. तो केवळ नशिबाला दोष देत बसणार नाही. परंतु, अशा इसमाचे भविष्य उज्वल होते. योग्य प्रकारची मदत व दैवाची साथ मिळाली कां तो यशाचा मानकरी होतो. परंतु, जेव्हां दोनही बाजू तुल्यबळ असतील तर कोणी एक जिंकतो कारण दोघे जिंकू शकत नाहीत. जर चुकीचे धोरण आखले तर दैव बलवत्तर असले तरी हार पदरी पडण्याची भिती असते. दोघांचे धोरण व दैव सारखेच असेल तरी कोणी एक जिंकू शकत नाही अशावेळी समझौता करावा लागतो. शत्रूचे दोष व कमतरता पारखून जर आपण योग्य प्रकारे त्याच्यावर चाल केली तर आपण जिंकण्याची जास्त शक्यता आहे. शहाणी माणसे कधीही बलाढ्य शत्रूवर उघडपणे हल्ला करत नाहीत. गनिमी कावा हेंच धोरण असावे लागते. गनिमीकाव्याने वार केला तर आपल्याला नामुष्कीसुद्धा येणार नाही. आणखीन एक मुद्दा असा कीं, त्याला मारले तर आपण आपल्या पूर्वजांचे ऋण फेडल्यासारखे होईल आणि जर आपण मारले गेलो तर सच्च्या क्षत्रियांसारखे लढलो म्हणून आपली स्वर्गात जागा निश्चित असेल. असें माझे विचार आहेत". एवढे सांगून दामोदर बोलण्याचे थांबवतो. युधिष्ठीर कृष्णाकडे प्रश्नार्थक दृष्टीने पहात त्याला विचारतो, "अरे जनार्दना, तू खूप चतुर आहेस, म्हणून मला एक शंका आहे ती विचारतो, मला सांग हा जरासंध कोण आहे किं, तू त्याच्यावर एवढा नाराज आहेस"? "तुझ्यासारख्याला तो खरे तर एकाद्या चिलटाप्रमाणे असला पाहिजे कीं, तो तुझ्या तेजांने चटकन करपून जाईल. मग असें काय त्याच्यात आहे कीं, त्याला मारण्यात तुला एवढा त्रास होत आहे किं, तू आम्हाला मध्ये घालत आहेस"? "जरासंध कोण आहे, त्याची ताकद कशात

आहे, एवढा त्रास दिला तरी मी कां नाही त्याला ठार मारले जसें कंसाला मारले व मला कां तुम्हाला मध्ये घालावे लागत आहे ते सगळे सांगतो". कृष्ण पुढे बोलतो. "त्याच्या आधी एक बलाढ्य राजा मगधात होऊन गेला. त्याचे नांव बृहद्रथ होते. युद्धात तो कधी हरत नसें. त्याच्या कडे तीन अक्षौहीनी एवढे सैन्य होते. तो देखणा राजा त्यांने केलेल्या अनेक यज्ञाच्या खुणा त्याच्या अंगावर दिसत होत्या असा तो दुसरा इंद्रच वाटत होता. त्याचे वैभव सूर्यासारखे होते. त्याची क्षमाशिलता साक्षात पृथ्वी प्रमाणे होती. क्रोधात तो दुसरा यम होता. श्रीमंतीत तो दुसरा वैश्रवण (कुबेर) होता. त्याचा प्रभाव सगळ्या पृथ्वीवर होता. त्याच्या पूर्वजांच्या किर्तीमय वारसाचा तो धनी होता. असा महापराक्रमी राजा काशीच्या राजाच्या दोन जुळ्या बहिणींशी लग्न करतो. दोनही राजकन्या वैभव आणि सौंदर्याने परीपूर्ण होत्या. बृहद्रथ त्याच्या दोनही बायकांची एक गुप्त करार करतो किं तो त्या दोघीही मुलींवर समसमान प्रेम करील. त्यांच्यात तो कधीही फरक करणार नाही. अशारितीने तो पृथ्वीचा बलाढ्य राजा त्याच्या दोनही बायकांसह मोठ्या आनंदात आपले जीवन घालवत होता जसा एक मस्तवाल हत्ती त्याच्या दोन हत्तिणींसह असावा. किंवा जणूकाय समुद्र गंगा आणि यमुना बरोबर असावा. त्याचे तारुण्य मजेत गेले परंतु, त्याला अपत्य झालेले नव्हते. त्यामुळें त्याचा वंश पुढे कसा चालणार हा प्रश्न होता. अनेक व्रतवैकल्ये, दानधर्म करूनही त्याला कांहीं केल्या मुल झाले नाही. असेंच एकेदिवशी त्याला चांद कौशिक ऋषीबद्दल समजले. ते गौतम परंपरेतील कक्षिवताचे पुत्र होते. तो ऋषी आपली साधना तूर्त थांबवून भटकण्यासाठी निघाले होते व बृहद्रथाच्या राजधानीत एका आंब्याच्या वृक्षाखाली येऊन बसले होते. त्यांचे आगमन झाल्याचे समजल्याने तो राजा आपल्या दोनही भार्यांना घेऊन त्याची पुजा करण्यासाठी आला. त्यांने ऋषीची पुजा मनोभावे केली व पुष्कळ मौल्यवान वस्तूंचे दान केले. ते पाहिल्यानंतर तो सत्त्रवृत्त ऋषी त्या राजावर संतुष्ट होतो. तो राजाला सांगतो, अरे राजा, मी तुझ्या पुजेने प्रसन्न झालो आहे. तुला काय पाहिजे म्हणून तू हे सगळे करत आहेस. ते ऐकल्यावर मोठ्या कष्टी अंतःकरणाने ते तिघे त्यांचे अपत्य नसल्याचे दुःख त्या ऋषीला सांगतात. ते बोलतात कीं, चांद कौशिकांच्या कृपेने त्यांना पुत्ररत्न व्हावे. राजा त्याला पुढे सांगतो, "अहो मुनी, आम्ही माझे राज्य त्याग करून वनात तपस्या करण्यासाठी जाण्याच्या विचारात आहोत.

परंतु, मला पुत्र नसल्यामुळें मोठा प्रश्न पडला आहे कीं, ह्या विशाल राज्याचे पुढे कसे होणार. राजा प्रजेचा पालक असतो, जर तोच नसेल तर प्रजा कशी सुरक्षित राहिल व राज्य सुखात कसे राहिल माझ्या जाण्यानंतर हा प्रश्न आहे. ते राजाचे विनवणी वजा बोलणे ऐकल्यावर तो मुनी समाधीत जातो, ते पहाण्यासाठी किं, काय करावे ह्या राज्यासाठी. त्या प्रसंगी त्या ऋषीच्या मांडीवर एक अस्पर्श रसाळ आंबा त्या झाडावरून पडतो. मुनी डोळे उघडून पहातो व त्या आंब्याला हातात घेऊन कांहीं मंत्र म्हणतो व राजाला सांगतो, हा आंबा तुझ्या राण्यांनी खाल्यास तुला एक अजिंक्य असा पुत्र प्राप्त होईल. ज्याला कोणीही पराभूत करू शकणार नाही. ऋषी सर्व ज्ञानी असा तो, पुढे राजाला सांगतो, अरे नरेशा, तू तपस्या करण्यासाठी वनात जाण्याची आवश्यकता नाही. त्यानंतर तो समजूतदार राजा मुनीचे पाय पकडून त्यांचा निरोप घेतो व आपल्या घरी जातो. घरी गेल्यावर त्याला त्याचे राण्यांना दिलेले आश्वासन आठवते व तो त्या आंब्याचे दोन तुकडे करून त्यांना  खाण्यास देतो. त्यानंतर त्या दोघीना दिवस जातात व राजा त्यामुळें अतिहर्षित होतो. परंतु, जेव्हां त्या प्रसवतात तेव्हा त्यांचे अपत्य दोन भागांत विभागलेले असें जन्मते. एकाला एक डोळा तर दुसर्याला दुसरा डोळा एकाला एक हात व दुसर्याला दुसरा हात, एकाला एक पाय व दुसर्याला दुसरा हात अशाप्रकारे दोघींना अर्धवट अवस्थेतील अशी विचित्र अपत्य होतात. ती जणू उभे चिरलेले अर्भक असावा असें ते दोन तुकडे होते. अर्धवट तयार झालेली अपत्ये पाहून त्या राण्या घाबरून थरथरू लागतात. त्या दोघी एकमेकींचा सल्ला घेऊन मग ती दोनही अर्धवट असलेली परंतु जीवंत अपत्ये टाकून देण्याचे त्यांच्या सुईणींना सांगतात. त्या बायकां ती अपत्ये शुभ्र कापडात गुंडाळून वाड्याबाहेर घेऊन जातात व तेथे मागील दारी फेकून देतात. थोड्या वेळांनी एक राक्षसीण जी नरमांस खात असते तेथे येते. तिचे नांव जरा असें होते. ती फाटलेली अपत्ये पाहून ती त्यांना उचलते व एकत्र करून अशी ठेवते किं, त्याची ती शरीरं एकमेकांना मिळतात. त्या बरोबर ती दोन शकलं एकमेकांना चिकटतात व त्यापासून एक पूर्ण शरीर असलेले मुल तयार होते. जरा त्याला उचलून नेण्याचा प्रयत्न करते पण ते मुल तिला उचलता येत नाही. ती समजते कीं, हा कांहीं वेगळा प्रकार आहे. ते बाळ त्याच्या हाताची मुठ तोंडात घालून जोरांने ओरडू लागते. तो प्रचंड आवाज ऐकल्याने त्या राजवाड्यातील

माणसे राजा बरोबर तेथे येतात. दुःखाने व्यथित झालेल्या त्या राण्यासुद्धा तेथे येतात. त्यांचे स्तन दुधाने भरलेले होते. त्या दोघी त्या बालकांला उचलण्याचा प्रयत्न करतात. ते पाहून ती राक्षसीण जरा, समजते किं, ती ज्या राजाच्या राज्यात आहे त्याची ती अपत्ये आहेत. अशी अपत्ये खाणे योग्य होणार नाही. ती मनुष्यरुप धारण करून ते बाळ उचलून वर धरते व बोलते, "अरे राजा बृहद्रथा, हे तुझे बाळ आहे. मी तुला ते एकत्र करून देत आहे. त्याचा जन्म एका महान ऋषीच्या कृपाप्रसादामुळें झाला आहे. तुझ्या राण्यांच्या दास्यांनी ते बाहेर टाकले होते. त्याला मी जीवनदान दिले आहे. माझा ह्या बालकाला आशिर्वाद आहे कीं, तो अजिंक्य होईल, त्याला मृत्यू स्पर्श करू शकणार नाही परंतु, जर त्याला कोणी उभे फाडले तर मात्र तो मरेल. त्यानंतर त्या दोनही राण्या त्या मुलाचा स्वीकार करतात व त्याला दुध पाजण्याला सुरुवात करतात. राजा इतका खूष झाला होता कीं, तो त्या मानवरुप धारण केलेल्या सुंदर दिसणार्या सोनेरी अंग असलेल्या राक्षसीणीला एक सामान्य बाई समजून बोलतो, "तू कोण देवता माझ्यासाठी आली आहेस काय? तू माझ्या राज्यात फिरण्यासाठी आलेली आहेस काय"?

अशा रितीने सभापर्वातील राजसूयारंभ पर्वाचा सतरावा भाग संपला.

# सभापर्व भाग अठरावा

(राजसूयारंभ पर्व पुढे चालू)

कृष्ण पुढे सांगत रहातो, राजाचे ते शब्द ऐकून ती मायावी राक्षसीण राजाला उत्तर देते, "अरे राजा बृहद्रथा, तुझे कल्याण हो. मी एक राक्षसीण असून कोणतेही रुप घेण्याची मायावी सिद्धी माझ्याकडे आहे. माझे नांव जरा आहे. मी तुझ्या निवासस्थानी सुखात रहाते. तुला तुझे प्रजाजन फार मानतात हे सुद्धा मी जाणते. मी खाद्य मिळवण्यासाठी येथे घराघरातून फिरत असते. मला त्या स्वयंभूने त्याच्यातून उत्पन्न केले व माझे नांव त्यांने गृहदेवी असें ठेवले आहे. माझी नेमणूक येथे दानवांचे पारिपत्य करण्यासाठी केलेली आहे. लहान मुलांत बसली आहे असें माझे चित्र, गृहस्थ माणसें त्यांच्या घरातील भिंतींवर ठेवतात त्यामुळें त्यांच्या मुलांना दानव त्रास देत नाहीत. तसें नाही केले तर त्या घराचा नाश दानव करतात असें आहे. तू सुद्धा तुझ्या मुलांच्या भल्यासाठी तसे एक चित्र भिंतीवर टांगावेस, त्यामुळें मी तुझ्या पुत्राचे संरक्षण करू शकेन. माझी पुजा सुगंधी फुलांनी करत जा. जर तू तसे केलेस तर त्याच्या बदल्यात मी तुझे वेळोवेळी कांहीतरी चांगले करत जाईन. दैवयोगांने मला तुझ्या मुलाचे दोन तुकडे मिळाले ते मी जोडले व त्याचा खर्या अर्थांने जन्म झाला माझ्यामुळें. असें झाले कारण तुझे भाग्य बलवत्तर आहे. मी केवळ कारण मात्र होते. मी मनात आणले तर मेरू पर्वतसुद्धा गिळून टाकू शकते मग ह्या लहान बाळाचे काय"? परंतु, तुझ्या घरात माझी पुजा होत आहे त्यामुळें ते बाळ मी तुला परत केले आहे. माझा ह्या तुझ्या मुलाला एक वर आहे किं, जोवर त्याची दोन उभी शकले एकत्र आहेत तोवर तो मरणार नाही". कृष्ण पुढे सांगतो, "असें सांगून ती राक्षसीण जरा, अंतर्धान पावली. त्यानंतर तो राजा आपल्या गृही गेला व मुलाच्या जन्माचे सगळे विधी संपन्न केले. त्या राजपुत्राच्या जन्मानिमित्त तो एक मोठा सोहळा त्याच्या राज्यात आयोजित करतो. त्यात त्या जरा राक्षसीणीचे कौतुक होत असते. त्यानंतर तो महान राजा जो ब्रह्माच्या तोडीचा होता, त्या मुलाचे नांव ठेवतो. तो सांगतो कीं, त्या बालकांचे पूर्ण बालकात रुपांतर करण्याचे काम त्या जरा राक्षसीणीने केले म्हणून तिच्या नावावरून त्यांचे नांव ठेवतात, जरासंध. म्हणजे जराने सांधलेला. असा तो राजपुत्र जरासंध, यज्ञातील अग्नीत तुप सोडले कीं, जशा त्याच्या ज्वाळा उंच उठतात तसा तो जरासंध

झपाट्याने वाढत जातो. त्या चंद्राच्या कळीतून पूर्ण चंद्र जसा होतो तसा वाढणारा त्याच्या आई बापाच्या प्रेमात मोठा होत असतो.

अशारितीने सभापर्वातील राजसूयारंभ पर्वाचा अठरावा भाग संपला.

# सभापर्व भाग एकोणीसावा

(राजसूयारंभ पर्व संपले)

कृष्ण पुढे सांगतो, त्यानंतर कांहीं काळांने तो महान ऋषी, चांद कौशिक, त्या राजाकडे मगध देशांत परत येतो. त्यांच्या आगमनाने आनंदी झालेला तो राजा त्यांचे सहर्ष स्वागत करतो. त्याच्या मंत्री मंडळ, पुरोहित व राण्यांच्या बरोबर पुत्र जरासंधाला घेऊन तो त्यांचे स्वागत करण्यासाठी जातो. ऋषीचे पाय पाण्याने धुतो, त्यानंतर चांद कौशिक त्यांचे तोंड धुऊन अर्ध्य घेतात. त्यानंतर तो राजा त्याचे सगळे राज्य व मुलगा चांद कौशिकाला अर्पण करतो. त्यामुळें संतुष्ट झालेला तो मुनी राजाला सांगतो, "अरे नरेशा, मी माझ्या अंतःचक्षूंनी हे सगळे पहात होतो. म्हणून आता मी जे सांगतो ते नीटपणे ऐक, तुझा हा मुलगा पुढे कोण होणार आहे व काय करणार आहे ते ऐक, तो तुझ्या सारखाच बलवान व धाडशी होणार आहे. तो ते सगळे स्वबळावर प्राप्त करणार आहे. जसें इतर पक्षी विनताच्या गरुडाशी तुलना करू शकत नाहीत तसेंच इतर कोणीही राजा तुझ्या पुत्राशी तुलना करू शकणार नाही. जे कोणी त्याच्याशी युद्धात सामना करतील ते सगळे तो हरवेल व त्यांना नष्ट करील. जसें झंजावात वाटेत येणार्या डोंगराच्या सुळक्यांना पाडतो तसे ते सगळे बरबाद होतील. अगदी देवांनी फेकलेली अस्त्रे व शस्त्रे निकामी ठरतील. हो तुझा मुलगा सगळ्या राजांच्या वर आपले स्थान सिद्ध करील. त्याच्या पुढे सगळे रथीमहारथी फिक्के पडतील जसें सूर्याच्या पुढे तारे फिक्के पडतात. तुझा पुत्र सगळ्या राजांचे गर्वहरण करील. मोठे मोठे राजे ज्याच्याकडे मोठे सैन्य आहे ते सुद्धा तुझ्या मुलांपुढे कुचकामी होतील. जसे नद्यांचे पाणी मग ते कितीही असो, समुद्र हजम करतो तसे तुझा पुत्र इतर राजांचे वैभव खाऊन टाकील. तुझा पुत्र सगळ्या चारही वर्णाच्या लोकांना सांभाळेल आणि पृथ्वीवरील राजांचा स्वामी होईल. तो पृथ्वीवर साक्षात रुद्र, ज्यांने त्रिपुराचा नाश केला, म्हणून ओळखला जाईल. जसें सगळे प्राणी वायूचे आधीन असतात तसेंच सगळे लोक तुझ्या मुलाच्या आधीन असतील. असे शुभवचन करून तो ऋषी आपल्या कामासाठी निघून जातो. ते ऐकल्यानंतर राजा ठरवतो कीं, आता आपल्या मुलाला, जरासंधाला गादीवर बसवून आपण आपल्या दोनही बायकांबरोबर वनवासात जावे. तो दरबारात येतो व आपल्या मंत्र्यांना बोलावून आपला विचार सांगतो. बृहद्रथाला व त्याच्या दोघीही

बायकांना आता सन्यासाचे वेध लागलेले असतात. तो जरासंधाच्या हातात राज्य देऊन आश्रमात रहाण्यास जातो. त्यानंतर तो जरासंध आपल्या स्वार्या सुरु करतो आणि अनेक राजांना पराभूत करून जायबंद करण्यास सुरुवात करतो.

वैशंपायन पुढे सांगतात, राजा बृहद्रथ त्याचे सन्यस्थ जीवन जगून यथावकाश स्वर्गात जातो. जरासंध चांद कौशिकाच्या आशिर्वादामुळें आपले साम्राज्य वाढवत असतो. राजा कंसाचा वध वासुदेवांने केल्यानंतर त्याची व कृष्णाची दुष्मनी वाढत जाते. कारण कंस त्याच्या मुलीचा पति असतो. जरासंध त्याची गदा त्याच्या गिरीव्रज नांवाच्या नगरीतून मथुरेच्या दिशेने कृष्णाला मारण्यासाठी रांगाने फेकतो कारण कृष्ण त्याकाळी मथुरेत रहात होता. ती बलशाली गदा गिरीव्रजा पासून नव्याण्णव योजने दूर असलेल्या मथुरेला येऊन पडते. ती गदा जेथे पडते तेथे एक मोठा खड्डा पडतो ते सांगण्यासाठी तेथील लोक कृष्णाला भेटतात व ते वृत्त सांगतात. जेथे ती गदा पडते त्या जागेचे नांव गदावसन असें होते. जरासंधाचे दोन मित्र होते, एकाचे नांव हंस व दुसर्याचे दिम्वक होते. ते दोघेही कोणत्याही अस्त्राने अथवा शस्त्राने मरण्यासारखे नव्हते. युद्ध शास्त्र व राजकारण निती चांगली जाणणारे ते सहजपणे हरणारे नव्हते. ते दोघे व जरासंध असें मिळून तिघे सगळ्या त्रिलोकांला भारी होते. म्हणून शक्तिमान कुक्कुर, अंधक आणि वृश्नी टोळ्यातील लोक त्या भानगडीत पडण्यास तयार नव्हते.

अशारितीने सभापर्वातील राजसूयारंभ पर्वाचा एकोणीसावा भाग संपला.

# सभापर्व भाग विसावा

(जरासंध वध पर्व सुरु)

कृष्ण त्यानंतर बोलतो, हंस आणि दिम्वक मारले जातात, एका कुटनितीच्या वापरांने. त्यानंतर कंस मारला जातो. आता जरासंधाच्या नाशाची वेळ आलेली असते. त्याला नेहमीच्या युद्ध पद्धतिने हरवणे केवळ अशक्य होते. त्याला मिळालेल्या दुव्यामुळे जरी देव आणि असुर एकत्र येऊन त्याच्याशी लढले तरी तो पराजित होण्यासारखे नव्हते. म्हणून माझ्यामते आपण त्याला एका द्वंद्वाचे आव्हान देऊन त्यात भिमाच्या मदतीने त्याचा नाश करणेंच श्रेयस्कर दिसते. माझ्यात युक्ती आहे, भिमात ताकद आहे आणि अर्जूनात भाग्य आहे, म्हणून आपण तिघे मिळून जाऊ व त्याचा धूर्त काव्याने फसवून मारून टाकू असे करण्याचे कारण तसे केले तर ते चांद कौशिकाच्या आशिर्वादा बाहेरचे असेल. म्हणून तुमच्या राजसूय यज्ञाची सुरुवात आपण जरासंधाचा वध करून करू. कृष्ण पुढे त्याची योजना काय ते सांगतो, तो बोलतो, "आपण तिघे गुप्तपणे वेगळ्या वेषात त्याला भेटू व त्याला एक वेगळ्या प्रकारचे आव्हान देऊ असें कीं, ते युद्ध नसेल". भिम समजतो व बोलतो, "म्हणजे द्वंद्व असें तुला सुचवायचे आहे कां"? कृष्ण त्यावर त्याचे मिष्किल हास्य करतो व सगळे ते समजतात. अशा द्वंद्वात चांद कौशिकाचा आशिर्वाद त्याला उपयोगी येणार नाही. पुढे तो सांगत असतो, "आपण असा प्रस्ताव त्याच्या पुढे ठेवावयाचा कीं, तो त्याला स्वीकार करण्या शिवाय पर्याय नसेल. द्वंद्वात तो भिमापुढे टिकणार नाही व त्याला भिमांने मारून टाकावे म्हणजे ते युद्ध नसल्याने चांद कौशिकाचे वचन खोटे होणार सुद्धा नाही. असे सांगून कृष्ण युधिष्ठीराला बोलतो, "द्वंद्वात त्याला मारावयाचे असल्यामुळें मी ते करणार नाही. म्हणून मला पांडवांची गरज आहे, तुला तुझ्या शंकेचे उत्तर मिळाले कां"? पुढे तो सांगतो, "जर तुझा माझ्या कारस्थानावर विश्वास असेल तर तू तुझे भाऊ माझ्या बरोबर पाठवण्यास तयार होशिल". एवढे बोलून दामोदर थांबतो. युधिष्ठीर त्याच्या भावांकडे पहातो, त्याला दिसते कीं, ते दोघेही भलतेच आनंदात एकमेकांच्या हातावर हात मारून टाळ्या देत त्यांची खूषी दाखवत होते.

वैशंपायन पुढे सांगतात, युधिष्ठीर कृष्णाला बोलतात, "अरे अच्युता, तू सगळ्या वाईटांचा नाश करणारा आहेस. तू आम्हा पांडवांचा मालक आहेस. आम्ही तुझ्यावर सर्वस्वी

विसंबून असतो, तू जे म्हणशिल ते तसेंच होईल. तुझ्या कारवाया फक्त कामयाब होऊ शकतात हे जाणणारा मी तुला कसें नाही म्हणेन"? "मी तर समजतो किं, तो नराधम जरासंध आता मेल्यातच जमा झाला आहे. मला दिसते कीं, त्याने कैद केलेले सगळे राजे सुटलेले आहेत. कृष्ण द्वैपायन आमच्या पाठीशी आहेत". त्यानंतर तो त्याच्या भांवांस सांगतो, "सगळे सावधगिरीने, विवेकाने व योजनाबद्ध असें करा. भावनांच्या आहारी जाऊन घाई करू नका व कृष्णाच्या योजने बरहुकूम सगळे तंतोतंत असें करा म्हणजे यश आपलेच आहे. आता मला वाटते आमचा राजसूय यज्ञ झाल्यातच जमा आहे". असें बोलून तो आपले कृष्णाच्या कारस्थानाला असलेले अनुमोदन व्यक्त करतो. युधिष्ठीर पुढे बोलतो, "तो त्याच्याशिवाय जगू शकणार नाही. नैतिकता, आनंद आणि वैभव ह्याच्या शिवाय जगण्यात काय अर्थ आहे? पार्थ कृष्णाशिवाय असू शकत नाही, कृष्णसुद्धा त्याच्या शिवाय अपूर्ण आहे. तसेंच असें काय आहे ह्या जगात जे हे दोघे जिंकू शकणार नाहीत"? त्यानंतर युधिष्ठीर भिमाकडे पाहून बोलतो, "असा बांधव ज्याच्या ताकदीला कांहीं मर्यादा नाही, असा माझा भाऊ तुमच्या सानिध्यात कोठलेही द्वंद्व लिलया जिंकू शकेल. जेथे अनुभवी मार्गदर्शक आहे तेथे यश स्वाभाविक असते. शत्रूचे दोष वापरून त्याला अडकवणे ह्यात अर्धे यश सामावलेले असते. म्हणून, आता आपण आपल्या नेत्याच्या, गोविंदाच्या, मार्गदर्शनानुसार पुढील कारवाई करण्यास सज्ज होऊ. आपला नेता राजकारण, कारस्थान तंत्र, नियोजन, साधनसुचीता, मर्यादा हे सगळे उत्तम जाणतो. त्याची शक्ती त्याच्या विवेकांत आहे. म्हणून तुम्ही दोघे कृष्णाबरोबर जाण्यास माझी सम्मति आहे. आपले चांगले नशिब आपल्या नेत्यात असते, कृष्णाचे नशिब नेहमीच बलवत्तर असते".

वैशंपायन पुढे बोलतात, अशारितीने बोलून युधिष्ठीर त्या तिघांना मगध देशाकडे जाण्याची परवानगी देतो. ते तिघे सन्याशाच्या वेषांत निघतात. ब्राह्मण स्नातक असल्याचे दाखवत ते आपला प्रवास सुरु करतात. त्यांचे बोलणे चालणे सगळे त्या प्रकारचे ते ठेवतात. कृष्ण सूर्यासारखा तळपत असतो, त्याच्या आप्तांच्या नाशास कारणीभूत असलेल्या जरासंधाचा शेवट तो भिम व अर्जुन ह्यांच्या मदतीने साध्य करणार असतो. एकच ध्येय असलेले ते तिघे मगध देशातील जरासंधाच्या राजधानीची नगरी, गिरीव्रज कडे जाऊ लागतात.

नैतिकता, आनंद आणि वैभव ह्यांचे संतुलन राखण्याचे भान असलेले ते आपला प्रवास सुरु करतात. कुरु जंगलातून त्यांचा प्रवास प्रारंभ होतो. प्रथम ते सुंदर कमळे असलेल्या विशाल सरोवराकडे पोहोचतात. त्यानंतर ते कालकूट पहाडांतून पुढे जातात. त्यानंतर ते गंडकी नदी ओलांडतात. सदनीरा, करतोया, शर्कारवर्त आणि अशा कांहीं नद्या पार करून ते पुढे जात असतात. त्यानंतर ते प्रसन्न चित्त करणार्या सरयू नदीपर्यंत पोहोचतात. आता ते त्या सुंदर व आनंद देणार्या पूर्वेकडील कौसल राज्यात येतात. तेथून मिथिला, मग मला व चर्मावंती नद्या ते पार करतात. त्यानंतर ते आता गंगानदी पहातात. तिला पार करून ते सोना नदीकडे जातात. आणखीन पूर्वेकडे ते येतात. अखेरीस ते शूरवीर मगध देशांत प्रवेश करतात. ब्रह्मचारी स्नातकाच्या वेषांत त्यांना सगळीकडे चांगले स्वागत होत असते. त्या राज्याच्या मध्ये असलेल्या कुशम्वतात येतात. तेथे असलेले वैभव व संपन्नता ते पहातात. गोरथ पहाडांकडे ते जातात. तेथे असलेले पशुधन ते पहातात. सगळीकडे संपन्नता त्यांना दिसते. धनसमृद्धी, जलसमृद्धी, वनसमृद्धी अशा तीन आवश्यक समृद्धी ते त्या राज्यात पहातात. लोक सुखी दिसत होते.

अशारितीने सभापर्वातील जरासंध वध पर्वाचा विसावा भाग संपला.

# सभापर्व भाग एकविसावा

(जरासंध वध पर्व पुढे चालू)

प्रवासात वासुदेव त्यांना बोलतो, "अरे पार्था, हे पहा धनाढ्य मगध राज्याची राजधानी आपल्यापुढे उभी आहे. तिचे सौंदर्य पहा. पशुधन, पाण्याची कमतरता नाही, इतर समृद्धी ओतून जात आहे पहा. येथील वाडे, महाल, गढी, साधी घरे सगळेच त्या राज्याचे वैभव दाखवत आहेत. कोठे आपत्तिचा मागमूस नाही. गिरीव्रज नगराच्या सीमा पांच डोंगरानी सिमीत केल्या होत्या. त्यांची नांवे वैहर, वरह, वृश्व आणि ऋषीगिरी आणि देखणा चैत्यगिरी. तो सगळे उंच शिखरे असलेले व विपुल वृक्षसंपदा असलेले होते. ते त्यांच्या उताराच्या बाजूनी एकमेकांना जोडलेले असें दिसत होते. त्यामुळें त्यांची जणू भिंत झाली होती. अशा स्वाभाविक तटबंदीने त्या सुंदर नगराचे संरक्षण होत होते. त्या डोंगरां वरील लोध्र वृक्षाच्या सुगंधी झाडींमुळें तो आसमंत सदैव प्रसन्न रहात असें. त्या लोध्र वृक्षाच्या लांबच लांब वाढलेल्या फांद्यांने व त्यावर उगवणार्या सुगंधी फुलांमुळें वन घनदाट झाले आहे". पुढे कृष्ण त्यांना सांगतो, "त्याच शुभ ठिकाणी प्राचीन काळी ऋषी गौतमांनी घोर तप केले होते. त्यांना त्याच ठिकाणी एका सुत कुळातील स्त्रीपासून कक्षिवत व इतर मुलं झाली होती. त्या बाईचे नांव होते, औषनरी जी उषिनराची मुलगी होती. कक्षिवता सह सगळे मोठे ऋषी झाले होते. ते उच्च प्रतिचे लोक केवळ गौतमाच्या दयार्द वृत्तीमुळें सामान्य लोकांतील राजांच्या राज्यात रहात होते. अरे अर्जुना, फार प्राचीन काळी अंग आणि वंग देशाचे, बलाढ्य राजे गौतमऋषीच्या आश्रमात आनंदात राहून जात असतं. ते पहा विशाल पिंपळाचे वृक्ष आणि सुगंधी लोध्राची झाडे, ते सगळे त्या प्राचीन मुनीच्या आश्रमाजवळ आहेत. ह्या ठिकाणी फार प्राचीन काळापासून नांग, अर्वुद व शक्रपावीन राजे जे सगळ्या त्यांच्या प्रतिस्पर्ध्याना चीत करत असत, राज्य करून राहिले होते. नागांतील स्वस्तिक आणि मणी महत्वाचे होते. स्वतः मनुने सांगितले होते कीं, त्या मगध प्रदेशात कधीही अवर्षण येणार नाही. प्राचीन कौशिक व मनमत ह्यांनासुद्धा हा प्रदेश खूप आवडत असें. अशा सोयिस्कर प्रदेशाची सत्ता लाभल्यामुळे असेल कदाचित कीं, जरासंध फाजिल महत्वाकांक्षी झाला असावा. ते कांहीं असो, आपण त्याचा अंत लवकरच करणार आहोत".

वैशंपायन पुढे सांगतात, अशारितीने गप्पा मारत ते तिघे शूर योद्धे त्या भागाचा फेरफटका मारत त्या प्रदेशाचे निरीक्षण करत असतात. त्यांचा म्होरका, वृश्नी वंशाचा कृष्ण व ते दोन पांडव आता त्या शहरात शिरतात. ते पहातात कीं, तेथील सगळे चतुर्वर्णी आनंदात व खूषीत वावरत आहेत. तेथे सदैव सणासुदीचेच वातावरण दिसत होते. ते खिंड दरवाजा पर्यंत येतात. इतर सामान्य जनाप्रमाणे ते त्या दरवाज्यातून जाण्या ऐवजी चैतक डोंगरात पोखरावयाला लागतात. जो डोंगर बृहद्रथ कुळांतील माणसे आणि इतर नगरवासी पुजत असतं. त्यामुळें ते सगळ्या मगधवासियांचे आदरस्थान होते. त्या जागी बृहद्रथाने एका राक्षसाचा वध केला होता. तो राक्षस, ज्याचे नांव होते ऋषभ, मारल्यानंतर त्याच्या चामड्यापासून तीन मोठे नगारे तयार केले होते. ते नगराच्या मध्ये ठेवले होते. ते असे होते कीं, त्यांच्यावर एकदा आघात केला कीं, तो महिनाभर निनादत रहात होता. त्या तिघा भावंडाने चैत्यक सुळका तोडला जो मगधवासियांचा गर्व होता. तो नेमका अशा जागी तोडला होता जेथे ते नगारे ठेवलेले होते ज्यांच्यावर सदैव सुगंधी फुलांचे आवरण असें. जरासंधाचा वध करण्याच्या उद्देशाने आलेले ते जणूकाय त्याच्या वर्मावर घाला करत होते. त्यांच्या बलाढ्य हातांने ते तो सुळका ज्याची पुजा सगळे करत असत, तो मोडून टाकला होता. ते करून कांहीं मोठे काम केले अशा अविर्भावात ते गिरीव्रजात प्रवेश करतात. त्याचवेळी मगधातील ज्ञानी ब्राह्मण राजाला कांही अशुभ लक्षणांची माहिती देतात. ते पुरोहित त्या धाडशी राजाला त्याबद्दल सावध करतात. ते अशुभ टाळण्यासाठी कांहीं निवारक विधी करण्याची आज्ञा राजा त्यांना देतो. त्यासाठी ते पुरोहित उपवास धरतात. त्याच समयी ते तिघे हातात कांहीं शस्त्र न घेता तसेंच त्या राजाच्या वाड्याकडे निघतात. ते ब्रह्मचारी ब्राह्मण स्नातकाच्या (गुरुकुलातील विद्यार्थी) सोंगात असतात. वाटेत ते सुंदर प्रकारे सजवलेल्या विविध दुकांनांना पहातात. त्यात खाद्य पदार्थ, कपडे, दागिने असें बरेच कांहीं विकण्यासाठी ठेवलेले ते पहातात. तुम्हाला जे पाहिजे ते सगळे तेथे मिळत होते. भिम, अर्जुन आणि कृष्ण ते पहात त्या नगरातून पुढे पुढे जात असतात. एका ठिकाणी भिम एका दुकानातून एक विकावयास ठेवलेला हार हिसकावून घेतो. तसे हार, रंगीत वस्त्र घातलेले ते त्या बुद्धिमान जरासंधाच्या वाड्यात येतात. त्यांचे वागणे असें होते किं, जणूकाय एकादा सिंह शिकार शोधत आहे. धिप्पाड शरीरयष्टी व अंगाला सगळे

चंदनाचे गंध चोपडलेले असा तो जरासंध त्या ब्राह्मण स्नातकांना भेटतो. एकाद्या साल वृक्षासारखा तो उभा असतांना वाटत होता. आमचे तिघे कांहीं कमी नव्हते. ते तीन हत्ती वाटत होते. त्यांना जरासंध निरखून पहात राहिला. तेथे बरीच माणसे राजाला भेटण्यासाठी आली होती. त्यात हे तिघे होते. ते ब्राह्मण स्नातक आहेत हे समजल्याने राजा त्यांचे विशेष स्वागत करतो व त्यांना अर्ध्यासाठी आणि पाय धुण्यासाठी पाण्याची व्यवस्था करतो. त्याशिवाय मध व तुप पूर्ण अर्ध्यासाठी त्या तिघांना देतो. त्याचे वागणे सत्शिल सज्जनाचे वाटत होते पण तो प्रतिस्पर्ध्यासाठी कर्दनकाळ होता. सामान्यजनांसाठी तो फार चांगला राजा होता असें त्यांना दिसून आले. ते ब्राह्मण आहेत म्हणून त्यांना प्रत्येकी एक गाय दान केली गेली. त्यानंतर तो बलशाली राजा त्यांना बोलतो, "मगध मध्ये तुमचे स्वागत असो". त्याच्यातील पार्थ व भिम कांहीं बोलत नाहीत. फक्त दामोदर बोलण्यास सुरुवात करतो. "अहो श्रेष्ठ राजेश, हे माझे सहचारी मौनव्रतात आहेत. म्हणून ते बोलणार नाहीत. आज रात्रीपर्यंत ते तसे मौनव्रतात असतील. त्यानंतर ते आपल्याशी बोलतील. त्यानंतर ते ऐकून राजा त्यांची रहाण्याची व्यवस्था एका संन्याशी रहातात त्या जागी करतो. त्यानंतर तो त्याच्या घरी जातो. मध्यरात्री राजा त्याच्या जागी येतो. त्या काळातील रिवाजानुसार जर एकादा स्नातक राजाकडे आला तर राजा त्याची व्यवस्था निकडीने करणार. त्या प्रमाणे ते होत होते. त्यानंतर तो जरासंध त्यांना भेटण्यास तयार होतो. त्या ब्राह्मण स्नातकांचा पेहेराव बघून मात्र त्याला शंका आली. तरीसुद्धा तो त्यांना सन्मान पूर्वकपणे वागवतो. परंतु, ते तिघे मात्र त्याच्याशी विचित्रपणे वागत असतात. ते त्याला आशिर्वाद देतात, "तुला सहजपणे मुक्ती मिळो". असें बोलल्यानंतर ते तिघे एकमेकाकडे पहात रहातात. त्यानंतर तो राजाधिराज पंडुच्या मुलांना म्हणतो, "आपण प्रथम आसनस्थ व्हावे". ते ऐकल्यावर ते खाली जमिनीवर बसतात. जसें यज्ञाच्या वेळी ऋद्विक बसतात. त्यानंतर राजा त्यांची विचारपुस करतांना विचारतो, "आमच्या येथे स्नातक कधी गळ्यात हार घालत नाहीत. रंगीबेरंगी कपडे घालत नाहीत. तुमच्या हातांवर शस्त्रांचा वापर करणार्यांच्या प्रमाणे वळ उठलेले आहेत. अंगाला गंधाचे पट्टे ओढलेले आहेत. तुम्ही सांगता कीं तुम्ही ब्राह्मण स्नातक अहात. तरी तुमच्या सर्व अगावर क्षत्रियांची लक्षणं दिसत आहेत. मला सांगा तुम्ही खरच कोण अहात? तुम्ही

येतांना चैत्यकाचा सुळा तोडून आत प्रवेश केला, तुम्ही अशारितीने अवैध प्रकारे नगरात येण्याचा प्रयास कां केला"? "ब्राह्मणाची शक्ती त्याचा शब्दात (वाणीत) असते, हालचालीत नसते, राजाच्या क्रोधाची तुम्हाला हे सगळे करतांना भिती वाटली नाही? तुमचे हे सगळे वागणे तुमच्या इतर सांगण्याशी मिळते जुळते नाही. तुम्ही नेमक्या कोणत्या उद्देशाने माझ्याकडे आला अहात"?

राजाची ती विचारणा ऐकल्यावर बोलण्यात चतुर असलेला दामोदर त्याला शांतपणे सांगतो, "आम्ही ब्राह्मण आहोत पण आपण जाणता कीं, ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य सगळेंच स्नातक असतात. त्याशिवाय आपण जाणता कीं, स्नातकांत अनेक प्रकार असतात. त्याप्रमाणे क्षत्रिय त्यांच्या नियमांने वागले तर ते उत्कर्ष पावतात. म्हणून आम्ही क्षत्रियांप्रमाणे वेशभुषा केली आहे. क्षत्रिय त्याची क्षमता वाणीने नाही तर त्यांच्या शारिरीक ताकदीने दाखवतात. म्हणून आम्ही हार परिधान केले आहेत. क्षत्रियांचे उच्चारण मग्रूरीचे असते. अहो बृहद्रथ पुत्रा, तुम्ही जाणता, ब्रह्माने क्षत्रियांना हात दिले आहेत. त्यांचे हात तुम्हाला पहावयाचे असतील तर ते आता पाहू शकता. त्याचप्रमाणे असें नियमात दिले आहे किं, जर शत्रूच्या घरात शिरावयाचे असेल तर दारातून नाही तर भिंत मोडून तोडून प्रवेश करावयाचा असतो. त्याच प्रमाणे, असें सुद्धा सांगितले आहे कीं, शत्रूने दिलेले स्वागत स्वीकारावयाचे नसते.

अशारितीने सभापर्वातील जरासंध वध पर्वाचा एकविसावा भाग संपला.

# सभापर्व भाग बाविसावा

(जरासंध वध पर्व पुढे चालू)

ते ऐकून जरासंध त्यांना बोलतो, "तुम्हा कोणाला मी दुखवले असेन असें मला आठवत नाही. किंबहुना मी तुम्हाला कधी पाहिल्याचे सुद्धा आठवत नाही मग असा रोष का"? "जर मी तुम्हाला कधीही दुखवले नसेल तर तुम्ही असें वागणे कितपत रास्त ठरते. तुम्ही ब्राह्मण जाणता कीं, मी तुमच्या बाबत निरपराध आहे. असें असतांना तुमचे हे वागणे व हा क्रोध माझ्यावर कां? ते सांगाल तर ते उचित होईल. कारण, सगळे शिष्ट (सुसंस्कृत) लोक ह्या नियमानुसारच आपले वर्तन ठेवतात. जो क्षत्रिय विनाकारण एकाद्याचा आनंद व जीवन बिघडवतो तो कितीही मोठा क्षत्रिय असला तरी पापाचाच धनी ठरतो. असें नितिशास्त्रात दिले आहे. त्याचा नाश निश्चित असतो. स्नातकानो. मी ह्या नियमांचे पालन काटेकोरपणे करत असतो. माझ्यावर अवलंबून असणार्या प्रजाजनांत मी कधीही असें कांहीं केलेले नाही कीं तुम्ही असा आरोप माझ्यावर करावा. म्हणून तुमचे हे वागणे निखालस गैर आहे.

ते शांतपणे ऐकल्यावर कृष्ण त्याला सांगतो, "प्रत्येक राजघराण्याचा एक प्रमुख असतो जो त्या घराण्याची प्रतिष्ठा सांभाळत असतो. त्या अशा राजाच्या आज्ञेने आम्ही आपल्याकडे आलो आहोत. तू अनेक निरपराध सामान्य राजांना कैद करून ठेवले आहेस आणि स्वताला तू निरपराध, निष्पाप समजतो आहेस"? "तू जो नितीशास्त्राचा नियम आता बोलत आहेस त्यानुसारच तू पापाचा धनी आहेस व म्हणून तुझा नाश सुद्धा निश्चित आहे". "कोणताही खरा नितीमान राजा दुसर्या राजाशी असा कसा वागू शकतो. तुला माहीत आहे किं, राजा ब्रह्माचा प्रतिनिधी असतो. त्याचे काम सुराज्य सर्वत्र आणणे असें अपेक्षित असते, ते नियम तू कसा विसरलास? तू त्या हरलेल्या राजांना क्रूरपणे वागवतोस ते शास्त्र संम्मत नाही हे तुला वेगळे सांगावे लागते कां? तू तुझ्याच कुळाच्या राजांना पशु प्रमाणे वागवतोस हे कोणत्या शास्त्रात सांगितले आहे? तू बृहद्रथाचा पुत्र असूनही तुझ्यात त्याची सहिष्णूता अजिबात आढळत नाही. तू जी ही पापकर्मे करत आहेस त्यामुळें समस्त ब्राह्मण व क्षत्रिय समाजांना काळीमा लागत आहे हे कसें ग्राह्य ठरेल? माणसाचा यज्ञात वध करावयाचा नसतो कारण शास्त्राप्रमाणे फक्त जीवांचा वध करावयाचा असतो

ज्यांच्यात आत्मा नाही. परंतु, अरे जरासंधा तू जाणतोस कीं, माणसात आत्मा असतो म्हणून तो इतर जीवांपेक्षा वेगळा समजला जातो. माणसाचा यज्ञात बळी दिला तर त्यामुळें ब्रह्माच्या कामात ढवळाढवळ केल्याचे महापाप लागते ते तुला माहीत नाही कां"? जर तुला असें वाटत असेल कीं, असा बळी दिल्याने तुला मोठी सिद्धी प्राप्त होईल तर त्या बरोबर हे सुद्धा तुला समजले पाहिजे कीं, ती सिद्धी अघोरी रुद्राची असते त्यात शंकर महादेव नसतो. त्या सिद्धीने जरी तू पृथ्वीवर संपन्न झालास तरी पुढे तू कायम नरकातच रहाणार आहेस हे कसे तुझ्यासारख्या बुद्धिमान राजाला समजत नाही. तुझा मोक्षमार्ग ह्या कल्पात संपला. राजे यज्ञ करतात ते स्वर्गात जाण्यासाठी व तू एक असा मूर्ख राजा आम्ही पहात आहोत, जो नरकात जाण्यासाठी यज्ञ करण्याच्या तयारीत आहे! आपण जे कर्म करतो त्याची त्याबरहुकूम फळं आपल्याला प्राप्त होत असतात. आम्ही पाप करणार्याला शासन करणे आमचे आद्यकर्तव्य समजतो कारण जर ते वेळीच थाबवले नाही तर अनर्थ होईल म्हणून आम्ही तुला सांगावयास आलो किं, तू तुझे पापकर्मी उद्योग थांबव. आम्ही पूण्य संवर्धनार्थ सगळे कांहीं करण्यास समर्थ आहोत. हे सगळे तुझे कृत्य पहाता आम्ही एकच म्हणू शकतो कीं, हे राजा तू मूर्ख आहेस. तुझी सारासार बुद्धी काम करत नाही. म्हणून आता मी तुला सांगतो किं, मानवातील चांगुलपणाच्या व आपल्या वंशाच्या भल्यासाठी आम्ही तुला यमाकडे पाठवण्यासाठी येथे आलो आहोत. मानवांचा वध केवळ स्वतःच्या छोट्या मतलबासाठी करणार्या राजाला पृथ्वीवर रहाण्याचे कारण नाही. तू असें समजतोस कीं, पृथ्वीवर तुझ्या ताकदीचा कोणी नाही, परंतु, हे राजा, हा तुझा एक गैरसमज आहे. तुझी ताकद म्हणून तू जी शक्ती सांगतोत ती खरे तर तुझ्या सैन्याची, तुझ्या मंत्र्यांची, तुझ्या आमात्यांची आणि मगधच्या जनतेची आहे. त्यात तुझा स्वतःचा अंश कणमात्र आहे. परंतु तू तिला तुझी ताकद समजण्याचा मूर्खपणा सदैव करत असतोस. आज वेळ आली आहे तुझ्या स्वतःच्या शक्तिची ताकद अजमावण्याची असें समज. राजा युद्ध जिंकतो ते त्याच्या सैन्याच्या जोरावर, सेनापतींच्या क्षमतेमुळे, साधन सामुग्रीमुळें ते सगळे विसरून जर तो राजा त्या यशाचे श्रेय एकटा स्वतः घेत असेल तर तो राजा नासमज समजला जातो. परंतु, जर तुला एवढा दिमाख असेल किं, तुझे स्वतःचे सामर्थ्य पुरेसे आहे तर तू आज तुझ्या ताकदीचे प्रदर्शन करून दाखवच. काय राजा

तुझ्यात असं आव्हान घेण्याची हिम्मत आहे? "वेदांचा अभ्यास, तपश्चर्या, गुण प्रसिद्धी आणि युद्धात मरण हे त्या राजाला स्वर्गाचा मार्ग मोकळा करतात. सत्यासाठी लढण्यात येणारा मृत्यू त्यापैकीं स्वर्गात नेण्यास खात्रीचा समजला जातो इतर तीन कदाचित् त्यास स्वर्गात नेण्यात असमर्थ असू शकतात. म्हणून सगळे राजे सत्यासाठी होणार्या युद्धातील मृत्यू सर्व श्रेष्ठ समजतात. इंद्र असाच शंभर वेळा लढण्यात मरून ते शंभर यज्ञ संपन्न केले म्हणून तो शक्र इंद्रपदाला गेला. त्यानंतर असुरांचे पारिपत्य करून तो विश्वाचा नरेश ठरला. तुझ्याशी लढून जर मृत्यू प्राप्त झाला तर ते खचितच भूषणावह होईल म्हणून आम्ही तुला आव्हान देण्यासाठी आलो आहोत. एक तर तू जिंकून आम्हाला मारून जिंकून दाखव नाहीतर आम्ही तुला मारून जगातील पाप कमी करून दाखवतो. जर तू आम्हाला मारलेस तर तुझे स्वर्गारोहण निश्चित होईल. त्यासाठी त्या निरपराध राजांचा बळी देण्याची आवश्यकता रहाणार नाही. तू इतरांना फालतु समजतोस ते बरोबर नाही. तुझ्यात जर खात्री असेल तर हे आव्हान स्वीकारशील. आम्ही तुला खाजगीत हे आव्हान देत आहोत कारण, तुझी इज्जत तुझ्या लोकांत रहावी अशी आमची इच्छा आहे. जे ठरेल ते सगळे आपल्यातच ठरेल. आम्ही सांगतो किं, आम्ही तुला तुल्यबळ आहोत तरी तू द्वंद्वास तयार हो. तू विसरलास किं, ते महान योद्धे दम्वधर, कार्तवीर्य, उत्तर, बृहदर्थ हे सगळे खोट्या मस्तीमुळें अखेरीस बरबाद झाले तसे तुझे होऊ नये असे जर तुला वाटत असेल तर, एकतर त्या निरपराध राजांची मुक्तता करशिल नाहीतर आमच्याशी द्वंद्व करशिल. आता तुला आमची खरी ओळख सांगतो, मी हृशिकेश ज्याला कधी सौरी असेसुद्धा बोलतात, हे माझे आत्येभाऊ म्हणजे पंडुराजाचे पुत्र, हा भिम व हा अर्जुन असें कुलिन क्षत्रिय आहोत, आम्ही ब्राह्मणाचे सोग घेतले कारण तुझी इज्जत तुझ्या लोकांत संपू नये"

ते ऐकल्यावर जरासंध त्यांना सांगतो, मी कधीही लढल्याशिवाय कोणालाही न हरवता कैद करत नाही. म्हणून तुम्हाला मी आताच कैद करू शकतो पण तसे करणार नाही. कारण, जर मी तसे केले तर मी मला माफ करू शकणार नाही. माझ्या अभिमानाला ठेंच मी स्वतः कधीही मारणार नाही कारण, तसे करणे खर्या क्षत्रियाला शोभणारे ठरत नाही. माझी जी न्यायाची संकल्पना आहे त्याचा मी तुम्हाला फायदा देत आहे. प्रथम मी

तुम्हाला तुमच्या द्वंद्वात हरवीन व नंतर पहा मी तुमचे काय करतो ते. तुझे मी ऐकले आता माझे तुम्ही ऐका". असें बोलून तो क्षत्रिय राजा, जरासंध कृष्णाला सांगतो, "माझ्या अभ्यासा प्रमाणे क्षत्रियांचे कार्य प्रतिस्पर्ध्यांना हरवून त्या द्वारा आपले श्रेष्ठत्व सिद्ध करण्यासाठी त्यांना कैद करून ठेवणे असे आहे. त्या हरलेल्यांना गुलाम करून ठेवावे. त्यांना मी यज्ञात बळी देण्यासाठी इतके दिवस ठेवले आहेत ते असेंच केवळ तू सांगतोस म्हणून मी सोडणार नाही. त्यासाठी मी माझ्या सैन्याची किंवा आणखीन कोणा एकाची अथवा दोघांची अथवा तिघांची मदत न घेता तुझे द्वंद्वाचे आव्हान स्वीकारण्यास तयार आहे. लक्षात ठेव जर तुम्ही कोणीही एक अथवा दोघी किंवा तिघेही हरलात तर तुम्हाला सुद्धा त्या राजांप्रमाणे मी कैदेत ठेवीन. हे सगळे क्षत्रिय कर्तव्याचा भाग आहे असें आपण समजू. मी समजतो, तुम्हाला ही माझी अट मान्य आहे"?

वैशंपायन नंतर सांगतात, असें बोलून तो मानी राजा त्याच्या पुत्रास, सहदेवाला बोलावतो व त्याला राजगादीवर बसवतो. त्या द्वंद्वाचा मुहूर्त ठरतो, कार्तिक शुक्ल प्रतिपदेचा. जरासंधाला त्याच्या दोन साथीदारांची आठवण येते. कौशिक आणि चित्रसेन ज्यांना हंस आणि दिम्वक म्हणून इतर लोक ओळखत होते. दुसर्या पक्षात महाबली जो ब्रह्माच्या आज्ञेनुसार सगळी कामं करत असतो, जो हलधराचा कनिष्ठ बंधू आहे, तो जरी हे घडवत असला तरी त्या द्वंद्वात तो नाही, त्याच्या ऐवजी पंडुपुत्र ते साध्य करणार असतो. हे सगळे विधीलिखीत होते. बुद्धीचा समतोल असलेला तो सत्यासाठी झटणारा, सौरी सर्व नियोजन बिनतोड करून त्या द्वंद्वाच्या तयारीत असतो. जरासंध त्याच्या सर्व शारिरीक सामर्थ्याने सज्ज असा त्या द्वंद्वासाठी तयार होतो.

अशारितीने सभापर्वातील जरासंध वध पर्वाचा बाविसावा भाग संपला.

# सभापर्व भाग तेविसावा

(जरासंध वध पर्व पुढे चालू)

वैशंपायन सांगतात, कृष्ण ओळखतो किं, आता जरासंध द्वंद्वासाठी उद्युक्त झाला आहे ते पाहून तो चतुर यादव जरासंधाला विचारतो, "आता सांग तू कोणाशी द्वंद्व करण्यास तयार आहेस"? "त्याप्रमाणे आमच्यातील तो तुझ्याशी द्वंद्व करण्यास तयार होईल". जरासंधाचा आत्मविश्वास दुर्दम्य होता तो त्या दोघांकडे पहाते व ओळखतो कीं, भिम त्याच्यासाठी योग्य प्रतिस्पर्धी आहे व म्हणून तो भिमाची निवड करतो, तो म्हणतो, "नेहमी क्षत्रियांनी बरोबरीची लढाई करावयाची असते. कमजोराला आव्हान देणार्यापैकीं मी नाही", असे बोलून तो अर्जुना कडे तुच्छतेने पहातो. कृष्णाला तेंच हवे असते, सगळे आपसुकच जमून येत आहे त्या करता तो उमाचे आभार मानतो. त्यानंतर राज पुरोहित गाईच्या पित्ताचे चूर्ण अर्थात गोरोचन आणि फुलांचा हार आणि इतर शुभ लक्षणी चिजा, तसेंच कांहीं उपयुक्त औषधी ज्यांचा उपयोग अशा द्वंद्वांत होणार्या जखमांवर लावण्यासाठी होतो त्या मलम पट्टी वगैरे सगळ्या आणतो. त्याशिवाय मुष्टीयुद्धात जबर फटका बसल्याने जी बेशुद्धी येते त्यावरील औषधी त्यात असते. कळांपासून निवारण करणारी औषधी जखमावर लावण्याची गंध इत्यादी व्यवस्था करण्यात येते. ते सगळे तो जरासंधाला दाखवतो. जरासंध त्या द्वंद्वासाठी क्षणोक्षणी अधिकाधिक तीव्रतेने उत्सुक होत होता. जरासंधाच्यावतीने त्याचे उच्च श्रेणीचे पुरोहित मंत्रोच्चारण करून द्वंद्व देवतेचे स्मरण करतात. त्यात तो ब्राह्मण त्याला द्वंद्वाचे नियम आठवण्याचे सांगतो व ते नियम समजावून देतो, तशी त्याची पद्धत होती त्याप्रमाणे ते होते. तो त्या द्वंद्वासाठी सुयोग्य पेहेराव करून तयार असतो. जरासंध त्याचा मुकूट काढून पुरोहिताच्या हातात देतो व स्वतःचे केस नीटपणे मागे रहातील असें बांधून घेतो. जरासंधाचा उत्साह असा होता जणू समुद्राला भरती आली आहे, तो अक्षरशः उसळत होता. त्यावेळी भिम तेथे त्याच्या तयारीने आला व तो सम्राट त्याला उद्देशून बोलतो, "मी तुझ्याशी द्वंद्व करणार आहे. तुझ्यासाठी हे चांगले आहे किं, तुझा पराभव तुझ्यापेक्षा कितीतरी उच्च अशा सम्राटाकडून होणार आहे". मध्येच कृष्ण बोलतो, "राजे, अजून कांहीं गोष्टी स्पष्ट झालेल्या नाहीत त्या कराव्यात". जरासंध विचारतो, "त्या कोणत्या अशा गोष्टी आहेत"?, ज्या स्पष्ट झालेल्या नाहीत".

कृष्ण सांगतो, "द्वंद्व कशाप्रकारे संपवावयाचे ते ठरलेले नाही ते ठरणे दोघाही मल्लास योग्य होईल". जरासंध त्या प्रश्नाचा ओघ समजत नाही व प्रश्नार्थक दृष्टीने तो जनार्दनाकडे पहात रहातो. जनार्दन म्हणतो, "हे द्वंद्व मरेपर्यंत करावे कां कोणी एक थकला किं त्याला हरला असें जाहिर करून संपवावयाचे ते ठरलेले नाही ते व्हावे". जरासंध भिमाकडे पहात म्हणतो, "मला कसेही चालेल कारण जर हा तुझा भाऊ थकला तर तो व त्याबरोबर तुम्ही दोघे माझे गुलाम व्हाल, ते मला मंजूर आहे". त्यानंतर कृष्ण भिमाकडे पहात विचारतो, "तुला कसे द्वंद्व पाहिजे"? भिम कुत्सितपणे जरासंधाकडे पहात म्हणतो, "मला मरेपर्यंत पाहिजे कारण मी येथे ह्याला मारण्यासाठीच आलो आहे". त्यानंतर कृष्ण विचारतो, "द्वंद्व कुस्तीचे करणार कां मुष्टीयुद्ध करणार"? ते ऐकल्यावर दोघेही एकदमच ओरडतात, "मिश्र असेल". म्हणजे दोनही प्रकारचे डावपेंच ते वापरून लढणार असें ठरते. ते बोलणे होत असतांनाच अधीर झाल्या सारखा अचानक जरासंध एकदम भिमावर चाल करून जातो व त्याला जोरांने ढकलून देतो. जसें पुरातन काळातील असुर वल, देवांवर चाल करून गेला होता. त्यावेळी भिम, ज्याच्यासाठी कृष्णाने देवांना साकडे घातले होते तो त्याला प्रत्यूत्तर तितक्याच जोरांने देतो. दोघांचे धाडस व जोर सारखेच दिसत होते. त्यांचे केवळ हातांनी तुंबळ द्वंद्व सुरु झाले. दोघेही प्रतिस्पर्ध्याला चित करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करत होते. एकमेकांचे हात पकडून व पिरघळून ते कुस्तीचे डाव टाकत होते. मध्येच पायात पाय घालून ते एकमेकांना आडवे टाकण्याचा प्रयत्न करत होते. जोर वाढावा म्हणून ते त्यांचे दंड थोपटत होते त्याचा फार मोठा आवाज होत होता. दोघे त्यांच्या डोक्यांना व मानांना पिळत होते जसे त्यांना दुसर्याची गर्दन मोडावयाची आहे. मधूनच ते सुटे होऊन प्रतिस्पर्ध्याच्या डावाचा अंदाज घेत होते. पुनः झपाट्याने ते भिडत होते त्यावेळी त्यांच्या शरीराच्या धडकण्यामुळें मोठा आवाज होत होता. मधूनच कोणी एक दुसर्याला उचलण्याचा प्रयत्न करत होता व त्याला उचलूव तो जोरात जमिनीवर आपटणार होता. असें दोघेही करत होते. मधूनच जरासंध आपल्या डोक्याने भिमाला जोराची टक्कर देतो व त्या धडाक्याने भिम दूर फेकला जातो. ताबडतोब वृकोदर उठतो व जरासंधाला जोरांने एक गुद्दा हाणतो त्या पटक्याने थोडाकाळ तो सम्राट थरथरत खाली पडतो. पण ते केवळ कांही क्षणच, त्यानंतर तो राजा उठतो व भिमाला तितक्याच जोरांने गुद्दा हाणतो.

अशारितीने कुस्ती आणि मुष्ठी असें दुहेरी द्वंद्व वाढत जाते. एकमेकांना ते उचलून खाली आपटत व त्याच्या नंतर ते पुनः कुस्तीसाठी भिडत होते. हात पिळणे, पाय पिळणे, माना पिरगळणे असें सगळे प्रकार वेगांने होत होते. कोणीही थकल्याचे दिसत नव्हते. त्यांच्या अंगावर असलेल्या लोखंडी कंकण व इतर आभूषणांतून ते जेव्हां जोराने हाणत तेव्हां ती आभूषणे एकमेकांवर आदळल्यामुळें ठिणग्या निघत होत्या. ते द्वंद्व कमालीचे भयंकर होत होते. मधून मधून ते जोरांने ओरडून प्रतिस्पर्ध्याला आव्हान देत होते. जोर जोराने गुद्दे ते मारून प्रतिस्पर्ध्याला घायाळ करण्याचा प्रयत्न करत होते. जणूकाय दोन मस्तवाल हत्ती लढत आहेत असें दृष्य होते. कोणीही हार मानत नव्हते. कोणीही हार मानत नाही हे पाहून ते दोघे एकमेकांकडे घृष्ण नजरेने पहात होते. एकदा भिमांने जरासंधाला उचलून दूर फेकून दिले त्यावेळी तो राजा कळवळल्यासारखा किंचाळला पण ताबडतोब उठून पुनः लढायला तयार झाला. मधूनच अर्जुन भिमाला उत्तेजन देण्यासाठी ओरडत होता तर दुसर्या बाजूला कोणी जरासंधाचे त्याला प्रोत्साहन देत होते. दोघाच्या अंगातून घामाच्या धारा लागल्या होत्या व ते थेंब लांबवर फेकले जात होते. त्या घामामुळें त्यांच्या शरीरावरील पकड करणे जास्त अवघड होत होते. दमछाक होते असें वाटावे तेवढ्यात पुनः त्यांचे द्वंद्व पुर्ववत सुरु होत होते. आता ते फेकाफेकी थांबवून त्या ऐवजी एकमेकांना दाबण्याचा डाव खेळू लागले कारण त्याने कोणाचा श्वास कमी झाला तर तो थकणार व तो हार मानणार असा त्यांचा कयास असावा असें वाटत होते. बराच वेळ ते एकमेकांचा श्वास दाबण्याचा प्रयत्न करत होते. त्यानंतर एकांने दुसर्याला पोटावर दाबण्यास सुरुवात केली. त्याला त्याकाळात पृष्ठभंग असें म्हणत. परंतु तसे धरून ठेवणे फारकाळ सोपे नव्हते. तो पृष्ठभंगाचा डाव दोघेही आलटून पालटून करत होते. असें द्वंद्व तेव्हाच निर्णायक होते जेव्हां कोणी एक थकतो पण येथे पहाता कोणीही थकत नव्हते. मानांवर पाय दाबून श्वास थांबवण्याचे प्रकार पुष्कळ होत होते पण फार काळ तसे धरून ठेवणे प्रतिस्पर्ध्याला जमत नव्हते कारण तो दोघेही फार अजस्त्र आकाराचे होते. ज्या आखाड्यात ते लढत होते त्यातील माती त्यांच्या घामाने भिजून गेली होती. असें झाल्यामुळें तेथे असलेले मल्ल विद्येचे निष्णात गुरू म्हणतात, "हि लढाई उद्या चालू ठेवावी कां"? परंतु, दोघेही जणूकाय ते द्वंद्व आवडले असावे असें त्याला नाकारतात व ते पाहून कृष्ण सांगतो, ती लढाई तशीच

अंता पर्यंत चालू राहिल असें त्या मल्लगुरूला सांगतात. त्यांच्या घामाने भिजलेल्या मातीमुळें त्यांच्या पकडी एकमेकावरील व मातीवरील निसटत होत्या त्यामुळें ते द्वंद्व निकराचे ठरत होते. कुस्ती व मुष्टीयुद्ध ह्यातील सगळे डाव आणि पेंच वापरून झाले होते पण कोणीही हार मानत नव्हते. श्वास दाबण्यासाठीचे सगळे डाव व्यर्थ जात होते. संपूर्ण मृच्छा, पूर्ण कुंभ असें सगळे वापरून झाले होते. एकमेकांना संपूर्ण शरीर पिळण्यात ते आपली सगळी ताकद घालत होते. एका जागी मारण्याचा अविर्भाव करत ते भलतीकडेच हाणत होते. त्यांचे नेम चुकत होते. ते द्वंद्व पहाण्यासाठी सर्व मगधातून अनेक ब्राह्मण, क्षत्रिय, सुत आणि वैश्य जमले होते. एवढेच नाही तर सर्व वयोगटातील महिलासुद्धा ती लढाई पहाण्यासाठी जमा झाले होते. अनेक मुष्टीयोद्धे व मल्ल ती झुंज पहाण्यासाठी जमा झाले होते. इतकी गर्दी झाली कीं. तो एकसंध जमाव एका मोठ्या शरीरासारखा वाटत होता. अनेक मल्ल टाळ्या वाजवून आपल्या राजाला प्रोत्साहन देत होते. जरासंधाने कांहीं डाव टाकला व त्यात भिम पडला किं एकच गदारोळ उठत असें. पण ताबडतोब भिम त्याला उचलून दूर फेकत असें व प्रोत्साहन देणारे थांबत होते. ते त्यांचा राजा जिंकावा असे त्याद्वारा दाखवत होते व ते अपेक्षित होते. ती लढाई क्षणाचाही विश्राम न घेता होत होती. कोणी एक थोडातरी थकेल असें लोक अपेक्षा करत परंतु, ते होत नव्हते. प्रतिस्पर्धी जराशी चुक करील अशा अपेक्षेने दुसरा पहात असतो पण ते दोघेही त्यांच्या कलेत बहुतेक समसमान ठरत होते. ती झुंज जरासंधाला एक वेगळा आनंद देत होती कारण आजवर त्याला अशी स्पर्धा कधी अनुभवाला आली नव्हती. तो सच्चा लढवय्या होता म्हणून तो भिमाचे कौतुक करत होता, त्यातसुद्धा जरासंधाचा अहंकार होता. दुसर्या बाजूला भिम केवळ जिंकण्यासाठी चढाई करत होता. त्याला जरासंधाचे कौतुक करण्यात रस नव्हता. जेव्हा त्या जमावाने भिमालासुद्धा प्रोत्साहन देण्यास सुरुवात केली तेव्हां ते जरासंधाला आवडले व तो त्या प्रोत्साहनाचे टाळ्या वाजवून कौतुक करत होता. हे असें झाले जसें वृत्र आणि वसव लढतांना एकमेकांचे कौतुक करत असतं. आता ती अक्षरशः मिश्र लढाई झाली होती ज्यासाठी नियम नव्हते. केवळ एकमेकांना आपटणे, तुडवणे, फेकून देणे, पिळणे, गुद्दे हाणणे असें होत होते. कोणीही जरासुद्धा थांबत नव्हते. पहाणार्यांना पहाण्याचा कंटाळा आला पण ते योद्धे थांबायला तयार नव्हते. त्यांचे हात गदे

सारखे व पाय मुसळासारखे ते वापर होते. दोघेही जबर मार खाऊन राहिले होते पण कोणीही औषध लावून घेण्यासाठी थांबला नाही. तेथे असलेले वैद्य ते पाहून म्हणाले, अशी तुल्यबळ कुस्ती आधी कधी झाली नाही. ती लढाई कार्तिक महिन्याच्या शुक्ल प्रतिपदेला सुरु झाली होती. ते महान योद्धे न थकता, न खाता, न पिता, विश्रांति न घेता सतत लढत होते ते युद्ध कार्तिक शुक्ल त्रयोदशी पर्यंत लढत होते. अखेरीस चतुर्दशीच्या रात्री जरासंध थोडे थकल्यासारखे वाटू लागले. कृष्ण ते युद्ध डोळ्यात तेल घालून पहात होता. त्याच्या लक्षात येते किं, जरासंध थकत आहे. ते तो अर्जुनाच्या निदर्शनात आणतो व मग भिमाला सांगतो, आता त्याला उसंत देऊ नकोस. हींच वेळ आहे त्याला मारण्याची. कृष्ण भिमाला सांगतो, "अरे कुंतीपुत्रा , शत्रूला असें दाबले कीं तो मरेल एवढीच ताकद वापर जी तुझा शत्रूला झेपेल. ते बोलणे ऐकून भिम जे समजायचे ते समजतो व जरासंधाला मारावयाची हींच वेळ आहे ते त्याच्या लक्षात येते. तो सगळ्या शूरात श्रेष्ठ असा कुरुवंशाचा योद्धा ज्याला तेरा दिवस लढूनही त्याला मारता आले नव्हते तो आता त्या आजपर्यंत अजिंक्य अशा शत्रूचा जीव घेण्यासाठी सज्ज होतो.
अशारितीने सभापर्वातील जरासंध वध पर्वाचा तेविसावा भाग संपला.

# सभापर्व भाग चोविसावा

(जरासंध वध पर्व संपले)

वैशंपायन पुढे सांगतात, अशारितीने कृष्ण भिमाला सांगतो त्यानंतर जरासंधाला ठार मारण्यासाठी मनाची तयारी करतो. वृकोदर कृष्णाला बोलतो, "अहो यदुकुळी कृष्णा, मी ह्या लढण्याचा प्रचंड क्षमता असलेल्या बदमाषाला आता सोडणार नाही, तो मेलाच पाहिजे". ते ऐकल्यावर कृष्ण समजतो किं, भिमाची लढण्याची ताकद दुर्दम्य आहे त्यामुळे उत्तेजित होऊन तो त्याला बोलतो, "अरे भिमा कुंतीपुत्रा , तुझी सगळी ताकद ह्याच्यावर घाल. तुझा पिता मरुत तुझ्यामागे आहे". असें बोलणे कृष्णाचे ऐकल्यावर भिम त्या जरासंधाचे मृच्छित शरीर दोनही हातांने उचलून डोक्यावर घेतो व निदान शंभर वेळा गरगरा फिरवून लांब फेकून देतो. त्यानंतर पुनः त्याचे निःचेष्ट शरीर उपडे टाकून त्याच्या पाठीवर आपला गुडघा दाबून त्या जरासंधाचे डोके व पाय पकडून ते शरीर उलट्या दिशेने धनुष्यासारखे वाकवण्यास सुरुवात करतो. त्यामुळें जरासंधाचे दोन आडवे तुकडे होतात. ते केल्यानंतर मोठ्या जोमांने भिम सिंहासारखी गर्जना करतो कीं, तो जिंकला. ती त्याची गर्जना व जरासंधाची किंकाळी एकमेकात मिसळून गेलेली असतात. ते पहाणार्या मगधवासीयांनी मोठ्याने टाहो फोडला ते सुद्धा सगळे ऐकतात. त्यामुळें अनेक लोकांचे बोलणे बंद झाले तर बर्याच बायकांचे गर्भ पडले तर कांहींनी बालकांना पूर्वकाळी जन्म दिले, सगळे घाबरलेले दिसत होते. एका वेगळ्या प्रकारच्या भितीने सगळे चिंताक्रांत झाले होते. मगधवासी समजू लागले किं, साक्षात हिमालय कोसळला आहे. सगळे प्रजाजन सावकाशपणे त्या जागेतून बाहेर पडून आपापल्या निवासस्थानी दुःखी अंतःकरणाने जाऊ लागले होते. जरासंधाचे कलेवर राजवाड्या बाहेर पडलेले होते. जणुकाय ते तेथे शांत निद्रा घेत आहे. त्याचा तो निःचेष्ट देह तसा पडलेला होता व भिम आणि कृष्ण आपला आनंद व्यक्त करत असतांना एक विलक्षण गोष्ट घडते. जरासंधाच्या शरीराचे ते दोन तुकडे एकत्र येऊ लागतात जणुकाय कोणी अज्ञात शक्ति त्यांना एकत्र आणत आहे आणि पहाता पहाता ते मिळून जरासंध पुन्हा जागा होतो. त्यावेळी भिम बेसावधपणे त्याच्या कडे पाठ करून कृष्णाशी बोलत असतो, ते अर्जुन पहातो व मोठ्यानो ओरडून वृकोदराला सावध करण्याचा प्रयत्न करणार एवढ्यात तो पुनः उठलेला जरासंध भिमावर मोठ्याने फटका

मारतो. भिम कोसळतो. सगळेंच अनपेक्षित होते. मेलेला जरासंध पुन्हा जीवंत होतो हे समजण्या आधीच तो भिमावर तुटून पडतो. पुनः द्वंद्व सुरू होते. मधल्या काळात भिमाला बर्यापैकीं विश्रांति मिळालेली असल्याने तो सुद्धा पुनः द्वंद्वास तयार होतो. कृष्णाला प्रश्न पडतो असें कसें झाले? परत जात असलेले मगधवासी ते समजल्यावर मागे फिरतात ते पहाण्यासाठी. सर्वजण अचंबित होऊन कांहीं समजण्याच्या पलिकडील घटना असल्यामुळें गोंधळल्यासारखे झालेले असतात. द्वंद्व पुनः जोरात नवीन त्वेषाने सुरु होते. आता लढणारा जरासंध कांहीं वेगळा असावा असा संशय कृष्णाला येतो पण त्यात विचार करण्यासाठी उसंत नव्हती. एका ठिकाणी युद्ध चालू आहे व दुसर्या ठिकाणी कृष्णाच्या विचार विश्वात त्याचे उत्तर शोधण्याचे काम सुरु होते. बराच वेळ स्मरणशक्तिला उजाळा दिल्यावर त्याला आठवते त्या जरा राक्षसीणीने दिलेला वर. त्या वरात तिने बृहद्रथाला सांगितलेले असते किं, जर त्या बालकाचे दोन तुकडे उभे झाले तरच तो मरेल एरव्ही नाही. भिमांने जरासंधाला आडवे तोडले होते व म्हणून तो पुन्हा उठला, कृष्णाला काय चुक झाली ते समजले. जरासंध सामान्य माणूस नव्हता. तो एक राक्षसीणीचा वरदहस्त होता म्हणून त्याला त्या प्रमाणे मारावे लागेल एरव्ही तो कधीच मरणार नाही, हे कृष्ण समजून चुकला. त्यांने ते अर्जुनाला सांगितले पण आता ते भिमाला सांगावयाची गरज होती. त्यासाठी पुनः एकदा जरासंध तसा खाली पडला पाहिजे. त्याची वाट पहात अधीरपणे ते दोघे ती झुंज पहात रहातात. भिम जरासंधाला मारत असतो व तो समजतो किं, त्या जरासंधात पूर्वीचा जोम नाही पण तो हरत नव्हता, तोंच प्रश्न होता. त्याचा प्रतिकार जरी पूर्वीसारखा नव्हता तरी होता त्यामुळे भिमाला समजत नव्हते आता काय करावे? अखेरीस एकदाचा जरासंध पुनः निपचित पडतो. तेव्हां कृष्ण भिमाजवळ जाऊन काय कारण आहे ते सांगतो. त्या बरोबर भिम जरासंधाच्या एका पायावर आपले पाऊल दाबून ठेवतो व दुसरा पाय जोरांने वर खेचतो असें किं, त्याची गुदाजवळील शिवण फाटेल. त्याप्रमाणें ते होते व त्या सरशी जरासंधाचे उभे दोन तुकडे होतात. भिम त्वेषाने ते दोन तुकडे एकमेकांपासून लांब असें दूर फेकून देतो. जरासंध उभा चिरला गेला असल्याने पुनः तो संजीवित होत नाही. त्याचे ते तुकडे मेल्याची कृष्ण खात्री करून घेतो व नंतरच सुटकेचा श्वास घेतो. सगळ्या मगध देशाला एव्हाना समजते किं, जरासंधाचा वध कृष्णाने

पंडुपुत्रांच्या मदतीने केला आहे. जरासंधाचा मुलगा व आता मगधच्या गादीचा वारस सहदेव त्या तिघांना अभिवादन करतो व जरासंधाच्याच रथातून त्यांची मिरवणूक निघते. कृष्णाच्या आदेशांचे पालन होते व ते कैदेत धरून ठेवलेले सगळे राजे व त्यांचे सैनिक मुक्त होतात. आपल्या आप्तांची सुटका केल्यामुळें कृष्णाचे सर्वत्र कौतुक होत असते. जरासंधाच्या कठोर कैदवासातून सुटका झालेले ते राजे त्यांची अलोट संपत्ति कृष्णावर उधळतात. अशारितीने सर्वस्वी मुक्त झालेले ते राजे व कृष्ण पुनः गिरिव्रजाकडे त्यांच्या रथांतून येतात. त्यांच्या बरोबर सव्यसाची अर्जुन जो सदैव अजिंक्य आणि महाबलि भिमसेन सुद्धा असतो. ज्या रथात अर्जुन आणि भिम बसलेले असतात त्याचे सारथ्य स्वतः कृष्ण करत असतो. ते असें दृष्य होते ज्याची तुलना त्या प्रसंगाशी होईल जेव्हां इंद्र व विष्णू असुरांशी युद्ध करून त्यांना पराजित करून येत होते, जे युद्ध बृहस्पतिच्या तारका नावाच्या पत्नीच्या आक्रस्ताळेपणामुळें झाले होते. ज्यामुळें पुष्कळ हत्या झाली होती. कोणाही राजाला हरवता येणार नाही असें ते योद्धे भिम आणि अर्जुन, देखणे, रुबाबदार, आता त्या जरासंधाच्या किल्ल्यातून बाहेर आले. त्या रथाच्या बाजूंना सोन्याचे पत्रे लावलेले होते. ते सोने सूर्याच्या प्रकाशामुळें तळपत्या अग्नीसारखे चमकत होते. त्या रथाच्या दोनही बाजूंना लहान घंटांच्या माळा तोरणासारख्या लटकत होत्या. त्या रथांची चाके मोठा गडगडाटासारखा आवाज करत होती. ज्या आवाजामुळें शत्रूच्या मनाचा थरकाप व्हावा. ह्याच रथातून पूर्वीच्या काळी इंद्राने नव्याण्णव असुर मारले होते. असा रथ मिळाल्यामुळे ते कुंतीपुत्र कमालीचे खूष झालेले दिसत होते. अजानुभाऊ कृष्ण व अर्जुन त्या रथात पाहून ते मगधवासी आश्चर्य करत होते कारण तो रथ त्यांच्या राजाचा, जरासंधाचा होता. आता तो भिमाचा झाला होता. तो अतिसुंदर आणि वेगाने प्रवास करणारा रथ ज्याच्यावर एक सहसा न दिसणारा ध्वज स्तंभ होता. तो रथ देवांसाठीच तयार केलेला होता. त्यातून सप्तरंगी किरणं निघत होती जी एक योजनं इतक्या दूर वरूनही पहाता येत होती. त्या रथातून प्रवास करतांना त्याला त्याच्या गरुडाची आठवण येते व गरुडाला त्याची आठवण येते. त्या क्षणी तो गरुड, दुसरा इंद्र तेथे अवतरतो. आता तो प्रचंड आकाराचा व भारी असा गरुड त्याच्या इतर भयंकर दिसणार्या विचित्र आकारांच्या व गर्जना करणार्या प्राणीगणांबरोबर त्या ध्वज स्तंभावर येऊन बसतो. त्या

रथातून जे किरण निघत होते त्यामुळे त्या कडे पहाणे सामान्य दृष्टीला केवळ अशक्य होते जसे दुपारच्या सूर्याकडे पहाणे व्हावे. असें ते सगळे मायावी होते कारण, जरी ते मानवाला दिसत होते तरी प्रत्यक्षात ते वास्तवात नव्हते कारण, रथ जातांना ते कोठल्याही गोष्टीला अडकत वा आदळत नव्हते. असा तो अद्भूत रथ गिरीव्रजातून बाहेर आला. हा रथ मुळात वासवाकडून जिंकून वसुंनी मिळवला होता. वसुकडून तो बृहद्रथाकडे आला होता व नंतर त्याच्या मुलाकडे, जरासंधाकडे आला होता आणि आता तो भिमाकडे आला होता. बाहेर आल्यावर ते तेथे जमलेल्या जनसमुदायाला अभिवादन करतात. त्यांतील ब्राह्मण त्यांना आशिर्वाद देतात. इतर जन त्यांची आरती ओवाळतात. मुक्त केलेले राजे व त्यांचे आता मुक्त झालेले सैनिक त्या तिघांची पुजा करतात. ते प्रार्थना करतात, अहो आमच्या उपकारकर्त्यानो, आम्ही तुमच्यासाठी काय करावे ते सांगा. ते सगळे राजे कृष्णाची स्तुती करतात त्यात कुंतीपुत्राचा सुद्धा उल्लेख असतो . ह्या तुझ्या कृत्यामुळें तू अजरामर होशिल. तुम्ही जे सांगाल ती सेवा आम्ही तुमचे उपकार फेडण्यासाठी करण्यास तयार आहोत. ते ऐकल्यावर कृष्ण त्यांच्याकडून एक वचन मागतो व ते राजे ते वचन मानण्यास लागलीच तयार होतात. कृष्ण सांगतो, "ऐका माझ्या मित्रानो, माझा आतेभाऊ व इंद्रप्रस्थाचा नरेश युधिष्ठीर लवकरच राजसूय यज्ञ करण्याचे ठरत आहे, तेव्हां त्याच्या बरोबर तुम्ही सगळे राजे प्रामाणिकपणे व एकदिलाने रहाण्याचे वचन द्या. त्याला त्वरित ते सगळे पंच्याऐंशी राजे अनुमोदन देतात. सगळे राजे एकदिलांने बोलतात, "तथास्तु". राजसूय यज्ञात सहकारी राजांनी दानं करावयाची असतात त्याची माहिती असलेले ते राजे ताबडतोब मोठ्या मोठ्या रकमांची दानं युधिष्ठीराला करण्याचे आश्वासन देतात. त्या दानातील कांहीं अंश युधिष्ठीराच्या वतीने भिम आणि अर्जुन कृष्णाचा वाटा म्हणून त्याला देतात तो वाटा कृष्ण सन्मानपूर्वकपणे स्वीकारतो. हे सगळे त्या काळातील रिवाजानुसार होते. त्यानंतर मगधाच्या गादीवर जरासंधाच्या सुपुत्राची, सहदेवाची नेमणूक कृष्ण युधिष्ठीराच्या वतीने भिम आणि अर्जुन ह्यांच्या सम्मतिने जाहिर करतो. त्या राज्यारोहण विधी संपन्न होतो. मगधात सर्वत्र आनंदीआनंद साजरा होतो. त्यानंतर नवनिर्वाचित राजा सहदेव त्याच्या राज पुरोहितांच्या समक्ष विधीपूर्वक कृष्णाला कांहीं जडजवाहर भेट देतो. राजगादीवर बसल्यावर तो नवीन राजा पांडवांना आणि कृष्णासह सगळ्या यादवांना अभय आणि

सौहार्द्याचे आश्वासन देतो. अशाप्रकारे तो सुद्धा युधिष्ठीराच्या यज्ञात एक सहकारी राजा म्हणून सामील होतो. सहदेव त्या प्रसंगी कृष्णाला विचारतो दुःखी अंतःकरणाने त्यांच्या पित्याबद्दल. सहदेव विचारतो, "जनार्दना, माझे पितामह बृहद्रथ एक सत्त्वशिल राजे होते. आमच्या घराण्यात कोणीही माझ्या पित्यासारखा क्रूर झाला नाही मग तेंच असें कां झाले ते समजत नाही, तुला सांगता येईल कां"? कृष्ण त्याला सांगतो जरी चांद कौशिकांच्या वरामुळें तो जन्मला होता तरी त्याच्यावर एका राक्षसीणीची छाया जन्मताच पडली होती. त्यामुळें तो अघोरी कृत्यात रमू लागला होता. ती जरा राक्षशिण बळी घेत होती.

अशाप्रकारे ते तिघे गडगंज संपत्ति घेऊन इंद्रप्रस्थाला रवाना होतात. तेथे गेल्यावर ते युधिष्ठीराला भेटतात व सगळें वृतांत, जसे घडले तसें सांगतात. सगळे जसे कृष्णाने आयोजित केले होते तसेंच निर्विघ्न संपन्न झाल्यामुळें युधिष्ठीर व इतर मंडळी समाधान व्यक्त करतात. त्या विजयामुळें आता राजसूय यज्ञास कांहीं बाधा येण्याची शक्यता उरली नव्हती. इंद्रप्रस्थामध्ये ते सुटलेले राजेसुद्धा आलेले असतात. ते त्यांना आश्वासन दिलेले धन राजकोषात देतात. त्या सगळ्या गोष्टी ठरवल्याप्रमाणे झाल्यामुळें सगळ्यांची इच्छा आता थोडी मौजमजा करण्याची होते. त्यावेळी राजा युधिष्ठीर त्या मित्र राजांना निरोप देतो व ते आपापल्या देशाकडे निघून जातात.

कुटील निती व सुयोग्य नियोजन ह्यांच्या सहायाने तो कृष्ण त्याच्या शत्रूचा पाडाव पांडवांच्या मदतीने करून घेतो म्हणजे एका दगडात दोन, असा डाव सांधतो. वैशंपायन सांगतात. आता तो जनार्दन आपल्या घरी जाण्याच्या तयारीला लागतो. तो प्रथम कुंतीला नमन करतो व नंतर द्रौपदीला भेटतो. तिचा निरोप घेऊन मग तो त्याच्या बहिणीस, सुभद्रास भेटतो. त्यानंतर नकुल आणि सहदेवांस भेटतो व त्यांच्याशी वार्तालाप करतो. शेवटी धनंजयाला आणि भिमाला कडकडून मिठी मारून त्यांचा निरोप घेतो. त्या घटनेमुळें सर्वदूर पांडवांची ख्याति पसरते. राजा युधिष्ठीर त्याचे राज्य नितीने व न्यायाने पुण्यमार्गाने पुढे चालवत रहातो. त्यात पुण्य, सुख व हित असें सगळे कसे एकातच साध्य होतील ते तो पहात एक उत्तम राज्य वाढवतो. त्या सगळ्यामुळें द्रौपदीच्या आनंदाला पारावार रहात नाही. अरे राजा, ते महत्वाचे होते कारण बहुधा इतरांचे भले करण्याच्या नादांत बरेच गुणीजन आपल्या पत्नीचा विचार करण्याचे विसरतात. परंतु, पांडवानी ती

चुक केली नाही. प्रजा व आप्त ह्या दोघांनाही न्यायाने वागवण्याचे कार्य तो गुणी राजा युधिष्ठीर लिलया करत असतो.

अशारितीने सभापर्वातील जरासंध वध पर्वाचा चोविसावा भाग संपला.

# सभापर्व भाग पंचविसावा

(दिग्विजय पर्व सुरु)

वैशंपायन पुढे सांगतात, अर्जुन त्याच्या विशेष शस्त्रसंभाराची पहाणी करतो. त्यात त्याचे उत्तम गांडीव धनुष्य, तो कधीही न संपणारा भाता, तो आकाशात उडणारा रथ, त्यावरील ध्वज आणि त्याची स्तंभ, त्याचे मायासुरांने घडवलेले सभागृह ही त्याची ताकद आहे ती तो युधिष्ठीराला दाखवतो त्यावर युधिष्ठीर त्याला बोलतो, "एकाद्या राजाला अशी सगळी साधन सामुग्री जमवणे व त्या बरोबर दोस्त राजे संपादन करणे, प्रसिद्ध मिळवणे, प्रांत ताब्यात घेणे हे आज आपल्याला शक्य झालेले आहे. तरीसुद्धा आपला खजाना म्हणावा तितका संपन्न नाही. त्यासाठी तुम्ही सगळे आपापल्या सैन्यानिशी निघून परप्रांतात जाऊन अधिक धन दौलत मिळवून आणली पाहिजे. त्या देशाच्या राजांकडून त्यांच्या संरक्षणाच्या बदल्यात खंडणी वसुल केली पाहिजे. त्यासाठी तू योग्य मुहूर्तावर उत्तर दिशेकडील राज्यांवर चाल करून जावे असे मला वाटते". ते ऐकल्यावर अर्जुन त्याला गंभीरपणे विचारपूर्वकपणे सांगतो, "अरें सुदैवी राजा ब्राम्हणांच्या तोंडातून शुभाशिर्वाद घेऊन आम्ही तुझ्या आज्ञेचे पालन करण्यासाठीच तर जात आहोत. तुझ्या आज्ञेने आम्ही आमच्या शत्रूंना हरवून व आमच्या दोस्तांना सुखी करून एक सुराज्य प्रस्थापित करून दाखवू. ह्याबद्दल खात्री बाळगावी, पृथाच्या पुत्रा". असें बोलून तो कुंतीपुत्र , अर्जुन एक मोठे सैन्य घेऊन त्याच्या विलक्षण अशा रथातून जो त्याला साक्षात अग्नीदेवांने दिला होता, सिमोल्लंघनासाठी उत्तर दिशेकडे प्रयाण करतो. जी कुबेराची दिशा म्हणून ओळखली जाते. त्याच्या मागोमाग भिम त्याची सेना घेऊन पूर्वेकडील देशांकडे निघतो व नकुल आणि सहदेव प्रत्येकी पश्चिम आणि दक्षिण दिशेकडे जातात. अशारितीने सगळे चार पांडव आपापल्या मोहीमांवर गेले असतांना युधिष्ठीर मात्र आपल्या मित्रमंडळी व बायको सह खांडवप्रस्थात मौज मजा करत रहातो.

अशारितीने सभापर्वातील दिग्विजय पर्वाचा पंचविसावा भाग संपला.

# सभापर्व भाग सव्विसावा

(दिग्विजय पर्व पुढे चालू)

जनमेजय वैशंपायनांना विचारतो, "अहो ब्राह्मण श्रेष्ठ, कृपया मला त्यांच्या चारही दिशांना केलेल्या स्वार्यांची माहिती तपशिलात जाऊन सांगा, कारण माझ्या पूर्वजांच्या पराक्रमाच्या कथा ऐकायला मला आवडते". वैशंपायन सांगू लागतात, "पृथाच्या पुत्रांनी हि पृथ्वी एकाच वेळी पादाक्रांत केली होती. त्यातील धनंजयाच्या मोहीमेची माहिती मी तुला प्रथम सांगतो. उत्तरेकडील देशांतील कुलिंदास राज्य त्यांने प्रथम जिंकले. त्यानंतर अनर्तास आणि कलकुट ताब्यात घेतली. त्यानंतर धनंजयाने सुमंडल जिंकले, शकल बेट जिंकले, प्रितिविंद्य राजाचा पराभव केला. शकल हे एक महत्वाचे बेट आहे पृथ्वीवर, त्या शकल बेटावर बरेच राजे राज्य करत होते ते सगळे अर्जुनाला मिळाले. त्या लढाया साध्या नव्हत्या तुंबळ युद्धानंतरच ते त्याला साध्य झाले. सरते शेवटी पार्थ त्यात कामयाब झाला. त्यांना जिंकल्यानंतर त्यांचा सन्मान करून त्यांना साम्राज्यात एक करून मग त्यांने त्यांच्या मदतीने प्रागज्योतिष जे किराट व चिनी राजांच्याकडे होते ते घेतले. तेथे एक महान राजा होता त्याचे नांव होते भागदत्त. तो धनंजयाबरोबर आठ दिवस लढला, त्यानंतर तो अर्जुनाला त्याचे कौतुक करण्यासाठी बोलतो, "अरे कुरु वंशाच्या योद्ध्या, तुझे युद्धकौशल्य वाखणण्यासारखे आहे. मी इंद्राचा मित्र आहे त्याच्याहून कंकणभरही कमी नाही पण तुझे अथक लढणे मला भावले. मी कबूल करतो आता मी ह्यापुढे तुझ्याशी बरोबरी करू शकणार नाही. अरे पंडुपुत्रा, मला सांग मी काय करावे असें तुला वाटते"? अर्जुन त्याला सांगतो, "आपणाला मी वंदन करतो कारण, तुम्ही माझ्या जन्मदात्याचे मित्र अहात. गोष्ट अशी आहे कि, आमचे राजे युधिष्ठीर धर्माचे राज्या प्रस्थापित करत आहेत त्यासाठी आपण त्यांना मिळून खंडणी द्यावा जे धन लोकांच्या भल्यासाठी वापरले जाणार आहे. आपण जाणकार अहात तेव्हां एवढे स्पष्टीकरण पुरे असें मी समजतो". ते ऐकून तो राजा भागदत्त त्याला बोलतो, "अरे कुंतीच्या मुला , तू माझ्यासाठी माझ्या मुलासारखाच आहेस. तसेंच तुझा भाऊ युधिष्ठीरसुद्धा मला मुलांसारखाच आहे. म्हणून मी तुमच्या कार्याला जरूर मदत करीन. आता मला सांग, मी आणखीन काय करावे असे तुला वाटते"? अशारितीने सभापर्वातील दिग्विजय पर्वाचा सव्विसावा भाग संपला.

# सभापर्व भाग सत्ताविसावा

(दिग्विजय पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगत रहातात, ते ऐकल्यावर धनंजय त्यांना बोलतो. "तुम्ही असें आश्वासन देत असाल तर मला सर्व कांहीं मिळाले असें मी समजेन". अशारितीने प्रागज्योतिष आपलेसे केल्यानंतर कुबेराच्या राज्याकडे कुच करतो. त्या डोंगराळ प्रदेशातील सगळी राज्ये त्यानी जिंकली व त्यांच्या कडून खंडणी वसुल केली. एवढेच नाही तर त्याने त्या प्रदेशातील राजांची मनं सुद्धा जिंकली म्हणून ते मोठ्या प्रेमांने खंडणी देत होते. चांगला राजकारभार राखण्याची एक अनोखी परंपरा धनंजयाने तेथे रुढ केली.

ते झाल्यानंतर तो मोठ्या तयारीने उलुकाचा राजा वृहंत ह्याच्यावर चाल करून गेला. परंतु, वृहंत सहसा हार मानणारा नव्हता. तोसुद्धा मोठ्या तयारीने त्याच्या नगराबाहेर त्याचे चारखांबी (घोडदळ, पायदळ, रथदळ आणि हत्तीदळ) सैन्य घेऊन सामोरा आला. फाल्गुनाच्या सैन्याचे ढोल ताशे आणि नगारे असा प्रचंड आवाज करत होते किं, कोणाचे हृदय थरकापून निघेल. धनंजयाच्या सैन्यातील हत्तींचे ओरडणे व त्याच्या सैन्यातील रथांचे आवाज घाबरवून टाकणारे होते. पण वृहंत कांहीं कमी नव्हता. तो अर्जुनाला चांगलीच लढत देतो. विशेषकरून स्वतः वृहंत आणि अर्जुन ह्यांच्यातील लढत चांगलीच चुरशीची झाली. अखेरीस तो पराक्रमी राजा पंडुपुत्रापुढे कमी ठरला. अर्जुनाला हरवणे केवळ अशक्य आहे हे समजल्यावर तो मन वृहंत तहास तयार झाला व एक मोठी खंडणी त्याने दिली. त्याच्याशी शांतिकरार केल्यानंतर अर्जुन त्याला सोबत घेऊन पुढील चढाईस निघाला. आता सेनाबिंदूच्या दिशेने तो निघाला होता. त्याला हरवल्यावर तो मोदपुरा, वामदेव, सुदामन, सुसंकुल आणि उत्तरेकडील उलुक व तेथील राजे व प्रजा ह्यांना जिंकले. त्यानंतर युधिष्ठीराच्या आदेशानुसार तो तेथे सेनाबिंदू येथेच थांबतो. परंतु आपल्या सेनानींना सैन्याबरोबर पाठवून तेथील प्रदेश काबीज करतो. त्यानंतर धनंजय सेनाबिंदूच्या राजधानीत देवप्रस्थाला असतांना आपल्या सैन्याचा चौथा भाग लष्कर घेऊन आणि जिंकलेल्या राजांच्या लष्करांना घेऊन विश्वगष्व कडे चाल करतो. तेथील बहादूर गिर्यावर्दींना जिंकून तो त्याचे सैन्य घेऊन पुरु राजाच्या राज्याकडे वळतो. पुरुराजाला हरवून तो पुढे तेथील दरोडेखोरांच्या टोळ्यांना मारून पुढे तो पंडुपुत्र उत्सव

संकेत नांवांने ओळखल्या जाणार्या टोळ्यांना खंडणी द्यायला लावतो. त्यानंतर तो काश्मीर मधील क्षत्रियांना हरवतो. तेथील लोहित व इतर लहान राजांना जिंकतो. तेथील विविध जमातीच्या जसें, त्रिगर्त, दारव, कोकोंड क्षत्रियांनासुद्धा तो हरवतो. त्यानंतर तो तेथील सुंदर नगरी अवसरी ताब्यात घेतो. त्यानंतर तो उरुगच्या रोचमनला जिंकतो. तो पांडव ज्याचा जन्मदाता साक्षात इंद्र आहे, आता अतिसुरक्षित समजल्या जाणार्या सिंघपुतावर चाल करून जातो. त्यानंतर तो शुह्म आणि सुमल जिंकतो. मोठ्या ताकदीने तो महाशक्तिमान वल्हिकांना हरवतो. त्यानंतर तो कांहीं निवडक लष्कर घेऊन कंबोज आणि दरद घेतो. त्यानंतर तो तेथील रानावनात वावरणार्या दरोडे घालणार्या टोळ्यांचा नाश करतो. त्याशिवाय तेथे वावरणार्या इतर टोळ्यां जसें, लोह, पूर्वेकडील कंबोज, उत्तरेकडील ऋषिक जिंकतो पण त्यासाठी त्याला मोठी लढाई करावी लागते. ती लढाई इतकी जबरदस्त होती कीं. त्याची तुलना देव आणि असुरांच्या लढाईशी करावी लागेल. ज्या लढाईला बृहस्पतिची पत्नी तारका कारण होती. त्यात अर्जुनाचे बरेच उत्तम शूरवीर कामास येतात. तरी शेवटी तो त्यांना कसेबसें हरवतो. त्यांच्या कडून तो पोपटाच्या चोचीच्या रगाचे (लाल) घोडे खंडणी म्हणून घेतो. त्याचप्रमाणे मोरपंखी रंग असलेले घोडेसुद्धा त्याला तेथे मिळतात. तसे घोडे फक्त त्याच प्रदेशांत आढळतात व त्यांचा वेग फार असतो. अशारितीने हिमालयाच्या व निशुक्त पर्वताच्या पायथ्याचे सगळे प्रदेश पादाक्रांत केल्यानंतर तो त्याच्या विजयी सैन्या बरोबर बर्फाच्छादित पहाडांकडे पोहोचतो. तेथे जिंकण्यासारखी मानव वस्ती नसल्यामुळे तो तेथे आराम करण्याचे ठरवतो.

अशारितीने सभापर्वातील दिग्विजय पर्वाची सत्ताविसावा भाग संपला.

# सभापर्व भाग अठ्ठाविसावा

(दिग्विजय पर्व पुढे चालू)

वैशंपायन बोलतात, तो शूरवीर महारथी असा पांडव हिमालयातील लिंपुरुष नांवाचे राज्या ज्यावर राजा धर्मपुत्र राज्य करत होता तो जिंकतो पण त्यासाठी मोठ्या संख्येने क्षत्रियांचा संहार होतो. त्यानंतर तो इंद्राचा मुलगा पुढे हरातक राज्याकडे कुच करतो. त्यावर गुहकांचे राज्य होते. गुहकांशी साम धोरणाचा उपयोग करून त्यांना तो आपलेसे करुन घेतो. त्यापुढे तो मनस सरोवराकडे जातो. त्याशिवाच इतर दुसरे तलाव तो तेथे पहातो. त्यांच्या प्रसन्न आसमंतात तो कांहीं समय व्यतित करतो. तेथे ध्यानसाधना करणार्या ऋषींचे दर्शन घेतो. मानस सरोवराचा प्रदेश गंधर्वांच्या ताब्यात होता. तेथून खंडणी म्हणून अर्जुन विविध प्रकारचे घोडे त्यांच्या कडून घेतो. त्या घोड्यांच्या जातींची नांवे अशी, तित्तीरी,कल्माश, मंडुक. शेवटी तो हरीवर्ष नांवाचे ठिकाण ताब्यात घेण्याचे ठरवतो. तेथील कांहीं रखवालदार जे खुप मोठ्या आकाराचे व बलवान होते त्याला भेटतात व चांगल्या मनांने त्याला सांगतात कीं, "अरे पृथा. हा प्रदेश तुला जिंकता येणार नाही. म्हणून येथून तू परत फिर कारण, कोणताही मनुष्य तेथे गेला तर नष्ट होतो. तुझ्या आतापर्यंतच्या लढाया आम्ही पाहिल्या आहेत तेव्हां, आमचे ऐकलेस तर मोठे उपकार होतील. तेथे तू गेलास तर तू कांही पाहू शकणार नाहीस. तेथे उत्तरेकडील कुरु लोक रहातात. तेथे युद्ध करतां येत नाही. तेथे जे आहे ते माणसाच्या डोळ्याने दिसत नाही. दुसरे कांहीं तुला करावयाचे असेल तर बघ". ते ऐकून अर्जुन त्यांना बोलतो, "आम्ही आमच्या राजासाठी साम्राज्याची प्रतिष्ठा प्राप्त करून घेण्यासाठी विविध राज्ये पादाक्रांत करत आहोत. तुमचे तसे म्हणणे असेल तर आम्हाला कांहीं खंडणी द्या म्हणजे मी निघून जाईन". ते ऐकल्यावर ते पहारेकरी त्याला पुष्कळ स्वर्गिय दागिने व वस्त्रं, रेशीम आणि चांमडी देतात. अशारितीने तो त्या प्रदेशांची सुद्धा आपल्या साम्राज्यात गणना करतो. अशारितीने सगळ्या उत्तरेकडील राज्यांना त्यांच्या साम्राज्यात समाविष्ट करण्यात धनंजय यशस्वी होतो. त्या बरोबर विविध प्रकारचे घोडे जे इतरत्र कोठे आढळत नाहीत तेसुद्धा तो मिळवतो. त्यात तित्तीर, कल्माश जातीचे घोडे, लाल रंगाचे अतिचपळ घोडे असतात. मोरपिशी रंगाचे घोडे असतात. अशी सगळी खंडणी घेऊन तो पांडव त्याचे चौदळी सैन्य

घेऊन इंद्रप्रस्थास येतो. तेथे आल्यावर तो ते सगळे राजा युधिष्ठीराला अर्पण करतो. त्यानंतर राजाज्ञेने तो विश्रांति साठी रजा घेतो व आपल्या कक्षात निघून जातो.

अशारितीने सभापर्वातील दिग्विजय पर्वाचा अठ्ठाविसावा भाग संपला.

# सभापर्व भाग एकोणतिसावा

(दिग्विजय पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगतात, त्याच सुमारास भिमसेन युधिष्ठीराच्या आज्ञेने त्याच्या मोहीमेस निघतो. त्याची दिशा असते पूर्व म्हणून, त्या दिशेने तो त्याचे सैन्य घेऊन कुच करतो. त्याच्या लष्करात हत्तीदल, घोडदल, रथदल आणि पायदल असते. सर्व शस्त्र सामुग्रीनिशी परिपूर्ण असे त्याचे सैन्य पुढे जात असते. तो प्रथम पांचाल देशात येतो. तेथे प्रथम समझौता करण्यात तो तेथील टोळ्यांना सांगतो म्हणजे विनाकारण मनुष्य हानि होऊ नये. त्यात तो यशस्वी होतो. तेथून तो गंडक आणि विदेह प्रांतात जातो व त्यांना हरवून त्या राज्यांना आपल्या साम्राज्यात विलीन करतो. तेथून तो महारथी दसर्नच्या राज्यात जातो. तेथे राज्य करणार्या राजाला, सुधर्मनला तो मुष्ठीयुद्धाचे आव्हान देतो. त्यात त्या राजाची क्षमता पाहून भिमसेन त्याला आपल्या सैन्याचा प्रमुख नेमून त्याचा गौरव करतो. त्यानंतर तो महाबली त्याच्या जबरदस्त सैन्यानिशी आणखीन पूर्वेकडील देशांकडे निघतो. त्याच्या सैन्याच्या आवाजांने तो प्रदेश दणाणून निघतो. तेथे त्याच्या सामर्थ्याने तेथील राजा रोचमन जो अश्वमेध राज्याचा नरेश होता त्याला जिंकतो. भयंकर घोर लढाई करुन तो त्या राज्यांना आपल्या साम्राज्यात समाविष्ट करून घेतो. त्यानंतर तो पुलिंद देशात जातो. तेथील राजे, सुकुमार आणि सुमित्र तो हरवतो व त्यांना सुद्धा साम्राज्यात सामिल करून घेतो.

अरे जनमेजया, तो बलाढ्य पांडव युधिष्ठीराच्या आज्ञेने शिशुपालाच्या राज्यात घुसतो. तो छेडीचा राजा असतो. त्याला समजते किं, पांडव त्याच्यावर चाल करून आला आहे तेव्हां तो त्याच्या नगराच्या बाहेर येतो. तेथे तो पृथाच्या मुलाचे स्वागत करतो. तेथे तो त्यांच्या कुटूंबियांची विचारपुस करतो. आपले राज्य त्याच्या हवाली करतो. तो भिमाला विचारतो, "अरे कुंतीपुत्रा, तुमचा इरादा नेमका काय आहे"? तेव्हां भिम युधिष्ठीराचे मानस त्याला समजावून सांगतो. त्यानंतर भिमसेन त्यांच्या कडे त्यांचे आदरतीथ्य स्वीकारत एक महिनाभर रहातो. त्यानंतर तो त्याचे सैन्य घेऊन तेथून निघतो.

अशारितीने सभापर्वातील दिग्विजय पर्वाचा एकोणतिसावा भाग संपला.

# सभापर्व भाग तिसावा

(दिग्विजय पर्व पुढे चालू)

वैशंपायन सागत असतात, त्यानंतर भिमसेन पुढे राजा क्षीनिमत जो कुमारदेशाचा नरेश होता त्याला पराभूत करतो व त्याचे राज्य आपल्या साम्राज्यात विलीन करतो. त्यानंतर कौसल देशाचा राजा बृह्दवत जिंकतो. तेथून तो मोठी लढाई करून अयोध्याच्या राज्याला, दीर्घयज्ञला हरवतो. त्यानंतर तो गोपालकक्ष्य व कौशलच्या उत्तरेकडील प्रदेश जिंकतो. मलदेशाच्या राजाला तो हरवून ते राज्यसुद्धा घेतो. तेथून तो महाबली पांडव हिमालयाच्या पायथ्याचे सगळे प्रदेश ताब्यात घेतो. अशारीतीने तो त्या परिसरातील विविध राज्ये ताब्यात घेतो. तेथून तो तेथील ताकदवान राज्य, भल्लात घेतो. त्यानंतर तो डोंगराळ प्रदेशातील शुक्तिमंत जे भल्लाताच्या बाजूला आहे ते घेतो. त्या लढाईत भिमसेन तो कधीही कोणालाही न हरणारा भाग जिंकतो. काशी नरेश सुवाहूला तो त्या युद्धात जिंकतो. त्यानंतर तो शक्तिशाली पांडव क्रथच्या राजाचा पाडाव करतो. तो सुपर्शाचा राजा होता. त्यानतर ते मत्स्य आणि मलद देश जिंकतो. त्यानंतर तो पशुभूमिकडे जातो. तो प्रदेश विनाशत्रू होता तो त्याच्या कब्जात येतो. त्यानंतर तो मदहरा, महिदर आणि सोमध्येय जिंकून घेतो. त्यानंतर तो उत्तरदिशेकडे वळतो. तेथे तो पराक्रमी कुंतीपुत्र वत्सभूमी जिंकतो. त्याबरोबर तो भर्ग, निषाद आणि मनिमत लोकांच्या प्रदेशात त्यांना हरवून तो प्रदेश आपल्या राज्यात जोडतो. त्यानंतर फारशी मेहनत न करतांच मल आणि भगौंत पर्वताचे प्रदेश जिंकतो. तेथे फक्त समझौता करावा लागतो व ते राजे सर्मक आणि वर्मक त्याला विनासायास खंडणी देतात. त्यानंतर जनकराजाच्या राज्याला, विदेह तो कमी मेहनतीने ताब्यात घेतो. त्यानंतर चतुराईने तो शकांना हरवतो. त्या भागात रहाणारे बर्बर लोक त्याला स्वीकारतात व खंडणी त्यांच्या ऐपतीनुसार देतात. त्यानंतर तो विदेहमधून किराटांच्या राज्यात जातो. ते इंद्र पर्वतावर रहात असतात. त्यानंतर मोठी चढाई करून तो शुबम आणि प्रशुमांना हरवतो. तेथून तो मगधला पोहोचतो. त्या वाटेत असलेले दंड व दंडधर ह्यांना पराजित करतो. त्या पराजित राजांना बरोबर घेऊन तो गिरीव्रज नगरात येतो. तेथे तो समझौता करून जरासंधाच्या मुलाकडून सहदेवाकडून मोठी खंडणी वसुल करतो. तेथून तो कंसाच्या राज्यात जातो. त्याच्या सैन्याच्या

आवाजाने सगळी धरणी थरकापत होती असा सगळा दरारा त्यांने त्या भागात पसरवला होता. त्यानंतर तो शूरवीर पांडव कामराज्यावर चाल करून जातो व त्याला पराजित करतो. त्या परिसरातील पहाडी प्रदेशातील इतर राजे तो जिंकतो. मदागिरीच्या राजाला तो आव्हान देतो व पराजित करतो. त्यामध्ये पुंड्रचा राजा वासुदेव महौज जो कौशिक कच्छचा राजा होता असतात. तेथून तो वंग वर स्वारी करतो. तेथे समुद्रसेनाचा पराभव करून तो चंद्रसेन आणि ताम्रलिप्त राजांनासुद्धा हरवतो. त्यानंतर करवटचे राज्य तो काबिज करतो. त्यानंतर सुहमच्या राजाला तो हरवतो. त्यानंतर समुद्र किनार्यावरील बरीच छोटी राज्यांकडून तो खंडणी वसुल करतो. तेथे रहाणार्या म्लेच्छ लोकांच्या टोळ्यांना तो जिंकतो. त्यांच्याकडून तो चंदनाच्या रुपात खंडणी वसुल करतो. त्याशिवाय समुद्री रत्ने जसें पोवळं, शंखू, कवड्या, मोती आणि कापडं वगैरे तो घेतो. त्याशिवाय ते म्लेच्छ राजे विविध प्रकारचे नाणी, मौल्यवान रत्ने ह्यांचा भिमसेनावर पाऊस पाडतात. ते घेऊन भिम यशस्वी होऊन इंद्रप्रस्थाला परततो. ती सगळी खंडणी तो राजा युधिष्ठीराला अर्पण करतो.

अशा रितीने सभापर्वातील दिग्विजय पर्वाची तिसावा भाग संपला.

# सभापर्व भाग एकतीस

(दिग्विजय पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगतात, अरे जनमेजया, त्याच प्रमाणे सहदेव आपल्या मोहिमेवर निघतो, त्या आधी तो युधिष्ठीरा कडून प्रेमाचा निरोप व शुभेच्छा घेतो. त्याची दिशा असते दक्षिण. त्या प्रदेशात तो जोरांने मुसंडी मारतो व एका पाठेपाठ लहान मोठी राज्ये काबिज करत जातो. त्यात महत्वाचा म्हणजे सुरसेन असतो. मत्स्य देशाच्या राजाला तो नमवून त्याच्या कडून मोठी खंडणी वसुल करतो. त्यानंतर अधिराजच्या दंतवक्राचा पराभव करतो. त्यानंतर त्याच्याकडून खंडणी घेतल्यानंतर त्यालाच त्याच्या गादीवर बसवतो आणि मैत्रीचा संबंध प्रस्थापित करतो. सहदेव त्यानंतर सुकुमार, सुमित्र व इतर त्या मत्स्य प्रदेशातील राज्ये पादाक्रांत करतो. त्यानंतर पदचरस राज्य काबिज करतो. तो बुद्धिमान पांडव त्यानंतर निषादांची राज्ये (भिल्ल) ताब्यात घेतो. तेथे उंच शिखरं असलेले गोश्रृंगी व श्रीनिमत जिंकतो. त्यानंतर नवराष्ट्र म्हणून ख्यातनाम असलेले राज्य जिंकतो. तेथून तो कुंतिभोजावर चाल करून जातो परंतु , तेथे त्यांचे स्वागत होते व ते यादव स्वतःहून त्यांची सत्ता स्वीकारतात. त्यानंतर त्याची भेट होते राजा जम्वकाशी. ह्या राजाचे पूर्वीच्या वैमनस्कामुळें वासुदेवाशी खटकले होते. सहदेवाला जम्वकाच्या मुलाशी लढावे लागते. त्यानंतर तो पांडव आणखीन दक्षिणेकडे निघतो. तेथे असलेल्या शेख राजांचा तो पराभव करतो. त्यांच्या कडून भरपूर खंडणी वसुल करतो व नंतर त्यांच्या बरेबर मैत्रीचे संबंध प्रस्थापित करून व त्यांच्या कडून कांहीं सैन्य घेऊन तो पुढे सरकतो. आता तो पांडव नर्मदेच्या तटावरील राज्याकडे आलेला असतो. तेथे अवंति च्या दोन बलाढ्य राजांचा तो पराभव करतो. त्यांची नांवे अशी, विंद आणि अनुविंद होती. त्यांच्या कडून भरपूर खंडणी तो आश्विनीकुमारांचा पुत्र सहदेव वसुल करून मग भोजकत गाठतो. तेथे त्या शहराच्या राजांशी तो निकराची लढाई करतो संपूर्ण दोन दिवस ते युद्ध चालते. अखेरीस तो पांडव त्या प्रदेशाचा राजा भिष्मकाचा पराभव करतो. त्यानंतर तो कोशलच्या राजाचा पराभव करतो. त्यानंतर तो वेनवा नदीच्या तटावरील राज्ये काबिज करत जातो. त्यानंतर कर्नाटक आणि पूर्व कोशल राज्यांच्या राजांना पराभूत करतो. तेथून तो शूरवीर योद्धा सहदेव नटकेय व हेरंभ ह्यांना हरवतो. त्यामुळें मरुध देश त्यांच्या कब्जात येतो. त्यानंतर

मंजग्राम तो बळजबरीने जिंकतो. त्यानंतर नचिन व अर्वुक हे अरण्यातील प्रदेश तो पादाक्रांत करतो. त्यानंतर तो वटधिप राजाला हरवतो. त्यानंतर तो राजा पुलिंदसीचा पराभव करतो. त्यानंतर तो आणखीन खाली म्हणजे दक्षिणेकडे निघतो. हा नकुलाचा कनिष्ट बंधू तेथे पांड्र राजाशी झुंज देतो. त्याला हरवल्यानंतर तो आणखीन दक्षिणेकडे जातो. तेथे तो प्रथमच ख्यातनाम असलेली किश्कींदाची लेणी पहातो. तेथे तेथील महारथ (महार) राजांशी तो सात दिवस लढतो परंतु त्यांना तो हरवू शकत नाही. त्यांची नांवे मिंद आणि द्विंद अशी होती. अखेरीस ते राजे सहदेवाला हरवता आले नाहीतच. परंतु, अखेरीस त्यांने त्यांच्याशी त्या राजांच्या भोळसटपणाचा व त्यांच्या चांगुलपणाचा फायदा घेऊन तो पुढे गेला. त्या शूरवीर लोकांनी तरीसुद्धा युधिष्ठीराला नाही तरी त्याच्या यज्ञासाठी शुभेच्छा मात्र दिल्या. खंडणी नाही तरी त्या यज्ञाला अर्थसहाय्य म्हणून ते महारथ कांहीं धन देतात. तेवढ्यावर समाधान मानून सहदेव पुढे निघाला. तेथून तो महिष्मति गाठतो. तेथे त्याच्या सैन्याशी सहदेवाचे लष्कर लढते पण त्यात त्याला यश येत नाही. त्या राजाचे नांव निल असें होते. त्या लढाईत त्याचे बरेच सैनिक कामी आले. सहदेवाचा जीवसुद्धा धोक्यात होता असें तुंबळ युद्ध झाले. पण यशाचे नांव नको अशी परिस्थिती होती. त्याचे कारण निल राजाला प्रत्यक्ष अग्नीदेवाचे सहाय्य होते. लढतांना सहदेवाचे रथ, हत्ती, घोडे तसेंच शस्त्रे सगळे अचानकपणे आग पकडत व त्यामुळें लढणे केवळ अशक्य होत होते. ते पाहिल्यावर तो आश्विनीकुमारांचा मुलगा आश्चर्यचकित झाला व विचार करू लागला किं, काय करावे?

जनमेजय वैशंपायनाना विचारतो, "जर पांडव एका महान यज्ञासाठी हे सगळे करत होते तर त्याला मदत करण्या ऐवजी अग्नीदेव असा विरोध कां करत होता"?

वैशंपायन त्याला समजावतात, "त्याचे कारण खास आहे, ते कोणते ते आता तुला सांगतो". असें बोलून वैशंपायन ते कारण सांगतात. त्या निल राजाला एक कन्या असते. ती अप्रतिम लावण्यवती असते. ती सदैव राजांने चेतवलेल्या होमाच्या जवळ बसून प्रार्थना करत असें. तिचे सौंदर्य असें विलक्षण होते कीं, अग्नीदेव स्वतः तिच्या प्रेमात अडकतो. त्याचा असा अनुभव राजाला येतो कि, जरी तो होमातील अग्नी कितीही फुंकर मारली तरी चेतवत नसें पण त्या मुलींनी जरी तेथे बसून नुसतां श्वासोंच्श्वास केला तरी तो चटकन

चेतवला जाई. पुढे राजाला जाणीव होते कीं, अग्नीदेवाला त्याच्या कन्येशी लग्न करावयाचे आहे. विशेष म्हणजे ते समजल्यावर ती राजकन्यासुद्धा त्यास मान्यता देते. एक दिवस अग्नीदेव एका ब्राह्मणाचे रुप घेऊन तेथे येतो. ते दोघे एकत्र मजेत वेळ एकमेकांना देत असतात. ते पाहून त्या राज्याच्या नियमानुसार राजा निल त्या ब्रह्मणांस शिक्षा सांगतो. तेव्हां अग्नीदेव त्याचे खरे रुप प्रकट करतो व राजाला समजते किं हा ब्राह्मण आपला जावई साक्षात अग्नीदेव आहे, त्यावर राजा नमन करून देवाची क्षमा मांगतो. आणि आपली कन्या देवाला दान करतो. त्यांचा विवाह संपन्न होतो. तेव्हां त्यावर संतुष्ट होऊन अग्नीदेव राजाला विचारतो त्याला काय आशिर्वाद पाहिजे ते सांग. राजा असा आशिर्वाद मांगतो कीं, युद्धात त्याचे सैन्य कधीही हरणार नाही. त्यावर अग्नीदेव त्याला तो आशिर्वाद देतो. तेव्हांपासून जे कोणी राजे ते राज्य जिंकण्यासाठी येतात त्यांना असा अनुभव येतो जो सहदेवाला आला होता. जो कोणी निलच्या राज्यावर चाल करून जाई त्याच्या सगळ्या सैन्यात आग भडकत असें. त्याचा परिणाम असा झाला, जनमेजया, महिष्मतिच्या मुलींशी कोणी बाहेरचा पुरुष लग्न करण्यास धजेना. त्या मुलींना लग्नासाठी नवरे मिळणे दुरापास्त झाले. सगळे इतर राजे महिष्मतिचे नांव घेण्यास घाबरू लागले. त्यामुळें अग्नीदेव त्या राज्यातील कन्यांना संभोग स्वातंत्र्य प्रदान करतो. त्या कोणाशीही संभोग करू शकत होत्या व त्यामुळें त्यांना कोणताही अपाय होत नव्हता. सहदेव स्वतःसुद्धा त्याचे सैन्य आगीने धरलेले पाहिले होते. तो स्वतःसुद्धा त्या आगीत अडकला होता. त्यावर इलाज म्हणून सहदेव अग्नीदेवाची याचना करण्याचे ठरवतो. तो स्वताची शुद्धी करून तपस्येस बसतो. त्याचे सैन्य तेथे त्याच्या भोवती राहून ते पहात असतात. सहदेव वेदांतील पद्धतीने प्रार्थना करतो ती अशी, "अहो हुताशनि, मी तुमच्या पुढे नमन करतो. तुमचा मार्ग सदैव धुराने वेढलेला असतो. मी तुम्हाला विनंती करतो, तुम्ही सगळ्यांचे कल्याण करणारे अहात. आपण स्वतः साक्षात यज्ञ कुंड अहात . त्यात सगळे वाहिले जाते. तुम्ही ते सगळे हव्य (तुप वगैरे अर्ध्य) हव्याहवन म्हणून स्वीकारत असता, म्हणूनच तुमचे नांव पावक आहे. वेदांची निर्मिती तुमची स्तुति करण्यासाठीच झाली आहे. म्हणून तुला जतवेद असें बोलतात. तुम्ही देवांचे प्रमुख अहात. तुम्हाला चित्रभानु, अनल, विभावसु, हुताशन, ज्वाला, शिखी, वैश्वानर, पिंगेश, प्लवंग, भुरीतेज, अशी विविध सुयोग्य नामाभिधानं

आहेत. तुम्हीच कुमार (कार्तिकेय) ह्याचे मुळ अहात. आपण पूर्ण पवित्र अहात. तुम्हाला रुद्रागर्व असें बोलतात. तसेंच हिरण्यकृत सुद्धा सांगतात. कृपया तुम्ही मला शक्ति द्या, अहो वायु जे अग्नीचे रुप आहे माझ्यावर कृपा करा. आपणच पाणी आहात. आपणच शुद्धतेची साक्ष अहात. तुम्हीच वेदातील मंत्र अहात. तुमच्यातूनच वेद उत्पन्न झाले आहेत. तुम्ही सगळ्या देवतांत श्रेष्ठ अहात. तुम्ही त्यांचे मुख अहात. तुमच्या कृपेने माझी शुद्धी होवो. ऋषी, ब्रह्मण, इतर दैवते, राक्षस, असुर सगळे तुमच्यासाठी यज्ञ करतांना अर्ध्य देतात. तुमच्यातून सत्याचे किरण बाहेर फाकू देंत. आपण यज्ञात व्यक्त होता तेव्हा तुम्ही माझ्यावर कृपा करा. आपण धुरध्वजाने सगळ्याना ज्ञात अहात. आपली उत्पत्ती वायूतून झाली. आपण पापांचा नाश करता. आपण सगळ्या सजीवांच्या उदरात राहून त्याचे जगणे संभव करता. आपल्या शुद्धीकरण करणार्या किरणांने माझे शुद्धीकरण करा. अशारितीने शुद्ध झालेला मी आपल्याला विनंती करू इच्छितो. त्यात मला समाधान, समृद्धी, ज्ञान आणि आनंदमय अवस्था प्राप्त हो".

वैशंपायन पुढे सागतात, सहदेव त्याची याचना पुढे करत असतो ती अशी, "जो साजुक तुपाची धार तुझ्यासाठी लावून मंत्र उच्चारण करतो त्यावर तू प्रसन्न होतोस असें समजतात. अशा माणसास तू समृद्धी, वैभव देतोस आणि जर त्याच्या वासनांवर त्याचा ताबा असेल तर तो माणूस पापविहीन होतो". अशारितीने तो पाडव अग्नीला याचना करत असतो. आपण स्वतः यज्ञाचे कारण असतांना आता आमच्या यज्ञात आपणच बाधा होत अहात हे थांबवावे कृपया. एवढे बोलल्यावर त्या प्रार्थनेचा कांही उपयोग झाला आहे कां, ते अजमावण्यासाठी कुश गवताच्या मोळीवर जाऊन बसतो व अग्नी तेथे येतो कां ते पहातो. सगळे दोनही बाजूचे सैनिक ते पहात असतात. जो अग्नी सगळे ज्वलनशिल फस्त करत असतांना त्या कुशाच्या ढिगाकडे येईल अशी साधारण अपेक्षा होती परंतु, तो येत नाही. म्हणजे सहदेवाची याचना जणू अग्नीदेवांनी ऐकली असें ते समजतात. अग्नीदेव सहदेवाला बोलतो, "अरे कुरु वंशाच्या राजपुत्रा, उठ तेथून, मी तुझी परिक्षा घेत होतो. तुझ्या उद्देशांची मला पूर्ण कल्पना आहे. त्याच प्रमाणें धर्माच्या (यमाच्या) मुलांचे (युधिष्ठीराचे) उद्देशसुद्धा मला चांगलेच अवगत आहेत. परंतु, जोवर निल राजांचे वंशज राज्य करत आहेत मी त्यांना संरक्षण देण्यास बांधलेला आहे. तरीसुद्धा तुमच्या यज्ञाला

अर्थ सहाय्य करण्यास मी तयार आहे. त्यानंतर अग्नीदेवाच्या सांगण्या बरहुकूम निल राजा सहदेवाचे स्वागत करतो. त्यानंतर यज्ञासाठी तो खंडणी चंद्याच्या रुपात घेतो. त्यानंतर तो पांडव आणखीन दक्षिणेकडे सरकतो. तेथे त्रिपुराच्या राजाला तो हरवतो. त्यानंतर पौरव राजांशी तो लढतो. त्या राजाला पराभूत केल्यावर तो अक्रितच्या राजाशी जो कौशिकांचा मुख्या असतो, झुंजतो ती मोठी झुंज होते. ते निकराचे युद्ध होते. त्यानंतर सौराष्ट्राचा राजा तो हरवतो. सौराष्ट्रात रहात असतांना तो त्याचा प्रतिनिधी भिष्मकाच्या भोजकांतला रुक्मीकडे पाठवतो. तो श्रीमंत व इंद्राचा मित्र त्याच्या मुलासह सहदेवाचा प्रस्ताव आनंदाने स्वीकारतो. कारण उघड आहे, पांडवांचे व कृष्णाचे संबंध ते जाणत असतात. रुक्मीकडून भरपूर  धनदौलत तो मिळवतो. तेथून तो पांडव शुर्पारक, दंडक आणि तलकत जिंकतो. त्या समुद्र किनार्यावर रहाणार्या बर्याच म्लेच्छ राजांना हरवून त्यांच्या कडून मोठी खंडणी तो वसुल करतो. त्याशिवाय तेथे असलेले भिल्ल, वनवाशी आणि कांही नरमांस भक्षक टोळ्यांचा पराभव तो करतो. त्याशिवाय तेथे असलेले कर्णप्रवर्ण, काळमुख अशा जातीच्या लोकांत फिरतो पण तेथे जिंकण्यासारखे कांहीं नसते. ते लोक माणूस व राक्षस ह्यांच्यातून उत्पन्न झालेले होते. तेथून तो सुरभिपट्टला जातो. त्यानंतर कोल पर्वतात जातो. तेथे ताम्र नांवाची बेटे होती. तेथे रमक नावांचा डोंगर होता. तेथे राज्य करणार्या तिमिंगील राजाचा तो पराभव करतो. तेथील वन्य जातीच्या लोकांना तो पहातो त्यांचे नांव केरकी (केरळी?) होते. त्या लोकांना फक्त एकच पाय होता. तेथून तो संजयंती नांवांचे शहर जिंकतो. पशंद आणि कर्हाटक (कर्हाड?) केवळ प्रतिनिधी पाठवून तो ताब्यात घेतो. त्यानंतर पौंड्रांकडून खंडणी वसुल करतो. त्यानंतर द्रविड, उद्रकेरल, आंध्र आणि तलवन, कलिंग, उष्ट्रकर्निका आणि मन प्रसंन्न करणारी नगरी अटवी तो जिंकतो. त्याशिवाय यवनांचे प्रदेश तो जिंकतो. शेवटी दक्षिण टोकाला पोहोचल्यावर सहदेव त्याचा दूत पलिकडील द्वीपात रहाणार्या बिभिषणाकडे पाठवतो. जो पुलस्त्य ऋषीचा नातू होता. तो त्यांचे मान्य करते व खंडणी पाठवून देतो. तो सांगतो हा यज्ञ होणे आहे म्हणून मी तुला मदत करत आहे. तो विविध प्रकारचे मणी, रत्नं, मोती, उंची वस्त्रं वगैरे मौल्यवान गोष्टी पाठवतो. त्या बरोबर चंदन, उत्तम जातीचे लाकूड जे काम करण्यासाठी उपयोगाचे असते. ते सगळे घेऊन तो चतुर पाडव माघारी निघतो. कांहीं जिंकून कांहीं सामोपचाराने कांहीं

करार करून असें सगळे करत तो गडगंज संपत्ती त्या यज्ञासाठी एकत्र करून इंद्रप्रस्थाकडे येतो. ती अफाट संपत्ती तो युधिष्ठीराला सुपूर्द करतो. त्यातच धन्यता मानत तो माद्रीचा मुलगा समाधानी होतो.

अशारितीने सभापर्वातील दिग्विजय पर्वाचा एकतिसावा भाग संपला.

# सभापर्व भाग बत्तिसावा

(दिग्विजय पर्व संपले)

वैशंपायन बोलतात, ह्यानंतर मी तुला नकुलाचे कर्तृत्व काय झाले ते सांगतो. एकेकाळी वासुदेवांने पादाक्रांत केलेल्या प्रदेशात तो जात असतो. प्रचंड लष्कर घेऊन तो खांडवप्रस्थातून प्रयाण करतो. त्याची दिशा असते पश्चिम. त्याचे सैन्य ज्या दिमाखात निघते त्यावरून त्या सैन्याचा जोम समजून येत होता. सैनिकांचे ओरडणे, घोड्यांचे खिंकाळणे, हत्तींच्या चित्कारांने सगळा आसमंत दणाणून गेला होता. महारथींच्या रथाच्या चाकांचा मोठा आवाज त्यात भर घालत होता. पश्चिमेकडील रोहितक पर्वतांच्या रांगांतून ते प्रथम जाणे पसंत करतात. तो पर्वत कार्तिकेयाला अतिप्रिय होता. तो मनाला प्रसंन्न करणारा होता. त्यातील प्रदेशात भरपूर पशुधन होते. सर्वप्रकारचे वैभव तेथे आढळत होते. त्याचा प्रथम मुकाबला झाला तो मत्तमौरकांशी, तो फार भयंकर होता. तरीसुद्धा त्यांना हरवल्यावर तो सगळा ओसाड प्रदेश त्यांने काबिज केला. त्यापुढे सैरीशक म्हणून ओळखला जाणारा आणखीन एक समृद्ध देश त्यांने कांबिज केला. त्यानंतर तसाच आणखीन एक ज्याचे नांव महेत्ता होते तोसुद्धा त्यांने जिंकला. त्यावेळी त्याला तेथील राजा अक्रोश बरोबर तुंबळ युद्ध करावे लागले. तो विजय सोपा नव्हता. तो भाग सोडल्यावर तो दसर्न, शिवी, त्रिगर्त, अमवश्थ, माळवा, त्यानंतर पांच कर्नटांच्या टोळ्या जिंकल्यानंतर द्विज समजलेले ज्यांच्या लढण्याची क्षमता अफाट होती असें ज्यांची नांवे मध्यमकय, वेत्तधानी त्यांना जिंकले. त्यानंतर गोल फेरी मारून तो म्लेच्छांच्या राज्यात आला. तेथील उत्सवशंकेत नांवाच्या म्लेच्छ टोळीला त्यांने हरवले. त्यानंतर त्यांने ग्रामानीय जिंकले जे समुद्र किनारी वसलेले होते. त्यानंतर सरस्वती नदीच्या तटावर वसलेल्या शुद्र आणि अभिर टोळ्यांना त्यांनी जिंकले. त्यानंतर अनेक टोळ्या ज्या मांसेमारी करून आपली उपजिवीका करत होत्या त्यांना त्यांने जिंकले. त्यानंतर तो सगळा प्रदेश ज्याला त्या पांच नद्यांच्या नांवांने ओळखत असतात तो सगळा प्रदेश त्यांनी जिंकला. अमर नांवाचा पहाडी प्रदेश, उत्तरायोतिश आणि दिव्यकुट्ट नांवाचे शहर व द्वारपाल नांवाचा शूरयोध्यांचा प्रदेश जो जिंकतो. केवळ सैन्याच्या बळावर तो हे सगळे करत असतो. त्यानंतर रामथ, हरहुण व इतर तेथील राजे तो हरवतो. त्यानंतर नकुल

त्यांचा दूत वासुदेवाकडे पाठवतो. वासुदेव त्याच्या सगळ्या यादवांच्या सह युधिष्ठीराचे प्रभुत्व मान्य करतो. तो विजयी फौज घेऊन मद्रदेशाच्या शकल नावाच्या नगरात येतो. तेथे तो त्याचा काका शल्य, ह्याला पांडवांचे प्रभुत्व मान्य करण्यास सांगतो व ते आनंदाने मानतात. त्यांचा चुलता त्याचे उत्तम स्वागत करतो व नकुल तेथे मजेत कांहीं काळ रहातो. खंडणी म्हणून तो काकाकडून एक मोठी रकम वसुल करतो. त्यानंतर पुढच्या स्वारीसाठी तो तेथून निघतो. सिंधू नदीच्या किनार्यावर वसलेले सगळे जसें, म्लेच्छ, पल्हव, किराट, यवन, शक अशा सगळ्यांना तो काबिज करतो आणि आपल्या साम्राज्यात सामिल करतो. त्यांच्याकडून मोठमोठ्या रकमा खंडणी म्हणून वसुल करतो. अशारितीने भरपूर धनदौलत जमा केल्यानंतर आपल्या इंद्रप्रस्थाकडे कुच करतो. अहो जनमेजया, नकुलाचा खजिना एवढा होता किं, तो नेण्यासाठी त्याला दहा हजार उंट लागले. ते ओझे इतके होते किं, ते उंट सावकाश चालत होते. इंद्रप्रस्थात आल्यावर तो सगळा खजिना तो युधिष्ठीराकडे अर्पण करतो.

जनमेजय वैशंपायनांना विचारतो, "अहो ऋषीवर, नकुल वरुणाच्या पश्चिमेकडील प्रदेशात गेला होता कां? जो प्रदेश वासुदेवांने स्वतः पूर्वी जिंकला होता".

अशारितीने सभापर्वातील दिग्विजय पर्वाचा बत्तिसावा भाग संपला.

# सभापर्व भाग तेहतिसावा

(राजसूयिक पर्व सुरु)

वैशंपायन बोलतात, त्या स्वार्यामुळें जे प्रदेश युधिष्ठीराच्या साम्राज्यात समाविष्ट झाले त्या सगळ्या प्रदेशाच्या संवर्धनाची जबाबदारी आता इंद्रप्रस्थावर येऊन पडली होती. न्याय आणि सत्य ह्याची चाड राखून तो त्या सगळ्या प्रदेशांचा कारभार पाहू लागला. युधिष्ठीराचे सगळे सहकारी त्या कामात व्यस्त झाले होते. लोकांना परवडेल असें कराचे धोरण राखून तो कारभार पहात होता. खोटी आश्वासने न देता सगळे प्रश्न त्याचे कारभारी न्यायांने सत्याच्या आधारे पहात असल्यामुळें त्याच्या राज्यात निसर्गदेव प्रसन्न झाला होता. त्यामुळें पाऊसपाणी योग्य प्रकारे होत होते. शेतात पिके उत्तम वाढत होती. कृषी, पशुधन, वनधन ह्यांची चांगली प्रगति होत होती. लोकांचे आरोग्यसुद्धा त्यामुळें सुधारत होते. अन्याय होत नसल्यामुळें व्यापार उदीम, कारखाने चांगले वाढत होते. लोकांची आर्थिक स्थिती सुधारत होती. त्याच्या साम्राज्यातील सगळे देश समृद्धीकडे जात होते. त्याच्या राज्यात कोणाला खोट्याचा आधार घ्यावासा वाटेनासे झाले होते. अगदी चोर, दरोडेखोरसुद्धा खोटे बोलत नव्हते. त्याच्या राज्यातून दुष्काळ नाहीसा झाला. नद्यांना पूर येत नव्हते, अवर्षण कधी झाले नाही. रोगराई, अकाली मृत्यू, आगी लागणे असें प्रकार जे अराजकाची लक्षणे समजली जातात ती नाहीशी झाली. कारण, अरे जनमेजया, जेव्हां राजा खर्या अर्थाने न्यायी, सत्यवादी (ब्रह्माशी प्रामाणिक) असतो तेव्हां अशी शुभ लक्षणे त्या राज्यात दिसतात. जणूकाय निसर्ग त्या राजाला मदत करू लागतो. युधिष्ठीराच्या आर्थिक धोरणामुळें त्याच्या राज्यातील सहाय्यक (मांडलिक) राजांना त्यांचे काम करणे सोपे होत होते. जर कोणी राजा अथवा त्याचा कोणी अन्याय आणि असत्य आचरत असेल तरच त्याला कठोर शिक्षा होत असें व जे उत्तम काम करीत त्यांना बक्षिस मिळत असें. युधिष्ठीराच्या मांडलिक राजांचा त्याने कधी अपमान केला नाही तर त्यांना व त्यांच्या दूतांचा नेहमीच यथोचित आदर राखला जात असें त्यामुळें, सुरुवातीला विरोधात असलेले कांहीं राजे साम्राज्याला समजून चांगले सहकार्य करू लागले होते. युधिष्ठीराच्या राज्याचा खजिना भरून वहात असें. तो एक शंभर वर्षं संपणार नाही अशी परिस्थिती होती. सर्वकाहीं योग्य प्रकारे होत आहे ह्याचा अंदाज घेतल्यानंतर तो पंडुचा मुलगा पुढील

गोष्टींबाबत योजना आखण्याचे ठरवतो. त्याचे मित्र व सहकारी एकत्रितपणे आणि वेगवेगळे त्याला भेटत व त्या यज्ञाबाबत चर्चा करत असत. यथावकाश सगळ्यांचे मत असें ठरते कीं, आता राजसूय यज्ञ करण्याची वेळ आली आहे. म्हणून त्वरेने त्याच्या व्यवस्थेसाठी कामास सुरुवात करावी असा सल्ला ते देऊ लागले. तशा वेळी सर्वज्ञ समजला जाणारा हरी, ज्याच्यातून हे विश्व उत्पन्न झाले असें समजतात, ज्याच्यात हे विश्व कल्पांती विरून जाते, ज्यांने केशी राक्षसाचा बिमोड केला, जो ह्या अवतारात वृश्नींचा म्होरक्या झाला आहे असा पांडवांचा प्रिय कृष्ण, जो सगळ्या यादवांचा नेता आहे, त्याच्या बरोबर मोठा खजिना घेऊन येतो कारण अशा यज्ञासाठी फारमोठी धनसंपत्ति आवश्यक होती. ते सगळे घेऊन तो मोठ्या इतमामांने खांडवप्रस्थात प्रवेश करतो. त्यांच्या येण्यामुळें त्यांच्या रथांचा गडगडाट सगळ्यांना थरकापून सोडतो. कृष्णाने आणलेल्या गडगंज संपत्तिमुळें पांडवांच्या वैर्यांच्या मनांत संताप आणि दुःख वाढते. कृष्णाच्या आगमनाने ती पांडवांची राजधानी आनंदमय होते. जसें सूर्याच्या येण्याने अंधार संपतो किंवा, जसें झुळूकीने स्तब्ध हवा चैतन्यमय होते. युधिष्ठीर त्याचे मोठ्या प्रेमाने स्वागत करतो व त्याचे कुशलमंगल विचारतो. त्याला बसण्यासाठी आसन देतो. त्यानंतर त्यांचे राजपुरोहित ऋषी धौम्य, द्वैपायन आणि इतर ऋद्विक त्या बैठकीला असतात. त्यांच्या बरोबर भिम, अर्जुन, नकुल व सहदेव हे पांडवसुद्धा उपस्थित असतात. युधिष्ठीर जनार्दनाला बोलतो, "अरे कृष्णा, मी पूर्णपणे जाणतो कीं, तुझ्या कृपेमुळें आज हे साम्राज्य माझ्यापाशी प्राप्त झालेले आहे. तुझ्याच कृपाप्रसादामुळें हि अगणित संपत्ति आमच्याकडे आहे. माझी इच्छा आहे किं, अरे माधवा, देवकीपुत्रा, हि सगळी संपत्ति मी तुझ्या हाते शास्त्रविधीनुसार ब्राह्मणांना व यज्ञाच्या पुरोहितांना यज्ञातील दान म्हणून करावे असें म्हणतो आहे. त्यासाठी अरें दशरथकुळांतील तू त्यासाठी मला आज्ञा करशिल अशी माझी अपेक्षा आहे. त्या सोहळ्यात तुझा सम्मतिने व तुझ्या सह ते करावे असें आम्हा सगळ्या पांडवांना वाटते. त्यासाठी तू स्वतः त्या यज्ञाला सुरुवात करवी. माझा विश्वास आहे किं जर तुझ्या पवित्र हातांने तो यज्ञ सुरु झाला तर माझी सगळी पापं जी ह्या सिमोल्लंघना दरम्यान जाणून अथावा अजाणता आमच्या कडून झाली असतील ती धुऊन टाकली जातील. असें झाले तरच आम्ही ह्या यज्ञाची निष्पत्ति उपभोगू शकू".

वैशंपायन पुढे सांगतात, युधिष्ठीराचे ते वक्तव्य ऐकल्यावर त्याला उद्देशून कृष्ण त्या पांडवाला, त्याचे कौतुक करत सांगतो, "अरे नरकेसरी, ह्या यज्ञात तुझा मान आहे व त्यासाठी तूंच तो करणार आहेस. असा यज्ञ करण्याचे स्वप्न तुझे आहे व त्यासाठी ते तुलाच पूर्ण करावे लागणार आहे. मी तुमच्या बरोबर नेहमी असतोच व त्यात मला जे काम तू सांगशिल ते मी प्रामाणिकपणे करून राहीन. उलट मींच तुझ्या आज्ञांचे पालन त्या दरम्यान करणार आहे, समजलास कां"?
ते ऐकून युधिष्ठीर कृष्णाला बोलतो, "अरे कृष्णा, तुझ्या येण्याने माझी इच्छा पूर्ण झाली आहे असेंच मी समजतो". एवढे औपचारिक श्रेयाचे दान प्रदान करण्याचे संपल्यावर कृष्णाच्या आदेशांने त्या राजसूय यज्ञाच्या तयारीला सुरुवात होते. युधिष्ठीर त्याचा सर्वात धाकटा भाऊ सहदेवाला आज्ञा करतो किं. त्याने त्वरितपणे जमा झालेल्या सगळ्या संपत्तिची मोजदाद करावी. त्यासाठी तो त्याला हव्या असलेल्या मंत्र्यांची मदत घेऊ शकतो. त्यानंतर तो त्याला सांगतो किं, यज्ञासाठी लागणार्या सगळ्या साधन सामुग्रीची यादी पुरोहित ब्राह्मणांकडून घेऊन त्याची व्यवस्था करावी. त्याशिवाय जे राजपुरोहित धौम्य मागतील ते सगळे त्यांना जसें मांगतील त्या क्रमांने मिळवून द्यावे. त्यानंतर तो दुसरी आज्ञा करतो सारथी इंद्रसेन आणि विशुक व पुरुसाठी, त्यांनी अर्जुनाबरोबर त्यांच्या रथातून ब्राह्मणांना जे कांही आवडते त्या सगळ्या वस्तु गोळा कराव्यात. त्याच वेळी ते सगळे करून त्याची माहिती तो सिद्धहस्त पांडव त्या राजाला सादर करतो. यज्ञाचे प्रमुख सामवेदी अर्ध्वर्यु म्हणून द्वैपायनांची नेमणूक केली जाते. हे असे झाले जसे जणू साक्षात वेदांचीच नेमणूक झाली आहे. त्या योजनेमुळें सत्यवतीचा पुत्र त्या यज्ञाची देवता झाला. धनंजय कुळातील सुसमन ह्याची योजना साम मंत्र उच्चारण्यासाठी केली गेली. याज्ञवल्क्य जे ब्रह्मज्ञानी होते तेसुद्धा दुसरे यजुर्वेदी अर्ध्वर्यु नेमले गेले. वसुचा मुलगा पैल आणि धौम्य अग्निहोत्री झाले. त्या प्रमुख पुरोहितांचे शिष्य इतर होत्रज झाले. त्या सर्वांचे वेदाचे ज्ञान निर्विवाद होते. त्या सगळ्या नेमणूका शास्त्रात दिलेल्या पद्धतीने योजल्या जातात. मुख्य पुरोहितांच्या मार्गदर्शनाखाली यज्ञाची व्यवस्था उभी केली जाते. ती एकाद्या भव्य मंदिरासारखी दिसते. एवढी व्यवस्था पूर्ण झाल्यावर यज्ञाच्या प्रमुख सहदेवाला युधिष्ठीर सांगतो कीं, आता त्याने राज्यातील सर्व ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य जमीनदार आणि

मुख्य (वडील) शुद्रांस आमंत्रणं पाठवावीत. त्यांनी यज्ञास हजर व्हावे असें त्यांना त्यात विनंति केलेली होती. त्याशिवाय ते झाल्यावर पुष्कळ माणसे राजाला ज्ञात असलेली व नसलेली तेथे उपस्थित होतात. सुयोग्य मुहूर्तावर युधिष्ठीराची मुख्य यजमानपदी व्यवस्था होते. तो विधी संपन्न झाल्यानंतर तो न्यायी राजा युधिष्ठीर, यज्ञाच्या प्रांगणात त्याच्या सह ब्राह्मण, त्याचे चार बंधू व इतर नातेवाईक आणि मंत्री सहचारी ह्यांसह प्रवेश करतो. त्याबरोबर इतर आमंत्रित मंडळीसुद्धा असतात. त्यात विविध देशांतून आमंत्रित केलेले राजेरजवाडेसुद्धा असतात. राजसूय यज्ञाच्या वार्तेने दूर दूरच्या भागांतून अनेक ज्ञानी, पंडीत, विद्वान मंडळीसुद्धा तेथे उपस्थित होतात. हुशार कारागिरांकडून ब्राह्मण आणि इतर आमंत्रितांसाठी चांगली रहाण्याची व्यवस्था असलेल्या खोल्या बांधून काढल्या जातात. त्यांत त्या सगळ्या आमंत्रितांची रहाण्याची उत्तम व्यवस्था होते. त्यात पिण्याचे पाणी, खाद्यपदार्थ, इतर कामासाठी पाणी, आंघोळीची व्यवस्था आणि निजण्याची व्यवस्था तसेंच शौंच व्यवस्था उत्तम केलेली असते. निरनिराळ्या आमंत्रितांच्या योग्यतेनुसार सगळे योजलेले असते. अशारितीने  सर्व तयारी केल्यानंतर त्या खोल्यांतून ते ब्राह्मण व इतर मंडळी आपापल्या खोल्यात विसावतात. तेथे ते एकमेकांची ओळख करून घेत विविध विषयांवर चर्चा करू लागतात. आमंत्रितांच्या मनोरंजनासाठी बहुविध उपक्रम आयोजलेले होते त्यामुळें त्यांचा समय चांगला मजेत जात होता. त्या ब्रह्मणांच्या खातपित गप्पागोष्टींचा मोठा आवाज सगळीकडे येत होता. सर्वत्र, "अहो खा हो, अहो प्या हो", असें सगळीकडे ते एकमेकांना आग्रह करत असल्याचे दिसत होते. त्याशिवाय त्या ब्राह्मणांना जे गाई गुरांचे व धन दौलतीचे दान होत होते त्यामुळें तो ब्रह्मवृंद खूप संतुष्ट झालेला दिसत होता. त्या ब्रह्मणांना दिलेल्या दास्यांच्या सहवासात ते त्यांचा समय मजेत काढत होते. अशारितीने त्या अतुलनीय राजाचा यज्ञ सुरु झाला. जसा तो यज्ञ स्वर्गात इंद्राने केला तसा तो पृथ्वीवर होत होता. सर्व व्यवस्था उत्तम झाली आहे ते पाहून मग तो न्यायी राजा युधिष्ठीर आपल्या भावाला, नकुलला बोलावतो व सांगतो कीं, त्यांने हस्तिनापुरात जाऊन त्यांचे वडिल आप्त, भिष्म, द्रोण, धृतराष्ट्र, विदूर आणि कृपाचार्य तसेंच सगळे चुलत भावंड जी पांडवांशी चांगले संबंध राखून होती ह्यांना आणण्याचे काम करावे. अशारितीने सभापर्वातील राजसूयिक पर्वाचा तेहतिसावा भाग संपला.

# सभापर्व भाग चौतिसावा

(राजसूयिक पर्व पुढे चालू)

वैशंपायन सांगतात. सदा अजिंक्य रहाणारा नकुल, पंडुपुत्र हस्तिनापुर गेल्यावर प्रथम भिष्माचार्य ह्यांना राजसूय यज्ञाचे आमंत्रण देतो. त्यानंतर धृतराष्ट्र आणि विदूर ह्यांना आमंत्रण देतो. ते तिघे कुरुकुळाचे ज्येष्ठ असल्यामुळें त्यांना आमंत्रण देणे आवश्यक होते. ते तिघे त्या आमंत्रणाचे मनापासून स्वागत करतात. त्यासाठी पवित्र नियमाप्रमाणे त्यांच्या पुढे ब्राह्मण चालत होते. युधिष्ठीर राजसूय यज्ञ करत आहेत हे समजल्यावर हस्तिनापुरातील मोठे क्षत्रिय मोठ्या आनंदाने त्या यज्ञात साक्ष रहाण्यासाठी जाण्याचे ठरवतात. युधिष्ठीर त्यांचा आवडता राजा असल्यामुळें ते सगळे क्षत्रिय त्या यज्ञात सामील होऊन तेथे त्या यज्ञासाठी उभ्या केलेल्या यज्ञसभेला भेट देण्यासाठी निघतात. त्याप्रमाणें, न्याय देवतेचा अवतार असलेले विदूरसुद्धा आमंत्रणानुसार इंद्रप्रस्थाकडे निघतात. त्याच प्रमाणे नकुल त्याच्या चुलत भावांनासुद्धा निमंत्रण देतो. त्यात दुर्योधन आणि गंधारचा राजा सुवल होते. त्याशिवाय अचल, वृशक, महारथी कर्ण ह्यांना आमंत्रण होते. कुंतीने विशेषकरून कर्णाला आमंत्रण देण्याच्या सुचना दिल्या होत्या . त्याशिवाय सत्य आणि वल्हीक, सोमदत्त, कुरुकुळातील भुरी, भुरीश्रव, शल, अश्वत्थामा, कृपाचार्य, द्रोण आणि जयद्रथ सिंधचा राजा ह्यांना आमंत्रण होते. यज्ञसेन त्याच्या पुत्रासह, राजा शल्य व भागादत्त प्रागज्योतिषचा राजा, त्याच्या वाळवंटात रहाणार्या म्लेच्छ टोळ्यासह आमंत्रित होते. बरेच डोंगराळ प्रदेशातील राजे त्यात होते. तसेंच राजा बृहद्बल, वासुदेव पौंड्रचा राजा, वंग आणि कलिंगचे राजे, अक्षथ, कुंतल , माळव्याचा राजा अंध्रक, द्रविड आणि सिंहल राजे त्याशिवाय काश्मिरचा राजा, महारथी कुंतिभोज , राजा गौरवहन असे सगळे वल्हीकच्या राजांना आमंत्रण त्याने दिले. त्याशिवाय विराट त्याच्या दोन मुलांसह, शुरवीर मावळा, इतर राजे त्यांने आमंत्रित केले. बलाढ्य राजा जो कधीही पराजित झाला नाही असा शिशुपाल त्याच्या मुलासह त्या यज्ञास येणार होता. राम, अनिरुद्ध, कनक, शरण, गद, प्रिद्युम्न, शम्व, चारुसेन, उल्मुक, निषथा, अंगवथ, आणि अनेक वृश्नी टोळीचे योद्धे येणार होते. ते सगळे महारथी होते. मध्य देशातील असें बरेच राजे त्या राजसूय यज्ञासाठी आमंत्रित होते व त्या सगळ्यांनी ते आमंत्रण स्वीकारले होते. त्या सगळ्या

आमंत्रितांची सुयोग्य व्यवस्था युधिष्ठीराच्या सेवकांनी केली होती. त्यांच्या खाण्यापिण्याची चोख व्यवस्था केलेली होती. त्यांच्या नित्यकर्माची सुद्धा व्यवस्था होती. राजा यजमान त्या सगळ्या आमंत्रितांचे कुशल स्वतः जातीने लक्ष देऊन पहात होता. पाहुण्यांसाठी जे विश्राम स्थान बनवले होते ते उंच कैलासा सारखे दिसत होते. त्याच्या भिंती शुभ्र रंगांच्या होत्या. त्यात असलेल्या खिंडक्यांना बारीक जाळीदार पडदे होते. त्यावर जरीची नक्षी केलेली होती. त्यांच्या कडांना मोती जडवले होते. त्या इमारतीचे जिने अशा उताराचे होते किं, त्यावरून चढतांना व उतरतांना त्रास होत नव्हता. त्या इमारतीतील मजल्याचे पृष्ठभाग गालीच्याने सजवले होते. त्या गालीच्यांवर फुलाच्या पाकळ्यांचा सडा होता व त्यांवर सुगंधी द्रव्य वेळोवेळी शिंपडले जात होते. हिमासारखे ते शुभ्र रंगवलेले महाल लांबून अतिशय देखणे वाटत होते. त्यातील दरवाजे आणि प्रवेशद्वारं सुंदर प्रकारे बसवलेले होते. त्यांचे आकार असे होते किं, कितीही रुंद आकाराचा इसम असला तरी त्याला येण्या जाण्यात त्रास होत नसे. निरनिराळ्या प्रकारच्या धातूंपासून ते घडवलेले होते. त्या इमारतीतील सज्यांतून ते आमंत्रित राजे युधिष्ठीराला पाहू शकत होते. ज्याच्या सभोवार सदैव सदस्य पुरोहितांचा गराडा होता. तो सतत ब्राह्मणांना विविध दानं करतांना दिसत होता. त्या प्रशस्थ इमारतीत राजे, विद्वान ब्राह्मण आणि ऋषी उतरलेले होते असें दिसत होते. जणूकाय तेथे देवांची गर्दी झाली आहे असें वाटत होते.

अशारितीने सभापर्वातील राजसूयिका पर्वाचा चौतिसावा भाग संपला.

# सभापर्व भाग पस्तिसावा

(राजसूयिक पर्व संपले)

वैशंपायन पुढे सांगतात, युधिष्ठीर आपल्या ज्येष्ठांचे पुजन करून त्या सर्वांना विनंति करतो कीं, हा अफाट धन साठा माझ्याकडे आहे त्याचा योग्यप्रकारे विनियोग करण्याच्या कामात हा यज्ञ सफल करण्यात मला तुमची मदत पाहिजे. त्या ज्येष्ठांत भिष्म, द्रोण, कृपाचार्य होते. त्या व्यतिरीक्त त्याचे सगे, दुर्योधन, विविंगसती होते. आपण एकमेकांत सल्लामसलत करून पाहिजे ते निर्णय घ्यावेत अशी तो पंडुपुत्र, त्यांना विनंती करतो. त्यावर भिष्म युधिष्ठीराला सांगतात कीं, तुझ्या चुलत भावंडांनासुद्धा त्यात मदतीस घे. भिष्माचार्यांच्या त्या आदेशाचे पालन करण्याच्या उद्देशाने युधिष्ठीर कांही नेमणूका करतो त्या अशा, दुःशासनाला खाद्य आणि इतर मजेच्या गोष्टींच्या वितरणाच्या कामात नेमतो. अश्वत्थामा ब्राह्मणांच्या व्यवस्थेसाठी ठेवला जातो. संजयाची नेमणूक आमंत्रित राजांच्या स्वागताच्या कामात केली जाते. भिष्म स्वतः आणि द्रोण सर्वांवर नजर ठेवण्यासाठी व कांहीं राहून गेले नाही ह्याची खबरदारी करण्यासाठी नेमले जातात. कृपाचार्यांची नेमणूक खजिन्यातील जडजवाहरांची व्यवस्था करण्यासाठी होते. कृपांची आणखीन एक जबाबदारी ब्राह्मणाच्या दानधर्माच्या देखभालीची असते. अशाप्रकारे त्या कुरुकुळातील मर्दांच्या विविध कामासाठी नेमणूका होतात. नकुलांनी आणलेले वल्हीक, धृतराष्ट्र आणि सोमदत्त व जयद्रथ हे यज्ञाचे प्रमुख म्हणून नेमले जातात. विदूर ज्याला क्षत्त सुद्धा म्हणतात त्याचे काम इतर वितरणाचे ठरते. दुर्योधनाची नेमणूक इतर पाहुण्या राजांनी आणलेल्या भेट वस्तुंची व्यवस्था करण्यासाठी होते. कृष्णाची नेमणूक ब्राह्मणांचे पाय धुण्यासाठी केली जाते. तेथे युधिष्ठीराला व त्या यज्ञाच्या वैभवशाली दिमाखाला पहाणारे राजे मोठमोठाल्या देणग्या घेऊन येत होते. एकमेकांशी मोठ्यातली मोठी देणगी देण्याची जणू चुरस लागली होती. त्यातील रत्नं, सेन्याचे दागिने, माणकं, मोती सगळे कांहीं अतुलनीय होते. त्या सतत वाढत जाणार्या खजिन्यामुळें तो यज्ञ करणे पांडवांना सुलभ होणार होते. त्यामध्ये युधिष्ठीर, कुंतीचा ज्येष्ठ पुत्र , राजसूय यज्ञाचा प्रमुख यजमान मोठा देखणा दिसत होता. त्यांने सभोवार बांधलेले ते महाल ज्यांत ते आमंत्रित पाहुणे रहात होते ते पाहिल्यावर

पांडवांच्या वैभवाची कल्पना येत होती. त्या वाड्यांच्या देखभाली व संरक्षणासाठी सर्वत्र पहारेकरी नेमलेले होते.

त्या वाड्याची उंची इतकी होती कीं, त्यांचे वरचे छपराचे भाग आकाशातून तो यज्ञ पहाण्यासाठी आलेल्या देवांच्या रथांच्या चाकांना स्पर्श करत होते. किंवा असें म्हणता येईल किं, ते रथ त्यांच्या छपरावर उतरले होते. तेथे रहाणारे ब्राह्मण, ऋषी, राजे ह्यांच्या तेजामुळें तो महाल तेजस्वी होत होते व त्यात त्या महालांच्या घडवणूकीत वापरलेले रत्न, माणकं, पांचू, मोती वगैरेमुळें तो सगळा परिसर स्वर्गीय वाटत होता. युधिष्ठीर संपन्नतेत साक्षात वरुणदेवांची तुलना करत होता असें पहाणार्या सगळ्यांना वाटत होते. अशा दिमाखदार तयारीने आता तो ख्यातनाम राजसूय यज्ञाचा प्रारंभ झाला. त्यात सहा अग्नी होते आणि ब्राह्मणांसाठी भरपूर दान संपत्ती होती. यजमान राजा युधिष्ठीरांने सगळ्या आमंत्रितांचे समाधान केले होते तसेंच ब्राह्मणांचेसुद्धा दानं करून मनं जिंकली होती. त्यामुळें तो यज्ञ खात्रीने यशस्वी होणार असें दिसत होते. खाण्यापिण्यात कांहीं कमी नव्हते. भरपूर भात व इतर मांसांचे खाद्य पदार्थ उदंड वाढले जात होते त्या आमंत्रितांना त्यामुळें खाऊन खाऊन ते सगळे ब्राह्मण संतुष्ट होते. यज्ञात केल्या जाणार्या आहुति दैवतांना संतुष्ट करत होत्या. एकेका दैवतांचे नांव घेऊन ऋषी आणि ऋद्विक मंत्रोच्चाराने एकेका दैवतेला बोलावून त्यांच्या नांवांने शुद्ध तुप, ईष्टीका ह्यांच्या आहुत्यांमुळें ते यज्ञकुंड प्रज्वलित रहात होते त्यामुळें अग्नीदेवासह इतर दैवते प्रसन्न होत होती. दुसरीकडे, इंद्रप्रस्थातील प्रजा राजाच्या दानधर्मामुळें पूर्णतया संतुष्ट झालेली होती. चारही वर्णाचे लोक राजाला दुवा देत होते. सगळे आंनंदात होते. कारण कोणीही असंतुष्ट नव्हता.

अशारितीने सभापर्वातील राजसूयिक पर्वाचा पस्तिसावा भाग संपला.

# सभापर्व भाग छत्तीस

(अर्घ्य हरण पर्व सुरु)

वैशंपायन पुढे सांगतात, यज्ञाच्या अखेरच्या दिवशी जेव्हा यजमानाच्या अंगावर पवित्र जलाचे शिंपन होणार असते, ज्यावेळी विशेष करून ऋषींचे खास स्वागत व्हावयाचे असते, आमंत्रित राजांचा गौरव व्हावयाचा असतो, ते सगळे महानुभाव त्या यज्ञाच्या प्रांगणात शिरत होते. त्या प्रसंगी तेथे बसलेल्या महाऋषींमध्ये अग्रक्रमात असलेले मुनी नारद, जे ब्रह्माच्या सभेत बसले आहेत असें इतरांसह प्रत्यक्ष देवांसारखे भासत होते. ते सगळे आरामात बसले असतांना त्यांच्यात इकडच्या तिकडच्या अशा गप्पा रंगत होत्या. त्यात ते एकमेकांच्या मतांची उलट तपासणीसुद्धा करत होते. विवाद्य मुद्दे चर्चेत येत होते. कोणाचा मुद्दा खरा शाबित होत होता तर कोणाचा चुकीचा म्हणून स्पष्ट होत होता. ते ज्ञानी लोक एकमेकांच्या मुद्द्यावर त्याच्या खर्याखोट्याचे परिक्षण करण्यासाठी तुटून पडत होते. वाद विवाद रंगात आले होते कारण तेथे दुसरे कांहीं करण्यासारखे नव्हते. एका बाजूस यज्ञाचे विधी संपन्न होत होते तर येथे हे अभ्यासपूर्ण चर्चासत्र रंगत होते. त्याचवेळी दुसरे कोणी फक्त एकमेकांच्या कुशलक्षेमाची चौकशी करत होते. वातावरण मोठे प्रसन्न होते. ते प्रांगण देव, ऋषी आणि ब्राह्मणांने भरलेले आकाशातील सभेसारखे चमकत होते. त्या ठिकाणी कोणीही नालायक इसम म्हणजे असा, ज्याने तत्त्वनिष्ठा, व्रतस्थता शपथेवर आचरलेली नाही असा उपस्थित नव्हता. ते सगळे पाहून नारद मुनी फारच संतुष्ट झाले होते. तो सज्जन कुलिन क्षत्रियांचा समुदाय पाहून तो मुनिश्वर विचारात गेला. त्याना तेव्हां एका ब्रह्माच्या सभेत त्यांने ऐकलेले बोल आठवतात. त्या बोलांत ब्रह्माने प्रत्येक देवतेचा पृथ्वीवर होणार्या अंशावताराचा उल्लेख केला होता. वैशंपायन पुढे सांगत असतात, अरे भरत कुळाच्या श्रेष्ठ राजा, जनमेजया, नारद हरीच्या अंशावताराचा विचार करत असतात. त्यांना आठवते जेव्हां ब्रह्माने नारायणाला बोलावून सांगितले किं, अरे नारायणा, पृथ्वीवर असुरांनी थैमान घातले आहे त्यासाठी कांही केले पाहिजे तेव्हां तो नारायण इंद्राला सांगतो किं, अरे शक्रा, सांग तुझ्या सगळ्या देवांना कीं, त्यानी आता पृथ्वीवर जाण्याच्या तयारीला लागावे. तेथे जाऊन त्या बिभत्स अहंकाराला काबूत आणा. त्यासाठी तेथे जाऊन तो अहंकार ज्यांने असुरांचे रुप घेतले आहे ते मारून टाकतील. ते झाले कीं, ते

परत स्वर्गात जाऊ शकतात. असुरांनी सर्वात प्रथम पृथ्वीवर येऊन तेथील प्रमुख वर्णाचा म्हणजे ब्राह्मण वर्णाचा कब्जा घेऊन देवांना पहिल्या फेरीत चित केले होते तेवढ्याने समाधानी नव्हते म्हणून, आता ते कृष्ण (तमो) अहंकाराचे रुप असलेले असुर क्षत्रिय कुळांत अवतरत होते. त्यांचे पारिपत्य करण्यासाठी देवसुद्धा पृथ्वीवर येत होते. त्यातच स्वतः हरी ज्याला शंभु असे सुद्धा म्हणतात, कृष्णाच्या रुपात यादव कुळात आलेला नारद पहात होते. त्या अंधक–वृश्नी वंशात जन्मतांना मुद्दामहून त्याचे सगळे पूण्यप्रभाव म्हणून तो मोठे नशिब घेऊन आला होता. असुरांशी लढण्यासाठी मोठ्या नशिबाची आवश्यकता होती ते तो जाणून होता. कुरुकुळातसुद्धा अनेक देव अंशावताराने जन्म घेऊन आले आहेत हे नारद अजमावतात. नारद ओळखतात किं, हल्ली तो नारायण माणसाच्या अवतारात वावरत आहे. ह्या सगळ्या असुर (भ्रष्ट) क्षत्रियांचा नाश तो स्वयंभू यथावकाश करणार आहे हेसुद्धा सर्व ज्ञानी नारद समजत असतात. ते हेसुद्धा ओळखून असतात किं, तो यज्ञ त्या हरासाठीच होत आहे जो तेथे पांडवांना हरप्रकारे मदत करत फिरत आहे. ह्या त्याच्या लिलेचे नारद मनातल्या मनात कौतुक करतात. नारद अशारितीने स्वतःच्या विचारात रमलेले असतांना, भिष्म युधिष्ठीराला आज्ञा करतात किं, आमंत्रित राजांचे त्यांच्या योग्यतेनुसार अर्घ्य (सन्माननीय वस्तु) देण्यास सुरुवात करावी. ते पुढे सांगतात, हे युधिष्ठीरा तुला माहित असले पाहिजे कीं, मुख्य पुरोहित, यज्ञाचे ऋग्विक, त्यांचे स्नातक, मित्र आणि राजे असे अशा अर्घ्यास लायक समजले जातात. जाणकार असें सांगतात किं, त्या कामात तो पूर्ण एक वर्षभर असला पाहिजे तरच तो अशा मानास पात्र ठरतो. हे राजे आपल्या बरोबर कांहीं काळ रहात आहेत म्हणून त्यांचा हक्क सिद्ध होतो. मुख्य पुरोहित त्यानंतर बोलतात, ह्यातील जे ज्येष्ठ आहेत त्यांचा मान सर्वात प्रथम झाला पाहिजे. ते ऐकल्यावर युधिष्ठीर बोलतो अहो आजोबा आपला मान पहिला आहे. वैशंपायन त्यानंतर पुढे बोलतात, हे ऐकल्यावर भिष्म विचार करतो कीं, कृष्ण त्याच्या योग्यतेत सर्वश्रेष्ठ असल्याने त्यालाच पहिला मान मिळाला पाहिजे. त्या प्रमाणे ते, भिष्म सांगतात. जसे सूर्य सगळ्या प्रकाशमान गोष्टींत प्रथम असतो त्याप्रमाणे कृष्ण आपल्यात प्रथम असला पाहिजे. त्याची योग्यता, बुद्धीमत्ता, धाडस, शौर्य, चतुराई ह्या सगळ्यात हा जनार्दन प्रथम आहे. त्यानंतर नियमानुसार सहदेव कृष्णाला पहिले अर्घ्य

प्रदान करतो. विधीनियमानुसार कृष्ण तो मान स्वीकारतो. मात्र एक आमंत्रित, शिशुपाल छेडीचा राजा, त्यामुळें नाराज होतो. तो त्याचा निषेध उघडपणे त्या भर सभेत भिष्म आणि युधिष्ठीरापुढे जाहीर करतो किं कृष्णाची ती लायकी नाही. अशारितीने त्या राजसूय यज्ञाला पहिले काळे बोट लागते. ब्रह्मराक्षस त्यांच्या कामात यशस्वी ठरतात.

अशारितीने सभापर्वातील अर्घ्य हरण पर्वाचा छत्तिसावा भाग संपला.

# सभापर्व भाग सदोतीस

(अर्घ्य हरण पर्व पुढे चालू)

शिशुपाल जोरांने ओरडून बोलतो, अहो यज्ञाचे यजमान कुरुवंशाचे नरेश, मी आक्षेप घेतो कारण, ह्या वृश्नी कुळातील कृष्ण ह्या प्रथम मानासाठी अयोग्य ठरतो, जेव्हां येथे जास्त मोठ्या योग्यतेचे नरेश उपस्थित आहेत. अशा प्रकारे ह्याची पुजा करणे हा तुमचा निर्णय अप्रस्तुत आहे. तुम्हा पाडवांना असा निर्णय घेणे शोभत नाही. पुढे शिशुपाल बोलतो, "अरे पंडुच्या मुलांनो, तुम्ही अजून लहान मुलांसारखे निर्णय घेत अहात. तुमचा मार्गदर्शक हा भिष्मसुद्धा त्या गंगेचा मुलगा, त्याची मर्यादा ओलांडून तुम्हाला चुकीचे सल्ले देत आहे". त्यानंतर तो शिशुपाल भिष्माकडे पहात बोलतो, "अरे गंगापुत्रा, तुझ्यासारखा व्रतस्थ केवळ स्वतःच्या मतलबासाठी जर असें चुकीचे मार्गदर्शन करणार असेल तर सगळे संपलेच असें समजावे लागेल. तू सर्व शहाण्यात श्रेष्ठ समजला जातोस आणि तू असें कसे चुकीचे श्रेयदान करावयास सांगत आहेस"? "आता पहा, हा दशरथ कुळी, जो अजून साधा राजासुद्धा नाही त्याला हा श्रेष्ठतेचा मान ह्या सगळ्या खर्या मानधारी राजांच्या सभेत स्वीकारतोच कसा? अशा प्रयोजनात हा पुजलाच कसा जातो? हे सगळे काय तू पंडुपुत्रा, युधिष्ठीरा आरंभले आहेस? आमचा खर्या श्रेष्ठींचा बोलावून अपमान करण्याचा तुम्हा पांडवांचा उद्देश आहे काय"? "जर तू त्याला वयाने ज्येष्ठ म्हणून पुजशील तर त्याचे पिता स्वतः वसुदेव येथे उपस्थित असतांना तू असें कसें करत आहेस"? "जर तू त्याला तुझा हितचिंतक म्हणून हा मान देत असशिल तर येथे द्रौपद आहेत त्यांचे तुझ्याबाबतचे हितचिंतन सर्वश्रुत आहे. त्यांचा त्यामुळें उपमर्द तू कां करत आहेस? "त्याशिवाय, जर तू ह्या वृश्न्याला तुझा ऋग्विज मानत असशील तर येथे द्वैपायन उपस्थित आहेत ते तू कसे विसरतोस? तुमचे आजोबा जे इच्छा मरणी आहेत म्हणून सगळे त्यांचे पुजन करतात ते उपस्थित असतांना तू कृष्णाला हा मान कोणत्या निकसांने दिला आहेस"? शौर्यात सर्वश्रेष्ठ ब्राह्मण अश्वत्थामा असतांना त्या निकसांने सुद्धा तुझा निर्णय अयोग्यच असल्याचे स्पष्ट होते हे कसे तुला समजत नाही"? सर्व नृपांत श्रेष्ठ दुर्योधन स्वतः येथे उपस्थित असतांना हा मान तू त्या गवळ्याला कसा देऊ शकतोस"? तुझे गुरू कृपाचार्य, द्रोणाचार्य असें एकाहून एक अतुलनीय श्रेष्ठी येथे असतांना कृष्णाला हा मान देऊन तू काय सिद्ध

करू इच्छित आहेस"? "त्या व्यतिरीक्त इतर श्रेष्ठी येथे बसलेले असतांना, जसे, भिष्मक, राजा पांड्य, राजा रुक्मी, एकलव्य, मद्रदेशाचा राजा शल्य, असें चुकीचे मानदान तू कृष्णाला कसे करू शकतोस? त्याशिवाय तेथे कर्ण आहे ज्याच्या दानशूरतेचे पोवाडे सगळे गात आहेत त्याचा तुला विसर कसा पडला"? "हा मधू राक्षसाचा वध करणारा तुझ्या यज्ञात मुख्य पुरोहित नाही कां अधिकारी नाही मग ह्याचे नेमके स्थान कोणते ह्या यज्ञात किं म्हणून तू त्याला निवडलेस"? "म्हणजे, कोणत्याही सामान्य निकसानुसार तुझा निर्णय चुकीचाच ठरत आहे हे तुझ्या केव्हां लक्षात येणार"? "मला सांग, असा कोणता स्वार्थ तू असे गैर वागून प्राप्त करून घेणार आहेस"? "तुला जर असें करावयाचे होते तर मग आम्हा सगळ्या राजांना तू येथे काय केवळ अपमानित करण्यासाठी आमंत्रित केले आहेस काय? आम्हा आमंत्रितांनी तुला ह्या यज्ञासाठी हरल्यामुळें अथवा समझौत्यामुळें अथवा कांहीं स्वार्थामुळें खंडणी दिलेली नाही तर केवळ तू सम्राट होण्यास योग्य आहेस असें समजून ती दिली म्हणून तू अशाप्रकारे आमचा उपमर्द करत आहेस कां? जर आमचा अपमान करण्याचा नसेल तर असा कोणता उद्देश असु शकतो अशा उर्मट वागण्याचा ते स्पष्ट करशिल कां"? "ज्याच्याकडे राजपद नाही, त्याला सगळ्या खर्या राजपदधारी राजांच्या समक्ष हा सन्मान देण्याचा अर्थ काय"? "तुला आम्ही उत्तम गुणी म्हणून धर्म असें अभिनाम दिले ते चुकीने केले असे आता मला वाटायला लागले आहे. कारण तू त्या अभिनामाच्या योग्यतेचा नाहीस हे तू आता असे वागून सिद्ध केले आहेस. त्या नराधमानें ख्यातनाम जरासंधाला कपटाने मारले त्याला हा मान देऊन अरे युधिष्ठीरा, तू हा यज्ञ करण्याच्या योग्यतेचाच नाहीस असे सिद्ध केले आहेस. हे माझे आरोप चुकीचे असतील तर ते योग्य कारणे देऊन त्या कृष्णांने दाखवून द्यावे आणि तो ह्या सन्मानास योग्य आहे हे सिद्ध करावे नाहीतर आम्ही सगळे राजे असें समजू कीं, केवळ तुझ्या दबावाखाली पांडव असें करत आहेत. आम्ही समजून आहोत कीं, तुझा ह्या कुंत्तीपुत्रांवर मोठा दबाव आहे . तसे जर तू सिद्ध करण्याचे टाळलेस तर आम्ही समजू कीं, एका फालतु कुत्र्याने यज्ञातील लोणी खाल्ले. अरे जनार्दना, मी सांगेन किं, असा अग्रक्रम देऊन पांडवांनी तुझा सन्मान केला नसून तुझी चेष्टाच केली आहे, कारण वांझोटीला सुवाष्ण देणे अथवा आंधळ्याला चांगला कार्यक्रम दाखवणे हे जसे व्यर्थ असते तसे तुला

हा किताब देणे आहे. कारण, अरे गवळ्या, तुझ्याकडे राजपद नसल्यामुळें तो किताब व्यर्थ गेल्यात जमा आहे. अरे कृष्णा आम्हाला सांग हा किताब घेऊन तू काय करणार आहेस"? आम्ही सगळ्याने भिष्माची योग्यता, युधिष्ठीराची योग्यता, वसुदेवांची योग्यता पाहिली आहे तरी ह्या कृष्णाची योग्यता त्यांने सिद्ध करावी असें मी सगळ्या राजांच्या वतीने आव्हान देत आहे. असे सगळे बोलल्यावर इतर नाराज नरेशांच्या बरोबर तो उठला आणि त्या सभागृहाचा त्याग केला.

अशारीतीने सभापर्वातील अर्घ्य हरण पर्वाचा सदोतीसवा भाग संपला.

# सभापर्व भाग अडोतीस

(अर्घ्य हरण पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगत असतात, त्या नरेशांना अशारितीने नाराज होऊन जातांना पाहून युधिष्ठीर तडकाफडकी आपल्या आसनांवरून उठून शिशुपालाला अडवत विनवणीच्या सुरात बोलतो. "अहो नरेश श्रेष्ठी, आपण जे आता बोललात ते तुमच्या सारख्यांना शोभले नाही. असें बोलणे अशा आमसभेत हे क्रूरपणाचे आहे. अहो, अशा वागण्याने आपण भिष्माचार्यांचा उपमर्द करत अहात कारण तो सन्मान कृष्णाला देण्याचा प्रस्ताव स्वतः भिष्माचार्यांने केला होता हे आपण जाणता आहात. तुमच्या पेक्षा ज्येष्ठ राजे येथे आहेत व त्यांच्या पैकी कोणीही त्याला विरोध केला नाही हे लक्षात घ्यावे. आपण त्या ज्येष्ठ राजांप्रमाणे धीराने वागावयास पाहिजे होते. अहो छेडीचे राजे, भिष्माचार्य कृष्णाला चांगले ओळखतात. आपण कृष्णाला ओळखत नाही म्हणून हे अविचारी उद्गार आपण काढले आहेत". अशा प्रकारे युधिष्ठीर शिशुपालाला समजावत असतांना भिष्म उठून मोठ्याने कठोर आवाजात आज्ञा करतात किं, "जर कोणा राजाला हा आमचा निर्णय मान्य नसेल तर ते ह्या सोहळ्यातून जाऊ शकतात. त्यांच्या हजेरीची येथे कांहीं आवश्यकता नाही"! हे झाल्यामुळें युधिष्ठीर शिशुपालाला समजावण्याचे थांबवून परत आपल्या आसनाकडे येतो. त्यानंतर भिष्म सगळ्या सभेला उद्देशून सांगतात जे एका प्रकारे शिशुपालाच्या सगळ्या आक्षेपांना उत्तर स्वरुप होते. तो सांगतो, "अहो राजांनो व इतर सन्माननीय अभ्यागतानो, ऐका कृष्णाची निवड ह्यासाठी आम्ही कां केली त्याची कारणं, आपल्या क्षत्रियांच्या परंपरेनुसार जो युद्धात प्रतिस्पर्धी योद्ध्यास नमवतो आणि ताब्यात घेतो तो श्रेष्ठ ठरतो. मी येथे जमलेल्या राजांत एकही राजा पाहिलेला नाही जो ह्या सतवत कुळाच्या जनार्दनाच्या योग्यतेचा आहे. कृष्ण निःसंशय ह्या किताबासाठी योग्य आहे कारण, मी व युधिष्ठीरानी येथे आमंत्रित सगळ्या मान्यवर राजांच्या मताचा विचार करूनच हा निर्णय घेतला आहे. त्यात मान्यवर राजे, ऋषी आणि ब्राह्मण आहेत. हा निर्णय पांडवांचा एकट्यांचा नाही हे तुम्हाला माहित नसल्यामुळें असे बेताल विधान तुम्ही केले, कृष्णाबद्दल. त्यात मुनी नारद, द्वैपायन, मी स्वतः, द्रोणाचार्य, कृप, राजा भिष्मक, राजा द्रौपद असें सगळे आहेत ज्यांनी अनुमोदन दिल्यानंतरच हा किताब कृष्णाला देण्याचे ठरले

होते. छेडीच्या नरेशा, ऐक आम्ही कृष्णाचे कोणते गुण लक्षात घेऊन त्याला निवडले आहे, त्याचे वेदांचे ज्ञान व त्यांच्या विविध शाखांचे ज्ञान इतर कोणाहीपेक्षा जास्त आहे. त्याची प्रसिद्धी त्याच्या विलक्षण कर्तृत्वामुळें जितकी आहे तितकी इतर कोणाचीही नाही. त्याचे बुद्धीचातुर्य इतर राजांपेक्षा खचितच जास्त आहे. एवढे कर्तृत्व असूनही त्याचे वागणे किती सोज्वळ, नम्र, सहिष्णूतापूर्वक, त्याचे सौंदर्य, निर्णयाचा खंबीरपणा, समाधानी वृत्ती, मर्यादाशिलता, त्याची संपन्नता असें सगळे गुण एकातच क्वचितच एकवटलेले आढळतात ते ह्या अच्युतात आम्हाला दिसले. त्याकरतां तुम्ही ह्या निर्णयाला मान्यता देणेंच सर्वस्वी श्रेयस्कर ठरेल. एकाच व्यक्तीत उत्तम शिक्षक, उत्तम गुरू, उत्तम मार्गदर्शक असें गुण व त्याशिवाय आधी सांगितलेले गुण असल्यामुळे तो ह्या अर्घ्य स्वीकारण्याच्या पदासाठी एकमेव योग्य उमेदवार ठरतो. हृषिकेश यज्ञाचा पुरोहित, स्नातक, एक सहृदय सोबती, एकमेव प्रियकर असा आहे जो ह्या विश्वाच्या निर्मितीत गुंतलेला आहे. म्हणून हे पांडव त्याची पुजा करत असतात. जे त्याची उपासना करतात त्या सगळ्यांना त्याच्या कृपेचा अनुभव येत असतो. ह्यातून हि सृष्टी उत्पन्न झाली आणि ह्यातच ती विलीन होणार असते हे जाणणारा कोणीही त्याला निवडले ह्याबद्दल नाराज होणार नाही. बाकी आपण सगळे कितीही झाले तरी सामान्य माणसे आहोत. त्याच्याशी तुलना कोणाचीही होत नाही. तो जरी आता आपल्यामध्ये व्यक्त रुपात असला तरी तो अव्यक्त रुपात सुद्धा असतो हे जे जाणतात ते आमच्या निवडीचे केवळ कौतुकच करतील. माणसात आल्यामुळें आपल्याला त्याचे मानवी पद्धतीने कौतुक करण्याची ही संधी आपण सगळ्यानी दवडणे मूर्खपणाचे होईल म्हणून त्याला स्वीकारून तुम्ही तुमची चुक सुधारावी. हे सर्व पंचमहाभूतं, हे चार जीव प्रकार, अंडज, गर्भज, पंकज आणि वनस्पति त्याच्या प्रतिभेतून उत्पन्न झाले आहेत अशा अच्युताची तुला कल्पना नाही हे तुझे दुर्दैव आहे. ते तारे, सूर्य, चंद्र, ग्रह, अशनि, नक्षत्र, सगळ्या दिशा, काळ हे सगळे ह्याच्याच कल्पनेतून उत्पन्न झाले आहेत हे लक्षात घेऊन कृष्णाच्या खर्या योग्यतेची कल्पना करा. अग्निहोत्र जे सगळ्यात महत्वाचे असते तेंच ह्यातून आले आहे, गायत्री त्याची किमया आहे. अरे शिशुपाला, तू एक लहान मुलगा असल्यासारखा बोलत होतास कारण, नद्यांपेक्षा समुद्र मोठा, ग्रहात चंद्र श्रेष्ठ, प्रकाशमान गोष्टींत सूर्य श्रेष्ठ, पर्वतात मेरू श्रेष्ठ, पक्षांत गरुड श्रेष्ठ, तसेंच सर्व

अस्तित्वात केशव श्रेष्ठ आहे हे तुला तुझ्या अज्ञानामुळें समजत नाही म्हणून तू त्याच्या निवडीस आक्षेप घेतला आहेस. तुझ्या अज्ञानामुळें तू कृष्णाबद्दल दुर्वाचा करत (अपशब्द बोलत) असतोस. उच्च श्रेणीचे ज्ञान ज्याला नाही असा हा छेडीचा राजा शिशुपाल, हे सगळे कधीच समजू शकणार नाही कारण, ते समजण्यासाठी जी प्रज्ञा असावी लागते ती त्याच्याकडे नाही हेंच खरे. जर तुला हि नेमणूक पसंत नसेल तर तू येथून जाऊ शकतो. आम्ही तुला अडवणार नाही कारण, त्याची आम्हाला आवश्यकता दिसत नाही".

अशारितीने सभापर्वातील अर्घ्य हरण पर्वाचा अडोतीसावा भाग संपला.

# सभापर्व भाग एकोणचाळीस

(अर्घ्य हरण पर्व संपले)

वैशंपायन सांगतात, ते सांगून महापराक्रमी भिष्म थांबले. त्यानंतर यज्ञाचे अधिकारी असलेले नकुल मोठ्या आवाजात व कठोर स्वरात बोलतो, "ज्या कोणाला हे सहन होत नसेल कीं, कृष्णाला श्रेष्ठतेचा मान मिळाला आहे त्या सगळ्यांना माझा हा जोडा डोक्यावर मारीन. ज्याला त्याचा जाब द्यावा लागेल. मी त्या केशीच्या वध करणार्या सावळ्या वर्णाचा अमर्याद सामर्थ्य असलेल्या कृष्णाची पुजा करतो. तसेंच ज्या बुद्धीमान राजांना कृष्णाचे स्वामित्व मान्य आहे ते ह्या नेमणूकीला अनुमोदन देतील. ह्या यज्ञासाठी त्याला गुरू, पिता आणि यज्ञ प्रमुख म्हणून मान्यता देईल. असें बोलत नकुल त्याचे पादत्राण हातात घेऊन शिशुपालाला दाखवत होता. जणूकाय तो ते पादत्राण त्याच्या डोक्यावर मारणार होता. असें बोलल्यावर एक चमत्कार व्हावा अशा प्रकारे आकाशातून स्वर्गीय फुलांचा वर्षाव सर्वत्र त्या भागात झाला. सगळे राजे फार उत्तम, फार उत्तम असें बोलून अनुमोदन देतात. त्यानंतर चर्मवस्त्र परिधान केलेले नारद मुनी बोलण्यास उठले. त्यांनी भूत काळातील आणि भविष्य काळातील गोष्टी सांगून शंकाकुशंकांचे निरसन करण्यास सुरुवात केली. सर्व जगाचे ज्ञान असलेले ते म्हणाले, "जो माणूस कमलनयना अशा कृष्णाची आराधना करणार नाही तो मृत असल्यासारखेच समजावे. त्याच्याशी कोठल्याही अशा विषयावर बोलणे व्यर्थ असते". थोडक्यात असें बोलून नारदमुनींनी कृष्णाचे महात्म्य सांगून टाकले. सर्व राजे जे त्यातून समजावयाचे ते समजले. प्रत्यक्ष नारद मुनी सांगत असल्याने त्यावर कोण प्रत्युत्तर करणार?

वैशंपायन सांगत रहातात, तो माणसात आलेला देव, नकुल, ब्राह्मण आणि क्षत्रिय ह्यांच्या वेगवेगळ्या प्रकारे पुजा करण्याचे योजतो. ज्यांची पुजा (सन्मान विधी) करणे प्रस्तुत होते त्यांची केली. त्याप्रमाणे तो विधी संपन्न झाला. सगळे व्यवस्थित झाले खरे परंतु, तो सुनिथ (शिशुपाल) डोळे लाल झालेला संतापातच तेथे थांबला होता. त्याच्या अंगाची लाही लाही होत होती जेव्हां जेव्हां कृष्णाचे कौतुक होत होते त्या सन्मान विधी दरम्यान. कारण तो सगळा सन्मान कृष्णाच्या पवित्र हातांने होत होता. तो रागात इतर राजांना बोलला, "मी येथे असतांना माझे नेतृत्व असलेले तुम्ही कशाचा विचार करता"? "चला

मर्दानो खर्या क्षत्रियांनो आपण हे सहन करतां कामा नये, चला ह्या वृश्नी आणि यादवांच्या बरोबर युद्धास तयार होऊ". त्यानंतर तो छेडीचा राजा त्याच्या दोस्त राजांबरोबर सल्लामसलत करू लागला हे ठरवण्यासाठी कीं, हा राजसूय यज्ञ कसा बारगळेल. त्यात कोणती विघ्नं उपस्थित करावयाची, वगैरे वगैरे. त्या यज्ञाला सुनिथचे मांडलिक म्हणून जे उपस्थित झाले होते ते सगळे त्याच्या बरोबर एकत्र होत पुढे काय करावे म्हणजे तो यज्ञ बंद पडेल ते ठरवू लागले. त्यांचे मित्र परंतु, त्याचे मांडलिक नसलेले इतर बरेच राजे त्यांना शांत करण्याचे सांगत होते. कांहीं त्यांना बोलले, अरे ह्या यज्ञात आपण भाग घेतल्यामुळें आपला स्वर्गाचा मार्ग मोकळा होणार आहे, ती संधी कशाला थोडक्यासाठी घालवावी? असें उलट सुलट विचार तेथे चर्चेत होते. शिशुपाल मात्र त्याच्या निर्णयावर ठाम होता व त्याच्या बरोबर आलेल्यांना त्या प्रमाणे आग्रह करत होता. तो एक प्रतिष्ठेचा सवाल झाला होता. तो विवेक हरवलेला राजा शिशुपाल त्यांना सागतो किं, आपण हा यज्ञ अमान्य केला तर तो झाला तरी न झाल्यासारखेच ठरेल. ते स्वताच्या सामर्थ्याबद्धल अति आत्मविश्वासी असलेले, आपल्या राजाच्या (शिशुपाल) अपमानाचे उकटे काढण्यासाठी उद्युक्त होतात. जितका त्यांना विरोध होईल तितका त्यांचा क्रोध वाढतच जात होता. कृष्ण परिस्थितीचा अंदाज घेतो, त्याला समजते कीं, तेथे असलेले अफाट सैन्य केव्हाही युद्धास निघाले तर ते मोठा बाका प्रसंग ठरेल. ते आत्ता कसेही करून टाळले पाहिजे. यज्ञात कोणतेही विघ्न नको होते. एकदा यज्ञ संपन्न झाला किं, मग पाहू काय करावयाचे ते, असा तो विचार करतो.

अशा रिताने सभापर्वातील अर्घ्य हरण पर्वाचा एकोणचाळीसावा भाग संपला.

# सभापर्व भाग चाळीसावा

(शिशुपाल वध पर्व पुढे चालू)

वैशंपायन सांगतात, तो राजांचा अफाट समुदाय पाहून जे अपमानामुळें क्रुद्ध झाले होते, जणूकाय समुद्रात वादळापूर्वीचे वारे वहात होते. सृष्टीचा अंत होणार अशी अवस्था झालेली होती. ते पाहून युधिष्ठीर भिष्माला बोलतात, "अहो पितामह, तुम्ही बुद्धिचे आगर अहात, दुसरे इंद्र अहात आमच्यासाठी, बृहस्पति अहात, मला सांगावयाचे आहे किं, हा खवळलेला क्षत्रियांचा समुद्र पहाता मी काय करावे ते समजण्याच्या क्षमतेत राहिलेलो नाही. कृपया मला अवगत करा कीं, नेमके मी काय करावे अशा परिस्थितीत"? मला अशा परिस्थितीत माझा यज्ञ कसा काय यशस्वी करता येईल ते समजत नाही. असा मार्ग दाखवा ज्यामुळें किमान इजा होत हा तेढा सुटेल. जर युद्ध छेडले गेले तर ब्रह्मराक्षसांचे फावेल, ते कोणत्याही परिस्थितीत झाले नाही पाहिजे". ते युधिष्ठीराचे हताश होऊन काढलेले उद्‍गार ऐकून तो कुरु घराण्याचा सिकंदर बोलतो, "अरे पंडुपुत्रा तू अजिबात घाबरू नकोस. अरे मर्दा, कुत्र्यांच्या भुंकण्याकडे कधी सिंह लक्ष देतात कां"? "मी त्याला मार्ग काढला आहे, तो सगळ्या दृष्टीने सुयोग्य आहे. जसे कुत्र्यांचे टोळके झोपलेल्या सिंहाकडे पहात भुंकतात, तसे हे आहे. त्याप्रमाणे, हे भुक्कड क्षत्रिय वृश्नी घराण्यातील कृष्णासारख्या सिंहाकडे पहात भुंकत आहेत. जेव्हां तो आपला सिंह उठेल तेव्हां ते सगळे सिंहासारखे वाटणारे कुत्र्यासारखे होतील. माझ्या मुला, तो माणसातील राजांचा म्होरका, शिशुपाल त्याचा विवेक हरवून बसला आहे आणि तो त्याच्या क्रुद्ध होण्याचा प्रभाव आहे. माणूस रागावला किं ज्या प्रकारच्या चुका करतो त्या प्रकारच्या चुका हा करत आहे. त्याच्या बरोबर ते त्याच्या सारखे विवेक हरवलेले इतर राजे आहेत ते सगळे त्यांच्या चुकीचे बळी ठरणार आहेत. परिणाम स्वरुप हे सगळे त्यातल्या त्यात विशेष करून शिशुपाल यमाकडे जाण्याच्या तयारीत आहेत असें मला स्पष्टपणे दिसत आहे. मला स्पष्टपणे दिसत आहे कीं, विष्णू शिशुपालाला दिलेली उर्जा लवकरच त्याच्या कडून काढून घेणार आहे. अरे माझ्या नातवा, कुंतीपुत्रा हे लक्षात घे कीं , हा शिशुपाल छेडीचा नरेश, आणि त्याचे ऐकणारे सगळे राजे, त्यांची बुद्धी वापरण्याचे बंद करून हे असें मूर्खपणाचे वागत आहेत. त्यांचा काळ समीप आला आहे असें दिसते. युधिष्ठीरा, कृष्ण सृष्टीतील जीव

उत्पन्न करतो व नष्टसुद्धा करतो, ते त्याचे कार्य आहे. त्याचे हे कार्य तिन्ही लोकात सतत चालू असते".

वैशंपायन पुढे सांगतात, ते भिष्माचे कठोर आणि निर्वाणीचे बोलणे ऐकल्याने तो छेडीचा राजा भिष्माला उद्देशून ओरडून बोलतो,

अशा रिताने सभापर्वातील शिशुपाल वध पर्वाचा चाळीसावा भाग संपला.

# सभापर्व भाग एकेचाळीस

(शिशुपाल वध पर्व पुढे चालू)

शिशुपाल रागात ओरडून बोलतो, "अरे म्हातारड्या, तुझ्या कुळाला कलंक लावणार्या, तुला लाज वाटत नाही ह्या खर्या मार्गाने जाणार्या सज्जन राजांना भिववण्याची. तुम्ही ह्या कुरु घराण्याचे मुख्य अहात आणि असें वागता किं जणूकाय तू नपुसक आहेस. त्यामुळें असा सल्ला तू तुझ्या नातवाला देत आहेस त्यात कांहीं नवल नाही. तुझ्या मार्गदर्शनात नैतिकता कोठेच दिसत नाही. एकमेकांना बांधलेल्या होड्या जशा एकमेकांवर आपटत आपटत हेलकावे खात रहातात, किंवा आंधळे एकमेकांना धरून चालतात असा तुझ्या मार्गदर्शनाचा परिणाम तुझ्या नातवंडांवर झालेला मला दिसतो. अशारितीने विनाकारण आव्हान देऊन तू पुन्हा आमच्या भावना दुखवल्या आहेत. विशेष करून तुझ्या त्या कृष्णाची कौतुकं ऐकून आमचे कान किटले आहेत. ज्यांने एका स्त्रीचा (पुतना) खून केला आणि बरेच अनेक गुन्हे केले त्याचे कौतुक तू करत आहेस कारण तुझी अक्कल शेण खाण्यास गेली आहे. अशारितीने त्या पाप्याची स्तुति करतांना तुझी जिभ का झडत नाही"? "मला खरच अचंबा वाटतो कारण तुझ्यासारख्या बुद्धीमानाने त्या नीच गवळ्याची स्तुती करावी. ज्याच्या बाबत अगदी मामुली बुद्धी असणारासुद्धा चांगले बोलू शकत नाही. जर त्या कृष्णाने त्याच्या लहानपणी एक मोठा पक्षी मारला तर त्यात विशेष असें काय? त्यांने अश्व आणि वृशवांचे वध केले त्यात काय मोठेसे? ते दोघेही युद्धकलेत कच्चे होते हे सगळेच जाणतात. त्या तुझ्या कृष्णांने पाण्यात एकादा निर्जीव पदार्थ फेकला तर त्याचे काय एवढे कौतुक करावयाचे. त्यांने एक आठवडा तो गोवर्धन पर्वत उचलून धरला त्यात काय विशेष? तो एक छोटासा वारुळासारखा हलका आहे. तुझ्या कृष्णांने कंसाचे खाद्य त्याच्या परवानगी शिवाय खाल्ले, त्यात विशेष काय? उलट त्यामुळे तुझा कृष्ण मोठा अनैतिक चोरटा इसम आहे हेंच सिद्ध होते. दुसर्याचे त्याच्या परवानगीशिवाय अपहार करणे कोणत्या नैतिकमुल्यांत बसते? त्यानंतर त्याचा कपट कारस्थानाने खून करणे हे तर मोठेच पाप त्यांने केले तरी त्याचे कौतुक तुला व तुझ्या अक्कलशून्य पांडवांना कां वाटते"? तुझ्या सगळ्या आयुष्यात तू फक्त केवळ आणि केवळ अनैतिक कृत्य करण्यातच वेळ घालवला आहेस. तुला जाणकारांने जर शिकवले नसेल तर मी आता तुला काय योग्य

ते शिकवतो ते तू समजून तुझ्या वर्तनात सुधारणा कर असे मी तुला सांगतो. सद्‌गुणी लोक कधीही शस्त्रांचा उपयोग स्त्री आणि ब्राह्मणांवर करत नाहीत. ज्याच्या कृपा प्रसादात रहातो त्याच्यावर वार करत नाहीत. हे सगळे शहाणपण तू विसरला आहेस. त्या नीच कृष्णाची तू माझ्यापुढे तोंड फाडून स्तुती करतोस व त्याचे वय लहान असले तरी तो महान आहे असें आम्हाला सांगतोस त्याचे मला वैषम्य वाटते. नैतिकतेच्या सगळ्याच तत्त्वांना तू झुगारून दिले आहेस असें वाटते. त्या नीच कृष्णाची स्तुती करतांना मला अक्कल नाही असें तू ओरडून सांगतोस. तू कितीही अशा प्रकारे उलटया प्रकारे प्रचार केला म्हणून कांहीं बिघडत नाही. मंत्र उलटा वाचला तर त्याचा कांहीही परिणाम होत नाही. जे खरे ते खरेच रहाते म्हणून तू व तुझ्यासारखे कितीही खोट्या गोष्टींचा खर्या म्हणून सांगितल्या म्हणून मला त्यात कांहीं फरक पडत नाही. हे असें तुझे वर्तन नीचपणाचेच ठरते. म्हणून मी विश्वासपूर्णपणे सांगतो किं, त्या कृष्णाच्या नादी लागलेले तुम्ही सगळे अंधारात चाचपडत अहात. त्याबद्दल मला तिळमात्र शंका नाही. शहाणपणाच्या गोष्टी सांगणारे तुम्ही खर्या पुण्याच्या मार्गापासून दूर जात अहात. हे माझे हितकारक बोलणे जर तुम्ही समजून घ्याल तर तुमचे भले होईल. तुझ्या पापकृत्याचा थोडा पाढा वाचतो म्हणजे तुला तू किती पापी आहेस ते समजेल. त्या काशीच्या राजकन्यांना तू भर सभेतून तुझ्या नालायक भावासांठी पळवून आणलेस. त्यातील अंबा जी दुसर्याच कोणावर प्रेम करत होती तिलासुद्धा तू बळजबरीने ओढून नेलेस व नंतर तिला टाकून दिलेस, हे कोणते पुण्य कर्म केलेस ते सांग. त्यानंतर अंबाच्या प्रियकरांने तिला नाकारले कारण तू तिला स्पर्श केला होतास तेव्हां ती परत तुझ्याकडे आली तर तू तिचा इन्कार केलास कां तर तू म्हणे ब्रह्मचारी आहेस? खरे तर तू हिजडा आहेस पण ते सत्य तू उघडपणे कबूल करण्याचे टाळत आहेस, हे सर्व तुझे वागणे कोणत्या पुण्यकर्मात येते ते सांगू शकशिल कां? तुला तुझ्या उच्च तत्त्वाचा मोठा दिमाख आहे. तुझ्या समक्ष कोणी दुसरे तुझ्या भावाच्या विधवांशी संबंध घेतात आणि त्यांना मुलं होतात त्यात तुझे कोणते मोठेपण आहे? हे तुझे दिखाऊ ब्रह्मचर्य कां हिजडेपण तुला कोणते महान स्थान देणार आहे"? शिशुपाल पुढे बोलतो, तू स्वतःला नैतिकतेचा जाणकार समजतोस, पण ह्या सगळ्या कृत्यांमुळें तू भिष्मा, नैतिकतेचे सगळे नियम मोडले आहेस तरीसुद्धा

स्वतःला मोठा ब्रह्मचारी आणि तत्त्वनिष्ठ, काय कमाल आहे बघा. देवांची पुजा, दानं, अभ्यास, यज्ञ करून व त्यात ब्रह्मणांना भेटी देणे ह्यांने ते श्रेय मिळत नाही जे केवळ एक पुत्र जन्माने प्राप्त होते. एका पुत्राला जन्म देण्यामुळें जे पुण्य प्राप्त होते त्याच्या सहावा भाग इतकेसुद्धा पुण्य हे सगळे करून प्राप्त होत नाही हे तुझ्यासारख्या स्वतःला जाणकार समजणार्याला माहीत नाही ह्याचे आश्चर्य वाटते. जो गृहस्थ पुत्रविहीन आहे त्याला कितीही व्रत वैकल्ये केली, तपस्या केली, उपवास केले तरी ते सगळे व्यर्थ असते. म्हणून गृहस्थाने पुत्रप्राप्ती साठी सर्वकांहीं करावयाचे असते. तू आता वृद्ध झाला आहेस आणि आता तुला पुत्र होणे केवळ अशक्य आहे. असा तू मोठ मोठ्या शहाणपणाच्या थापा मारत असतोस"? तू तुझ्या नातेवाईकांच्या मेहरबानीवर शेवटचे आयुष्य व्यतित करणार आहेस, त्यात तुझे म्हणून सांगता येथील असें कोणीही नसेल. हे सगळे तुला समजावे व तुझे कल्याण व्हावे म्हणून मी तुला त्या हंस पक्षाची गोष्ट सांगतो, कदाचित ती ऐकल्यावर तुझी नाठी झालेली अक्कल जागृत होईल व तुझे भले होईल!

फार पूर्वी एकेकाळी, एक म्हातारा हंस पक्षी एका समुद्र किनारी रहात होता. सदैव तो सगळ्यांना नैतिकतेचे धडे देत असें. तो त्याच्या पक्षी समुहाला नेहमी शिकवत असें किं, "गड्यानो, पुण्याचा मार्ग चोखंदळपणे आचरावा आणि पापाचा मार्ग कधीही आचरू नये". तेथे वावरणारे सगळे लहान मोठे पक्षी त्याची ती शिकवण ऐकतच मोठे होत होते. खाणे मिळवण्यासाठी पुण्याचा मार्ग कसा आचरावा ते त्या म्हातार्या पक्षास विचारत असतं. तेथील सगळे हंस पक्षी त्यांची अंडी त्याच्या हवाली करून बिनधास्तपणे समुद्रावर खाद्य मिळवण्यासाठी घिरट्या घालत असत. तो धूर्त म्हातारा मात्र त्याचे खाणे मिळवण्यात त्याच्या वृद्धत्वामुळें असमर्थ झाला होता. तो त्या तरूण पक्षांची अंडी त्यांच्या नकळत खाऊन त्याचे पोट भरत होता. एकदा त्या पक्षांतील एका चाणाक्ष पक्षास संशय आला. कारण, त्याला त्याच्या अंड्यांची संख्या कमी झाल्याचे जाणवते. एकदा तो त्या म्हातार्या हंसास अंडे खातांना पहातो व त्याला त्याचा संशय खरा असल्याची खात्री होते. तो चाणाक्ष पक्षी आपला संशय इतर हंसांना सांगतो. त्यानंतर ते सगळे पक्षी त्या म्हातार्या हंसाला अंडी खातांना पकडतात. ते त्याला पकडतात आणि चोंचीनी टोचून टोचून ठार मारतात". अरे कुरुवर्या, तुझी वागणूक नेमकी अशीच आहे जशी त्या म्हातार्या हंसाची

होती. कदाचित जेव्हां तुझ्या प्रिय पांडवांना तुझा दुटप्पी डाव लक्षात येईल तेव्हां तेसुद्धा तुला तसेंच ठेचून ठेचून ठार मारतील त्याची कल्पना तुला आहे कां"? पुराणांचा अभ्यास केलेले हि कथा सांगतात". शिशुपाल पुढे भिष्माकडे पहात बोलतो, "अरे भिष्मा ही कथा तुला चांगलीच लागू होते. तुझे वागणे ह्या म्हातार्या हंस पक्षासारखेच आहे. तोंडात एक वाणी व पोटात दुसरेच असते तुझ्या. तू तुझ्या स्वार्थासाठी तुझ्या पांडवांची भविष्याची फळं, अंडी, खात आहेस".

अशारितीने सभापर्वातील शिशुपाल वध पर्वाचा एकेचाळीसावा भाग संपला.

# सभापर्व भाग बेचाळीस

(शिशुपाल वध पर्व पुढे चालू)

पुढे शिशुपाल बोलतो, "तो शक्तिमान जरासंध कृष्णाशी लढण्यास तयार नव्हता कारण कृष्ण नोकर वर्गातील (सुत वर्ण) होता. म्हणून त्यांने तुझ्या पांडवांचा उपयोग केला. प्राप्त नियमांनुसार जरासंधाने काय चुकीचे केले? ते त्याचे वागणे त्याच्या इभ्रतिस शोभणारेच होते. तू मला सांग, त्या कृष्णाने व त्याच्या नादी लागून तुझ्या भिमांने व अर्जुनाने जे केले ते कितपत नैतिकतेच्या नियमांनुसार योग्य होते? ज्या पद्धतिने जरासंध मारला गेला ते कोणत्या नैतिकतेत बसत होते? नगरात राजमार्गाने न शिरता भिंत फोडून जाणे, ब्राह्मण नसतांना त्यांच्या सारखे वस्त्र परिधान करणे व आपण स्नातक असल्याची राजाकडे बतावणी करणे, राजांने (जरासंधाने) त्यांना अर्घ्य दिले व पाय धुण्यासाठी जल दिले ते नाकारणे हे सगळे काय केले जात होते? एवढेच नाही तर जेव्हां जरासंधाने त्यांना जेवण दिले ते कृष्णाने साफ नाकारले कां? जर हा हलकट माणूस स्वताला परमेश्वर समजतो तर तो स्वताला ब्राह्मण म्हणून घेण्यास कां नाकारत होता"? "मला आश्चर्य वाटते अशाचे कीं, तू तुझ्या पांडवांना चुकीच्या मार्गाने जाण्याचे सांगत असतांना ते मात्र तुला नैतिकतेचा पुतळा समजतात. कदाचित हे असें होत आहे कारण, ते लहानपणापासून तुझ्या सारख्या बाईल प्रवृत्तीच्या नपुसकाच्या मार्गदर्शनाखालीच राहिले आहेत.

वैशंपायन सांगतात, ते उद्धट बोलणे ऐकून मात्र भिम रागावले. त्यांचे डोळे जे आधीच मोठे असतात ते आणखीन मोठे आणि लाल झाले. तेथे जमलेल्या राजांनी पाहिले किं, त्यांच्या कपाळावर तीन आठ्या उमटल्या होत्या त्या क्रोधामुळें. भिमांने रागांने दात चावायला सुरुवात केली तेव्हां असें वाटले, साक्षात यम अवतरत आहे कां असें पहाणार्यांना वाटले. भिमांने शिशुपालाची मान पकडली जशी शंकराने असुरांच्या सरसेनापतिची पकडली होती. परंतु, भिष्मांने त्याला कांहीं सांगून शांत केले. त्यावर भिम आपल्या पितामहांचे ऐकून थोडा निवळला. कारण, भिमाला आपल्या पितामहांच्या आदेशाचे पालन करण्याशिवाय गत्यातर नव्हते, जसें सागराचे पाणी भर पावसाळ्यासुद्धा आपल्या किनार्याच्या मर्यादा ओलांडत नाही. भिमाचा तो क्रोध पाहूनही शिशुपालाची हिम्मत यत्किंचितही कमी झाली नाही. भिम त्याच्यावर चालून जाण्याचे धैर्य दाखवत असतांना तो

शिशुपाल, छेडीचा नृपाधिपती त्याची बडबड थांबवायला तयार नव्हता. जसे सिंह लहान प्राण्याच्या ओरडण्याकडे दुर्लक्ष करतो. त्या उलट भिमाचा तो त्रागा पाहून तो असुरी राजा शिशुपाल त्याच्याकडे पाहून हंसू लागला. बोलला, "त्याला माझ्यावर सोडा, सगळ्या राजांना पाहूद्या मी कसा त्याची चिरफाड करतो ते. जसे किडे आगीत करपतात तसा हा मूर्ख पांडव ज्याने जरासंधाला कपटाने मारले तो माझ्या आगीत जळून जाईल". असे वेपर्वाईचे त्याचे बोलणे ऐकून भिष्म भिमाला सांगतो, शांतपणे.
अशारितीने सभापर्वातील शिशुपाल वध पर्वाचा बेचाळीसावा भाग संपला.

# सभापर्व भाग त्रेचाळीस

(शिशुपाल वध पर्व पुढे चालू)

भिष्म त्याला सांगतात, अरे माझ्या भिमा, तुला सांगतो ह्याची गोष्ट. हा त्या छेडी कुळात जन्मलेला आहे. तो जन्मला तेव्हां त्याला तीन डोळे आणि चार हात होते. तो जन्मताच गाढवा सारखा खिंकाळू लागला होता. ते पाहून त्याचे मातापिता व इतर आप्त घाबरून गेले होते. ते एक अशुभ मुल आहे असें समजून ती मंडळी त्याला उकिरड्यावर टाकणार होती. परंतु, एक विलक्षण आवाज त्यांना ऐकू आला तो बोलतो, "तुमचा पुत्र विलक्षण शक्ती घेऊन आला आहे. म्हणून त्या पासून तुम्हाला कांही बाधा होणार नाही. त्याच्या जन्माचे स्वागत करा व आनंदी व्हा. तो बालपणी मरणार नाही. त्याचा मृत्यू येण्यास अजून बराच अवधी आहे. त्याला मारणारासुद्धा जन्मला आहे". ते ऐकल्यावर त्याची आई विचारते, त्या अद्भूत आवाजाला, "माझ्यावर कृपा करा व त्याला संरक्षण द्या. तरीसुद्धा मला सांगा अहो पवित्र ध्वनि, माझ्या मुलाला कोण मारणार आहे ते सांगा". ती कळकळीची विनंती ऐकल्यावर तो अद्भूत ध्वनि तिला सांगतो, "ज्याच्या मांडीवर ह्याला ठेवल्याने त्याचे जास्तचे अवयव गळून पडतील आणि ज्याचे दर्शन झाल्याने त्याचा तिसरा डोळा विरून जाईल तो त्याला मारणार आहे. असा विचित्र बाळ जन्मलेला आहे हे समजल्यावर सगळे पृथ्वीचे राजे त्या विचित्र मुलांस पहाण्यासाठी छेडीला गेले. जसें ते प्रतापी राजे तेथे जात व शिशुपालाला पहात त्याची आई त्याला त्या राजाच्या मांडीवर ठेवत असें. ते पहाण्यासाठी कीं, कोणता राजा त्याला मारणार आहे. अक्षरशः हजारो राजे आले पण त्या कोणाही राजाच्या मांडीवर त्याला ठेवल्याने त्याचे अवयव खडून पडले नाहीत. ती वार्ता सगळी कडे पसरली होती त्यामुळें द्वारकेचे यादव योद्धे शंकरसन (बलराम) आणि जनार्दन तेथे त्या विचित्र बालकांस पहाण्यासाठी गेले कारण, छेडीची राणी त्यांची आत्या होती. तेथे गेल्यावर ते तेथील सगळ्यांना नमस्कार करतात आणि राजा व राणी (आत्या) ह्यांनासुद्धा नमस्कार करतात. सगळ्यांचे क्षेमकुशल विचारण्याचा शिष्टाचार आटोपल्यावर ते दोघे भाऊ, बलराम आणि कृष्ण तेथे बसतात. राणी त्यांचे ते विचित्र बाळ घेऊन येते व त्यांच्या मांडीवर मोठ्या आनंदाने ठेवते. कृष्णाच्या माडीवर ठेवल्या बरोबर त्या बालकाचे जास्तचे अवयव गळून पडतात. त्याचा तिसरा डोळासुद्धा विरून जातो. ते बालक सामान्य

मुलांसारखे होते. ते पाहिल्यावर त्यांची आत्या व छेडीची राणी, शिशुपालाची आई गयावया करून कृष्णाकडे भिक मांगते, ती बोलते, "अरे जनार्दना, माझी भिती मी तुला सांगते, माझ्या पुतण्या, तू सगळ्यांचा त्राता आहेस, सगळ्याचे दुःख निवारणारा आहेस, माझ्या ह्या मुलाला जीवदान दे". ते तिचे काकुळतीचे बोलणे ऐकल्यावर कृष्ण तिला सांगतो, "आत्ये, घाबरू नकोस, तू नितीमुल्ये जाणतेस, माझ्याकडून तुला कांही धोका नाही. मग तू असा कोणता वर माझ्या कडून मांगते आहेस. मला जमेल तितके चांगले तुझ्यासाठी करण्याचा प्रयत्न करीन". ते आश्वासन ऐकल्यावर कृष्णाची आत्या व शिशुपालाची माता त्याला सांगते किं, "तिच्या मुलांचे अपराध तू माफ करशिल, असे आश्वासन ती मांगते". ते ऐकल्यावर तो विश्वनाथ तिला आश्वासन देतो किं, तो तिच्या मुलांचे शंभर अपराध माफ करू शकतो पण जर तेवढ्यात तो थाबला नाही तर त्याच्या शंभराव्या अपराधाला कृष्ण त्याला मरून टाकीन". भिष्म पुढे बोलतो, "भिमा, तो हलकट त्याच्या त्या कृष्णाने दिलेल्या आशिर्वादाच्या जोरावर तुला आव्हान देत आहे. म्हणून, तू न चिडता फक्त काय होते ते पहात रहा. कारण, त्याचे शंभर अपराध पूर्ण होत आले आहेत!

अशारितीने सभापर्वातील शिशुपाल वध पर्वाचा त्रेचाळीसावा भाग संपला.

# सभापर्व भाग चव्वेचाळीस

(शिशुपाल वध पर्व पुढे चालू)

भिष्म पुढे सांगत असतो, "ज्या शक्तिच्या भरवशावर तो तुला आव्हान देत आहे ती त्याची नाही. तू जरी अथक शक्ती असलेला असलास तरी त्याची शक्ती कृष्णाची दिलेली आहे व म्हणून आपण तिच्याशी लढावयाचे नाही. कृष्णसुद्धा त्याला बडबडण्यापासून अडवत नाही कारण, त्याची शंभर पाप पूर्ण होण्याची तो वाट पहात आहे. त्याला जे बडबडावयाचे आहे ते बडबडू दे. आणखीन थोडी जास्त वल्गना त्यांनी केली किं, दामोदर त्याचे काम करील आपल्याला त्यासाठी चिडण्याचीसुद्धा आवश्यकता नाही. त्याच्यात असलेली बरीच उर्जा जनार्दनाची आहे त्या बरोबर आपण लढणे योग्य होणार नाही, ती उर्जा कृष्ण योग्यवेळी त्याच्याकडून काढून घेईल. मला अशारितीने अपशब्दाने अपमानित करणे कोणालाही कधीतरी शक्य होईल कां? केवळ कृष्णाच्या प्रचंड उर्जेमुळे तो तसे बोलू शकतो आहे. परिणामाची पर्वा न करता तो वल्गना करत आहे". वैशंपायन पुढे बोलतात, ते भिष्माचे भिमाला सांगणे अर्थातच् शिशुपाल सुद्धा ऐकत असतो. त्यामुळें त्याचा रागाचा पारा चढत जातो. तो भिष्माला ओरडून बोलतो, "अरे, तू काय त्या फालतू कृष्णाच्या उर्जेच्या गोष्टी करत आहेस? यज्ञात पुनःपुन्हा उठून मंत्र बडबडणार्या सारखा काय मध्येच उठून फालतु बडबड करत आहेस त्या कृष्णाच्या उर्जे बद्दल? त्या कृष्णाला सोडून येथे असलेल्या खर्या राजांची स्तुती केलीस तर तुझ्या यज्ञात त्याचा कांहीं फायदा होईल". हा पहा राजा दरद आहे वल्हिकचा त्याची स्तुती कर, त्यांने जन्मताच सगळी पृथ्वी हलवली होती. तो पहा कर्ण, वंग आणि बंग देशांचा राजा, त्याची ताकद हजार अक्ष असलेल्या इंद्रा एवढी आहे. त्याची तिरंदाजी पहा कोणालाही लिलया हरवू शकते. अशांची पुजा करावी ते सोडून त्या गवळ्याची तुम्ही करता म्हणजे तुमची बुद्धी शेण खात आहे. तो जन्मतः कर्णकुंडल घालून आला होता , ज्याला स्वर्गीय चिलखत प्राप्त होते. तो सूर्याचा पुत्र आहे. त्याशिवाय तुमच्यात इतरही श्रेष्ठ इसम आहेत त्यांचे कौतुक करा तर ते जास्त योग्य होईल, कांहीं शिका माझ्या कडून. त्यात द्रोण आहेत त्यांचाच मुलगा आहे, महान योद्धा अश्वत्थामा आहे. कृप आहेत, सगळे ब्राह्मण आहेत, कितीतरी एकसोएक अग्रणी होण्याच्या योग्यतेचे असतांना तुम्हाला त्या सुताची आठवण येते हे किती मूर्खपणाचे आहे. अहो

भिष्म, अशा थोर लोकांचा तुम्हाला विसर कसा पडतो"? तुम्हाला अक्कल नसेल तर माझ्याकडून घ्या, तुमच्या चांगल्यासाठी मी हे सांगत आहे. आणखीन कांहीं थोर योग्यतेचे राजे आहेत ते दाखवतो तुम्हाला जर तुम्हाला दिसत नसतील तर मी दाखवतो. अतुलनीय जयद्रथ, द्रुम जो किंपुरुषचा प्रसुख आहे. त्यांची क्षमता आणि धाडसीपणा इतर कोणातच दिसत नाही. कृप पांडवांचे गुरू आहेत ते कसे तुम्हाला दिसत नाहीत. ह्या पैकीं कोणाचीही बरोबरी करण्याची लायकी आहे कां त्या तुमच्या कृष्णात"? "भिष्मक, दंतवक्र, भागदत्त जो त्याच्या असंख्य यज्ञांसाठी ख्यातनाम आहे. जयत्सेन, विराट, द्रुपद, शकुनी, बृहद्वल, विंद, अनुविंद, अवंत पांड्य, श्वेत उत्तम, श्रीमंत शंख्य, अभिमानी वृष्सेन, बलवान एकलव्य, महारथी कलिंग असें कितीतरी असतांना त्या कृष्णातच काय तुमचे अडकते ते समजणे मला मुष्किल झाले आहे. मी तुमच्या भल्यासाठी आणि तुमचा यज्ञ उत्तम व्हावा म्हणून हे सगळे तुमचा एक हितचिंतक म्हणून सांगत आहे. कृष्णाची योजना केल्याने कदाचित् तुमचा यज्ञ फसू शकतो ते तुम्हाला समजत नाही हे तुमच्या अक्कलशून्यपणाचे द्योतक आहे. ज्याचे करावे भले, तो म्हणतो माझेच खरे, अशी तुमची गत झाली आहे. केव्हा तुम्हाला अक्कल येणार"?

"तुला शल्य दिसत नाही कां"? त्यांच्या सारखा दुसरा राजा ह्या पृथ्वीतलात झालेला नाही. मला आता असें वाटू लागले आहे किं, अरे भिष्मा, तू जुन्या लोकांकडून कांहीं शहाणपण घ्यायला विसरला आहेस कां"? "तुला कदाचित माहित नसेल कीं, स्वताची किंवा दुसर्याची स्तुती करणे अथवा टीका करणे असें दोनही प्रतिष्ठीत माणसे करत नाहीत. तुझे आताचे वागणे कोणीही येथे उपस्थित असलेला राजा मान्य करणार नाही. कृष्णाचे कौतुक तू करतोस ते केवळ अज्ञानातून होत आहे जर थोडी अक्कल असती तर अशा प्रकारे त्या मूर्खाचे कौतुक तू कधीच केले नसतेस. तुझ्या मताशी सगळ्यानी सहमत असलेच पाहिजे असा तुझा आग्रह कां? तो भोज लोकांतील गवळी आहे, त्याचे कौतुक राजांच्या समाजात करणे कितपत योग्य होईल हा प्रश्न पडतो. तुम्ही राजघराण्याचे असूनही हे करत अहात हे तुझ्या खर्या स्वभावात बसते कां"? तुला माहीत आहे कां, तेथे एक छोटा पक्षी आहे त्याला भुलिंगा म्हणतात, जो सिंहाच्या दातात अडकलेले मांस उचकटून काढून खातो. त्यावेळी तो सिंह त्याचा जबडा उघडा ठेवतो. त्या सिंहाने मनात

आणले तर तो त्या पक्षाला गिळू शकतो पण तो तसे करत नाही. हे असें आहे येथे, तो राजांचा समस्त समाज हा त्या तोंड उघडे ठेवून भुलिंगाला खाऊ देणार्या सिंहासारखा असतो. पण जर त्या राजे लोकांच्या समाजाने तुला खाऊन टाकावयाचे ठरवले तर तू क्षणभरसुद्धा टिकणार नाहीस. तू त्या पक्षासारखाच आहेस, ज्याचे खायचे त्यालाच टोचायचे! असें तुझे वागणे आहे. त्याच्या सहनशिलतेचा आणि प्रेमळपणाचा तू असे वागून गैरफायदा घेत आहेस. तुम्ही सदैव त्या राजघराण्यांच्या मताविरुद्ध वागत असता. असा विश्वासघातकीपणा इतरत्र सापडत नाही.

वैशंपायन पुढे सांगतात, छेडीच्या राजाचे असे मनाला सतत टोचणारे शब्द ऐकून भिष्म त्याला विचारतो, खरोखरच कां आम्ही ह्या राजांच्या मेहरबानीवर अवलंबून आहोत"? असा प्रश्न विचारल्या नंतर तो महारथी भिष्म बोलतो, "मला वाटते ह्यातील एकही राजा त्या लायकीचा नाही. ते राजे गवतासारखेच आहेत माझ्यासाठी". ते ऐकून ते जमलेल्या राज्यांत संतापाची लाट उठली. त्यातील काही उठून उभे राहीले व इतर काहीं भिष्माशी वाद करू लागले. त्यातील कांहीं जे उत्तम धनुर्धर होते, भिष्माबद्दल बोलले कीं, हा आता म्हातारा झाला आहे पण म्हणून त्यांने असें उर्मटपणे बोलणे योग्य नाही. त्याला माफ करता येणार नाही. त्याला शिकारीत जसे आपण प्राणी मारतो तसें ठार केले पाहिजे. आपली तुलना हा म्हातारा गवताशी करतो म्हणून त्यालाच गवतात घालून ठार जाळून टाकले पाहिजे. ती त्या क्षत्रियांची प्रतिक्रिया लक्षात आल्यावर भिष्म त्यां सगळ्या उद्देशून बोलतो, "ऐका पाहुण्यांनो, हे केवळ वक्तव्य चालू आहे व शब्दास शब्दच लावावयाचे असतात. तेथे कृती करावयाची नसते. म्हणून, उगाचच भावूक होऊ नकां, फक्त ऐका काय बोलणे होत आहे व नंतर पहा काय होते ते. त्यानंतर ठरवा माझे काय करावयाचे, प्राण्यासारखे ठार मारावयाचे कां गवतात जाळावयाचे! असें पहा, हा वाद ज्या गोविंदाच्या अग्रणी नेमण्यामुळें सुरु झाला त्यालाच आपण बोलवू म्हणजे तोंच काय ते ठरवेल. जो कधीच हरत नाही व ज्याची आपण सगळे पुजा करतो तो माधव ज्याचा रंग सावळा आहे, जो सुदर्शन चक्र आणि गदा वापरतो, जो मृत्यू देतो व जन्माला सुद्धा घालतो, जो माणसात आणि देवांत सारखाच मिसळतो त्याला विचारू, काय करावे"?

अशारितीने सभापर्वातील शिशुपाल वध पर्वाचा चव्वेचाळीसावा भाग संपला.

# सभापर्व भाग पंचेचाळीस

(शिशुपाल वध पर्व संपले)

वैशंपायन पुढे सांगतात, ते आवाहन ऐकल्यावर छेडीचा राजा शिशुपाल उत्तेजित होतो व बोलतो, "चला येऊ द्या त्या गवळ्याला, त्याला आता मी दाखवीन त्याची काय लायकी आहे ते". पुढे तो अविवेकी छेडीचा राजा वल्गना करतो कीं, तो कृष्णा बरोबर सगळ्या पांडवांचा सुद्धा विनाश करेल. तो पुढे बोलतो, "कारण कीं, त्या पांडवानीसुद्धा येथे जमलेल्या समस्त क्षत्रियांचा अपमान केला आहे व म्हणून त्यांना हा यज्ञ करण्याचा अधिकारच उरला नाही त्या प्रित्यर्थ त्यांचा विनाश क्रमप्राप्त आहे. असें माझे मत आहे". "त्या कृष्णाची ते त्यांच्या बालिशपणामुळें पुजा करत आहेत म्हणून ते केवळ दास बनण्याच्याच योग्यतेचे आहेत, त्यांना राजांचे विधी करण्याचा अधिकार नाही. म्हणून त्यांनी आपली मर्यादा ओलांडली आहे, अशांना जगण्याचा सुद्धा अधिकार नाही. त्यांचा मृत्यू माझ्या हस्ते होणार असें विधीलिखीत आहे ते होणार". असें बोलत तो शिशुपाल जोर जोरांने ओरडत कृष्णाला आव्हान देऊ लागला.

कृष्ण त्यानंतर उठला व सगळ्या उपस्थित पाहुण्या राजांना उद्देशून सांगू लागला, "अहो राजांनो, हा बुद्धी भ्रष्ट झालेला नीचकर्मा सतवत घराण्यातील स्त्रीचा पुत्र आहे, त्याच्या ह्या वागण्यावरून तुम्ही समजून घ्या कीं, हा तुम्हा आम्हा सगळ्यांचा शत्रू आहे, जरा आपल्याला त्याला इजा करण्याची इच्छा नसली तरी तो सतत आगावू होत आहे ते आपण समस्त नृपगण सांप्रत पहात अहातच. त्याच्या असंख्य पाप कर्मातील कांहीं सांगतो, आम्ही प्रागज्योतिष नगरीस गेलो होतो ते समजल्यावर आमच्या द्वारकेवर चालून गेला. आणि ती जाळून टाकली. जरी तो माझ्या बहिणीचा मुलगा असला तरी जेव्हा राजा भोज रैवताचे दर्शन घेण्यास गेला असतां ह्यांने हल्ला करून कित्येक पहारेकर्यांना ठार मारले व कित्येकांना पकडून साखळदंडांने कैद केले व स्वताच्या नगरीला घेऊन गेला. त्याची प्रत्येक कृत्ये पापयुक्त आहेत, ह्या हलकट माणसांने माझ्या पित्याचा यज्ञ मोडावा म्हणून यज्ञाचा घोडा त्याचे संरक्षण करणारे पहारेकरी बेसावध असतांना पळवला, हा पापकर्मा, विभूच्या, (अक्रूरच्या) पत्नीबरोबर अत्याचारी मार्गाने संबंध करण्याचा प्रयत्न

करत होता. जेव्हा द्वारका जाळल्यावर तो सौरवाकडे परतत होता. राजा कुरुशाचे सोंग घेऊन हा त्याच्या मामाला बरबाद करून राहिला आहे. ह्यांने भद्राला सुद्धा नाडले आहे, विशालाची राजकन्या जीचा विवाह कुरुशाशी होणार होता तेथे त्याचे सोंग घेऊन हा गेला व तिला बरबाद केले. मी त्याची अनेक पापे शांतपणे सहन करत होतो कारण, मी त्याच्या मातेला तसे आश्वासन दिले आहे. मला ह्याचे चांगले वाटते कीं, ह्या सगळ्या गोष्टी आज ह्या यज्ञाच्या निमित्ताने येथे तुम्हा सगळ्या राजांच्या समक्ष होत आहेत. तुम्हा सगळ्यांना तो माझा किती द्वेष करतो हे प्रत्यक्ष पहाण्यास मिळत आहे. तुम्हाला त्याने माझ्या पाठीत वार करण्याची एकही संधी सोडलेली नाही हेसुद्धा दिसत आहे. त्याचा हा अतिरेकी अहंकार कोणालाही विध्न करू शकतो म्हणून त्याचा वध करण्याशिवाय मला दुसरा मार्ग दिसत नाही. तसें पाहता त्यांने मला आव्हान दिलेले आहेच तेव्हां त्यात जर मी त्याचा वध केला तर त्याबद्दल कोणाला कांहीं आक्षेप आहे कां ते सांगा. त्यांने केलेल्या अशा सगळ्या पापांना मी आता क्षमा करू शकणार नाही. त्याला मी एक त्वरित मृत्यू देणार आहे. ह्या मूर्खाला रुक्मिणी पाहिजे होती, परंतु, त्याला ती मिळाली नाही. जसें अयोग्याला वेदाचे ज्ञान प्राप्त होत नाही".

वैशंपायन पुढे सांगतात, वासुदेवाचे ते शब्द ऐकताच त्या सभेत उपस्थित असलेले सगळे राजे शिशुपालाला दोष देऊ लागले. ते पाहून उन्मत्त झालेला तो छेडीचा राजा, कृष्णाचे ते सांगणे हसण्यावर नेऊन त्या सगळ्या राजांना व कृष्णाला सांगतो, "अरें कृष्णा, तुला लाज वाटत नाही किं, तुझ्या बायकोचे व माझे अनैतिक संबंध होते हे ह्या समस्त प्रतिष्ठीत राजांना सांगतांना"? एक गोष्ट लक्षात ठेव किं तू रागाच्या भरात अथवा एरव्हीच्या परिस्थितीत, तू माझे कांहीही वाकडे करू शकत नाहीस. अशा रितीने तो पापकर्मी शिशुपाल बोलत असतांना कृष्णाला त्याचे सुदर्शन चक्र आठवते. ज्याच्यापुढे कांहींही टिकत नाही. मोठे मोठे असुर त्यापुढे टिकू शकले नव्हते. त्या चक्राची आठवण होतांच ते महाप्रतापी सुदर्शन चक्र त्याच्या बोटावर आले व गरगरा फिरू लागले. त्याबरोबर तो भगवान त्या राजसभेला उद्देशून बोलतो, "ऐका पृथ्वीच्या राजांनो, मला माफ करा. ह्याच्या आईला दिलेल्या शब्दाप्रमाणे मी त्याला त्याची शंभर पापं माफ केली आहेत व आता त्याला माफ करण्याचे मला कारण उरलेले नाही अशासाठी किं, त्यांने आता

रुक्मिणी बद्दलचे बोलून एकशेएकावे पाप केले आहे. विधी लिखीताप्रमाणे ह्याचा मृत्यू माझ्या हाती आहे व म्हणून मी आता तुम्हा सगळ्यांच्या समक्ष त्याला यमाकडे पाठवणार आहे. एवढे बोलल्यावर ते प्रभावी चक्र कृष्णाच्या बोटावरून निघते व क्षणात शिशुपालाच्या मानेवर लागते आणि त्याचे शिर त्याच्या धडापासून वेगळे होऊन खाली पडते. शिशुपाल एकाद्या प्रचंड वृक्ष कोसळावा तसा जमिनीवर कोसळतो. त्या धडातून व शिरातून ते राजे पहातात किं, कांहीं प्रचंड उर्जेचा स्त्रोत बाहेर पडू लागतो व तो कृष्णाच्या पायाकडून त्याच्या शरीरात घुसतांना ते पहातात. तो चमत्कार पाहून ते सर्व राजे स्तिमीत होतात. त्या प्रसंगी जरी आकाशात ढगे नव्हती तरी पाऊस पडू लागला. ढगांचा गडगडाट असा झाला कीं, पृथ्वी थरकापून गेली. बरेच राजे ते पाहून कृष्णाकडे आश्चर्याने अवाक् होऊन पहात राहिले. कांहीं त्यांचे हात चोळत बसले व कांहीं दात ओठ चावत होते. त्याच प्रमाणें असेंही खूप होते त्यांनी कृष्णाच्या सामर्थ्याची वाहवा केली. त्यातील जे वृश्नी कुळातील होते ते खूष झालेले दिसत होते. कांही केवळ रागावलेले दिसले तर कांहीं गप्प बसलेले दिसले. निरनिराळ्या राजांच्या प्रतिक्रिया विविध होत्या. तेथे उपस्थित असलेले ऋषी कृष्णाचे गुणगान करू लागले. कांहीं सात्त्विक प्रवृत्तीचे राजे कृष्णाचे सामर्थ्य पाहून प्रसन्न झालेले दिसले. बरेच जण अशा वेगवेगळ्या प्रतिक्रीया देत तो सभागृह सोडून जाऊ लागले.

त्यानंतर युधिष्ठीर त्याच्या भावांना आदेश देतो किं शिशुपालाच्या कलेवराचा अंत्यविधी योग्य सन्मानाने करावा. त्या दमघोषाच्या पुत्राचा अशारितीने नाश झाला. त्या प्रमाणे त्याचा अंत्यविधी शस्त्रशुद्ध पद्धतीने केला जातो. त्यानंतर तेथे उपस्थित असलेला त्याचा पुत्र त्याच्या राज्याचा उत्तराधिकारी म्हणून घोषीत केला जातो.

त्यानंतर तो यज्ञविधी पुर्ववत सुरु केला जातो. त्या पांडवांच्या राज्यात सर्व प्रकारचे सुख समृद्धी आली. धन, धान्य, पशुधन सर्वकांही विपुल झाले होते व ते सर्व त्या केशवाच्या कृपेने होत होते. यथावकाश तो राजसूय यज्ञ संपन्न झाला. महाशक्तिमान सौरी त्याच्या चक्र गदा आणि सारंग धनुष्य ह्यांच्या सहाय्याने तो यज्ञ पूर्ण करण्यात मदत करत होता. बाकीचे सगळे चांगले राजे युधिष्ठीराला शुभेच्छा देत होते. सर्व विघ्नें नाहीशी झाली होती. शेवटी यज्ञाच्या अखेरीस तो स्नान करतो. तो स्वतःला बोलतो, "अरे पांडवा, केवळ

चांगल्या नशिबामुळें तू त्यात यशस्वी झाला आहेस. युधिष्ठीराला सम्राट पद प्राप्त झाले. अजमिदा वंशाचा तो सन्मान होता". त्यानंतर सर्व पाहूणे राजे त्याला बोलतात, "अरे राजा, ह्या यज्ञामुळे तुला मोठे धार्मिक श्रेयसुद्धा मिळाले आहे. तू त्या तुझ्या मांडलिक राजांचासुद्धा त्यातून सन्मान केला आहेस. आता आम्ही आमच्या राज्यात परत जाण्याचे ठरवले आहे तरी परवानगी द्यावी".

ते ऐकल्यावर तो चांगला राजा त्याच्या भावांना आज्ञा देतो कीं, "हे राजे त्याच्या मर्जीने आपल्या येथे यज्ञात भाग घेण्यासाठी आले आहेत त्यांचा यथायोग्य सन्मान करून त्यांना त्यांच्या राज्यात जाण्यासाठी व्यवस्था करावी व त्यांना त्यांच्या योग्यतेप्रमाणे आपल्या सीमेपर्यंत पोहोचवण्याचे करावे".

ती आज्ञा प्रमाण मानून ते सच्चरित्र पांडव त्या प्रमाणे त्या राजांचा यथोचित गौरव होईल असे पाहून त्यांना अलबिदा करतात. अशाप्रकारे एकेक करून ते राजे सादरपूर्वक इंद्रप्रस्थातून निघून जातात. धृष्यद्युम्न पांडवांच्या वतीने विराटाला निरोप देतो. धनंजय यजसेनाला त्या पाठोपाठ निरोप देतो. भिम भिष्माचार्यांना व धृतराष्ट्राला निरोप देतो. सहदेव अश्वत्थामा आणि द्रोणांना निरोप देतो. नकुल सुवलांना व त्यांच्या मुलांना निरोप देतो. द्रौपदीची मुलं त्या पहाडी राजांचा निरोप घेतात. अशारितीने ते क्षत्रिय राजे एकामागोमाग एक असें आपापल्या घरी निघून जातात. त्यानंतर ते ब्राह्मण निर्वाणीचे विधी झाल्यावर आपापल्या गृही निघून जातात. ते सगळे पाहूणे गेल्यावर तो वासुदेव युधिष्ठीराला बोलतो, "अरे कुंतूपुत्रा , मीसुद्धा आता तुमचा निरोप घेण्याचा वेळ आला आहे. मलासुद्धा द्वारकेची ओढ लागली आहे. तुझ्या थोर नशिबांने तुला उत्तम साथ दिली आहे म्हणून असा यज्ञ तू सिद्ध करू शकलास". ते ऐकल्यावर विनम्रतेने वाकून तो सम्राट दामोदराला बोलतो. "तुझ्या कृपेमुळें हे साध्य झाले हे मी पूर्णतया ओळखून आहे. तुझ्या कृपेमुळें ते सगळे राजे मला मान्यता देऊन राहिले हे मी कधीही विसरणार नाही. तुझ्यामुळेंच आम्हाला त्या सगळ्या खंडणी मिळाल्या आहेत. आणि आम्ही श्रीमंत झालो आहोत. तू नसलास कीं, आम्हाला करमत नाही. तुला जाण्याची परवानगी देतांना मला गहिवरून येते आहे. परंतु, तुला तुझ्या द्वारकेलासुद्धा न्याय द्यावयाचा आहे हे आम्ही समजू शकतो". ते बोलणे झाल्यावर कृष्ण युधिष्ठीरा सह कुंतीला भेटण्यास जातो . तीला

बोलतो, "अहो माझ्या आत्ये आता तुझे पुत्र सम्राट झाले आहेत. त्यांच्या यशाला आता मर्यादा राहिल्या नाहीत. आता मी माझ्या घरी जाण्याची परवानगी तुझ्याकडे मागण्यासाठी आलो आहे. तरी ती द्यावी". त्यानंतर कृष्ण द्रौपदीचा निरोप घेतो. त्यानंतर स्वताच्या बहिणीचा, सुभद्राचा निरोप घेतो. त्यानंतर तो नित्याचे विधी उरकून ब्राह्मणांना पुजतो. त्यांना अर्घ्य देतो. त्यानंतर त्याचा सारथी दरूक ढगासारखे स्वरुप असलेला त्याचा रथ घेऊन येतो. त्यानंतर तो रथाभोवती एक प्रदक्षणा करतो व नंतर त्यात चढतो. तो द्वारकेला निघतो. त्याच्या रथामागे पांच पांडव पायी चालत निघतात ते सीमेपर्यंत जातात. कृष्ण थोडा पुढे गेल्यावर त्याचा रथ थांबवतो. रथातूनच तो युधिष्ठीराला बोलतो, अरे राजाधिराजा आता तू तुझ्या प्रजेवर लक्ष दे आणि त्याना सुखी करावेस. तेंच तुझे कार्य आहे ते करशिल तर तुझ्या राज्यात कधीही कांहीं कमी होणार नाही. ज्या राज्याचे राजकर्ते आपले कर्तव्य योग्य प्रकारे पार पाडत नाहीत त्यांच्या राज्यावर निसर्ग रुष्ट होतो म्हणून तुझी प्रजा सुखी राहिल असे पहा. जे तुला मानतात त्यांचा आदर कर, त्यांच्या सगळ्या योग्य मागण्याकडे लक्ष ठेव. जसे इंद्र देवांचे हित पहातो तसे तू तुझ्या जनतेचे पहावेस. ह्या यज्ञानंतर तुझी जबाबदारी वाढली आहे ते लक्षात असू दे". एवढे सांगून मग तो कमलनयनी जनार्दन द्वारकेसाठी त्वरित निघून गेला. सगळे गेले तरी दुर्योधन, राजा सुवल व त्याचा मुलगा आणि शकुनी तेथेच वस्तीला त्या स्वर्गीय महालात राहिले होते.

ब्रह्मराक्षस मात्र हसत असतात कारण त्या यज्ञाच्या दरम्यान जो शिशुपालाचा वध झाला त्यामुळें पांडवांवर भविष्यात मोठी गंडांतरं येणार होती. अशारितीने सभा पर्वातील शिशुपाल वधाचा पंचेचाळीसावा भाग संपला.

## महाभारत सभापर्व खंड पहिला समाप्त

## भाषांतरकाराचा परिचय -

मी अशोक कोठारे, माझ्या वयाची ७६ वर्षे झाली आहेत. गेली कित्येक वर्षे मी विविध प्राचीन ग्रथांचा एक कुतुहल म्हणून अभ्यास करत असतो. त्या काळात मला समजले कीं, आपल्या प्राचीन शिक्षण पद्धतीत चार ग्रंथांचे महत्व होते. त्यात मनुस्मृती, महाभारत, रामायण आणि योगवासिष्ठ हे महत्वाचे होते. आपल्या पूर्वीच्या शिक्षण पद्धतीत ह्या ग्रंथांचे वाचन करण्याची प्रथा होती. नंतरच्या काळात इंग्रजांनी त्यांची शिक्षण पद्धती येथे रुजवली व आपली पाठशाळा पद्धती संपुष्टात आली. आपल्या शिक्षण पद्धतीत अक्षर ओळख, नितीशास्त्र, गणित एवढेच शिकवले जात. त्याशिवाय शिकतांना घोकंपट्टी करण्याचे महत्व होते. ते सगळे आता इतिहास जमा झालेले असले तरी त्याची उपयुक्तता नाकारता येणार नाही. म्हणून एक प्रयत्न मी करावयाचे ठरवले. मी एक अतिसामान्य अभ्यासक आहे तरी व्यासंग मोठा आहे. त्या प्रमाणे, मनुस्मृती प्रथम ई-साहित्यच्या माध्यामाने तुम्हाला दिली. त्याचे चांगले स्वागत झाले आहे. त्यामुळें माझा उत्साह वाढला आणि महाभारताचे, 'जसे आहे तसे', अशाप्रकारचे भाषांतर आता देत आहे. त्याचे साधारणपणे २५ खंड होणार आहेत. संपूर्ण महाभारत येण्यास बराच अवधी लागणार आहे. इतर मंडळी महाभारताचे भाषांतर करतांना त्याचा आकार आटोपशीर करण्यासाठी त्यातील शिकवणूकीचा भाग व्यर्थ समजून सोडून केवळ कथाभागाचेच भाषांतर करतात त्यामुळे एक शैक्षणिक पुस्तक म्हणून असें भाषांतर रहात नाही. मी सगळ्या नितीशास्त्र शिकवणार्या कथा जशाच्या तशा ठेवल्या आहेत. कांहीं जागी विषय समजणे सोपे व्हावे म्हणून मी टीपा दिल्या आहेत कारण मला माहित आहे किं, ह्याचे वाचन करणारे मराठी भाषिक सामान्य आहेत. कोणी विद्वान वाचक असेल तर त्याला त्या टीपांची गरज वाटणार नाही.

आता थोडे माझ्याबद्दल देत आहे. तसे पाहता अशा कामात कोणी संस्कृतचा प्राध्यापक असला पाहिजे असें कोणाला वाटेल मग मी एक इंजिनीअर कां हे काम करत आहे असा प्रश्न पडेल पण त्याचे उत्तर असें आहे किं, एवढे मोठे काम करण्यास कोणी तयार होत

नाही आणि ते सुद्धा फुकट करणारा विद्वान मला मिळाला नाही. ज्या कोणाला मी त्याचे महत्व सांगितले ते सगळे त्या कामासाठी भरपूर मानधन मागू लागले मग मी ठरवले आपणच ते करावे. गेली २५ वर्षे मी निवृत्त जीवन जगत आहे, बराच समय माझ्याकडे आहे मग आपणच हे करावे अशा विचारांने ते करावयास घेतले व प्रथम मनुस्मृती दिली आता महाभारत देण्याचा प्रयत्न चालू आहे. त्यासाठी दैवयोगांने ई-साहित्य सारख्या ध्येयवादी मंडळींची साथ मिळाल्यामुळें माझा उत्साह द्विगुणित झाला.

१९८५ पर्यंत मी माझा उद्योग करत होतो. कारखाना भाईदरला व रहाणार चेंबूरला त्यामुळें येण्याजाण्याची दगदग माझ्या प्रकृतीला झेपली नाही व मी हृदयाच्या झटक्याने आजारी झालो. त्यानंतर डॉक्टराच्या सल्ल्याने मी सगळे उद्योग बंद करून घरात बसलो. थोडी बचत केली होती त्याच्या जोरावर आज मी माझे साधे जीवन जगत आहे. पैशापाठी लागण्याचा स्वभाव माझा मुळातच नाही. सुरुवातीपासून वाचनाचा छंद होता त्यात कथा कादंबर्या वाचण्यात रस नव्हता. मी कांहीं माहिती देणारे ग्रंथच वाचत असें. त्यामुळें अनेक विषयांचा व्यासंग झाला त्यात ही चार पुस्तक पुढच्या पिढीस विशेष उपयुक्त ठरतील असे मला जाणवू लागले तेव्हा त्यांची भाषांतरे करण्याचे ठरवले. त्या व्यतिरीक्त माझे लिखाण शेती विषयांत बरेच आहे. कॉटिनेंटलचे कै. रत्नाकर कुलकर्णी ह्यांनी आग्रहपूर्वक माझ्या कडून 'सेंद्रिय खत निर्मिती उद्योग', नांवाचे पुस्तक लिहून घेतले, मराठीतील हे पहिले खतविषयक पुस्तक आहे. त्याच्या चार आवृत्या झाल्या आहेत. बळिराजा मासिकाचे संपादक भोसले ह्यांच्या आग्रहामुळें त्यांच्या मासिकांत मी १९९२ ते २००५ पर्यंत शेतकर्यांना शेतीचे पद्धतशीर शिक्षण एका लेखमालेच्या द्वारा दिले आहे. त्यात ६५ लेख लिहीले. त्या शिवाय संपादक भोसल्यांच्या आग्रहामुळें निसर्गशेतीचे तंत्र शिकवणारा एक अभ्यासक्रम, 'व्यावहारिक निसर्गशेती अभ्यासक्रम' तयार करून तो स्वखर्चांने शेतकर्यांसाठी १९९४ साली उपलब्ध केला. त्यामुळें आपल्या महाराष्ट्रात निसर्गशेतीचा प्रचार झाला. आता ह्या उतारवयात जेव्हां शरीर साथ देण्यात कुचराई करू लागले आहे,

माझे सगळे लक्ष आपल्या हिंदू मान्यतांचा मराठी माणसाला परिचय करण्यावर आहे. त्यासाठी महाभारत, रामायण व योगवासिष्ठ ह्यांचे 'जसे आहे तसें' अनुवाद करण्यावर भर आहे. माझे ज्योतिष शास्त्राचे ज्ञान चांगले आहे. त्याप्रमाणे जर गोष्टी होणार असतील तर मी २०२० नंतर नसेन. त्यासाठी हे सगळे उपक्रम लवकरात लवकर उरकण्याचा मानस आहे.

आता कोणाला प्रश्न पडेल कीं, हा इंजिनियरींगचा माणूस शेतीवर कसें लिहीतो? त्या बद्दल थोडे लिहीतो. माझ्या कारखान्यात बहुतेक कामगार उरण, अलिबाग, वसईचे होते. शिक्षण बेताचे पण एकादे अवजार कसें वापरावयाचे ते शिकवले किं, ते त्यात लवकरच निष्णात होत होते. त्या मुलांना मी विचारले किं, ते एवढे हुशार असूनही शेती कां करत नाहीत? त्यांचे एकच उत्तर असें, मालक शेतीत भागत नाही. मग मी ठरवलें शेतीशास्त्राचा अभ्यास करावयाचा. अभ्यासाचाच छंद असल्यामुळें तो सुरु झाला. त्यात मला लवकरच समजले कीं, शेतीचा संबंध बॉटनी पेक्षा मायक्रोबायॉलॉजीशी जास्त आहे. मग मी त्या विषयाचा अभ्यास करून त्यात लवकरच पारंगत झालो. त्या अभ्यासाप्रमाणे मी कांहीं तंत्र विकसित केले व ते अजमावण्यास सुरुवात केली. त्यात अपेक्षेप्रमाणे परिणाम मिळू लागले त्याप्रमाणे एक शेतीतंत्र विकसित होत गेले. माझ्या कामगाराच्या शेतावर माझे प्रयोग होत होते, त्यात माझा पैसा लागत होता व त्यांचे कुटूंबिय काम करत होते. त्यावेळी मी चांगला तरुण होतो व उत्साहसुद्धा होता. माझ्या तंत्राने शेती उत्तम होते हे मी समजलो व ते सगळे तेथेच संपले. ते सगळे १९८२ ते १९८५ अशा सालात झाले होते. मीसुद्धा ते सगळे विसरून गेलो. परंतु, १९९२ साली मोठा दुष्काळ पडला होता महाराष्ट्रात त्यावेळी मी एक दृष्य टीव्हीवर पाहिले, त्यात एक ग्रामीण महिला एका खोल विहीरीत उतरून वाटीने पाणी काढून बालदीत भरत होती. त्यावेळी मला रहावले नाही व विचार केला, माझ्या ज्ञानाचा जर उपयोग होणार नसेल तर काय कामाचे ते ज्ञान. मी एक लेख लिहीला व दैनिक नवशक्तिला पाठवला. तो लेख त्यांनी प्रसिद्ध केला नाही. मग मी तो लेख बळीराजा

मासिकात पाठवला. त्यात तो छापून आला. तसे पहाता नवशक्तिनेसुद्धा तो प्रसिद्ध केला. त्यानंतर बळिराजाच्या वाचकांची प्रश्न विचारणा सुरु झाली व मी माझे शेतीचे ज्ञान त्यांना त्या मासिकात लेख लिहून देऊ लागलो. अशारितीने माझे शेतीत लिखाण भरपूर झाले. त्याबद्दल आधी लिहीले आहे.

आता थोडे माझ्या ब्लॉगपोस्ट बद्दल लिहीतो. हिंदूस्तानात २००८ साली इंटरनेटवर ब्लॉग सुरु झाले व मी त्यात माझे ब्लॉग सुरु केले. माझ्या ख्रिस्ती धर्माबद्दलच्या वादग्रस्त परंतु शास्त्रशुद्ध विचारांमुळें पहिले ब्लॉग बंद झाले. माझे पूर्वी पांच ब्लॉग होते. त्यात मी अभ्यासांने जे संशोधन करून शोधून काढत असें, ते लिहीतो. त्यात अनेक विषयावरील माझे संशोधित साहित्य प्रसिद्ध करत असतो. त्यात ब्राह्मण धर्म, जैन धर्म, ख्रिस्ती धर्म, इस्लाम, अर्थ, न्याय, नितीशास्त्र, राजकारण अशा विषयांवर बरेच लिहीत असतो. ते तुम्ही वाचू शकता. एकच ब्लॉग मराठी आहे बाकीचे इंग्रजीत आहेत. सिलीकॉन मधील ब्लॉग इस्लाम बद्दलच्या माझ्या संशोधनाचे शास्त्रशुद्ध लिखाण आल्यानंतर तो ब्लॉग बंद झाला आहे. गुगलवरील ब्लॉग मात्र जोरात चालू आहेत. माझे अशा विषयावरील विचार नाकारता येणार नाहीत असें सत्याला धरून असल्यामुळे जेव्हां मला कोणी विरोध करतो तेव्हां त्यांना मी नम्रपणे सांगतो, कृपया माझ्यावर अब्रुनुकसानीचा दावा करावा, ते झाले किं, ते लोक गप्प होतात. कारण, जर ते तसा दावा करतात तर त्यात तेंच हरण्याचा संभव जास्त असतो. एवढेच नाही तर त्यांच्या खोटेपणाचा जाहिर बभ्रा होईल ते त्यांना परवडण्यासारखे नसते. मी प्रचारकी थाटाचे लिखाण करत नाही. जे समजते ते विज्ञानाच्या आधाराने सिद्ध करूनच लिहीतो, आजच्या काळात असें लिखाण बर्याच गटांना आवडत नाही. बर्याच लोकांचे खूनसुद्धा झाले आहेत हे आपण जाणताच, म्हणून मी शक्यतर माझ्याबद्दल कांहीं लिहू इच्छित नाही. सत्यापेक्षा सोइस्करचा आज जमाना आहे. माझे जीवनातील अनुभव लिहीले तर ते एक वाचनीय पुस्तक होईल पण त्यात सर्व वादग्रस्त विषय पुढे येतील. मी मांडलेला कोणताही मुद्दा आजवर कोणालाही खोटा

ठरवता आलेला नाही. जाता जाता, जैन धर्माबद्दलचा वाद सांगतो एक उदाहरण म्हणून, १९०२ मध्यें सर जगदीशचंद्र बोस ह्यांनी वैज्ञानिक पुरावे देऊन जे सिद्धांत मांडले त्याचा पुरावा देऊन मी लिहीले कीं, हल्ली जो जैन धर्म प्रचारात आहे तो तीन हजार वर्षापूर्वीच्या अडाणीपणावर आधारित आहे, त्यातील सगळेंच विचार अज्ञानाधारीत म्हणून खोटे आहेत. एवढेच नाही तर व्यवहारिक जीवनात तो धर्म पाळणे केवळ अशक्य आहे. त्यामुळें जैन उखडले पण सुदैवाने ते खूनखराबा करणारे नसल्यामुळें वाचलो.

शेवटी माझ्या तब्यती बद्दल लिहीतो. मुळातच माझी प्रकृती तोळामासा असते त्यात २०१० साली बेस्टच्या बसने मला ५० फूट लांब फेकल्यामुळें पुरता जायबंद झालो होतो. मेंदूला आघात झाल्यामुळें माझी स्मरणशक्ती गेली होती. दोन बरगड्या तुटल्या होत्या. माझे शौंच व मुत्र ह्यांवर नियंत्रण राहिले नव्हते. दीड वर्ष तसेंच गेले. त्यावेळी माझे वय ६८ होते. केवळ दैव बलवत्तर म्हणून आज मी पूर्ववत झालो आहे तरी कोठल्याही वाहनाने प्रवास करण्यास परवानगी नाही. म्हणून मी कोठेही जात नाही. गेलेली स्मृति पुनः आली व आता सगळे बरे चालले आहे. त्या काळातील अनुभव विशेषकरून माझ्या ज्ञान साधनेचे, मोठे रोचक आहेत. तूर्तास एवढे पुरे.

ई-साहित्यच्या पदाधिकार्यांच्या आग्रहामुळें ही माझ्याबद्दली खरी माहिती सविस्तरपणे दिली आहे. जर शक्य असेल तर त्यातील मजकुरात बदल न करता तो प्रसिद्धीस घ्यावा.

अशोक कोठारे,

२३- २ २०१८

ashokkothare@gmail.com ,

ashokkothare@yahoo.co.in

## ई साहित्य प्रतिष्ठान -

मराठी भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणार्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार न हजार प्रती छापल्या जात. पांच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी! आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच लाख वाचकांपर्यंत जात आहेत. वर्षाला अर्धा कोटी डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर ऑर्डर करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायला लागली आहेत. सुसाट सुटल मराठीचं वारु. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठीवरील प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगांने सुसाट सुटलेल्या मराठीच्या गाडीला आता कोणी थांबवू शकत नाही. या धूमधडक क्रांतीत साहभागी व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही कितीही वाचक आणा. ते शंभर आणतील आणि ते हजार आणतील. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला कुठली पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत ते आपल्याला टिव्ही, पेपरची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवून देऊ.

ई साहित्यची पुस्तके www.esahity.com वरून डाऊनलोड करा.

esahity@gmail.com ला कळवून ई-मेलने मागवा. किंवा 7710980841हा नंबर सेव्ह करून ठेवा, या नंबरला तुमचे नांवाने Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा.

लिंक ई साहित्यचे app.https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.www.esahitybooks ह्या लिंकवर उपलब्ध आहेत. ते download करा. हे सर्व मोफत आहेत.

धन्यवाद